म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय कादंबरी
दा. क्र. ९५६४

# रासेलस

या इंग्रजी ग्रंथाचें

# मराठी भाषांतर

( सन १९३८ )

IRBK-0101564

किंमत एक रुपया १

# रासेलस

या इंग्रजी ग्रंथाचें

# मराठी भाषांतर

कै० कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनीं केलें

तें

शंकर नरहर जोशी, चित्रशाळा प्रेस, १०२८ सदाशिव पेठ, पुणें,

यांनीं

" चित्रशाळा " छा० छा० प्रसिद्ध केलें.

आवृत्ति आठवी.

IRBK-0101564

IRBK-0101564

म. ग्रं. सं. ठाणें, ग्रंथालय शाखा.
वा. क्र. ७५६८ नों. दि.
वाचा

ग्रंथ संग्रहालय, ठाणें
अनुक्रम ३००८६
विभाग २२२८
क्रमांक
नों. दि.

हें पुस्तक सन १८६७ च्या २५ व्या ॲक्टाप्रमाणें नोंदून सर्व हक्क
प्रकाशकानें स्वाधीन ठेविले आहेत.

# पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना.

हें भाषांतर सुमारें पांच वर्षांपूर्वी शाळापत्रकाच्या अंकांतून पहिल्यानें प्रसिद्ध झालें. तेव्हांपासून तें सर्व एके ठिकाणीं छापण्याविषयीं पुष्कळांनीं सूचना केल्या होत्या; व गेल्या सालीं याच महिन्यांत या भाषांतराविषयींची जाहिरात ज्ञानप्रकाशांत छापविली होती. पण कित्येक कारणांवरून तो बेत आजपर्यंत लांबणीवर टाकण्यांत आला. आतां ते सर्व भाग एकत्र करून व नीट तपासून या पुस्तकाच्या रूपानें लोकांस सादर केले आहेत.

ही प्रस्तावना लिहिणारा पुढील भाषांतराचा कर्ता नव्हे; यास्तव त्यासंबंधें तिऱ्हाईतपणानें येथें थोडेसे शब्द बोलण्यास त्यास फारशी हरकत आहे, असें वाटत नाहीं. पुढील ग्रंथ आमच्या वाचकांस तीन प्रकारांनीं उपयोगी पडेल अशी आशा आहे. एक तर तो कादंबरीरूप आहे म्हणून, म्हणजे कल्पित गोष्टींत जसें चमत्कारिक वर्णन, खुबीदार भाषणें वगैरे असतात, तसें यांत असल्यानें त्यांचें मनोरंजन होईल; आतां हें खरें कीं, जे अगदींच अप्रबुद्ध असतील व कल्पित गोष्टी म्हटल्या म्हणजे त्यांत अद्‌भुत रस खेळला पाहिजे तरच काय ती मजा, इतकाच काय तो त्यांच्या स्वरूपाचा बोध ज्यांस झाला असेल, त्यांची प्रस्तुत ग्रंथ वाचून अगदीं निराशा होईल, व वरील आमची शिफारस केवळ आपमतलबाचीच आहे असेंही म्हणण्यास ते चुकणार नाहींत. अशा हिरमुष्टी होणाऱ्या वाचकांचें समाधान होण्यास येथें एकच गोष्ट त्यांस अगोदर कळविण्यासारखी आहे ती ही कीं, जरी त्यांस हा ग्रंथ प्रथमतः अगदीं निरस वाटला तरी सदभिरुचि व मार्मिकपणा यांचा त्यांचे ठायीं जसजसा अधिकाधिक विकास होईल, तसतसा प्रतिकूळ अभिप्राय त्यांचा तेच खोडूं लागतील; व हें बहुतेक अंशीं त्यांनीं केलें म्हणजे ग्रंथांचे गुण समजण्याची शक्ति त्यांचे ठायीं बरीच आली, असें त्यांनीं समजावें. असो. दुसरें असें कीं, आजवर जीं इंग्रजी ग्रंथांचीं भाषांतरें मराठींत झालीं त्यांचा उद्देश केवळ मनोरंजनाचा होता. तसेंच सर्वथा या ग्रंथांत नाहीं. 'अरेबियन नाईट्स्' वगैरे ग्रंथांत जसा मुख्यतः कल्पनाशक्तीचाच खेळ आहे, तसें येथें नसून ती येथें केवळ गौण आहे; व संसारांतील नानाविध स्थितींच्या गुणदोषांचें

व प्रसंगोपात दुसऱ्या अनेक विषयांचें प्रतिपादन करतांना मूळ ग्रंथकर्त्यानें आपली सूक्ष्म विवेचनशक्तीच विशेषेंकरून प्रगट केली आहे. यास्तव प्रतिपादनरूप ग्रंथाचा आपल्या भाषेंत हा पहिलाच मासला होय. तिसरा उपयोग भाषेच्या संबंधानें सांप्रतकाळीं आपल्या मराठी भाषेकडे बऱ्याच लोकांचें लक्ष लागलेसें दिसतें; निदान इतकें तरी खरें कीं, युनिव्हर्सिटींतून पसार झालेल्या विद्वानांनीं आपलें कुलव्रत आजपर्यंत अगदीं सोडलें नाहीं, व पुढेंही सोडतीलसा रंग दिसत नाहीं. तरी एकंदर लोकांत मराठी लिहिण्याचा व वाचण्याचा प्रघात निःसंशय पुष्कळ वाढला. या गोष्टीचें उत्कृष्ट प्रमाण वर्तमानपत्रें, मासिक पुस्तकें व इतर ग्रंथ, यांचा जो अलीकडे सुकाळ होत चालला आहे, तें होय. आतां इतक्या सर्वांत नांवाजण्यासारखें असें जरी फारच थोडें निघेल, तरी आज हजारों वर्षें एकंदर लोकांच्या मताची हालचाल जी अगदींच बंद पडली होती ती निदान कांहीं अंशीं तरी पुनः सुरू झाल्याचें चिन्ह दिसूं लागलें आहे, ही गोष्ट आम्हांस अत्यंत अभिनंदनीय वाटते. इतकेंच मात्र कीं, अशा ऐन संधींत लोकांच्या भाषेस, अभिरुचीस वगैरे चांगलें वळण लावण्यास कोणी विद्वानांनीं उत्साहपूर्वक पुढें होऊन झटलें पाहिजे. असो. सांप्रतचा यत्न त्याच उद्देशास अनुसरून होय. मराठी भाषेच्या सरणीस इंग्रजी ग्रंथांतील विचार कसे उतरावे,—म्हणजे मुळांतील अर्थात् उणेंअधिक कोठें घालावें, कोणत्या ठिकाणीं कसा फेरफार करावा; वगैरे ज्या नानाप्रकारच्या युक्त्या भाषांतरकर्त्यास प्रसंगवशात् लढवाव्या लागतात, त्यांची समजूत पुढील ग्रंथावरून बरीच पडेल, असा भरंवसा आहे. तसेंच शब्दांचें व अर्थांचें सौष्ठव व स्वारस्य हींही मराठी अभ्यास करणारांस लक्षपूर्वक वाचतांना कळण्यासारखीं आहेत.

शेवटीं आमच्या वाचकांस इतकीच विनंति करणें आहे कीं, अजूनही नजरचुकीनें जर पुढील ग्रंथांत कोठें कोठें अशुद्धें राहिलीं असलीं तर त्यांची त्यांनीं माफी करावी.

पुणें, सन १८७६.

विष्णुशास्त्री चिपळूणकर.

# अनुक्रमणिका.


| विषय | | | | | पृष्ठ |
|---|---|---|---|---|---|
| भाग १ | ... | ... | ... | ... | १ |
| भाग २ | ... | ... | ... | ... | ४ |
| भाग ३ | ... | ... | ... | ... | ८ |
| भाग ४ | ... | ... | ... | ... | १० |
| भाग ५ | ... | ... | .... | ... | १४ |
| भाग ६ | ... | ... | ... | ... | १६ |
| भाग ७ | ... | ... | ... | ... | २० |
| भाग ८ | ... | ... | ... | ... | २२ |
| भाग ९ | ... | ... | ... | ... | २६ |
| भाग १० | ... | ... | ... | ... | ३० |
| भाग ११ | ... | ... | ... | ... | ३४ |
| भाग १२ | ... | ... | ... | ... | ३८ |
| भाग १३ | ... | ... | ... | ... | ४५ |
| भाग १४ | ... | ... | ... | ... | ४८ |
| भाग १५ | ... | ... | ... | ... | ५० |
| भाग १६ | ... | ... | ... | ... | ५२ |
| भाग १७ | ... | ... | ... | ... | ५७ |
| भाग १८ | ... | ... | ... | ... | ५९ |
| भाग १९ | ... | ... | ... | ... | ६३ |
| भाग २० | ... | ... | ... | ... | ६४ |
| भाग २१ | ... | ... | ... | ... | ६७ |
| भाग २२ | ... | ... | ... | ... | ७१ |
| भाग २३ | ... | ... | ... | ... | ७४ |
| भाग २४ | ... | ... | ... | ... | ७५ |

| विषय | पृष्ठ |
|---|---|
| भाग २५ ... ... ... ... | ७७ |
| भाग २६ ... .... ... ... | ८० |
| भाग २७ ... ... ... ... | ८४ |
| भाग २८ ... ... ... ... | ८७ |
| भाग २९ ... ... ... ... | ९१ |
| भाग ३० ... ... ... ... | ९६ |
| भाग ३१ ... ... ... ... | १०० |
| भाग ३२ ... ... ... | १०३ |
| भाग ३३ ... ... ... ... | १०५ |
| भाग ३४ ... .... ... ... | १०६ |
| भाग ३५ ... ... ... ... | ११० |
| भाग ३६ ... ... ... ... | ११४ |
| भाग ३७ ... ... ... ... | ११५ |
| भाग ३८ ... ... ... ... | ११७ |
| भाग ३९ ... ... ... ... | १२२ |
| भाग ४० ... ... ... ... | १२९ |
| भाग ४१ ... ... ... ... | १३२ |
| भाग ४२ ... ... ... ... | १३३ |
| भाग ४३ ... ... ... ... | १३४ |
| भाग ४४ ... ... ... ... | १३६ |
| भाग ४५ ... ... ... ... | १३८ |
| भाग ४६ ... ... ... ... | १४१ |
| भाग ४७ .... ... ... ... | १४६ |
| भाग ४८ ... ... ... ... | १५० |
| भाग ४९ ... ... ... ... | १५४ |

अनुक्रम ३००५८
विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय

# रासेलस.

## भाग पहिला.

—:o:—

मनांत जे कल्पनेचे अनेकविध तरंग उठतात, ते ज्यांस खरे भासत असतील, व आशेनें उत्पन्न केलेल्या मृगजलामागें उत्कंठेनें जे धांवत असतील; तसेंच ज्या गोष्टी पुढें होतीलशा लहानपणीं वाटतात, त्या मोठेपणीं खरोखरी सिद्ध होतील, किंवा आज ज्यांत न्यूनता आहेत, त्या उद्यां पूर्णतेस पावतील असें ज्यांस वाटत असेल, त्यांनीं हबशी देशाचा राजपुत्र रासेलस याचा हा पुढील वृत्तांत चित्त देऊन ऐकावा.

रासेलस हा, हबशी देशचा एक मोठा प्रतापी बादशहा होता, याचा चौथा पुत्र. या बादशाहाच्या राज्यांत आफ्रिका खंडांतील परम विख्यात जी नील नदी ती उत्पन्न होते. आणि तेथून पुढे तिचें पात्र मोठें विशाल होऊन ती मिसर देशांत वहात गेली आहे; तिच्या पाण्यानें त्या मिसर देशांत इतकें पीक होतें कीं, तेणेंकरून अर्ध्या पृथ्वीस धान्याचा पुरवठा होतो.

उष्ण देशांतील कितीएक मुलखांत फार प्राचीन काळापासून पिढ्यानपिढ्या अशी चाल चालत आली होती कीं, राजघराण्यांतील मुलांस व मुलींस, त्यांची गादीवर बसण्याची पाळी येई तोंपर्यंत, एकीकडे बांधलेल्या अशा एकाद्या जागीं प्रतिबंधांत असल्याप्रमाणें ठेवावें. त्या चालीप्रमाणें रासेलस ह्यास कितीएक राजपुत्र व राजकन्या यांसहवर्तमान एकीकडे बांधलेल्या एका वाड्यांत ठेविलें होतें.

हबशी देशांत राजपुत्रांस ठेवण्याकरितां प्राचीन काळापासून एका मोठ्या प्रशस्त गुहेची योजना केली होती. आतां ही योजना प्राचीन काळच्या राजांच्या शहाणपणानें झाली असो, किंवा त्यांच्या राजकीय कारणानें झाली असो, ती-विषयीं निश्चित कांहीं समजत नाहीं. ही गुहा आम्हारा राज्यांत होती. या गुहे-सभोंवतीं डोंगर होते, व त्या डोंगरांचीं शिखरें त्यांच्या मध्यभागाच्या पुढें झुक-

लेलीं होतीं. या डोंगरांपैकीं एका डोंगरास एक विवर होतें. तेवढी मात्र त्या गुहेंत जावयास वाट होती. हें विवर मूळचेंच होतें किंवा मनुष्यकृतीनें केलें होतें. याविषयीं बहुत दिवस वादच होता. या विवराच्या बाहेरच्या बाजूस मोठी किर्र झाडी होती. तिनें त्याचें तोंड लपून गेलें होतें, व त्याच्या आंतल्या तोंडाला प्राचीन काळंच्या कारागिरांनीं घडलेला लोखंडी दरवाजा बसविला होता. तो इतका मोठा होता कीं, तो यंत्रावांचून मनुष्यांस लावतां किंवा उघडतां येत नसे.

चोहोंकडल्या डोंगरावरून ओढे खालीं येऊन त्या गुहेंत जिकडे तिकडे हिरवळ झालें होतें, व तेथें नानाप्रकारचे पदार्थ पिकत असत. तसेंच चोहोंकडलें पाणी एकवट होऊन त्या गुहेच्या मध्यभागीं एक मोठा तलाव झाला होता. त्या तलावांत सर्व जातीचे मासे व हंसादिक जलपक्षी होते. तळें भरून जास्त झालेल्या पाण्याची नदी होऊन ती डोंगराच्या उत्तरेच्या बाजूस एक दरी होती तींत शिरली होती;आणि बाहेर जातांना एका खडप्यावरून पडत पडत व मोठा भयंकर आवाज करीत करीत ती लांब जाऊन तो आवाज ऐकूं येईनासा होई.

डोंगरांच्या बाजू वृक्षांनीं झांकून गेलेल्या असत व ओढ्यांचीं तीरें फुलझाडांनीं चित्रविचित्रवर्ण दिसत. वारा सुटला असतां चोहोंकडून सुगंध चाले व दर महिन्यांत त्या त्या ऋतूंत होणारीं फळें पक्व होऊन झाडें लवलेलीं असत. गवत खाणारीं सर्व प्रकारचीं माणसाळलेलीं जनावरें व रानजनावरें त्या विस्तीर्ण गुहेंत निर्भयपणें इकडे तिकडे फिरत. त्या गुहेच्या एकाभागीं शेळ्यामेंढ्यांचे व गुरांचे कळप कुरणांत चरत; व दुसऱ्या भागीं मैदानांत हरणें, ससे, सांबरें, इत्यादि शिकारीचीं जनावरें बागडत व खेळत असत.कोठें खडकावरून चपळ करडें उड्या मारीत असत. कोठें कोठें धूर्त माकडें व वानरें वृक्षांवर बसून चमत्कारिक चेष्टा करीत; कोठें कोठें गंभीर हत्ती शीतळ छायेंत विश्रांति घेत बसलेले असत, जगांतलि सर्व तऱ्हा त्या स्थळीं एकत्र केल्या होत्या, व सृष्टींतलि सर्व सुखें एके जागीं मिळाल्यामुळें तेथें दुःखाचें नांवही ऐकूं येत नव्हतें.

गुहा मोठी अफाट असून तेथलि जमीन पिकाऊ असल्यामुळें तेथें राहणाऱ्या लोकांच्या निर्वाहाचे सर्व पदार्थ तेथल्या तेथेंच पिकत; ऐषआरामाचे व उपयोगाचे जिन्नस वर्षांतून एक वेळ, बादशाहा आपल्या मुलांस भेटावयास येई तेंव्हां पुष्कळ घेऊन येत असे. बादशाहाची स्वारी वाजत गाजत आली म्हणजे लोखंडी दरवाजा उघडे. तो तेथें आठ दिवस राही, व तितक्या काळांत त्या गुहेंत राहणाऱ्या

सर्वांस एकंदर ताकीद असे कीं, तो एकांतवास आनंददायक होण्याविषयीं ज्यास जी युक्ति सुचेल, ती त्यानें कळवावी व मंडळीच्या चित्तास करमणूक होऊन वेळ सुखानें जाईलसें करावें. या प्रसंगीं कोणी जी इच्छा प्रगट करीत ती तत्काळ सिद्ध होई. हे उत्सवाचे दिवस आनंदांत जावे म्हणून मौज करणाऱ्या गुणी लोकांस बोलावीत असत. मोठमोठे गवय्ये व बजवय्ये राजपुत्रांपुढें आपली गायनकला व वादनकला दाखवीत व कलावंतिणी नाचून आपली करामत दाखवीत. मनांत आशा कीं, आपली वाहवा झाल्यास या नांवानें प्रतिबंधाच्या परंतु वास्तविकपणें सुखाच्या स्थळीं सर्व आयुष्य घालवावयास सांपडेल; कारण या स्थळीं प्रवेश होणें तो नवीन नवीन चमत्कार दाखवून मनोरंजन करण्याचें ज्यांच्या आंगीं कसब असे त्यांचा मात्र होई, इतरांचा होत नसे. या स्थळीं राहणाऱ्यांस दिसण्यांत सुख व निर्घोरपणा हीं इतकीं आहेतशीं दिसत असत कीं, जे नवीन तेथें येत त्यांस अशी इच्छा होई कीं, अशी स्थिति सदोदित असावी. आणि जे एकदां तेथें राहिले, त्यांस पुन्हां कदापि बाहेर येऊं देत नसत; त्यामुळें या स्थळीं पुष्कळ दिवस राहिले असतां मनाची स्थिति कशी होते, हें बाहेरच्या लोकांस कदापि समजत नसे. याप्रमाणें स्थिति असल्यामुळें दरवर्षी मनोरंजन करण्याच्या नवीन नवीन युक्ति उत्पन्न करून नवीन नवीन लोक मोठ्या हौसेनें बंदींत येऊन पडण्याकरितां झटत !

राजपुत्र ज्या वाड्यांत राहात होते, तो वाडा वर जो तलाव सांगितला त्या तलावाच्या सपाटीपासून सुमारें तीस हात उंचीच्या एका उंचवट्यावर बांधला होता. या वाड्यांत पुष्कळ चौक होते व ते ज्यांच्या ज्यांच्याकरितां बांधले होते, त्यांच्या त्यांच्या पदवीप्रमाणें कमीजास्त शोभिवंत केले होते. या इमारतींत सर्व ठिकाणीं वरच्या आंगीं दगडाचे कमानदार घुमट होते व त्यांचा चुना जुना झाल्यामुळें दगडासारखा कठीण झाला होता. ही इमारत बांधून शेंकडों वर्षें लोटलीं होतीं तरी ती मोठमोठ्या पावसांस व मोठमोठ्या तुफानांस जुमानीत नसे व तिला डागडुजीचीही गरज नसे.

हा वाडा इतका मोठा होता कीं, त्याची पूर्ण माहिती म्हटली म्हणजे कांहीं जुने सरकारी चाकर खेरीजकरून दुसऱ्या कोणाएकास नव्हती; व त्या कामगारांसही ती माहिती बापापासून मुलास, त्यापासून त्याच्या मुलास, अशी पिढ्यानपिढ्या मोठी गुप्त गोष्ट म्हणून प्राप्त होत असे. ह्या वाड्याची रचना अशी होती

कीं, जसा काय मूर्तिमान् अविश्वासानेंच साक्षात् त्या वाड्याचा नकाशा केला होता. प्रत्येक जाग्यास दोन दोन वाटा असत. एक प्रसिद्ध वाट व एक चोरवाट. प्रत्येक चौकांतून बाकीच्या चौकांत जावयाचा रस्ता असे; तो रस्ता कांहीं ठिकाणीं वरच्या मजल्यावरून व गुप्त रीतीनें असे व कांहीं ठिकाणीं जमिनी-खालीं भुयारांतून असे. त्या इमारतींतले कितीएक खांब पोकळ होते. परंतु त्यांचा पोकळपणा ठाऊक असल्यावांचून अगदीं कळत नसे. त्या खांबांच्या गाभाऱ्यांत राजांनीं पिढ्यानपिढ्या दौलत भरून ठेविली होती, व त्यांच्या तोंडांशीं दगडाचे चिरे बसवून ते अगदीं बेमालूम करून टाकिले होते. त्या ठिकाणचें द्रव्य राज्या-वर पराकाष्ठेचें मोठें संकट येऊन गुदरल्याशिवाय बाहेर काढीत नसत. या गुप्त ठेव्यांची एक याद असे. ती याद देखील एका बुरुजांत गुप्त ठिकाणीं ठेविलेली असे. या बुरुजांत बादशाहा व त्यामागून गादीवर बसण्याची ज्याची पाळी असे तो, यांखेरीज दुसरें कोणी जात नसे.

---

# भाग दुसरा.

## रासेलसास आनंदगुहेंत राहण्याचा त्रास आला.

मागल्या भागांत ज्या गुहेचें वर्णन केलें, तीस आनंदगुहा म्हणत. या ठिकाणीं जे राजपुत्र व राजकन्या राहात त्यांस सौख्य व विश्रांति यांच्या मात्र कोमल वैचित्र्याचा अनुभव घडे. संसारांत इतर मनुष्यांस घडणाऱ्या दुःखाचे व संकटाचे कठिण प्रसंग त्यांस स्वप्नींही ठाऊक नसत. मनोरंजन करण्याविषयीं चतुर अशीं सर्व प्रकारचीं माणसें त्यांच्या चाकरीस सिद्ध असत, व इंद्रियांची तृप्ति करणारे सर्व पदार्थ त्यांस अनुकूल असत. जेथें सुवास चोहींकडे फाकला आहे, अशा बागांत त्यांनीं फिरावें, व दमलेसें वाटलें म्हणजे निर्भय किल्ल्यांत स्वस्थ विश्रांति घ्यावी. त्यांस आपली स्थिति गोड वाटावी म्हणून हरएक प्रकारच्या तजविजी योजिल्या होत्या. त्यांस शिकविण्याकरितां जे थोर थोर विद्वान् तेथें ठेविले होते, ते लौकिकांत वागण्यापासून घडणाऱ्या अनेक दुःखांचें सर्वकाळ वर्णन करीत; आणि त्यांस सांगत कीं, या गुहेच्या बाहेर सर्वत्र अनेक प्रकारचीं संकटें आहेत व तेथें मनुष्यें सर्वकाळ परस्परांशीं भांडून एकमेकांचे जीव घेतात.

तसेंच त्या राजपुत्रांस आपण मोठे सुखी आहों असें वाटावें म्हणून, त्या आनंदगुहेंत ज्यांत स्तुति आहे, अशीं कवनें गाऊन तीं नेहमीं त्यांस ऐकवीत. तसेंच ऐषआरामाच्या अनेक प्रकारांविषयीं गोष्टी वारंवार काढून त्यांचा अनुभव घेण्याची इच्छा त्यांच्या मनांत उत्पन्न करीत आणि सकाळीं उठल्यापासून रात्रीं निजत तोंपर्यंत त्यांचा सर्व काळ, ख्यालीखुशाली करावी, व मौजा माराव्या, यांतच काय तो जात असे.

आनंदगुहेंतील सर्व व्यवस्था ज्या हेतूनें करणाऱ्यानें केली होती, तो हेतु प्रायः सिद्धीस जात असे. त्या स्थळीं राहणाऱ्या राजपुत्रांपैकीं प्रतिबंधांतून सुटण्याची इच्छा करणारा विरळाच निघे. बहुतेक सर्वांस असें वाटे कीं, सृष्टींत स्वतःसिद्ध व मनुष्यकृतीनें केलेलीं जीं जीं सुखें आहेत, तीं तीं सर्व आपणांस ह्या स्थळीं अनुकूल आहेत व ज्यांचा कमनशिबामुळें येथें प्रवेश होत नाहीं, ते लोक अनेक दुःखांनीं पीडित असावे, व त्यांस कधीं कधीं सुख झालें तरी तें निश्चित नसल्यामुळें उद्यां काय अनर्थ होईल, असा घोर त्यांच्या मनास नेहमीं असावा.

याप्रमाणें सकाळपासून संध्याकाळपर्यंत ते राजपुत्र सर्वदा स्वतः आनंदवृत्तींत असत व एकमेकांशीं मोठ्या गोडीगुलाबीनें वागत. परंतु रासेलसाची स्थिति फार निराळी झाली होती. पूर्वीं तो इतरांप्रमाणेंच वागत असे; परंतु सुमारें सव्वीस वर्षांचें त्याचें वय झाल्यापासून त्याच्या वृत्तींत फेर पडला. तेव्हांपासून तो इतर राजपुत्रांच्या मंडळींत व ख्यालीखुशालींत मिसळेनासा झाला. त्यानें एकटेंच रानांत किंवा बागांत फिरावें किंवा एकांतीं आपणांशींच मनन करीत बसावें. त्यानें जेवायास मंडळींत बसावें. परंतु पुढल्या ताटांतलि पक्वान्न उचलून तोंडांत घालण्याचें भान त्यास राहूं नये. गायन ऐकण्यास बसला असतां अर्ध्याच गाण्यांत मंडळींतून एकाएकीं उठून गाण्याचा स्वर ऐकूं न येईलसें दूर निघून जावें. त्याच्या वृत्तींत पडलेला हा फरक त्याच्या बरदास्तीस जीं माणसें होतीं, त्यांच्या लक्षांत येऊन त्यांनीं ह्याचें लक्ष पुनः ऐषआरामाकडे लागावें म्हणून यत्न चालविले; परंतु ते सर्व निष्फळ झाले. त्यास संतोष होण्याकरितां ते कांहीं पुढें पुढें होऊन करूं लागले असतां त्यानें त्याकडे दुर्लक्ष्य करावें व ख्यालीखुशाली करण्याकरितां त्यांनीं पुष्कळ विनविलें तरी त्यानें साफ नाहीं म्हणून सांगावें. ओढ्यांच्या कांठीं झाडांची गर्दी असेल अशा ठिकाणीं त्यानें दररोज जाऊन बसावें; आणि तेथें झाडांच्या फांद्यांवर पांखरें शब्द करीत असतील तेच कधीं कधीं ऐकत बसावें; कधीं कधीं ओढ्यांत मासे

खेळत असतील, त्यांकडेच पहात उभें रहावें; कधीं कधीं डोंगरांच्या बाजूवर व कुरणांत जनावरें चरत असतील व झुडपांत निजलीं असतील त्यांकडे पहात तासांचे तास घालवावे.

त्याच्या वृत्तांत असें एकाएकीं वैलक्षण्य आल्यामुळें त्याजकडे लोकांचें लक्ष विशेष लागलें. राजपुत्रांस शिकविण्याकरितां जे पंडित तेथें ठेविले होते, त्यांपैकीं एक पंडित, ज्याच्या भाषणापासून रासेलसास पूर्वीं फार संतोष होत असे, त्याच्या अंतःकरणांत असमाधान उत्पन्न होण्याचें कारण शोधून काढावें, या इच्छेनें एक दिवस त्यास कळूं न देतां चोरून त्याच्या मागें रानांत गेला. रासेलसास आपल्या आसपास जवळ कोणी आहे असें ठाऊक नव्हतें; यास्तव तो डोंगराच्या कांठावर बोकड चढत होते त्यांकडे टक लावून पहात होत्साता त्या प्राण्यांची स्थिति व आपली स्थिति, ह्यांची तुलना करून आपणाशीं याप्रमाणें बोलूं लागलाः—

तो म्हणाला, " अहो, मनुष्य आणि इतर प्राणी ह्यांच्यामध्यें वास्तविक भेद कोणता आहे बरें ? मज भोंवतालचे हे सर्व पशु प्राणिधर्मांनीं मजसारखेच आहेत. त्यांस भूक लागली म्हणजे ते गवत खातात, तहान लागली म्हणजे ओढ्यावर जाऊन पाणी पितात; आणि याप्रमाणें त्यांची तहानभूक शांत झाली म्हणजे ते स्वस्थ बसतात किंवा झोंप घेतात. कांहीं वेळानें उठले म्हणजे त्यांस पुनः भूक लागते, पुनः ते चारा खातात व विश्रांति घेतात. याप्रमाणें सदोदित क्रम चालतो. त्याप्रमाणें मलाहि भूक लागते व तहानही लागते.परंतु त्या शांत केल्या असतां त्या जनावराप्रमाणें माझ्या मनास स्वस्थता येत नाहीं. अन्न,पाणी वगैरे जरूरीचे पदार्थ नसले म्हणजे जनावराप्रमाणें मला दुःख होतें.परंतु तें प्राप्त झालें असतां त्याप्रमाणें मला समाधान होत नाहीं.माझी मधील वेळ कंटाळवाणी होते. मला वाटतें कीं, मला पुनः भूक लागेल तर चांगलें होईल; कारण, तिच्या योगानें चित्तास कांहीं व्यापार होऊन वेळ लवकर जाईल. पहा, हे पक्षी हीं फळें व दाणे खाऊन राईंत उडून जातात व तेथें खुशाल झाडांच्या फांद्यांवर बसून सर्व दिवसभर तेच तेच शब्द पुनः पुनः करीत असतात; परंतु त्यांचा त्यांस त्रास किंवा कंटाळा येतोसा वाटत नाहीं.सतार वाजविणारा किंवा गवयास बोलवावयाची मला इच्छा झाल्यास त्या गोष्टी मला अनुकूल आहेत; परंतु काल ज्या गाण्यानें किंवा रागानें मला आनंद झाला,तेंच गाणें किंवा तोच राग आज

पुनः ऐकिल्यास संतोष होत नाहीं. आणि उद्यांही तोच ऐकूं लागल्यास त्रास उत्पन्न होतो. ज्या ज्या विषयानें इंद्रियांस तृप्ति होते, त्या सर्व विषयांचा मी कंटाळा येईपर्यंत अनुभव घेतला; तथापि माझ्या अंतःकरणास अद्यापि समाधान होत नाहीं हें काय ? मला वाटतें कीं, जितकीं ठाऊक आहेत, त्यापेक्षां मनुष्यास एकादें आणखी जास्त सुखसाधनइंद्रिय खचित असावें; परंतु त्या इंद्रियाची तृप्ति करणारा विषय या स्थळीं नसल्यामुळें त्याची शक्ति अनुभवास येत नाहीं किंवा इंद्रियाहून निराळ्या अशा कांहीं इच्छा मनुष्यास असाव्या कीं, ज्या तृप्त झाल्यावांचून त्याच्या चित्तास कदापि समाधान व्हावयाचें नाहीं. ''—

याप्रमाणें विचार करीत असतां वर पाहतो तों चंद्र उगवून बराच वर आलेला त्याच्या दृष्टीस पडला. मग तो तेथून उठून राजवाड्याकडे चालता झाला. वाटेनें चालत असतां कितीएक जनावरें त्याच्या दृष्टीस पडलीं.त्यांस तो म्हणाला, " अहो, तुम्ही माझ्यापेक्षां सुखी आहांत; आपल्या जिवास त्रासलेला जो मी त्या माझा हेवा करण्याची तुम्हांस गरज नाहीं, व मीही तुमच्या सुखाचा हेवा करीत नाहीं. कारण, तुम्हांस जें सुख आहे तें मनुष्याचें सुख नव्हे. मला जीं कितीएक दुःखें आहेत त्यांपासून तुम्ही अगदीं मोकळे आहां. जी इजा वास्तविकपणें घडत नाहीं, तिचें मला भय वाटतें. तुमची गोष्ट तशी नाहीं. ती खरोखर जेव्हां घडत असते तेव्हां मात्र तुम्हांस दुःख होतें. मागें घडलेल्या अनर्थांची स्मृति झाली असतां किंवा पुढें होणाऱ्या पीडेची कल्पना मनांत आली असतां माझ्या जिवास भय वाटतें. यावरून मला पक्की खात्री वाटते कीं, ईश्वराची सर्वांवर समदृष्टि आहे. त्यानें तुम्हां जनावरांपेक्षां मनुष्यांस जशीं विशेष दुःखें दिलीं आहेत तशीं सुखेंही दिलीं असावीं. "

याप्रमाणें विचार करीत व ते करुण व मंद स्वरानें उच्चारीत राजपुत्र परत येत होता. तथापि त्याच्या मुद्रेवरून असें दिसत होतें कीं, त्यास आपल्या विचारशक्तीचें सूक्ष्मत्व पाहून कांहीं संतोष झाला असावा. तसेंच जें दुःख आपण भोगतों, तें विशेष अभिज्ञत्वानें भोगतों व तें दुःख चातुर्यानें आपण आपल्या मनास व्यक्त करून दाखवितों.असें वाटून त्याचें दुःख कांहीं हलकें झालें असावें, असें त्याच्या मुद्रेवरून दिसत होतें. असो; संध्याकाळीं नित्याप्रमाणें मंडळी जमली होती तींत तो त्या रात्रीं विशेष आनंदवृत्तीनें वागला आणि त्यापासून सर्वांस मोठा संतोष झाला.

# भाग तिसरा.

## ज्यास कोणत्याही गोष्टीची ददात नाहीं त्याची ददात.

राजपुत्रांच्या शिक्षकांपैकीं एक शिक्षक रासेलसांच्या मागून त्यांस नकळत रानांत गेला होता म्हणून मागील भागांत सांगितलें होतें. त्या शिक्षकास असें वाटलें कीं, या राजपुत्राची वृत्ति बिघडण्याचें कारण आपणास कळलें; तर आतां उपदेश करून ह्यास बेतावर आणावें. अशा उद्देशानें तो शिक्षक त्याशीं संभाषण करण्याचा प्रसंग आणण्यास झटूं लागला. परंतु त्याची बुद्धि सर्व नाहींशी झाली, असें राजपुत्रास वाटून त्या वृद्ध मनुष्याशीं संभाषण करण्यास तो खुषी नव्हता. तो आपल्याशीं म्हणे कीं, "हा म्हातारा असा माझ्या पिच्छास कां बरें लागला आहे? ज्या गोष्टी याजपासून मी पूर्वीं ऐकिल्या, त्यांचा विसर हा मला पडूं देत नाहीं काय? त्या गोष्टी नवीन असल्यामुळें त्या ऐकून पूर्वीं मला आनंद होत असे खरा; पण आतां तसा पुनः होण्यास त्या विसरल्याशिवाय दुसरा उपाय नाहीं." नंतर तो नित्याप्रमाणें रानांत फिरावयास गेला; आणि एकांतस्थळीं बसून स्वस्थ मन करून रोजच्याप्रमाणें विचार करण्यास आरंभ करतो, इतक्यांत शेजारीं त्याचा जुना गुरु उभा राहिलेला त्याच्या दृष्टीस पडला. त्यांस पाहिल्याबरोबर प्रथमतः त्याच्या मनांत असें आलें कीं, ह्याशीं कांहीं न बोलतां तसेंच निघून जावें. तथापि तो पूर्वीं त्यास मोठा मान देत असे, यास्तव त्याची त्याजवर ममता होती; या कारणास्तव त्याचें मन त्याच्यानें दुखवेना. मग त्यानें हाक मारून आपल्या शेजारीं त्यास बसावयास जागा दिली.

हें पाहून म्हाताऱ्यास उत्तेजन आलें, आणि तो त्यास म्हणतो, "हे राजपुत्रा, अलीकडे थोड्या दिवसांत तुझ्या चित्तास स्वस्थता वाटत नाहींशी झाली आहे; हें पाहून मला फार दुःख होतें. राजवाड्यांत चैन चालली असतां ती सोडून तूं रानांत एकांतीं येऊन बसतोस ह्याचें कारण काय?" राजपुत्रानें उत्तर केलें, "चैनीपासून माझे मनास पूर्वींप्रमाणें आनंद होत नाहीं म्हणून ती मी सोडून जातों. आतां मी एकांतीं येऊन बसतों ह्याचें कारण हेंच कीं, आपली चिंताग्रस्त व दुःखित मुद्रा दाखवून दुसऱ्यांच्या आनंदाचा विरस करणें मला नीट वाटत नाहीं."

हें भाषण ऐकून तो वृद्ध पंडित म्हणाला, " ह्या आनंदगुहेंत दुःखित म्हणून मी तुलाच पहिल्यानें पाहतों; आजपर्यंत दुःखी मनुष्य येथें कधींच पाहिलें नाहीं. मला असें वाटतें, तुला दुःख वाटण्याचें कारण या जागीं कांहीं नाहीं. व विचार करशील तर तुझ्याही मनाची अशीच खात्री होईल. पहा; हबशी देशाच्या बादशाहास प्राप्त होण्यासारखीं जीं जीं सुखें आहेत, तीं सर्व येथें तुला अनुकूल आहेत. या जागीं कोणत्याही प्रकारचा घोर बाळगण्याची तुला गरज नाहीं. नानाप्रकारचीं दुःखें सोसून जे जे उत्तम पदार्थ मनुष्यें मिळवितात, ते सर्व तुम्हां राजपुत्रांच्या सुखाकरितां येथें आयते सिद्ध आहेत. तेव्हां केवढें बरें तुमचें दैव ? तुला येथें कोणतें उणें आहे ? आणि तुला जर कोणताही उणेपणा नाहीं तर मग तूं दुःखी कसा ? "

राजपुत्रानें उत्तर केलें, " मला कोणता उणेपणा नाहीं किंवा कोणता उणेपणा आहे, हें मला कळत नाहीं. हेंच माझें दुःखाचें कारण होय. कारण, अमक्या गोष्टींची मला न्यूनता आहे असें जर मला समजतें, तर मला त्या गोष्टीविषयीं स्पष्ट इच्छा होती; आणि इच्छा जर मला असती तर ती पूर्ण करण्यास माझ्या हातून प्रयत्नही होता, सूर्योदय झाल्यापासून तों संध्याकाळपर्यंत सर्व वेळ मला त्रासदायक लांबच लांब जसा वाटतो तसा न वाटतां, किंवा हल्लीं उठलें आणि झोंप येईनाशी झाली म्हणजे जीवनाचा कंटाळा विसरविणारी झोंप तशी मला पुष्कळ कां येत नाहीं. असा जो खेद होतो तो न होतां; कोंकरें व करडें एकमेकांच्या पाठीस लागतांना दृष्टीस पडलीं म्हणजे मला असें वाटतें कीं, ज्यांत गुंतून राहीन असा मला कांहीं उद्योग सुचता तर मी किती सुखी होतों ? परंतु ज्या ज्या पदार्थांची मला गरज आहे, ते सर्व श्रम केल्यावांचून मला अनुकूल असल्यामुळें सर्व दिवस व सर्व तास मला अगदीं एकसारखे भासतात. विशेष म्हणून इतकाच दिसतो कीं, पहिल्यापेक्षां दुसरा अधिक कंटाळवाणा वाटतो. गुरुजीबाबा, आपण बहुत पाहिलें आहे; तर आपणांस माझी हीच विनंति आहे कीं, मी जेव्हां लहान होतों त्या वेळीं मला जग नवें वाटत असे व प्रत्येक क्षणीं अपूर्व नवा पदार्थ पाहण्यांत येऊन दिवस लहान वाटत; तर आतांही तसे लहान वाटण्याची कांहीं युक्ति असेल तर सांगा. मी सुखांचा मनस्वी उपभोग घेऊन विटलों. आतां जीविषयीं मला इच्छा वाटेल अशी एखादी वस्तु तुम्हांस ठाऊक असेल तर सांगा. "

म्हाताऱ्यास दुःखाचें हें अपूर्व कारण पाहून मोठा अचंबा वाटला. त्यावर उत्तर काय करावें हें त्यास सुचेना. परंतु निरुत्तर राहणें नीट न वाटून तो

म्हणाला " बाबा, जगांतील दुःखें जर तुला माहीत असतीं तर तुला तुझ्या सुखांचा वास्तविक थोरपणा कळता. "

राजपुत्र म्हणाला, " हां हां, मला इच्छिण्यासारखी गोष्ट तुम्ही आतां बोललां खरी. जगांतील दुःखें पाहण्याविषयीं मला फार उत्कंठा वाटते; कां तर तुमच्या बोलण्यावरून तीं दुःखें पाहिल्यावांचून मला आपल्या स्थितीची गोडी व थोरपणा हीं बरोबर कळणें नाहीं. "

---

# भाग चवथा.

## राजपुत्राचा आणखी खेद व चिंता.

इतक्यांत गजर झाला, मग वाड्यांत जेवावयाची वेळ झाली असें पाहून त्यांनीं संभाषण समाप्त केलें, आणि राजवाड्याकडे ते परत वळले. म्हातारा, रासेल्साच्या मनांत जी गोष्ट न यावी म्हणून झटत होता, तीच गोष्ट त्याचे मनांत ठसण्यास आपलें भाषण कारण झालें, हें पाहून फार खजील झाला. परंतु म्हातारपणीं लज्जा किंवा खेद हीं मनुष्याचे मनांत फार वेळ टिकत नाहींत. ज्या गोष्टी आपण बहुत दिवस सोशीत येतों त्या सहन करणें पुढें सोपें पडतें. किंवा लोक आपली पर्वा कमी बाळगतात, हें पाहून आपणही लोकांची पर्वा कमी करितों; किंवा सर्व दुःखांचा अंत करणारा जो मृत्यु तो जवळ आला असें आपणास ठाऊक असतें म्हणून आपणास दुःखें क्षुल्लक वाटतात; काय असेल तें असो !

परंतु राजपुत्राची दृष्टि विशेष पुढें होती; यास्तव त्याच्या मनास स्वस्थता लौकर प्राप्त होईना. वय अल्प असल्यामुळें या जगांत आपणास अजून पुष्कळ दिवस काढावयाचे आहेत व बहुत दिवसांत आपणास दुःखही बहुत सोसावें लागेल, असें मनांत येऊन त्यास इतके दिवस मोठी दहशत पडत असे, ती आतां नाहींशी होऊन आपणास पुष्कळ वर्षें वांचावयाचें आहे, तेव्हां पुष्कळ वर्षांत पुष्कळ कृत्यें करावयास सांपडतील, हें वाटून त्यास मोठा आनंद वाटूं लागला.

इतके दिवसांत त्याच्या चित्तांत उमेदीचा हा प्रथमच मोड उत्पन्न झाल्यामुळें त्याची चर्या बदलली. त्याच्या गालांवर तारुण्याची टवटवी विशेष दिसूं लागली. व डोळ्यांतही हुशारीचें तेज अधिक चमकूं लागलें. कांहीं एक आपल्याच्यानें

अनुक्रम
विभाग

होण्यासारखें आहे, येवढ्यानेंच त्याच्या अंतःकरणांत आवेश उत्पन्न झाला. परंतु ती कर्तव्य गोष्ट कोणती व ती सिद्ध होण्याचा उपाय काय, याचें स्पष्ट ज्ञान अद्यापि त्याचें त्यासच नव्हतें.

या वेळेपासून त्याचा उदासपणा व एकलकोंडेपणा नाहींसा झाला. आपणास सुखाचा एक गुप्त ठेवा सांपडला, परंतु त्याचा उपभोग होण्यास तो कोणास कळता उपयोगी नाहीं असें वाटून तो तेव्हांपासून इतर राजपुत्रांच्या मंडळींत जाऊन त्यांच्या ख्यालीखुशालींत मिसळल्यासारखें दाखवूं लागला. आणि याप्रमाणें त्यास मनांतून ज्या स्थितीचा त्रास आला होता, ती दुसऱ्यास गोड वाटावयाचा यत्न त्यानें चालविला. असें झालें तरी ख्यालीखुशालीचे प्रकार कोठें असें वाढवितां येतात व ती अशी कोठें सतत चालवितां येतें कीं, मनुष्याचा बहुतेक काळ तींत पुरेल! रात्रीं व दिवसास त्यास पुष्कळ वेळ रिकामी सांपडे, त्यावेळीं तो कोणाच्या मनांत कांहीं शंका न येतां एकांतीं मनन करीत बसे. पूर्वी त्यास जिवाचा जो कंटाळा येत असे, तो आतां पुष्कळ कमी झाला. राजपुत्रांच्या मंडळांत तो वारंवार जात असे. कारण, तसें केल्यावांचून आपल्या मनांतला उद्देश सिद्धीस जाणें नाहीं असें त्यास वाटत असे. तसेंच मंडळी फुटून आपल्या ठिकाणीं लोक गेले तरी त्या गोष्टीचा त्यास आनंदच असे; कारण, तसें झालें म्हणजे त्यास एकांतीं बसून मनन करण्यास सांपडे.

एकांतीं बसला म्हणजे रासेलसानें बहुतकरून दुनिया कशी असेल व तींत कोणतीं कोणतीं कृत्यें घडत असतील, याचा विचार करावा. त्या बापड्यानें दुनियेचें तर कांहींच पाहिलें नव्हतें. त्यानें एक मनःकल्पित सृष्टीच उत्पन्न करावी; तींत आपल्या ठायीं नानाप्रकारच्या अवस्था कल्पाव्या; आणि कधीं कधीं त्यानें असें कल्पावें कीं, आपण मोठ्या पेंचांत सांपडलों आहों, किंवा कांहीं अघटित प्रसंगांत गुंतलों आहों; आणि त्याचा स्वभाव परोपकारी असल्यामुळें त्याच्या कल्पनेचा शेवट चांगला असे. तो असा कीं, कधीं कधीं त्यानें कोणाचे संकटाचा परिहार करावा. कधीं कधीं कोणा दुष्टाचें कपट उघडकीस आणावें, कोणा अनाथास पीडा होत असल्यास तिचें निवारण करावें, किंवा पुष्कळ मनुष्यांचें सुख वाढवावें. याप्रमाणें रासेलसाच्या आयुष्याचे वीस महिने लोटले. कल्पित कामांच्या धांदलींत त्याचें चित्त इतकें गढून जाई कीं, आपण खरोखर एकांतीं बसलों आहों, याचें भानही त्यास नाहींसें होई. याप्रमाणें चाललें असतां मानवी प्रपंचांत मनुष्यास जे अनेकविध प्रसंग येतात त्याविषयींच्या तजविजी योजण्यांत

गुंतून त्या प्रपंचांत आपला प्रवेश होण्याकरितां उपाय काय करावा, हा विचार त्याच्या मनांतून मुळींच सुटला.

एके दिवशीं तो ओढ्याच्या कांठीं बसला असतां त्याच्या मनांत अशी कल्पना आली कीं, कोणी एक दुष्ट व कपटी पुरुष एका अनाथ व तरुण मुलीस, 'तुजवर माझें प्रेम आहे, मी तुजबरोबर लग्न करितों,' असा नाद लावून तिजपाशीं जो थोडासा विषय होता तो घेऊन पळाला, व ती मुलगी रडत व आपली दाद लागून पैसा परत यावा म्हणून विलाप करीत त्याचेमागें चालली आहे. कल्पित सृष्टींतील ही विश्वासघाताची गोष्ट पाहून रासेलसास मोठी करुणा आली आणि ही केवळ कल्पना आहे, हें विसरून खरी गोष्ट असल्याप्रमाणें तो उठून त्या ठकास धरण्याकरितां त्याचे पाठीस लागला. अपराधी मनुष्य भयानें फारच झपाट्यानें पळत असतो, त्याप्रमाणें तो चोर रासेलसाच्या हातीं लागेना. मग धांवून धांवून तो दमला म्हणजे त्यास पकडावें असा निश्चय करून राजपुत्रानें मोठ्या निकरानें त्याचा पाठलाग चालविला. तो धांवतां धांवतां शेवटीं पर्वताच्या पायथ्याशीं येऊन थडकला; व तेथें त्याचें धांवणें बंद झालें.

या स्थळीं तो शुद्धीवर येऊन त्यास आपल्या निरर्थक आवेशाचें हंसें आलें. मग तो त्या डोंगराकडे दृष्टि देऊन म्हणतो, " मला सुख प्राप्त होण्यास व माझे हातून परोपकार घडण्यास नशिबानें जो मोठा अडथळा घालून ठेवला आहे तो हाच होय. या डोंगराच्या पलीकडे जाण्याविषयीं माझ्या मनांत इच्छाच येऊन किती दिवस झाले बरें ! परंतु ती गोष्ट सिद्ध होण्याविषयीं मी इतक्या दिवसांत कांहींच उद्योग केला नाहीं. "

ही गोष्ट मनांत येऊन तो खालीं बसून तीविषयीं मनन करूं लागला. मग त्यास अशी आठवण झाली कीं, या बंदीखान्यांतून सुटून जाण्याचा निश्चय आपण करून दीड वर्षावर काळ गुदरला. ही गोष्ट लक्षांत येऊन त्यास फारच खेद झाला. इतका खेद त्यास पूर्वीं कधींच झाला नव्हता. त्यानें असा विचार केला कीं, इतक्या काळांत केला असतां तर पुष्कळ उद्योग होता, परंतु माझ्या मूर्खपणामुळें तो सर्वकाळ फुकट गेला. वीस महिन्यांची त्यानें एकंदर मनुष्याच्या आयुष्याशीं तुलना केली. तो म्हणाला, " मनुष्याच्या आयुष्याची गणना करतांना तींत त्याचें अज्ञान, बालपण व म्हातारपण हीं तर मुळींच धरतां येत नाहींत. मनुष्यास जन्मून कितीएक काळ लोटल्यानंतर त्यास विचार करण्याची शक्ति येते, व पुढें लवकरच त्याचें उद्योग करण्याचें सामर्थ्य नाहींसें होतें. यावरून मनुष्याचें

वास्तविक आयुष्य म्हणजे चाळीस वर्षेच काय तीं खरीं. त्यांपैकीं चोविसावा वांटा मीं नुसतें मनन करण्यांत गमविला. हा जो काळ मीं गमविला हा माझा खचित होता. आतां पुढें काळ आहे खरा; परंतु त्याचा भरंवसा कोण सांगूं शकेल ? ”

ही त्याची मूर्खपणाची गोष्ट त्याच्या जिवास फारच लागून गेली. व ही गोष्ट जुनी होऊन चित्त स्वस्थ व्हावयास कितीएक दिवस लागले. तो आपले चित्तांत विचार करीत असे कीं, आजपर्यंत माझे दिवस व्यर्थ गेले ते माझ्या पूर्वजांच्या दुष्टपणानें किंवा मूर्खपणानें किंवा या देशांतील वेड्या चालीनें गेले. ती गोष्ट माझे मनांत आली म्हणजे त्रास येतो खरा; परंतु माझें मन मला खात नाहीं; परंतु मला नवीन ज्ञान प्राप्त झालें, आणि या बंधांतून सुटून सुखसंपादन करण्याचा मीं बेत केला, तेव्हांपासून जे वीस महिने मीं गमविले ते केवळ आपल्याच मूर्खपणानें गमविले. वीस महिने सकाळपासून संध्याकाळपर्यंत उगाच आळसांत घालविले. इतक्या वेळांत पांखरांचीं पिलें आईबापांचीं कोठीं सोडून डोंगरावर चढून स्वतंत्रपणानें आपलें पोट भरावयास शिकलीं. मीं मात्र इतक्या काळांत कांहीं विशेष गोष्ट केली नाहीं. जशाचा तसाच अज्ञान व परस्वाधीन राहिलों. चंद्रानें विसांपेक्षां अधिक वेळ आपलें बिंब कमीजास्त करून, वेळ जात आहे असें मला सुचविलें. ओढे सतत पुढें चाललेल्या प्रवाहांच्या योगानें उगीच बसूं नको म्हणून मला नित्य उपदेश करीत होते. परंतु मीं व्यर्थ मनन करण्याच्या नादांत काळ बुडविला. पृथ्वीनें व ग्रहांनीं केलेल्या बुद्धिवादाकडेही मीं लक्ष दिलें नाहीं. थोडे थोडके नाहींत, वीस महिने फुकट गमाविले ! हे महिने कोण मला परत आणून देईल ?

हे दुःखकारक विचार त्याचे मनांत खिळून गेले. कांहीं केल्यानें मनांतून ते जाईनात. उगीच व्यर्थ बेत करावयाचे नाहींत असा बेत करण्यांत पुनः त्यानें चार महिने घालविले; आणि शेवटीं पोकळ विचार पुरे करून त्याला उद्योग आरंभण्यास असें कारण झालें कीं, एके दिवशीं एका कुळंबिणीच्या हातून एक चिनी भांडें पडून फुटलें असतां ती म्हणाली कीं, जें पुनः नीट होणें नाहीं त्याबद्दल खेद करून काय उपयोग आहे? व हें तिचें म्हणणें त्या राजपुत्राचे कानीं पडलें.
कुळंबीण जें बोलली तें अगदीं स्पष्ट असल्यावरून ही गोष्ट इतकी उघड असतां आपल्या ध्यानांत इतक्या दिवसांत आली नाहीं, तेव्हां आपल्या बुद्धीस धिःकार असो असें रासेलसास वाटलें. परंतु त्या बापुड्यास ठाऊक नव्हतें किंवा त्यानें

विचार केला नव्हता कीं, कितीएक उपयुक्त गोष्टी स्पष्ट असून त्या केवळ काकतालीय न्यायानें मनुष्यास कळल्या आहेत. याचें कारण, मन हें मोठ्या आवेशानें दूरदूरच्या विषयांच्या विचारांत निमग्न झालें असतां अत्यंत जवळच्या गोष्टी उघड असतांही त्याच्या नजरेंतून जातात. असो;मग आपण निरुपाय गोष्टीविषयीं खेद केला, हें वाईट केलें, असा खेद कांहीं वेळ करून त्या वेळेपासून त्यानें त्या आनंदगुहेंतून सुटण्याचा उपाय करण्याकडे आपलें सर्व मन लाविलें.

---

# भाग पांचवा.

## सुटून जाण्याविषयीं राजपुत्राचा विचार.

त्या गुहेंतून बाहेर सुटून जाण्याविषयीं तो खरोखर यत्न जेव्हां करूं लागला तेव्हां त्यास कळलें की, जी गोष्ट सिद्ध झालीशी सहज कल्पितां येत होती ती सिद्ध करण्यास फारच कठिण आहे. सुटका होण्याच्या बुद्धीनें तो चोहींकडे पाहूं लागला तों भोंवतालीं डोंगरांचा स्वतःसिद्ध असा जबरदस्त कोट त्याच्या दृष्टीस पडला, की ज्यास भंग होण्याचा कधीं संभवच नाहीं. व एका आंगास लोखंडी दरवाजा होता तोही त्यानें पाहिला.या वाटेनें तो एक वेळ आंत जो आला तो बाहेर पुनः गेलाच नाहीं.याप्रमाणें चोहोंकडून अटकाव पाहून आकाशांत स्वतंत्रपणें फिरणाऱ्या पक्ष्यास पिंजऱ्यांत कोंडून टाकलें असतां तो जसा बाहेर पडण्यासाठीं तळमळतो, तशी रासेलसास तळमळ लागली. झुडुपांच्या गर्दीत झांकून गेलेलें कोठें एखादें भोंक असलें तर पहावें म्हणून त्यानें डोंगरावर चढून शोधलें; परंतु जिकडे जिकडे तो जाई, तिकडे तिकडे खडपे झुकून पुढें आल्यामुळें शिखराकडे जावयास त्यास मार्ग सांपडेना. लोखंडी दरवाजा जो होता तो अनेक प्रकारच्या युक्तींनीं मजबूत केला होता; इतकेंच नाहीं तर तेथें चौकीदारांचे आळीपाळीनें पाहरे असत; व तो अशा उघड ठिकाणीं होता कीं, गुहेंतल्या लोकांची त्यापाशीं नेहमीं वाग असे.

तळ्यांत अधिक झालेलें पाणी ज्या दरींतून बाहेर जात असे, ती दरी त्यानें पाहिली. एक दिवस दोन प्रहरीं त्या दरीच्या तोंडावर कडक ऊन पडलें असतां

त्यानें तींत डोकावून पाहिलें तों आंत फुटलेले कितीएक खडक होते व त्यांमधून पाणी पार जात होतें. तथापि मनुष्याचा रिघाव होण्याची सोय नव्हती. हें सर्व पाहून त्याचें धैर्य खचलें व तो उदास होऊन परत घरीं आला; परंतु ह्या वेळेस आशेच्या सुखाची गोडी त्यास लागली होती. ह्यास्तव त्यानें असा निश्चय केला कीं, कसेंही झालें तरी निराश व्हावयाचें नाहीं.

या प्रकारच्या निष्फळ उद्योगांत त्यानें दहा महिने घालविले. पण त्याचा हा वेळ चांगल्या आनंदांत गेला. सकाळीं तो उठे तेव्हां आदल्या रात्रीं योजलेला उपाय करून पाहण्याची त्यास उमेद असे. आपण आपल्याकडून उद्योग केला, उगीच बसून काळ व्यर्थ घालविला नाहीं, हें मनांत येऊन संध्याकाळीं त्यास समाधान होई. व श्रम झाल्यामुळें रात्रीं स्वस्थ गाढ झोंप येई. दिवसास डोंगरावरून वगैरे फिरतांना हजारों चमत्कार त्याच्या दृष्टीस पडत, तेणेंकरून तो शीण विसरे व त्याची माहिती वाढे. जनावरांचे नानाविध स्वभाव व वनस्पतींचे अनेक गुण त्याच्या नजरेखालीं येत, तेणेंकरून ती गुहा चमत्कारांनीं भरली आहे असें त्याच्या समजुतींत आलें. आणि त्यानें असा विचार केला कीं, आपली येथून सुटका होतच नाहीं; असें झाल्यास या चमत्कारांचा विचार करण्यांतच आपण आपला काळ लोटूं. तसेंच तो आपल्या मनाचा असा संतोष करून घेई कीं, आपल्या उद्योगापासून इष्ट उद्देश जरी सिद्ध झाला नाहीं, तथापि आपलें ज्ञान वाढून आपणांस विचार करावयास अक्षय विषय मिळाला, हा तरी एक मोठाच लाभ होईल.

याप्रमाणें दहा महिने गुदरले, व बहुत यत्न वायां गेले. तथापि त्या राजपुत्रानें आपला मूळचा उद्देश सोडला नाहीं. कसें तरी करून प्रपंचांत मनुष्यें कोणत्या कोणत्या प्रकारें वागतात, या गोष्टीची माहिती करून घ्यावयाची हा निश्चय त्याच्या मनांतून अगदीं ढळला नाहीं. याविषयींची इच्छा त्यास होती तशीच होती; परंतु ती सिद्धीस जावयाचा संभव मात्र त्यास कांहीं कमी दिसूं लागला. इतके दिवस डोंगरांत कोठें एकादी गुप्त वाट शोधण्याचा जो त्यास नाद होता, तो नाद मात्र आतां त्यानें सोडून दिला. त्यास वाटलें कीं, याविषयीं आणखी श्रम करून फळ नाहीं. तथापि त्यानें इतका दृढ निश्चय केला कीं, आपला मूळचा हेतु न विसरतां तो तडीस नेण्याची पुढें कधीं काळीं संधि आल्यास ती वायां जाऊं द्यावयाची नाहीं.

---

# भाग सहावा.

## मनुष्यानें पंख लावून उडण्याची युक्ति.

त्या गुहेंत राहणाऱ्या लोकांचीं सोईचीं व मौजेचीं कामें करून पैसा मिळवावा, या लोभानें त्या बंदीखान्यांत तऱ्हेतऱ्हेचे कितीएक कसबी लोक येऊन राहिले होते. त्यांमध्यें एक कारागीर असे. तो शिल्पविद्येंत फारच निष्णात आहे अशी त्याची ख्याति होती. त्यानें तेथें आपल्या बुद्धीनें व कौशल्यानें उपयोगाचीं व मौजेचीं कितीएक यंत्रें केलीं होतीं, त्यानें पाण्याच्या जोरानें एका यंत्राचें चाक फिरतें करून, त्या यंत्रानें एका बुरुजांत पाणी नेऊन, तेथून तें पाणी राजवाड्यांत जागोजाग खेळविलें होतें. तसेंच त्यानें बागेंत एक बंगला बांधला होता व तेथें अशी कळ केली होती कीं, तिच्या योगानें त्या बंगल्याच्या भोंवतीं कृतीचा पर्जन्य पडून तेथें कधींही उष्मा होऊं नये, तसेंच त्यानें स्त्रियांस विहार करण्यासाठीं एक कुंज तयार केला होता. तेथें पंखे लावले होते, ते पाण्याच्या प्रवाहाच्या योगानें हलून तेथें नामी मजेची हवा चाले. तशींच गोड व मंजुळ स्वराचीं वाद्यें करून तीं एकमेकांपासून त्यानें योग्य अंतरावर ठेविलीं होतीं. ह्यांपैकीं कितीएक वाऱ्याच्या शक्तीनें व कितीएक प्रवाहाच्या शक्तीनें वाजत असत.

राजपुत्र रासेलस ह्यास सर्व विद्यांचा व कलांचा शोक होता. तो कधीं कधीं या कारागिराकडे जात असे. मनांत कीं, कधीं तरी आपण या बंदीखान्यांतून सुटल्यास बाहेर प्रपंचांत आपणास या सर्व प्रकारच्या ज्ञानाचा उपयोग होईल. असो.

हा राजपुत्र नेहमींप्रमाणें एक दिवस चार घटका करमणूक होण्याकरितां ह्या कारागिराकडे गेला, त्यावेळीं शिडांनीं गलबत जसें पाण्यावर चालतें तसा जमिनीवर चालणारा रथ तो तयार करीत होता. त्यानें त्या रथाची सर्व युक्ति समजावून दिल्यावर तो रथ सपाट जमिनीवरून वाऱ्यानें चालेल अशी राजपुत्राची खात्री झाली. नंतर त्यानें त्या कारागिराची मोठी वाहवा केली आणि मोठा आग्रह करून सांगितलें कीं, 'तुम्ही हें काम तडीस न्या.' राजपुत्रानें केलेली स्तुति ऐकून त्या कारागिरास हर्ष झाला. मग याहीपेक्षां विशेष प्रतिष्ठा मिळवावी

या बुद्धीनें तो राजपुत्रास म्हणतो, "महाराज, आपण जें पाहिलें तें कांहींच नाहीं; याहून फार मोठे मोठे चमत्कार शिल्पविद्येच्या सामर्थ्यानें सिद्ध होतात. माझें मत बहुत दिवस असें आहे कीं, एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणीं जाणें झाल्यास मनुष्यें गलबतांत किंवा गाड्यांत वगैरे जातात;पण ही वाहनें मंद आहेत; तर हीं टाकून शिल्पविद्येच्या योगानें पंखांनीं मनुष्यास विशेष जलद जातां येईल.जे आळशी व अज्ञान, त्यांनीं हवें तर जमिनीवर रखडावें, परंतु जे विद्या जाणतात त्यांस तिच्या सामर्थ्यानें आकाशमार्गानें खुशाल संचार करतां येईल."

हें भाषण ऐकून त्या गुहेभोंवतालचे डोंगर उल्लंघून पार जाण्याची इच्छा राजपुत्राचे मनांत पुनः उद्भवली.त्या कारागिराचें कांहीं कसब त्यानें पाहिलें होतें, व त्याचे मनांत डोंगरावर जावयाची उत्कंठा होती; यास्तव त्यास वाटलें कीं, हा म्हणतो तसें कदाचित् करीलही; नाहीं कशावरून ? तथापि चांगला विचार केल्यावांचून या छंदांत मन घालूं नये; कारण, हा म्हणतो याप्रमाणें न झाल्यास आशाभंग होऊन पुनरपि उगीच दुःख होईल. असा निश्चय करून तो त्या कारागिरास म्हणतो," बाबा, मला वाटतें कीं,तुला या गोष्टीचा नाद असावा, त्यामुळें हें तूं बोलतोस; आपल्या कसबाचा विचार करून बोलत नाहींस. पहा; ईश्वरानें निरनिराळ्या जातींच्या प्राण्यांस निरनिराळ्या स्थानांची योजना केली आहे. मनुष्यें व जनावरें यांनीं जमिनीवर फिरावें व पक्ष्यांनीं आकाशांत फिरावें असा त्याचा संकेत स्पष्ट दिसतो."

करागिरानें उत्तर दिलें, " महाराज, आपण म्हणतां या रीतीनें पाण्यांत मासे वगैरे जलचरांस मात्र फिरतां यावें; पण तसें दिसत नाहीं. जनावरांस स्वभावतः व मनुष्यांस कृतीनें त्यांत पोहतां येतें. आणि ज्यांस,पाण्यांत पोहतां येतें,त्यांस आकाशांत उडतां येणें असंभाव्य नाहीं; कारण, पोहणें आणि उडणें यांत वास्तविक भेद नाहीं;पोहणें म्हणजे विशेष घनद्रव्य जें पाणी त्यांत उडणेंच आहे व उडणें हें विशेष विरल द्रव्य जो वायु, त्यांत पोहणेंच होय. आपणांस ज्या द्रव्यांत संचार करावयाचा असेल तें द्रव्य जसें घन (घट्ट) किंवा विरल (पातळ) असेल त्याप्रमाणें कमीजास्त जोरानें त्याचा रोध केला पाहिजे, म्हणजे तें दाबलें पाहिजे म्हणजे झालें. वायु दाबला असतां तो विरळपणामुळें जितका लवकर दाबांतून निघून जातो, त्यापेक्षां विशेष जलदीनें पुनः त्यास दाबतां आलें म्हणजे मनुष्य अर्थातच वायूंत तरेल हें उघड आहे."

२

राजपुत्र म्हणाला, " पण पोहण्याच्या कामाची मोठी जबरी मेहेनत आहे. पराकाष्ठेचा बळकट पुरुषसुद्धां पोहतांना लौकर दमतो. यावरून मला वाटतें कीं, उडण्याची मेहेनत याहीपेक्षां जबर होईल; आणि पोहणाऱ्यापेक्षां उडणाऱ्यास जर दूर जाववलें नाहीं तर पंख लावून उडण्यांत कांहीं अर्थ नाहीं. "

कारागिरानें उत्तर केलें, " आरंभीं जमिनीवरून उठावणी करतांना मेहेनत फार पडेल खरी; कारण कोंबडा, बदकें, मोर इत्यादि मोठमोठ्या पांखरांच्या उडण्यांत ती गोष्ट स्पष्ट दिसून येते. परंतु मनुष्य जसजसा वर वर चढेल तसतसें पृथ्वीचें आकर्षण कमी कमी होऊन उडणाऱ्याच्या आंगाचें वजनही कमी कमी होत जाईल; आणि वर चढतां चढतां तो इतका उंच जाईल कीं, तेथें खालीं पडण्याचा कल त्याचे ठायीं नाहींसा होऊन तो खुशाल वातावरणांत तरेल. मग पुढें सरण्याविषयींच काय तो यत्न केला पाहिजे; व तो यत्न सहज व सुखानें होईल. ज्ञाता व विद्वान् पुरुष पंखांच्या योगानें वातावरणांत चढून आकाशांत इकडे तिकडे संचार करीत असतां पृथ्वी व तिजवरील देश व लोक जे एका अक्षवृत्तावर असतील ते पृथ्वीच्या दैनंदिन (रोजच्या) भ्रमणानें एकामागून एक वर येतांना व खालीं जातांना पाहून त्यास केवढा चमत्कार व आनंद वाटेल; हे महाराज, आपणास ज्ञानाचा आषक फार आहेच, तेव्हां आपल्या ध्यानांत सहज येईल, यांत संशय नाहीं. मनुष्यास उंच गगनमंडळांत उभें राहून तेथून खालीं द्वीपें, महाद्वीपें, समुद्र, मोठमोठालीं नगरें व अफाट अरण्यें हीं चाकावर बसून फिरविल्यासारखीं एकामागून एक दृष्टीस पडलीं असतां केवढी मजा वाटेल? जेथें सर्व प्रकारची समृद्धि असल्यामुळें व दंगाधोपा नसल्यामुळें लोक स्वस्थतेनें सुखानुभव घेताहेत असे सुपीक देश असोत; तसेंच जेथें लोकांची देवघेव चालली आहे अशीं मोठमोठीं व्यापाऱ्यांचीं शहरें असोत; किंवा ज्यावर क्रूर व अडाणी लोक फिरताहेत असे पर्वत असोत; किंवा जेथें सैनिक एकमेकांचा संहार करीत आहेत अशीं रणांगणें असोत; हीं सर्व स्थळें निर्धोरपणें पाहतां आलीं असतां केवढी मौज वाटेल बरें! महाराज, मेघमंडळांत आपण गेलों असतां तेथें बसून नील नदीचा उगम कोठें आहे व ती कोणकोणत्या देशांतून कसकशी वाहात गेली आहे, हें आपणांस सहज समजेल व दूरदूरच्या देशांवरून उडत जाऊन पृथ्वी एका शेवटापासून दुसऱ्या शेवटापर्यंत समग्र पाहतां येईल. "

राजपुत्र म्हणाला, " तूं म्हणतोस हें सर्व होईल तर फार चांगलें आहे खरें; परंतु व्हावयाचेंच कठिण दिसतें. जेथून पृथ्वीवरील सर्व चमत्कार निर्भयपणें व

स्वस्थपणें पाहतां येतील त्या उंच प्रदेशीं वायु फारच विरळ असल्यामुळें मनुष्यास श्वासोच्छ्वास करतां यावयाचा नाहींसें मला वाटतें. मी असें ऐकिलें आहे कीं, उंच उंच पर्वतांच्या माथ्यांवर गेलें असतां तेथें श्वासोच्छ्वास व्हावयास फार कठिण पडतें आणि या माथ्यांवर वायु इतका विरळ झाला असतो तरी तेथून पदार्थ सहज खालीं पडतात. यावरून मला अशी शंका येते कीं, जितक्या उंचीवर मनुष्यास श्वासोच्छ्वास करतां येईल तितक्या उंचीवर त्याचें खालीं पडण्याचें भय नाहींसें होणार नाहीं."

कारागिरानें उत्तर केलें, "सर्व शंकांचें समाधान पूर्वी झालें पाहिजे असा नियम केल्यास कोणत्याही गोष्टीचा यत्नच व्हावयाचा नाहीं. या माझ्या बेतास आपण जर आश्रय देत असलां तर प्रथम उडून पाहण्याचें माझें मी पत्करतों; त्यापासून अपाय घडल्यास तो माझा मला घडेल. आकाशांत उडणाऱ्या सर्व प्राण्यांच्या शरीररचनेचा मी विचार केला आहे. सर्वांत वडवाघळासारखे अखंड पंख मनुष्यास चांगले उपयोगी पडतील असें माझें मत आहे. त्या नमुन्यावर पंख घडण्याच्या कामास मी उद्यांपासून लागतों, व एका वर्षांत आकाशांत उडून मनुष्याचें जेथें खालून कांहीं चालणार नाहीं इतका उंच जाईन अशी माझी उमेद आहे. परंतु कामास लागण्यापूर्वी आपण एक वचन मला दिलें पाहिजे. तें वचन हेंच कीं, ही माझी युक्ति गुप्त रहावी व आपणां दोघांशिवाय दुसऱ्या कोणास पंख करून देण्याविषयीं आपण मला सांगूं नये."

राजपुत्रास स्वभावतः उपकारबुद्धि होती. त्यानें विचारिलें कीं, "अरे, असली अपूर्व शक्ति दुसऱ्या मनुष्यास प्राप्त झाली असतां त्यांत तुला इतका असंतोष कां? आपणांस जी युक्ति येत असेल ती मनुष्यमात्राच्या उपयोगीं पडेलशी करावी असा आपला धर्म आहे. पहा, प्रत्येक मनुष्यास इतरांपासून पुष्कळ हित झालें आहे. आकाशांतून पडला आणि धरणीवर सांवरला असा कोणी नाहीं; यास्तव आपणांकडून होईल तितका उपकार आपण दुसऱ्यावर करीतच असावा."

कारागिरानें उत्तर केलें, "महाराज, सर्वच मनुष्यें आपणासारखीं सद्बुद्धीचीं असतीं तर मी मोठ्या आनंदानें सर्वांस आकाशांत उडण्याची कला शिकवली असती; परंतु तशी स्थिति जगांत दिसत नाहीं. पहा! दुष्ट मनुष्यें आकाशांतून उतरून चांगल्या मनुष्यांवर हल्ला करूं लागलीं तर त्या चांगल्या मनुष्यांस स्वस्थता कशी वाटावी? आकाश-मार्गानें चालून येणाऱ्या फौजेचें निवारण डोंगर समुद्र यांच्यानेंसुद्धां होणार नाहीं; मग कोट व खंदक यांची काय कथा आहे?

उत्तरेकडील देशांतील अडाणी व क्रूर लोकांचें लष्करच्या लष्कर उडत येऊन एकाद्या समृद्ध राजाच्या राजधानीवर एकाएकीं एकदम पडलें आणि तिचा सफाई नाश केला तर त्यापुढें काय चालणार आहे? लांब कशास पाहिजे, दक्षिण समुद्राच्या किनाऱ्यावर जे रानटी लोक राहतात तेसुद्धां कदाचित् आपणां राजपुत्रांची रहावयाची जी ही गुहा—जी केवळ आनंदाचें वसतिस्थान—तीवरसुद्धां हल्ला करूं शकतील. ”

नंतर राजपुत्रानें ती युक्ति गुप्त राखण्याविषयीं वचन दिल्यावर दुसऱ्या दिवशीं कारागिरानें पंख करण्यास आरंभ केला. तें काम सिद्ध होईलच अशी केवळ खात्री राजपुत्रास नव्हती खरी; परंतु तें सिद्ध होणार नाहीं असेंही त्यास पक्कें वाटलें नव्हतें. असो. तो वरच्यावर तें काम कसें चाललें आहे, हें पहावयास जात असे, व ते पंख हलके असून मजबूत व्हावे व त्यांस सहज हलवितां यावें म्हणून ज्या ज्या चमत्कारिक युक्त्या तो कारागीर योजी त्याही हा लक्ष लावून पाही. त्या कारागिराच्या मनाची दररोज विशेष खात्री होऊन तो म्हणत असे कीं, मीं या पंखांच्या योगानें गिधाड व घारी यांस मागें टाकून त्याहीपेक्षां उंच जाईन; व ही त्याची इतकी खात्री पाहून राजपुत्राच्याही मनांत अधिकाधिकच खात्री वाटूं लागली.

एक वर्ष संपावयाच्या सुमारास ते पंख तयार झाले, व संकेताप्रमाणें एके दिवशीं सकाळीं तळ्याच्या कांठीं, उडण्याची तयारी करून, तो कारागीर आला. नंतर वारा जमण्याकरितां त्यानें कांहीं वेळ पंख फडफडावून त्या कांठावरून वर उडी मारली. परंतु वर न जातां तो तत्काळ तळ्यांत पडला. वातावरणांत तरण्याला तर त्या पंखांचा उपयोग झाला नाहीं खरा, तथापि पाण्यांत तरण्यास ते त्या कारागिराचे उपयोगीं पडले. मग लज्जेनें व भयानें अर्धमेला झालेल्या त्या कारागिरास राजपुत्रानें ओढून तीरावर आणिलें.

---

## भाग सातवा

### राजपुत्राची एका विद्वानाशीं भेट.

त्या कारागिराची पंख लावून उडण्याची युक्ति फसली म्हणून राजपुत्रास फारसें दुःख झालें नाहीं. कारण त्यास ती गोष्ट सिद्ध होण्याची विशेष आशा

पूर्वीपासूनच नव्हती; तरी त्यास त्या बंदीखान्यांतून बाहेर पडण्यास दुसरी कांहीं युक्ति दिसत नव्हती व ही एक आढळली म्हणून तो तिच्या नादीं कांहींसा लागला होता. असो. असें झालें तरी त्या आनंदगुहेंतून संधि साधल्या-बरोबर निघून जाण्याचा जो त्यानें एक वेळ निश्चय केला होता तो त्याचा अगदीं ढळला नव्हता.

परंतु आतां तो हेतु सिद्ध करण्याची कांहींएक युक्ति त्यास सुचेना. बंधांतून सुटून बाह्य जगांत मोकळेपणें मिसळण्याचा संभव त्यास अगदीं दिसेना. त्यामुळें आपली उमेद न खचण्याविषयीं तो जरी पुष्कळ यत्न करी, तथापि अस्वस्थपणा उत्तरोत्तर वाढून त्याचे वृत्तींत पूर्वीप्रमाणें खिन्नता व उदासपणा हीं येत चाललीं. इतक्यांत पर्जन्यकाळ आला, त्यामुळें बाहेर रानांत फिरण्याची सोयही नाहींशी झाली.

त्या वर्षी नेहमींपेक्षां पावसाळा अधिक दिवस राहून पाऊसही जोरानें पडत असे. भोंवतालच्या डोंगरांवर ढग थडकून खूप पाऊस पडे. आणि त्यावरून मोठमोठे लोंढे खालीं उतरून जिकडेतिकडे ओढे वहावयास लागले. तें जास्त पाणी दरींतून जाईनासें होऊन तळें फुगलें, आणि सपाट जागीं जिकडे तिकडे पाणीच पाणी होऊन गेलें. राजवाडा उंच जागीं होता तो व दुसरे कांहीं थोडे उंचवटे खेरीजकरून बाकी सर्व जलमय दिसूं लागलें. शेळ्यामेंढयांचे कळप व गाई-म्हशींचीं खिल्लारें यांनीं कुरणें सोडिलीं, व सर्व रानजनावरें व पाळीव जनावरें आपापल्या बचावाकरितां डोंगरावर गेलीं.

याप्रमाणें बाहेर फिरावयाचें बंद झाल्यामुळें राजपुत्रास घरांत बसून व्हाव-यासारख्या करमणुकीनें मनोरंजन करणें प्राप्त झालें. त्या गुहेंत इम्लाक म्हणून एक कवि होता. तो केव्हां केव्हां आपल्या कविता म्हणून दाखवून मंडळीस करमणूक करीत असे. त्याच्या कवितांत मनुष्यांच्या अनेकविध अवस्थांचें सुरस व विविक्त वर्णन असे. तें ऐकून रासेलसाचें मन त्या कवितांनीं फारच वेधलें. मग एके दिवशीं त्यानें त्या सर्वांस आपल्या स्वतःच्या दिवाणखान्यांत बोलावून आणून त्याकडून त्या कविता पुनः म्हणविल्या. नंतर त्याचें व याचें विशेष सलगीनें कांहीं वेळ संभाषण झाल्यावरून हा मनुष्य प्रपंचांतील मनुष्यांची स्थिति चांगली जाणतो व वक्तृत्वाच्या योगानें ऐकणारापुढें प्रत्यक्ष असल्याप्रमाणें ती उभी करण्याचें यास सामर्थ्य आहे, असला मनुष्य आपणास सांपडला, हें पाहून रासेलसास मोठा आनंद झाला. त्यानें त्यास पुष्कळ गोष्टी पुसल्या. त्या

एरवींच्या मनुष्यांस अगदीं उघड होत्या, तरी हा राजपुत्र लहानपणापासून एकी-कडे प्रतिबंधांतच असल्यानें त्यास मुळींच माहीत नव्हत्या. त्याचें तें अज्ञान पाहून कवीस त्याविषयीं वाईट वाटलें, व ज्ञान प्राप्त करून घेण्याची त्याची उत्कंठा पाहून त्याजवर त्याचा लोभ जडला. मग तो कवि त्या राजपुत्रास रोजच्या रोज नव्या नव्या गोष्टी सांगे, व प्रपंचांतील माहिती करून देई. राजपुत्रास या गोष्टी ऐकण्याचें असें वेड लागलें कीं, रात्रीं झोंपेंत काळ जातो याचें त्यास मोठें दुःख होई; आणि असें वाटे कीं, उजाडेल केव्हां आणि मी त्या गोष्टी ऐकेन केव्हां.

एक दिवस ते दोघे बोलत बसले असतां राजपुत्र इम्लाक यास म्हणाला कीं, आपली मुळापासून सर्व हकीकत ऐकण्याची इच्छा मला झाली आहे. तर ती कृपा करून सांगावी. आपण या गुहेंत आलां तें कोणतें कारण घडल्यावरून किंवा कोणत्या हेतूनें आलां तेंही सांगावें. आतां इम्लाक आपली गोष्ट आरंभणार, इतक्यांत राजपुत्रास गाणें ऐकण्यास राजवाड्यांतून बोलावणें आलें; त्यामुळें तो तिकडे गेला, व गोष्ट ऐकण्याचा बेत संध्याकाळपर्यंत तहकूब झाला.

---

# भाग आठवा.

## इम्लाक याची हकीकत.

उष्ण देशांत ख्यालीखुशालीची वेळ म्हटली म्हणजे दिवस मावळल्यानंतर; तेव्हां राजवाड्यांतलें गाणें आटपून राजपुत्र आपल्या महालांत जाईन तों मध्यरात्रीचा सुमार झाला. रासेलसानें नंतर कवीस बोलावून त्याची हकीकत ऐकण्यास आरंभ केला.

इम्लाक कवि म्हणाला, "महाराज, माझी हकीकत फार नाहीं. जो मनुष्य आपला जन्म केवळ विद्याभ्यासांत घालवितो, त्याविषयीं लोकांत तादृश गवगवा होत नाहीं; व साधारण ऐकणाऱ्यास रंजविण्यासारखीं व चमत्कारिक कृत्यें त्याच्या हकीकतींत असत नाहींत. त्याच्या हकीकतींत काय त्या गोष्टी म्हटल्या म्हणजे त्यानें चार मंडळींत भाषण करणें, एकांतीं बसून मनन करणें, ग्रंथ वाचणें, पाठ ऐकणें, दुसऱ्यास प्रश्न करणें किंवा दुसऱ्याच्या प्रश्नांचीं उत्तरें सांगणें, ह्याच होत. तो कोणीकडे फिरला तर त्याजबरोबर इतमाम नसतो किंवा त्याचा कोणास दरारा नसतो; त्यासारखे जे कांहीं थोडे विद्येचीच दर्द बाळगणारे असतात, त्या-खेरीज तो कोणासही माहीत नसतो व त्याविषयीं कोणी पर्वाही करीत नाहीं. असो.

" नील नदीच्या उगमापासून जवळच गोयामीचें राज्य आहे, तेथें माझा जन्म झाला. माझा बाप मोठा श्रीमान् सावकार होता. तो अरबी समुद्राचीं बंदरें व आफ्रिका खंडांतील समुद्रापासून दूर अंतरावरचे देश यांच्यामध्यें माल आणण्यानेण्याचा व्यापार करीत असे. परंतु त्याची समजूत कमी व बुद्धि कृपण असे. त्याला असें वाटे कीं, आपण मोठे श्रीमान् असावें म्हणजे सर्व झालें. परंतु तो आपली श्रीमंती बाहेर दाखवीत नसे. कारण,ती समजल्यास त्या ठिकाणचे सरकारी अधिकारी आपली संपत्ति लुटून नेतील असें त्यास नेहमीं भय वाटे."

हें ऐकून राजपुत्र म्हणाला, " माझ्या बापाच्या राज्यांत एक मनुष्य दुसऱ्याची दौलत जबरीनें घेण्यास जर प्रवृत्त होत असेल तर, तो राजा कारभार बरोबर पहात नाहीं हें उघड आहे. राजा स्वतः अन्याय करो, किंवा दुसऱ्यास अन्याय करूं देवो. त्या दोहींबद्दल त्यास ईश्वरापाशीं जबाब दिला पाहिजे, हें बादशाहा जाणत नाहीं काय ? मी जर बादशाहा झालों तर माझ्या राज्यांत अत्यंत दुर्बल जो मनुष्य असेल त्यासुद्धां कोणी उगीच इजा देऊं शकणार नाहीं; व कोणी कदाचित् दिल्यास मी त्यास शिक्षा केल्यावांचून कधीं राहणार नाहीं. सरकारी कामगार आपणांस लुटतील या भयानें राज्यांत सावकारांस प्रामाणिकपणानें मिळविलेल्या संपत्तीचा उपभोग घेण्यास हिंम्या होत नाहीं, ही अंदाधुंदी ऐकून खरोखर माझ्या आंगाचा संताप झाला आहे. असा दुष्ट कोण अधिकारी असेल त्याचें नांव सांगा, मी स्वतः त्याचा गुन्हा बादशाहास कळवितों."

इम्लाक म्हणाला, " महाराज, आपला स्वभाव उत्तम आहे व वय लहान असून आपणांस लौकिकाची माहिती नाहीं; यामुळें आपणांस इतका त्वेष आला. परंतु पुढें कांहीं वर्षांनीं आपणच आपल्या तीर्थरूपास दोष लावीतनासे व्हाल, व अधिकाऱ्यांचा आपणास कदाचित् इतका राग येईनासा होईल. हबशी मुलखांत वास्तविक पहातां रयतेवर जुलूम क्वचित् होतो, व जेव्हां होतो तेव्हां गुन्हेगारास शासन झाल्यावांचून प्रायः रहात नाहीं. परंतु ज्यांत जुलूम व अन्याय होत नाहींत, असा राज्यव्यवस्थेचा प्रकार मनुष्यास अद्यापि सुचला नाहीं. कोणत्यांत कमी, कोणत्यांत फार इतकेंच;परंतु अन्याय व जुलूम हे म्हणून राज्यव्यवस्थेच्या सर्व प्रकारांत आहेतच आहेत. अंमल म्हटला म्हणजे एकाच्या हातीं सत्ता व दुसऱ्यास ती मानणें भाग, असा अर्थ उत्पन्न झाल्यावांचून रहात नाहीं. आणि सत्ता जर मनुष्याच्या हातीं आहे तर कधीं ना कधीं तरी ती त्याच्या हातून गैरवाजवी कामाकडे लागेल ह्यांत संशय नाहीं. सर्वश्रेष्ठ अधिकारी जो राजा तो

सावधपणें सर्व पहात असला म्हणजे पुष्कळ काम होतें; परंतु पुष्कळ गोष्टी बंदोबस्तावांचून तशाच रहातात. त्याच्या राज्यांत जे जे अन्याय होतात ते सर्व त्यास कळणें अशक्य आहे, व जे म्हणून त्यास कळतात, त्या सर्वांबद्दलच शासन करण्याचें त्यास बहुतकरून सामर्थ्य असत नाहीं. "

राजपुत्र म्हणाला, " तुम्ही म्हणतां हें माझ्या ध्यानांत येत नाहीं. असो. सध्यां मला तुमची गोष्ट ऐकणें आहे, वादविवाद करणें नाहीं. यास्तव आपली गोष्ट पुढें चालू द्यावी. "

इम्लाक म्हणाला, "माझ्या बापाचा मूळचा उद्देश असा होता कीं, व्यापाराच्या कामांत जितकी विद्या लागते तितकी मात्र मला शिकवावी, दुसरें कांहीं शिकवूं नये. लहानपणीं माझी धारणाशक्ति व तीव्रबुद्धि पाहून तो म्हणत असें कीं, हा मुलगा मोठेपणीं सर्व हबशी देशांत मोठा श्रीमंत होईल असें मला वाटतें. "

राजपुत्रानें विचारलें, " आपणाच्यानें उपभोगवेल किंवा लोकांस दाखवेल त्यापेक्षां अधिक दौलत तुमच्या बापापाशीं असतां ती आणखी वाढवावी अशी त्यास इच्छा होती म्हणून सांगतां हें कसें ? तुम्ही सांगतां तें खोटें असें माझ्यानें म्हणवत नाहीं, परंतु परस्परांशीं विरुद्ध अशा दोन्ही गोष्टी कशा घडतील ? "

इम्लाकनें उत्तर केलें, " परस्परांशीं विरुद्ध अशा दोन्ही गोष्टी वाजवी असणार नाहींत खऱ्या; परंतु मनुष्यांच्या ठायीं परस्परांस विरुद्ध अशा दोन्ही गोष्टी घडतात. आणखी असें आहे कीं, गोष्टी परस्परांहून भिन्न असल्या म्हणजे त्या नियमानें परस्परांशीं विरुद्ध असतातच असें नाहीं. माझ्या बापास कदाचित् असें वाटत असेल कीं, पुढें कांहीं कालानें राज्यांत अधिक बंदोबस्त होईल व आपणास आपल्या संपत्तीचा उघडपणें स्वस्थ उपभोग घ्यावयास सांपडेल. तसेंच आणखीही एक गोष्ट अशी आहे कीं, मनुष्याच्या जिवांत जीव आहे तों त्याच्या मनांत कांहीं तरी हव्यास असावा लागतो. मग ज्यांच्या वास्तविक न्यूनता पूर्ण झाल्या असतात ते कांहीं कल्पित न्यूनता उत्पन्न करून त्या पूर्ण करण्याच्या नादांत आपला वेळ घालवितात. "

राजपुत्र म्हणाला, " तुम्ही म्हणतां ती गोष्ट कांहीं अंशीं मला समजली. मला आतां वाटतें कीं, मध्यें शंका काढून तुमच्या गोष्टीस उगीच व्यत्यय केला. असो; पुढें ? "

इम्लाक पुढें म्हणाला, " वर सांगितलेल्या उद्देशानें बापानें मला शाळेंत घातलें. परंतु तेथें लौकरच मला नवीन गोष्टींच्या माहितीची मौज, अपूर्व विषयांत

बुद्धि शिरल्यापासूनचा हर्ष व आंगीं कल्पकता वाढविण्याचा अभिमान, यांची चटक लागून संपत्ति तुच्छ वाटूं लागली. माझ्या बापाचा दौलत वाढविण्याचा हव्यास आठवला म्हणजे त्याचा तिरस्कार मला वाटे. मी मनांत निश्चय केला कीं, आपला काळ त्याच्या इच्छेप्रमाणें क्षुल्लक जी संपत्ति ती मिळविण्यांत घालवावयाचा नाहीं. माझ्या बापाची मजवर ममता होती त्यामुळें माझें वय वीस वर्षांचें होईपर्यंत मुशाफरीच्या दगदगींत त्यानें मला घातलें नाहीं. तितक्या काळांत एकामागून एक अशा निरनिराळ्या गुरूंपासून मी आपल्या देशांतील सर्व विद्या शिकलों. दररोज मला नवीन नवीन गोष्टी समजत; त्यामुळें माझा हा काळ एकसारखा आनंदांत गेला. परंतु असें झालें कीं, माझ्या शिक्षकांविषयीं माझ्या मनांत पूर्वीं जी पूज्यबुद्धि होती, ती मी जसजसा प्रौढ होत चाललों तसतशी नाहींशी झाली. कारण, ते मला जो जो पाठ सांगत तो संपल्यावर मी विचार करून पाही तों ते मला इतर मनुष्यापेक्षां शहाणपणानें किंवा आचरणानें कांहीं अधिक आहेत, असें माझ्या अनुभवास येत नसे.

" पुढें आतां यास व्यापारांत घालावें असा निश्चय करून माझा बाप एके दिवशीं द्रव्यानें भरलेल्या भुयारांतील एका भुयारांतून दहा हजार मोहरा काढून त्या मजपुढें ठेवून म्हणाला कीं, मुला, हें तुला मी भांडवल देतों; एवढ्यावर तुला व्यापार आरंभिला पाहिजे. मी जेव्हां व्यापार करूं लागलों तेव्हां मुळीं याचा पंचमांशसुद्धां भांडवल नव्हतें;पण मेहेनतीच्या व व्यवस्थितपणें वागण्याच्या योगानें तें किती वाढलें हें तुला दिसतच आहे. आतां हें जें तुला द्रव्य देतों यावर तुझी पूर्ण सत्ता आहे. तूं हवें तर उधळून टाक किंवा हवें असल्यास वाढीव. तूं जर गैदीपणानें किंवा छांदिष्टपणानें हें उधळून टाकिलेंस तर माझ्या जिवांत जीव आहे तावत्कालपर्यंत तुला पुनः मजपासून पैसा प्राप्त होणें नाहीं. तो मिळण्यास तुला माझ्या मरणाचीच वाट पहात बसलें पाहिजे. परंतु चार वर्षांत जर तूं हें भांडवल दुप्पट केलेंस तर तुझ्या व माझ्यामधला लहानमोठेपणा विसरून मी तुजबरोबर भागीदार मित्राप्रमाणें वागेन. कारण, पैसा मिळविण्याच्या कामांत जो माझ्याप्रमाणें हुषारी दाखवितो, त्यास सर्वकाळ मी आपल्या बरोबरीचा लेखतों; मग तो वयानें लहान असो किंवा बरोबरीचा असो.

" मग स्वस्ताईचा माल विकत घेऊन व त्याच्या पोटांत तो पैसा गुप्तपणें ठेवून तो माल मीं उंटावर लादला, आणि तांबड्या समुद्राच्या तीरास गेलों. तेथें समुद्राचा अमर्याद विस्तार पाहून, एकादा मनुष्य बंदीखान्यांतून मोकळा होतो

त्याप्रमाणें मला पराकाष्ठेचा हर्ष झाला; व अनेक प्रकारचें ज्ञान प्राप्त करून घेण्याची उत्कंठा माझ्या मनांत उत्पन्न झाली. मग मीं मनांत निश्चय केला कीं, पृथ्वीवरील नानाविध लोकांच्या नानाविध रीतिभाती व हवशी देशांत अज्ञात अशा ज्या विद्या असतील त्या सर्व माहीत करून घेण्याची ही संधि आली आहे, तर ही व्यर्थ जाऊं द्यावयाची नाहीं.

" बापानें मला जें सांगितलें होतें त्याची मला आठवण होती. मी व्यापार करून भांडवल वाढवावें असें त्याचें म्हणणें होतें खरें, परंतु त्याबद्दल त्यानें वचनानें मला बांधून घेतलें नव्हतें; इतकेंच मात्र सांगितलें होतें कीं, त्याच्या इच्छेप्रमाणें मी न वागल्यास मला त्यापासून आणखी पैसा मिळावयाचा नाहीं. आतां माझें वचन गुंतलें असतें तर तें मला मोडतां येतेंना, परंतु आणखी पैशाची आशा सोडण्यास मी मुखत्यार होतों. मग मीं निश्चय केला कीं, पुष्कळ मुलूख पाहून ज्ञान प्राप्त करून घेण्याची आपणास मोठी हौस आहे तर तीच पुरवावयाची. पैसा आणखी न मिळाला तरी न मिळो.

" मी स्वतंत्रपणें व्यापारास निघालों आहें हें लोकांस समजलें होतें. यास्तव गलबतवाल्याची ओळख करून पहिल्यानें योजलेल्यापेक्षां दुसऱ्या देशांत जाण्यासाठीं त्यांच्या गलबतावर जागा भाड्यानें ठरविण्यास मला कठिण पडलें नाहीं. अमक्याच देशांत जाण्याचें मला कारण नव्हतें. पूर्वीं न पाहिलेल्या कोणत्याही देशांत जाऊन तो पाहण्याचा माझा उद्देश होता, म्हणून सुरतेस जाणारें एक जहाज होतें त्यावर चढण्याचें मीं ठरविलें व त्याप्रमाणें बापास घरीं पत्र रवाना करून मी हिंदुस्थानास निघालों. "

---

# भाग नववा.

## इम्लाक याची हकीकत पुढें चालू.

" प्रथमच मी अफाट दर्यांत गेलों होतों. मग जेव्हां जमीन कोणीकडेही अगदीं दिसेनाशी झाली, त्यावेळेस चोहोंकडे पाहून मला मोठी मौज वाटली. परंतु त्या मौजेंत भयाचाही कांहीं अंश होता. भोंवतालचा तो अमर्याद विस्तार पाहून माझें मनही विस्तृत झालेसें भासलें; व असें झालें कीं, समुद्राकडे टक लावून कितीही दिवस बसलें तरी कधींही कंटाळा यावयाचा नाहीं. परंतु कांहीं वेळ

लोटल्यावर मला त्या नुसत्या एकसारख्या पाण्याकडे पहावयाचा त्रास येऊन मी तक्तपोशीवरून उठून खालीं खोलींत जाऊन बसलों. माझ्या मनांत असा संशय आला कीं, समुद्राच्या मौजेविषयीं जसें झालें तसेंच ज्या पुष्कळ आशा बाळगून मी मुशाफरीस निघालों आहें, त्यांचाहि असाच शेवट होणार नाहींना ! परंतु पुनः आपल्या मनाशीं असा विचार केला कीं, समुद्र आणि जमीन यांच्यामध्यें फार तफावत आहे. पाण्याच्या स्थितींत वैचित्र्य म्हटलें म्हणजे फारच थोडें. तें हलत असेल किंवा संथ असेल. परंतु जमिनीची गोष्ट तशी नाहीं. तीवर डोंगर, खोरीं, मैदानें, रानें व नगरें असें पुष्कळ वैचित्र्य असतें. तिवर निरनिराळे लोक राहतात, व त्या त्या लोकांच्या रीतीभाती, समजुती फारच निरनिराळ्या असतात. जमिनीवरील सृष्टीच्या रचनेंत व स्वरूपांत जरी तितकें वैचित्र दृष्टीस न पडलें तरी तीवरील मनुष्यांच्या व्यवहारांत तरी पुष्कळ वैचित्र्य आढळण्याचा संभव आहे. याप्रमाणें विचार करून मीं आपलें मन शांत केलें.

" वाटेनें जहाजावर करमणूक करण्याकरितां मीं कधीं कधीं खलाशांपासून गलबतें दर्यांत चालविण्याची विद्या समजून घेत असे. ह्या विद्येची यापूर्वीं मला माहिती नव्हती. तसेंच कधीं कधीं वेळ जाईनासा झाला म्हणजे एकांतीं बसून आपणांस प्रपंचांतल्या निरनिराळ्या अवस्थांत कल्पून त्यांत कसकशा रीतीनें वागावें याची योजना करीत असे. परंतु त्यांपैकीं एकाही अवस्थेचा अनुभव माझ्या आंगीं नव्हता.

" मला दर्याचा बहुतकरून कंटाळा आला होता; इतक्यांत आमचें जहाज सुरक्षितपणें सुरतेच्या बंदरास लागलें. मग जमिनीवर उतरल्यावर आपला सर्व पैसा घेऊन व्यापार करण्याच्या मिषानें कांहीं माल खरेदी करून, आंतील दूरदूरच्या प्रांतांत व्यापारी लोकांचा तांडा जात होता, त्याबरोबर मीही निघालों. कोणत्या कारणावरून असेल तें असो, परंतु माझ्या सोबत्यांस मजपाशीं पुष्कळ द्रव्य आहे असें लवकरच कळलें; व मला ज्या ज्या नवीन गोष्टी दिसत, त्या सर्वांविषयीं मला आश्चर्य वाटे, व मी त्यांस त्यांविषयीं प्रश्न करी त्यांवरून माझ्या आंगीं वाकबगारी नाहीं, हेंही त्यांनीं लवकरच ताडलें. त्यावरून मग त्यांनी विचार केला कीं, हा मनुष्य नवखा आहे, यास टकाविण्यास कांहीं चिंता नाहीं; व प्रपंचांत मनुष्य टकतें कसें, ही एकच विद्या समजण्यांत माझा बराच पैसा गेला. असो. त्यांच्या हुकेगिरीमुळें चाकर माझा पैसा चोरीत व वाटेनें जे सरकारी कामगार भेटत तेही मजपासून जकातीच्या वगैरे मिषानें उगीच पैसा उपटीत. या प्रकारें

मला लोक लुटीत. यांत माझ्या सोबत्यांस स्वतः नफा नसे; परंतु माझें अज्ञान व आपली विशेष हुशारी मनांत आणूनच ते संतोष पावत."

राजपुत्र म्हणाला, "थांबा अंमळ. मी आपणास विचारतों कीं, मनुष्यें स्वभावानें इतकीं दुष्ट आहेत काय, कीं आपलें हित नसतांही दुसऱ्याचें उगीच नुकसान केल्यानें त्यांस सुख वाटतें? आपण विशेष हुशार आहों, हें मनांत येऊन आनंद होणें हें स्वाभाविकच आहे,हें मला समजतें. परंतु केवळ प्रसंग न आल्यामुळें तुम्ही अज्ञान होतां, यांत कांहीं तुमचा अपराध किंवा मूर्खपणा नव्हता, तर तुमच्या असल्या अज्ञानावरून आपण विशेष हुशार आहों असें मानून संतोष वाटण्यास त्यांस कारण नव्हतें. आणखी मला असें वाटतें कीं, ते तुम्हांपेक्षां विशेष वाकबगार व हुशार होते, ही गोष्ट तुम्हांस फसवून जशी त्यांनीं दाखविली, तशी तुम्हांस सावध करूनही त्यांस दाखवितां आली असती. त्याकरितां तुमचा तोटाच करण्याची गरज नव्हती."

इम्लाकनें उत्तर केलें, "महाराज, गर्विष्ठ मनुष्यें इतका सूक्ष्म भेद कोठें पाहतात? क्षुल्लक गोष्टींत जरी वर्चस्व असलें तरी तेवढेंच त्यांस फुशारकी वाटण्यास पुरतें. तसेंच मत्सरी पुरुष असतात, त्यांस स्वतःचें केवळ बरें मनांत आणून सुख होत नाहीं, तर दुसऱ्याचें दुःख त्यांस मनांत आणावें लागतें. माझे सोबती मजशीं वैर करीत; त्याचें कारण इतकेंच कीं, माझें द्रव्य पाहून त्यांस दुःख होई; आणि ते माझा तोटा करीत; त्याचें कारण हेंच कीं, माझा दुर्बलपणा पाहून त्यांस समाधान वाटे."

राजपुत्र म्हणाला,"तुम्ही सांगतां त्या गोष्टी घडल्या असतील;त्या मी खोट्या म्हणत नाहीं;परंतु तुम्ही ज्या हेतूनें त्या तुमच्या सोबत्यांनीं केल्या म्हणून म्हणतां, त्याविषयीं मात्र मला वाटतें कीं, ती तुमची भ्रांति असावी. असो; मग पुढें?"

इम्लाकनें सांगितलें, "मग त्या सावकाराबरोबर हिंदुस्थानची राजधानी आग्रा शहर तेथें गेलों. या शहरांत त्या देशाचा बादशाहा बहुतकरून राहतो. नंतर मी हिंदुस्थानी भाषेचा अभ्यास करून थोड्याच दिवसांत तेथील विद्वान् लोकांशीं संभाषण करूं लागलों. त्या विद्वान् लोकांपैकीं कितीएक त्रासिक असत, व त्यांस दुसऱ्यांशीं बोलण्याचा कंटाळा असे. दुसरे कितीएक असत ते आनंदवृत्ति असत, व त्यांस दुसऱ्याशीं बोलण्याची हौस असे. स्वतः श्रम करून शिकलेली विद्या दुसऱ्यास सांगण्यास कितीएकांची खुषी नसे. व कितीएकांचें मत असें असे कीं, विद्याभ्यास करण्याचा वास्तविक उद्देश म्हटला म्हणजे, ती दुसऱ्यास शिकवून नांवलौकिक मिळवावा.

" बादशाहाच्या मुलांस जो पंडित शिकवीत असे, त्याशीं ओळख करून त्याचा मी लोभ संपादिला. त्यानें मला दरबारीं नेऊन बादशाहाची भेट करून दिली व त्या प्रसंगीं, " हा अपूर्व विद्वान् आहे " अशी माझी बादशाहापाशीं त्यानें बहुत स्तुति केली. बादशाहानें मग मला हबशी देशांतल्या कित्येक गोष्टी विचारल्या, व तुम्ही वाटेनें कसे आलां वगैरे कांहीं प्रश्न केले. बादशाहाच्या भाषणांत साधारण चातुर्याच्या कांहीं गोष्टी होत्या, असें तर मला आतां आठवत नाहीं खरें; तथापि इतकें पक्कें आठवतें कीं, त्या वेळेस त्याच्या अकलेचें मला मोठें आश्चर्य वाटलें, व त्याच्या सौजन्यानें माझें चित्त मोहून गेलें.

" पुढें बादशाहाचे दरबारांत माझी फारच प्रतिष्ठा झाल्यावरून सुरतेहून मज-बरोबर आग्र्यास आलेले सावकार लोक मजकडे येऊन मला आग्रह करूं लागले कीं, तुम्ही शिफारस करून आमचा माल खपवून द्या. त्यांची आग्रह करण्याची सलगी पाहून मला मोठा चमत्कार वाटला. मग त्यांनीं वाटेनें मजबरोबर लुचे-गिरी केल्याची त्यांस आठवण देऊन मी हंसत हंसत त्यांची बरीच शोभा केली. परंतु त्यांनीं ती खुशाल ऐकून घेतली. तीपासून त्यांस लाज वाटली किंवा दुःख वाटलें, असें कांहींच त्यांच्या मुद्रेवरून दिसलें नाहीं.

" मग कांहीं वेळानें तीच गोष्ट पुनः काढून त्याबद्दल ते मला लांच देऊं लागले. परंतु मेहेरबानीखातर त्यांचें म्हणणें जो ऐकेना तो मी लाचानें कसला बधतों ! माझ्या हातून ही गोष्ट होणें नाहीं म्हणून मीं त्यांस साफ सांगितलें. त्यांनीं वाटेनें मला बुडविलें होतें ह्या द्वेषानें मीं त्यांस नकार सांगितला, असें नाहीं; तर लोकांस बुडविण्यास आपण त्यांस मदत करूं नये हाच माझा हेतु होता. कारण त्याविषयीं मीं कोणा एकाद्यास शिफारस केली असती, तर त्या शिफारशीच्या योगानें त्या मनुष्यास आपला माल विकतांना ते ठकवितें, ही माझी पक्की खात्री होती. असो.

पुढें आग्र्यास पाहण्यासारखें व समजून घेण्यासारखें कांहीं राहिलें नाहीं असें पाहून मी तेथून इराणांत गेलों. तेथें त्या देशांतल्या प्राचीन काळच्या ऐश्वर्याचीं कितीएक चिन्हें माझ्या दृष्टीस पडलीं व तेथें संसारसुखाच्या कितीएक वस्तु माझ्या पाहण्यांत आल्या. "

" इराणी लोक बोलून चालून वगैरे फारच चांगले आहेत. त्या लोकांत मी फार मिसळत असे, तेणेंकरून त्यांच्या रीतीभाती व प्रपंचांतल्या अनेक

प्रकारच्या स्थितींतले मनुष्यांचे निरनिराळे स्वभाव, हीं पाहण्यास मला तेथें नित्य नवीन संधि सांपडे.

" इराणांतून मी अरबस्थानांत गेलों. या देशांतील लोक मोठे शूर आहेत, व ते गुरें बाळगून उपजीवन कारितात. हे फार दिवस एके ठिकाणीं रहात नाहींत, शेळयामेंढयांचे कळप व गुरांचीं खिल्लारें हींच काय ती त्यांची दौलत. इतर देशच्या लोकांच्या संपत्तीचा त्यांस मत्सर किंवा लाभ नसतांही ते त्यांशीं आज शेंकडों वर्षे नेहमीं लढाई करीत आले आहेत, याचें काय कारण असेल तें असो. "

---

# भाग दहावा.

## इम्लाकची हकीकत पुढें चालू.

### कवितेविषयीं सामान्य विचार.

इम्लाक पुढें सांगतो, " महाराज, मीं जे जे मुलूख पाहिले, त्या त्या सर्व मुलुखांत माझ्या पाहण्यांत असें आलें कीं, सर्वत्र कविता ही सर्वांत मोठी विद्या गणतात. व तिला देवकृति असल्याप्रमाणें मान देतात, आणि त्यांत विशेष आश्चर्य वाटण्याजोगी ही गोष्ट माझ्या पाहण्यांत आली कीं, बहुतेक सर्व देशांत अत्यंत पुरातन जीं काव्यें त्यांसच अत्यंत उत्कृष्ट मानितात. आतां ही जी सर्वत्र सारखी समजूत पडली आहे हिचें कारण काय? बाकीच्या सर्व विद्या मनुष्यास होत होत प्राप्त होतात, आणि कविता एकदम प्राप्त होते, किंवा निरनिराळ्या लोकांत जे जे प्रथमतः कवि होऊन गेले, त्यांचीं काव्यें अगदीं नवीनच असल्यामुळें त्या त्या लोकांस तीं अद्भुत वाटून, त्या कवींची जी एक वेळ कीर्ति होऊन गेली, तीच अंधपरंपरेनें त्या त्या लोकांत अद्यापि तशीच राहिली आहे; किंवा मनुष्यांच्या मनोवृत्ति—ज्यास अलंकारशास्त्रांत रस म्हणतात—व सृष्टि-सौंदर्य हेच कवितेचे विषय काय ते नेहमीं असल्यामुळें, पहिल्यानें ज्यांनीं काव्यें रचिलीं, त्यांनीं अत्यंत वर्णनीय विषयांचें वर्णन करून टाकलें व संभवण्यासारखीं सर्व संविधानकें रचून टाकिलीं, त्यामुळें त्यांच्या मागून झालेल्या कवींस त्यांनीं वर्णिलेल्या गोष्टींचेंच पुनः वर्णन करणें व त्यांच्याच ग्रंथांतल्या गोष्टी घेऊन त्यांची कांहीं नव्या रीतीनें रचना करणें प्राप्त झालें; यापैकीं कोणतें कारण असेल तें

असो ! परंतु आपणांस कवितांचे मर्मज्ञ म्हणविणाऱ्या विद्वानांचें बहुतकरून असें मत आहे कीं, प्रथम जे कवि झाले त्यांच्या ग्रंथांत स्वभावसिद्ध सौंदर्य फार, व त्यांच्या मागून जे झाले त्यांच्या ग्रंथांत करामत फार. पहिल्या कवींच्या काव्यांत आवेश व कल्पना हीं अधिक, व मागल्यांच्या काव्यांत शब्दलालित्य व अर्थलालित्य* हीं अधिक.

" मला अशी इच्छा झाली कीं, आपलेंही कविमालिकेंत नांव पडावें, आणि ती इच्छा सिद्ध होण्याकरितां मी फारशी भाषेंतील व आरबी भाषेंतील सर्व काव्यांचा चांगला अभ्यास केला. मुसलमानांचें अत्यंत पवित्र क्षेत्र जें मक्का शहर तेथल्या मशिदींत पुष्कळ काव्यें आहेत, तीं मीं पाठ केलीं. परंतु लवकरच माझ्या लक्षांत आलें कीं, केवळ अनुकरणानें मोठा कवि कोणी कधींही झाला नाहीं.

" माझ्या मनांत तर आपली कविता उत्कृष्ट व्हावी असें होतें. यास्तव मीं बेत केला कीं, आपण स्वतः सृष्टीचें व लोकस्थितीचें मनन करून नवीन काव्य करावयाचें. दुसऱ्यांनीं सांगितलेल्याच गोष्टींचा अनुवाद करावयाचा नाहीं. सृष्टींतले चमत्कार ज्याचा विषय व सर्व मनुष्यें ज्याचे श्रोते, असें काव्य करण्याचा माझा हेतु होता. तेव्हां विषयाचें वर्णन चांगलें सुरस करतां यावें, म्हणून सृष्टीचें लक्षपूर्वक मी अवलोकन करूं लागलों, व श्रोत्यांच्या मनांत हवा तो रस उत्पन्न करतां यावा म्हणून मनुष्यांच्या समजुती व त्यांचे मनोविकार कसकसे असतात, हें समजून घेऊं लागलों.

" मग कवि होण्याचा निश्चय केल्यावर या नवीन उद्देशानें जेव्हां मी सृष्टीचें अवलोकन करूं लागलों, तेव्हां पूर्वीं पाहिलेलीच सृष्टि मला नवीन भासूं लागली. ज्या गोष्टींकडे पूर्वीं लक्ष पोंचत नव्हतें त्या लक्षांत येऊं लागल्या; सर्व प्रकारच्या माहितीची मला आतां गरज वाटूं लागली. नानाप्रकारचे उपमादि अलंकार सुचावे व मनोरंजक वर्णन करतां यावें, म्हणून मी पर्वतांवर व अरण्यांत पुष्कळ फिरलों, अनेक प्रकारच्या वृक्षांच्या व पुष्पांच्या तसबिरी स्मृतिरूप-पटावर उतरून घेतल्या. पर्वतांचे मोठमोठे कडे व राजमंदिरांचीं शिखरें यांचें एकसारखें लक्ष देऊन अवलोकन केलें. कधीं कधीं मी वनांत एकादा चांगला स्वच्छ ओढा वाहतांना दृष्टीस पडला असतां, त्याच्या वळणावळणांनीं त्याच्या तीरावरची शोभा पहात पहात कोस कोस लांब जाई. व कधीं कधीं संध्याकाळीं पश्चिमेस चित्र-

* सुंदरपणा.

विचित्र रंगांचे मेघ दिसतात व क्षणोक्षणीं त्यांचे आकार बदलत असतात, त्यांजकडे पहात उभा राही. कवीला अनुपयुक्त असा कोणताही विषय नाहीं. या सृष्टींत जे जे अत्यंत रमणीय किंवा अत्यंत भयंकर विषय आहेत ते त्यास सर्वदा उपस्थित पाहिजेत; जे जे विशाळ असल्यामुळें प्रचंड किंवा सूक्ष्म असल्यामुळें गोजिरवाणें असतें, त्या सर्वांची त्यास माहिती पाहिजे. बागांतील झाडें, अरण्यांतील जनावरें, जमिनींतील खनिज पदार्थ, आकाशांतील ग्रह, तारे वगैरे या सर्व विषयांचें ज्ञान त्यास पाहिजे. कवीचा मुख्य उद्देश म्हटला म्हणजे वाचणाऱ्यांची सदाचरणाकडे प्रवृत्ति व्हावी व दुराचरणापासून निवृत्ति व्हावी हा आहे; आणि या प्रकारचा त्याचा उपदेश गोड लागून मनांत ठसण्याकरितां प्रसंगवशात् सर्व प्रकारच्या कल्पना त्याच्या उपयोगीं पडतात. यास्तव ज्यास माहिती फार त्यास आपल्या वर्णनांत वैचित्र्य व गोडी आणण्याची व दूरदूरचे दाखले आणून व उपदेश करून वाचणाऱ्याचें मनोरंजन करण्याची शक्तीही फार येते हें सिद्धच आहे."

"हें सर्व मनांत आणून सृष्टींतील सर्व चमत्कारिक गोष्टींचा मी लक्षपूर्वक विचार करूं लागलों, व जो जो देश मीं पाहिला तेथें तेथें माझ्या अंगची कविता-शक्ति वाढण्यासारखें कांहीं कांहीं ज्ञान मला प्राप्त झालें."

राजपुत्र म्हणाला, "तुम्ही इतके देश फिरलां, तेव्हां त्यांतल्या पुष्कळ गोष्टी तुम्ही पाहिल्यावांचून राहिल्या असतील हें उघड आहे. पहा, या गुहेंत मी आज लहानपणापासून राहत आहे व ही गुहाही फार मोठी नाहीं. तथापि मी कधीं बाहेर फिरावयास गेलों आणि पूर्वी न पाहिलेला किंवा ज्याकडे पूर्वी लक्ष दिलें नाहीं असा पदार्थ माझ्या नजरेस पडला नाहीं, असा दिवस एक देखील मला आठवत नाहीं."

इम्लाकनें उत्तर केलें, "महाराज, कवीला प्रत्येक व्यक्ति पाहण्याची गरज नाहीं. त्यास जातींचें ज्ञान झालें म्हणजे पुरे आहे. वनस्पतींच्या किंवा प्राण्यांच्या निरनिराळ्या जातींचे ठायीं जे साधारण व सहज लक्षांत येण्यासारखे गुण व धर्म असतात, ते त्यास ठाऊक असले म्हणजे झालें. गुलाबाच्या फुलास किती पाकळ्या असतात किंवा वनांतल्या झाडांच्या हिरवेपणांत कोणकोणत्या छाया असतात, हें वर्णन करण्याची त्यास गरज नाहीं. पर्वत, नद्या, वृक्ष, वनस्पती इत्यादि सृष्टींतल्या विषयांचें वर्णन करतांना उत्तम कवि ह्यांच्या अशा ठळक ठळक गुणांचें वर्णन करितो कीं तेणेंकरून ते विषय वाचणारांस एकदम आपल्या डोळ्यांपुढें उभे राहिलेसे वाटतात. आतां त्या

वाचनालय

विषयांच्या ठायीं कितीएकांच्या नजरेस येणारे व कितीएकांच्या नजरेस न येणारे बारिकबारिक भेद असतात, तसल्या गुणांचें कवि वर्णन करीत नाहींत.

" परंतु सृष्टींतल्या विषयांचें ज्ञान झालें म्हणजे कवीची [illegible] तयारी झाली. याखेरीज लोकवृत्त, म्हणजे लोकांचे निरनिराळे वागण्याचे प्रकार, हेही त्यास ठाऊक असले पाहिजेत. या संसारांत धनीचाकर, सावकारकूळ, राजाप्रजा, नवराबायको, श्रीमंतगरीब इत्यादि अनेक भिन्न भिन्न अवस्था आहेत. या प्रत्येकींत सुख किती व दुःख किती हें कवीस माहीत असलें पाहिजे. काम, क्रोध, प्रीति, द्वेष इत्यादि भिन्न भिन्न मनोवृत्ति वेगवेगळ्या असतां व एकत्र जमल्या असतां काय परिणाम होतात, हें त्याच्या लक्षांत पाहिजे. तसेंच निरनिराळ्या देशांत निरनिराळ्या राज्यव्यवस्था व लोकमर्यादा इत्यादिकांच्या व रीति, चाली, हवा इत्यादिकांच्या योगानें मनुष्यांच्या वृत्तींत बालपणापासून वृद्धपणापर्यंत कसकसे फेरफार होत असतात, हेंही कवीस कळलें पाहिजे. मनुष्य ज्या देशांत व ज्या काळांत लहानाचा मोठा होतो त्या देशच्या व त्या काळच्या समजुती त्याचे ठायीं केवळ बालाभ्यासानें दृढ होतात. व त्यांच्या योगानें तो पुष्कळ गोष्टींस पुरा विचार न करितां बऱ्या किंवा वाईट, खऱ्या किंवा खोट्या म्हणत असतो; तर तसल्या समजुती एकीकडे ठेवून वास्तविकपणें शाश्वत नीति कोणती व अनीति कोणती याचा त्यास विचार केला पाहिजे. आणि चालत्या काळाचे जे कायदे, जीं मतें असतील त्यांवरच पोकळ भरंवसा न ठेवितां निःपक्षपातानें जें तथ्य असेल, ज्यास कधींही बाध येत नाहीं, त्याचेंच अवलंबन करण्याविषयीं झटलें पाहिजे. अशा प्रकारचें काव्य करणाराची कीर्ति जर लौकर पसरली नाहीं, तर त्या गोष्टीविषयीं मनांत वाईट न वाटूं देतां त्यानें असें समाधान केलें पाहिजे कीं, हल्लींच्या काळांत माझी वाहवा न झाली, तरी पुढें जे समंजस व निःपक्षपाती लोक होतील ते मला चाहतील. त्यानें आपल्या ग्रंथांत सृष्ट पदार्थांचें वास्तविक स्वरूप उघड करून दाखविलें पाहिजे व सर्व मनुष्यमात्रांचें ज्यांत हित आहे असा वर्तनक्रम सांगितला पाहिजे; तसेंच तो ज्या काळीं व ज्या देशांत रहात असेल त्या काळच्या व त्या देशच्या अविचारांच्या समजुतींनीं भ्रांति पडूं न देतां आपल्या लेखाच्या सामर्थ्यानें पुढील लोकांची समजूत व वर्तणूक उत्तम करण्याची शक्ति त्यास असावी.

"इतक्यानेंच झालें नाहीं. याखेरीज त्याला पुष्कळ भाषा व पुष्कळ शास्त्रेंही आलीं पाहिजेत. तसेंच अर्थास अनुरूप शब्दरचना होण्यासाठीं तो ज्या भाषेंत कविता करील त्या भाषेचें मर्म व तिचें माधुर्य यांविषयीं तो पुरा वाक-बगारही असला पाहिजे."

---

# भाग अकरावा.

## इम्लाक याची गोष्ट पुढें चालू.

### यात्रेविषयीं.

इम्लाक कवि मोठ्या रंगांत येऊन आपल्या कसबाचें याप्रकारें अतिशयोक्ति-पूर्वक वर्णन करीत चालला असतां राजपुत्र म्हणाला, " बस बस, पुरे करा. माझी खात्री झाली कीं, तुम्ही म्हणतां हें जर खरें आहे, तर मनुष्याच्या हातून कविता कदापि होणें नाहीं. तर आतां तुमची पुढची हकीकत काय ती सांगा."

इम्लाक म्हणाला, " उत्तम कविता करणें फार कठिण आहे खरें,—"

राजपुत्रानें उत्तर केलें, " इतकें कठिण कीं, ती करतां यावयाकरितां जे श्रम करावे लागत असतील ते समजून घेण्याची सांप्रत मला अगदीं इच्छा नाहीं, तर इराण देश पाहून झाल्यावर आपण पुढें कोणत्या देशास गेलां, तें कृपा करून मला सांगावें."

इम्लाक म्हणाला, "इराण देशाहून मी सिरिया नामक देशास गेलों. ज्या देशास तुर्कस्थान म्हणतात, त्या देशांत पालेस्तैन म्हणून एक प्रांत आहे, त्या ठिकाणीं यहुदी लोकांचें राज्य प्राचीनकाळीं होतें. या प्रांतीं मी तीन वर्षे होतों. तेथें मी असतां युरोपखंडांतील उत्तरेकडील व पश्चिमेकडील देशांतील पुष्कळ लोकांशीं माझ्या गांठी पडत, व त्यांशीं संभाषण करावयास सांपडे. त्या देशच्या लोकांच्या आंगीं जो पराक्रम व जें ज्ञान आहे, तशीं पृथ्वींत दुसऱ्या कोणत्याही लोकांत नाहींत. त्यांचीं लष्करें जिकडे जिकडे जातात तिकडे तिकडे त्यांची फत्तेच होते; तसेंच त्यांचीं आरमारें अशीं जबरदस्त आहेत कीं, महा-सागराच्या अत्यंत दूर दूर प्रदेशीं सुद्धां त्यांची दहशत आहे. ते लोक, आणि आपला देश व आपल्या भोंवताळचे देश येथील लोक, यांची तुलना मी मनांत

करून पाहूं लागलों तों दोन निरनिराळ्या जातींच्या प्राण्यांत जसें अंतर असावें, तसें अंतर त्या दोघांमध्यें मला दिसलें. अमुक एक पदार्थाची इच्छा केली आणि तो पदार्थ त्या देशांत प्राप्त होत नाहीं, असा पदार्थ सांपडणें कठिण. जो जो पदार्थ इच्छावा तो तो तेथें प्राप्त होतो. लोकांच्या सोईकरितां व मौजेकरितां जीं हजारों कसबें व धंदे त्या देशांत चालले आहेत, त्यांचीं नांवेंसुद्धां आपल्या देशांत कोणीं ऐकिलीं नाहींत. आतां जे जे जिन्नस त्यांच्या देशांत पिकत नाहींत ते सर्व त्यांस व्यापाराच्या योगानें हवे तितके प्राप्त होतात. "

राजपुत्रानें विचारलें, " युरोप खंडांतले लोक इतके पराक्रमी असण्याचें कारण काय ? आणि युरोपचे लोक व्यापाराकरितां किंवा मुलूख काबीज करण्याकरितां जसे एशिया खंडांत व आफ्रिका खंडांत येतात, तसे एशिया खंडांतले लोक व आफ्रिका खंडांतले लोक युरोप खंडांतल्या देशांवर स्वारी करून व तेथें वसाहत करून अंमल कां बसवीत नाहींत ? पहा, ज्या वाऱ्याच्या योगानें युरोपचे लोक जहाजांत बसून परत जातात, त्याच वाऱ्यानें या लोकांचीं जहाजें युरोप खंडांत जाण्यास अडचण कोणती ? "

इम्लाकनें उत्तर केलें, " युरोपियन लोक आपणांपेक्षां विशेष पराक्रमी असण्याचें कारण हेंच कीं, त्यांचें ज्ञान आपणांपेक्षां विशेष आहे; व ज्ञानाची छाप सर्वकाळ अज्ञानावर असावयाचीच. पहा, पशूंस मनुष्याच्या अधीन राहावें लागतें, याचें कारण तरी मनुष्यास पशूंपेक्षां विशेष ज्ञान आहे, याखेरीज दुसरें कोणतें आहे ? आतां त्यांस आपणांपेक्षां विशेष ज्ञान तरी कां असावें, असा आपण प्रश्न केल्यास त्यावर, ' अशी ईश्वराची मर्जी ' याखेरीज दुसरें उत्तर मला सुचत नाहीं. "

राजपुत्र दुःखाचा उसासा टाकून म्हणाला, " पालेस्तैन प्रांतांत जाऊन तेथें जमलेला अनेक देशांच्या लोकांचा मेळा पाहण्याचा व त्यांत मिसळण्याचा योग कधीं मला घडेल कां ? आतां तो आनंदाचा दिवस कधीं उगवेल तो उगवो. परंतु तो येईपर्यंत तुमच्या तोंडून तेथील गोष्टी तर ऐकूं, " असें बोलून तो आणखी म्हणाला, " पालेस्तैन प्रांतांत सर्व मुलखांतून इतके लोक कां येतात हें मला ठाऊक आहे. त्या प्रांतांत ख्रिस्ताचा जन्म होऊन त्यानें अनेक अद्भुत कृत्यें तेथें केलीं आहेत. ज्ञानाचें व धार्मिकपणाचें हें मुख्य स्थान. तेथें देशोदेशींचे मोठमोठे विद्वान् व धर्मनिष्ठ पुरुष नेहमीं येत असतील यांत संशय नाहीं. "

इम्लाक म्हणाला, " कितीएक देश असे आहेत कीं, तेथून फारसे लोक पालेस्तैन प्रांतांत येत नाहींत. याचें कारण असें आहे कीं, युरोप खंडांत ख्रिस्ती धर्मांतल्या कितीएक पंथांचे लोक यात्रा करण्याच्या चालीस अज्ञानमूलक मानून तिची निंदा करतात; या पंथांत बहुत लोक आहेत, व त्यांपैकीं कितीएक मोठमोठे विद्वान् आहेत. "

राजपुत्र म्हणाला, " या बंदखान्यांत मी लहानपणापासून असल्यामुळें लोकांत बाहेर कोणकोणतीं भिन्न भिन्न मतें आहेत, तीं मला ठाऊक नाहींत, हें तुम्हांस कळतच आहे; यात्रेविषयीं उभय पक्षांचीं साधकबाधक प्रमाणें ऐकून घेण्यास पुष्कळ वेळ पाहिजे. यास्तव या विषयावर तुम्हीं विचार केलाच असेल. तर तुमचा सिद्धांत झाला असेल तोच मला कळवा म्हणजे झालें. "

इम्लाक म्हणाला, " इतर धार्मिक कृत्यांप्रमाणें यात्रा करणें हेंही जशा बुद्धीनें तें करावें त्याप्रमाणें सयुक्तिक किंवा अयुक्तिक आहे. सत्याच्या शोधाकरितां दूर दूर देशीं प्रवास करावा म्हणून शास्त्रांत कोठेंही सांगितलें नाहीं. सुमार्गानें वागण्याकरितां जितकें ज्ञान पाहिजे तितकें ज्ञान मनुष्य भाविकपणें जेथें शोधील तेथें त्यास प्राप्त होईल, अशी तजवीज ईश्वरानें केली आहे. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं गेलें असतां देवभक्ति वाढतेच असें नाहीं. पण बहुत फिरण्यानें मन मात्र उलटें चंचल होतें. तथापि ज्या ज्या ठिकाणीं मोठमोठीं अद्भुत कृत्यें घडलीं तीं ठिकाणें पाहण्याकरितां मनुष्यें नेहमीं जातात, व तीं ठिकाणें दृष्टीनें पाहिल्यामुळें त्या कृत्यांचें महत्त्व त्यांचें मनांत बिंबतें, असें अनुभवसिद्ध आहे. यावरून आपला धर्म ज्या ठिकाणीं उत्पन्न झाला तें स्थळ पहावयास जाण्याची उत्सुकता वाटणें मनुष्यास स्वाभाविक आहे; व मला वाटतें कीं, कोणी ख्रिस्ती पालेस्तैनमध्यें गेला, व ख्रिस्तानें अलौकिक कृत्यें केल्याचीं स्थानें बघून त्याची धर्माविषयीं निष्ठा विशेष दृढ झाली नाहीं, असें प्रायः घडत नाहीं. एका ठिकाणापेक्षां दुसऱ्या ठिकाणीं परमेश्वराचा प्रसाद विशेष सुलभतेनें होतो असें समजणें केवळ पोकळ भ्रांति आहे. तथापि कांहीं स्थानांच्या दर्शनानें भक्ति वगैरे भाव मनांत विशेष उत्पन्न होतात, ही गोष्ट सर्वानुभवसिद्ध व निर्विवाद आहे. कोणी जर असें समजत असेल कीं, पालेस्तैन येथें गेल्यानें मला दुष्ट वासनांचें दमन विशेष करितां येईल, तर तें त्याचें अज्ञान आहे; तरी तें स्थळ पहावयास जाणें केवळ मूर्खपणा आहे असेंही म्हणणें खोटें आहे. चमत्कारिक स्थानें

पहावयास जाण्यास कांहीं चिंता नाहीं. आतां कोणी असें जर समजेल कीं, अमुक स्थळीं गेलें असतां ईश्वर पापाची विशेष त्वरेनें व सहज क्षमा करतो, तर तो मनुष्य मात्र आपल्या अकलेस व धर्मास थट्टा आणतो, असें समजावें. ”

राजपुत्र म्हणाला, “ हे जे तुम्ही बारीक भेद सांगितले ते युरोपियन लोकांनीं केलेले दिसतात. हे खरे किंवा खोटे याचा विचार मी सध्यां करीत नाहीं, पुढें एखादे वेळेस करूं. तुम्हांस सांप्रत मी इतकेंच पुसतों कीं, ज्ञानाचा परिणाम आपणांस कोणता दिसला ? आपणापेक्षां युरोपियन लोकांस ज्ञान विशेष आहे म्हणून तुम्हीं सांगितलें तर ते लोक आपणांपेक्षां ज्ञानाच्या मानानें विशेष सुखी आहेत काय?”

इम्लाक म्हणाला, “ या संसारांत प्रत्येक मनुष्य आपल्या काळजींत निमग्न असल्यामुळें अमक्याचें सुख विशेष व अमक्याचें कमी असा विचार करण्यास कोणीही बहुतकरून रिकामा नाहीं. तथापि माझें पुसाल तर असें मत आहे कीं, ज्ञान हें स्वतः सुखास कारण आहे. यास प्रमाण हेंच कीं आपापलें ज्ञान वाढावें अशी इच्छा प्रत्येक मनुष्याच्या अंतःकरणांत स्वाभाविक दिसते. अज्ञान हें अंधकारासारखें केवळ अभावरूप आहे. त्यापासून कोणतेंही कार्य उत्पन्न होत नाहीं. आपणांस कांहीं गोष्ट नवीन समजली म्हणजे तेवढ्यानेंच आनंद होतो व ती विसरली असतां वाईट वाटतें; यावरून ज्ञान स्वतः सुखास कारण आहे, हें स्पष्ट सिद्ध होतें. यावरून मला असें वाटतें कीं, जसें जसें मनुष्याचें ज्ञान वाढत जातें तसें तसें त्याचें सुखही वाढतें, असा सामान्य नियम आहे. आतां ज्ञानापासून सुख उत्पन्न होण्यास कितीएक प्रतिबंधकें आहेत, तीं असतील तर मात्र गोष्ट निराळी.”

“ आतां संसारांतल्या विशेष सुखांची गणना करूं लागलें असतां तीं आपणापेक्षां युरोपियन लोकांस अधिक आहेत, असें आपल्या सहज लक्षांत येईल. जखमा पडल्या असतां किंवा रोग झाले असतां आपणांप्रमाणें ते लोक खितपत पडून मरत नाहींत. त्यांस वैद्यक चांगलें समजत असल्यामुळें ते त्या व्याधी सहज दूर करतात; शिल्पविद्या ते चांगली जाणतात. यामुळें थंडी, उष्ण वगैरेपासून आपणांस जशी पीडा होते तशी त्यांस होत नाहीं. ते त्यांचें निवारण करितात. कितीएक श्रमाचीं व दगदगीचीं कामें जीं आपणांस आंगमेहनतीनें करावीं लागतात तीं ते लोक यंत्राच्या सहाय्यानें करितात. यास्तव त्यांस आपणांसारखा शीण सोसावा लागत नाहीं. त्या लोकांच्या मुलुखांत चोहोंकडे सतत डाका चालतात, यामुळें त्यांस मित्रवियोग म्हणून बहुतकरून होतच नाहीं, असें

म्हटलें तरी चिंता नाहीं. त्यांच्या देशांत राज्यव्यवस्था चांगली असल्यामुळें राजापासून त्यांस पीडा होत नाहीं. त्यांच्या देशांत मोठमोठे डोंगर फोडून आरपार रस्ते बांधले आहेत, व नद्यांवर पूल असल्यामुळें त्यांवरून अलीकडे पलीकडे जाण्यास हरकत होत नाहीं. आतां घरगुती सुखाचा विचार करूं लागल्यास त्या लोकांचीं रहातीं घरें आपल्यापेक्षां फारच विशेष सोईचीं असल्यामुळें, व त्यांस चोराचिलटांचा उपद्रव फारच कमी असल्यामुळें घरगुती सुखही त्या लोकांस आपणांपेक्षां पुष्कळ अधिक आहे, असें कबूल केलें पाहिजे. "

राजपुत्र म्हणाला, " असल्या ज्या सोई आहेत त्या विशेष सुखावह होत, हें तर स्पष्टच आहे; परंतु एकमेकांपासून दूर अंतरावर असतांही आपापलें हृद्गत मित्रांस एकमेकांस कळवितां येतें, ही सोय त्या लोकांत आहे, हें तर फारच मोठें सुख आहे. हें आपल्या देशांत नसल्यामुळें मला फारच वाईट वाटतें. इतर सुखें नसल्यामुळें तादृश वाटत नाहीं. "

इम्लाक म्हणाला, "युरोप खंडांतल्या लोकांत आपणांपेक्षां दुःख कमी खरें; परंतु ते म्हणजे वास्तविक सुखी आहेत असें मला वाटत नाहीं. कोणत्याही देशीं व कोणत्याही काळीं पहा. मनुष्यास दुःख सोसणें विशेष, सुखानुभव कमी, असें दृष्टोत्पत्तीस येतें. "

---

# भाग बारावा.

## इम्लाक याची हकीकत पुढें चालू.

राजपुत्र म्हणाला, "तुमचें मत असें दिसतें कीं, मनुष्यास सुख देण्यास ईश्वर हाताचा फार जड आहे. पण मला तुमच्या बोलण्याचा खरेपणा अद्याप तरी वाटत नाहीं. माझ्या मनाची तर खात्री आहे कीं, मला स्वतंत्रपणें वागूं दिल्यास मी आपल्या आयुष्याचा प्रत्येक दिवस पूर्ण सुखांत घालवीन; दुःखाचा अगदीं लवलेशसुद्धां येऊं देणार नाहीं. मी स्वतंत्र झाल्यास कसा वागेन तें तुम्हांस सांगतों ऐका. मी कधीं कोणास इजा देणार नाहीं. व कोणाचाही द्वेष संपादणार नाहीं. जो जो कोणी संकटांत पडलेला दृष्टीस पडेल, त्याचें त्याचें संकट दूर करून सर्व लोक माझे उपकार स्मरून माझें सर्वदा कल्याणच इच्छितील असें करीन. व जे सुज्ञ व सज्जन असतील त्यांशींच मी मित्रत्व करीन, आणि सुगुण व सुशील

स्त्री पाहून तिच्याशीं विवाह करीन; मग असें केल्यावर विश्वासघाताचें किंवा प्रीतिभंगाचें भय कोठें राहिलें ? मी मोठ्या काळजीनें मुलांस सुविद्या व सुनीति शिकवून तीं विद्वान् व धार्मिक होतशीं तजवीज ठेवीन. म्हणजे अर्थातच तीं लहानपणीं मीं त्यांवर केलेले उपकार स्मरून म्हातारपणीं मला सुख देतील.ज्याच्या औदार्यानें श्रीमान झालेले व ज्याच्या मदतीनें संकटांतून पार पडलेले हजारों हजार लोक हाकेबरोबर ज्यास सहाय्य करण्यास सिद्ध आहेत, त्या पुरुषाकडे वांकड्या दृष्टीनें पाहण्यास सुद्धां कोणी समर्थ होणार नाहीं, मग त्यास त्रास देण्याची वार्ता कशास पाहिजे ? याप्रमाणें आपण दुसऱ्यांवर उपकार करावा व त्यांनीं आपणास बरें म्हणावें अशा रीतीनें सर्व आयुष्य आनंदांत स्वस्थपणें कोणी घालवील तर तसें घालवितां येईल. ही गोष्ट मला अगदीं अशक्य दिसत नाहीं; व अशा रीतीनें वागण्यास युरोपियन लोकांच्या अनेक प्रकारच्या ज्या सुधारणुका तुम्हीं सांगितल्या त्यांची अगदीं गरज दिसत नाहीं. त्या सुधारणुकां-विषयीं माझें खरें मत विचाराल तर त्या बाहेरून जशा मोठ्या दिसतात तितका त्यांत वास्तविक फायदा नाहीं, असें मला वाटतें. तर आतां युरोपियन लोकांचें वर्णन पुरें करून तुम्ही आपल्या मुशाफरीची गोष्ट पुढें चालवा. ''

इम्लाक म्हणाला, ''पालेस्तैन सोडल्यावर मी एशिया खंडांतले दुसरे पुष्कळ देश पाहिले. ज्या मुलुखांतून लोक सज्ञान आहेत त्या मुलुखांत व्यापारी होऊन हिंडलों, व ज्या डोंगराळ वगैरे देशांत लोक अडाणी आहेत तेथें यात्रेकऱ्यांचे वेषानें फिरलों. याप्रमाणें बहुत वर्षें लोटल्यावर प्रवासाचा मला कंटाळा आला; आणि मनांत अशी इच्छा उत्पन्न झाली कीं,आतां स्वदेशीं जाऊन ज्या ठिकाणीं बाळपणचे दिवस घालविले त्या ठिकाणीं स्वस्थपणें राहून आयुष्याचे शेवटचे दिवस घालवावे व परमुलुखांत जे अनेक चमत्कार आपण पाहिले ते आपल्या लहानपणच्या जुन्या सोबत्यांस सांगून त्यांस व आपणांस करमणूक करावी. कितीएक वेळ माझ्या मनांत असें येई कीं, मी जसा काय मध्यें बसलों आहे व ज्यांशीं पोरपणाचे खेळ खेळून मोठ्या मौजेनें बाळपण घालविलें ते स्नेही आतां मजसारखेच प्रौढ वयांत आलेले माझ्या भोंवतालीं बसले आहेत, व माझ्या चमत्कारिक गोष्टी ऐकून आश्चर्य करताहेत, व माझा उपदेश चित्त देऊन ऐकताहेत. या प्रकारच्या मनांत भावना उत्पन्न होऊन मला फारच संतोष होई.

'' नंतर वारंवार मनांत घोळल्यानें मला या गोष्टीचें फारच वेड लागलें;

होईल तितकी जलदी करून स्वदेशीं जावें, दुसऱ्या कोणत्या कृत्यांत एक क्षण गेला तर मोठें नुकसान झालें असें वाटूं लागलें. नंतर मी मोठ्या त्वरेनें मिसर देशांत आलों आणि स्वदेशीं येण्याची इतकी उत्कंठा लागली होती तरी त्या देशांत प्राचीन काळच्या मोठमोठ्या इमारती वगैरे पाहण्याकरितां व तेथें प्राचीन काळचे कांहीं लेख वगैरे आहेत त्यांची माहिती करून घेण्याकरितां मी त्या मुलखांत सुमारें दहा महिने घालविले. मिसर देशाची राजधानी केरो नामें शहर आहे, तेथें मी गेलों. त्या ठिकाणीं अनेक देशांतले अनेक प्रकारचे लोक येऊन राहतात. कोणी विद्या प्राप्त करून घेण्याकरितां, कोणी व्यापार वगैरे करून पैसा मिळवण्याकरितां व कोणी आपण स्वेच्छेनें वागावें, व अमका अमुक रीतीनें वागतो अशी लोकांत चर्चा न व्हावी याकरितां; कां कीं, केरोसारख्या शहरांत जेथें हजारों प्रकारचे हजारों लोक राहतात, तेथें सर्व लोक आपापल्या कामांत मग्न असतात; आपले शेजारी काय करितात याची चौकशी कोणी करीत नाहीं. यामुळें असल्या ठिकाणीं राहण्यांत एकांतीं राहण्याचे व समुदायांत राहण्याचे असे दोहींचेही गुण असतात. असो.

" केरो शहर सोडल्यावर मी सुएज नामक बंदराच्या गांवास गेलों; व तेथें गलबतांत बसून तांबड्या समुद्राच्या किनाऱ्या–किनाऱ्यानें, ज्या बंदरांतून परमुलूख पहावयास निघालों होतों, त्याच बंदरीं पुनः वीस वर्षांनीं पोहोंचलों. नंतर व्यापारी लोकांचा एक मोठा तांडा आंतल्या मुलखांत जात होता, त्यांच्या सोबतीनें मी आपल्या गांवीं जावयास निघालों.

" या वेळीं मला असें वाटत होतें कीं, माझे सोयरेधायरे व इष्टमित्र यांस मी बहुत वर्षांनीं सुखरूप परत आलोंसें पाहून मोठा आनंद होईल, व ते मोठ्या हर्षानें मला भेटावयास येऊन माझा मोठा गौरव करतील. मला अशीसुद्धां आशा होती कीं, मी बापाची मर्जी मोडून मुशाफरीस गेलों म्हणून त्यास पहिल्यानें कितीही जरी राग आला असला, व जरी पैसा त्यास कितीही थोर वाटत असला, तरी सर्व देशाचा नांवलौकिक वाढण्यासारखी व सर्व लोकांचें कल्याण करण्यासारखी ज्याची विद्या, असा पुत्र आपल्या पोटीं निपजला हें पाहून माझ्या बापास मोठा हर्ष झाल्यावांचून व आपण धन्य आहों असें मनांत आल्यावांचून कधीं राहावयाचें नाहीं. हें सर्व माझें मनोराज्य लवकरच लयास गेलें. मी आपल्या गांवीं चौकशी करूं लागलों तों असा शोध लागला कीं, सुमारें १४ वर्षांपूर्वीं माझा बाप वारला, व मरते-

वेळेस त्यानें आपली सर्व दौलत आपल्या दुसऱ्या मुलांस वांटून दिली, आणि माझे सर्व भाऊ तो देश सोडून कांहीं वर्षांपूर्वी परागंदा झाले. माझ्या लहानपणच्या सोबत्यांपैकीं बहुतेक मरून गेले होते, व कांहीं जे राहिले होते, त्यांस बहुत वर्षं लोटल्यामुळें माझी आठवण बुजून जाऊन माझी ओळख पटण्यास सुद्धां मारामार पडली, मग आगतस्वागताची वार्ता तर दूरच; व कितीएक असें मानूं लागले कीं, हा बहुत वेळ परमुलुखांत राहिल्यामुळें ह्याचा रीतरिवाज अगदीं बिघडून गेला आहे.

" ज्या मनुष्यावर सुखदुःखाचे प्रसंग पुष्कळ येऊन गेले असतात, त्याचें मन कांहीं कारणानें उदास झालें तरी तें पुनः लौकर हुशार होतें. वर सांगितलेल्या आशाभंगाचें दुःख मी कांहीं दिवसांनीं विसरून गेलों. मग मी देशांतल्या थोर थोर अमीरउमरावांचा स्नेह करावा या बुद्धीनें त्या उद्योगास लागलों. हा माझा उद्देश लवकरच सिद्धीस जाऊन मला त्यांच्या घरीं भोजनाचीं आमंत्रणें येऊं लागलीं, व ते माझ्या तोंडून देशोदेशींच्या चमत्कारिक गोष्टी मोठ्या हौसेनें ऐकूं लागले.परंतु कांहीं दिवसांनीं माझ्या सहवासानें त्यांस पहिल्यासारखा आनंद होत नाहीं, व ते पहिल्याप्रमाणें आपला आदर करीत नाहींत, असें पाहून त्यांकडे जाणें मी सोडलें; आणि परमुलुखांत संपादलेली विद्या स्वदेशांत प्रसृत करावी या हेतूनें मी शाळा घातली; परंतु तुम्ही नवीन नवीन विद्या शिकवूं नये म्हणून सरकारची मनाई आल्यावरून लौकरच शाळा सोडणें मला प्राप्त झालें. नंतर सुखवस्तु राहून काळ घालवावा असा विचार करून एक अविवाहित स्त्री माझ्या भाषणास फार लुब्ध असे, तिजपाशीं मीं लग्नाविषयीं गोष्ट काढली. परंतु तिनें तात्काळ उत्तर केलें कीं, ' तुमचा बाप व्यापारी होता, तुमचा जन्म खानदानीच्या घराण्यांतला नाहीं, यास्तव तुम्हांबरोबर मला लग्न करतां येत नाहीं.'

"याप्रमाणें व्यर्थ आर्जव करण्याचा व निष्फळ यत्न करण्याचा मला कंटाळा आला; आणि मनाची खात्री झाली कीं, लोक जे कोणाला बरें वाईट म्हणतात ते पुरा विचार करून म्हणतात असें नाहीं; जशी ज्या वेळेस लहर लागेल तीप्रमाणें म्हणतात; तर त्यांच्या तसल्या म्हणण्यापासून हर्ष किंवा विषाद पावणें हा वेडेपणा होय. नंतर असल्या अविचारी लोकांत राहूं नये असा निश्चय करून मीं मनांत योजना केली कीं, या तुम्हां राजपुत्रांच्या आनंदगुहेंत जावें आणि जगाच्या स्तुतीस व निंदेस लाथ मारावी. याप्रमाणें मनाचा संकल्प झाल्यावर या

गुहेंत नवे लोक घेण्याचा दिवस येण्याची वाट पहात राहिलों. पुढें तो दिवस आला तेव्हां एक नवीन कविता करून राजवाड्यांत गेलों. तेथें चार मंडळींत माझी कविता मान्य झाल्यावर जेथून मनुष्याची कधीं बाहेर सुटका होत नाहीं, अशा या ठिकाणीं मी स्वसंतोषानें आलों. याप्रमाणें माझी हकीकत आहे."

राजपुत्र म्हणाला, "बरें, सरतेशेवटीं या ठिकाणीं तरी तुम्हांस मनाप्रमाणें सुख झालें कीं नाहीं ? मनांत काडीमात्र संकोच न धरितां खरेंच सांगा कीं, हल्लीं या गुहेंत राहण्यास तुम्हांस समाधान वाटतें किंवा येथून बाहेर पडून पुनः देशोदेशीं फिरून जगाची मौज पहावीशी वाटतें ? या गुहेंत राहणारे सर्व लोक आम्ही दैववान् म्हणून येथें आलों अशी या स्थळाची वाखाणणी करतात, व वर्षांस एक वेळ बादशाहा नवे लोक आंत घेतो त्या वेळेस तुम्ही येथें या, अशी बाहेरच्या आपल्या ओळखीच्या लोकांस शिफारस करतात. तर तेथील सुखाविषयीं तुमचा जातीचा अनुभव कसा काय आहे ? "

इम्लाक म्हणाला, " महाराज, आपण उत्कंठेनें विचारतां त्यापेक्षां आपला वास्तविक अभिप्राय आपणांस स्पष्टपणें कळवितों, श्रवण करावा. खरेंच पुसाल तर ज्यास या जन्मठेपेच्या ठिकाणीं आल्याचा पश्चात्ताप होत नाहीं असा आपल्या आश्रित मंडळींमध्यें एकसुद्धां नाहीं. येथील सर्व लोकांत मलाच दुःख कांहींसें कमी आहे. कारण विद्याभ्यास केल्यामुळें व बहुत मुलूख पाहिल्यामुळें माझ्या मनांत अनेक प्रकारच्या कल्पना भरल्या आहेत, त्या मनांत आणून त्यांची निरनिराळ्या प्रकारें योजना करून मला वेळ घालवितां येते, तशी त्यांस येत नाहीं. तसेंच बहुत दिवस विचार न केल्यामुळें ज्या विद्या मळीन झाल्या असतील त्यांचें मनन करून त्या मी पुनः उज्ज्वलित करितों, व माझ्या आयुष्यांत ज्या अनेक गोष्टी घडल्या आहेत, त्यांची आठवण करतों; तेणेंकरून माझ्या मनास पुष्कळ करमणूक होते; परंतु या प्रकारें कांहीं वेळ करमणूक झाली तरी शेवटीं असें वाटतें कीं, या आपल्या सर्व विद्या व ज्ञान व्यर्थ आहे, व जीं सुखें आपण पूर्वीं अनुभविलीं तीं पुनः प्राप्त होण्याचा संभव राहिला नाहीं. आतां माझ्यासारख्याची जर ही कथा तर इतरांची अवस्था काय सुखकारक असणार आहे ? चालत्या क्षणीं ज्या गोष्टी घडत असतात त्यांपलीकडे त्यांचा विचार कधींच जात नसतो. त्यांस मननाचें वगैरे सुख कोठून ? त्यांस दोन गोष्टी घडावयाच्या. अनेक प्रकारचे दुष्ट विचार येऊन त्यांचें अंतःकरण बिघडत असेल, हें एक; किंवा उगीच शून्यपणें बसल्यामुळें त्यांस जिवाचा त्रास येत असेल, हें दुसरें."

राजपुत्र म्हणाला, " पण जेथें स्पर्धा नाहीं तेथें दुष्ट विचार कोठून उत्पन्न होतील ? पहा, या गुहेंत कोणाच्याच हातीं सत्ता नाहीं. मग एकास दुसऱ्याचा दुष्टावा करण्यास काय जागा आहे ? व जीं सुखें आहेत तीं सर्वांस सारखींच; मग एकानें दुसऱ्याचा मत्सर करण्याची काय गरज ? "

इम्लाक म्हणाला, " महाराज, खाणें, पिणें, वगैरे जीं कांहीं जडपदार्थाधीन सुखें आहेत तीं बहुतकरून सर्वांस सारखीं करतां येतात. व तीं या ठिकाणीं सर्वांस सारखी आहेत खरीं. तथापि लोकांनीं आपणावर प्रेम करणें किंवा त्यांनीं आपणांस मान देणें हीं जीं सुखें आहेत, तीं कधीं सर्वांस सारखीं करून व्हाव-याची नाहींत. दुसऱ्यास खुष करण्याचाच गुण घ्या. हा गुण कोणांत जास्त असतो, कोणांत कमी असतो. आतां ज्याच्या आंगांत तो गुण कमी असेल तो ज्याच्या आंगांत तो गुण अधिक असेल त्याचा मत्सर केल्यावांचून कधीं राह-णार नाहीं. आणि त्यांत जे त्याचा तिरस्कार करतात, त्यांच्या सहवासास त्यास नेहमीं राहणें प्राप्त झालें तर त्या मनुष्याचा मत्सर व दुष्टपणा हे फारच वाढतील, यांत संशय नाहीं. आतां येथील लोकांस आपल्या स्थितीचा त्रास आला असतां येथील सुखाचें खोटें वर्णन करून बाहेरच्या माणसांस ते आंत बोलावतात म्हणून जें आपण सांगितलें तर तेंही केवळ त्यांच्या दुष्टपणापासून घडतें. एकटे बसून किंवा एकमेकांच्या संगतीनें त्यांचा वेळ जात नाहीं, म्हणून कांहीं वेळ करमणूक होण्याकरितां ते बाहेरच्या नव्या लोकांस आंत बोलावतात. त्यांनीं मूर्खपणा करून आपलें स्वातंत्र्य गमाविलें आणि दुसऱ्या लोकांचें स्वातंत्र्य त्यांस पाहवत नाहीं. या मत्सरी लोकांस सर्व दुनिया आपल्याप्रमाणें बंदिवान करतां येईल तर ते ती गोष्ट मोठ्या संतोषानें करतील; या गोष्टीचें त्यांस तिळमात्र सुद्धां वाईट वाटावयाचें नाहीं.

" परंतु महाराज, ईश्वरानें मला अद्यापि या दोषापासून दूर राखिलें आहे. माझ्या शिफारशीनें या ठिकाणीं येऊन दुःखांत पडला असा कोणी एकसुद्धां नाहीं. वर्षाच्या वर्षास शेंकडों लोक मोठा यत्न करून या बंदीशाळेंत येऊन पडतात, हें पाहून मला त्यांचा मोठा कळवळा येतो. पण काय करावें ? उपाय नाहीं. जर कायद्याचा प्रतिबंध नसता तर येथील दुःखें निवेदन करून लोकांचें मन येथें येण्यापासून मीं फिरविलें असतें. "

हें भाषण ऐकून रासेलसास मोठा आनंद झाला. मग मोठ्या प्रेमानें त्याचा हात धरून तो त्यास म्हणाला, " मित्रा, मीही आपल्या मनांतली गुप्त गोष्ट

तुला सांगतों. मलाही फार दिवसांपासून या गुहेंत राहण्याचा कंटाळा आला आहे, व येथून निघून जाण्याची मोठी इच्छा मी करीत आहे. भोंवतालचे सर्व डोंगर फिरून पाहिले, पण सुटका होण्याचा इलाज म्हणून मला कांहीं दिसत नाहीं. तर तुम्ही येथून बाहेर पडण्याची युक्ति मला सांगा. तुम्ही मजबरोबर या बंदीखान्यांतून बाहेर चलावें. तुम्ही सांगाल तिकडे मी फिरेन. मला जीं सुखें किंवा दुःखें प्राप्त होतील त्यांचे तुम्हांस भागीदार करीन व तुम्ही मसलत द्याल त्याप्रमाणें संसारांत वागण्याचा अमुक एक मार्ग निवडून तो स्वीकारीन. ”

इम्लाक म्हणाला, “ महाराज, गुहेंतून सुटका होण्यास आपणांस बहुत श्रम करावे लागतील, व ती गोष्ट सिद्ध झाली तरी पुढें लौकरच आपणांस तिजविषयीं मी ही कोठून केली, केली नसती तर बरें होतें, असेंही कदाचित् वाटूं लागेल. आज आपणांस बाहेरचें जग या गुहेंतल्या तलावासारखें संथ व रमणीय वाटत असेल, परंतु खरोखरी पहातांना तें वादळांनीं खवळलेल्या समुद्राप्रमाणें मोठें भयंकर दिसेल. तेथें दुष्टत्वाच्या लाटा चोहोंकडून उसळून कधीं कधीं बुडून जाण्याचे प्रसंग येतील व कधीं कधीं विश्वासघातरूप खडकावर जाऊन आपटावें लागेल. तेथील अन्याय, कपट, स्पर्धा व काळजी यांच्या गोंधळांत पडलां म्हणजे दिवसांतून शेंकडों वेळां मनांत असें वाटेल कीं, त्या आनंदगुहेंत स्वस्थ होतों तें बरें होतें; या जगांतील चमत्कार पाहण्याची आशा नको व तेथील अनर्थांचें रात्रंदिवस भयही नको; परंतु त्या वेळेस पश्चात्ताप होऊन कांहीं उपयोग व्हाव-याचा नाहीं. तर पुढल्या गोष्टीचा विचार आजच करून काय करणें तें करा. ”

राजपुत्र म्हणाला, “ माझ्या मनानें जो निश्चय केला आहे, तो ढवळण्याचा यत्न करूं नका. तुम्हीं जें जें पाहिलें तें तें सर्व पाहण्याविषयीं माझें मन फार उत्कंठित झालें आहे. आणि ज्या अर्थी तुम्हांस या ठिकाणीं राहण्याचा त्रास आला आहे, त्या अर्थी हें स्पष्ट सिद्ध होतें कीं, तुमची बाहेरची स्थिति कितीही वाईट असली तरी येथल्यापेक्षां खचित चांगली असली पाहिजे; नाहींतर येथून बाहेर जाण्याची इच्छा तुम्हांस कदापि होतीना. तर आतां कांहीं झालें तरी होवो; मी बाहेर जाऊन मनुष्याच्या निरनिराळ्या अवस्था आपल्या डोळ्यांनीं पाहणार व सर्वांत जी अवस्था चांगली वाटेल, तिचा स्वीकार करून तींत आपलें आयुष्य घालविणार. हा माझ्या मनाचा दृढनिश्चय झाला. हा आतां फिरणें नाहीं.”

इम्लाक म्हणाला, " महाराज, आपली येथून सुटका होण्यास माझ्या भाषणापेक्षां फारच बलवत्तर अशा दुसऱ्या बहुत अडचणी आहेत. असो, परंतु कितीही अडचणी असल्या तरी आपण उमेद सोडूं नये. उद्योग व चातुर्य यांस असाध्य अशी गोष्ट बहुतकरून कोणतीही नाहीं."

---

# भाग तेरावा.

## रासेलस यास गुहेंतून बाहेर पडण्यास उपाय सांपडला.

त्या दिवशीं फार रात्र झाल्यामुळें राजपुत्रानें कवीस निजावयास जाण्यास निरोप दिला. परंतु त्यास स्वतः त्या रात्रीं झोंप आली नाहीं. इम्लाक यानें सांगितलेले चमत्कार व नवीन गोष्टी पुनः पुनः त्याचे मनांत येत. व त्यांचें मनन करीत असतां शेंकडों प्रश्न इम्लाक कवीस दुसऱ्या दिवशीं सकाळीं विचारण्याकरितां त्यानें मनांत तयार करून ठेविले.

यावेळीं राजपुत्राच्या मनांतलें दुःख पुष्कळ कमी झालें होतें. त्यास आतां आपल्या मनांतील गुप्त विचार सांगण्यास मित्र झाला, व तो मित्र आपला हेतु कसा सिद्ध करावा याविषयीं त्यास मसलत देण्यासारखा वाकबगारही होता. इतके दिवस झालेलें दुःख व त्रास हीं मनांतल्या मनांत त्यास तुंबवून धरावीं लागत असत. तसें करण्याची आतां गरज नाहींशी झाली. इम्लाकाचे गुण पाहून रासेलसास असें वाटलें कीं, याचा सहवास नेहमीं असला तर या गुहेंतसुद्धां फार दुःख झाल्यावांचून आपण दिवस काढूं. मग असल्या सोबत्याबरोबर बाहेर फिरावयास जर सांपडेल तर मग आपल्या भाग्यास पारावारच नाहीं.

पुढें लौकरच तलावाचा पूर ओसरून जमीन कोरडी झाली. नंतर राजपुत्र व इम्लाक एकांतीं भाषण करावयाकरितां रानांत फिरावयास नित्य जात. त्या गुहेंतून बाहेर पडण्याची गोष्ट रासेलसच्या मनांत रात्रंदिवस घोळत असल्यामुळें, एक दिवस ते दोघे फिरत फिरत गुहेच्या दरवाजापाशीं सहज आले असतां, दरवाजा लागलेला पाहून राजपुत्र दुःखानें म्लानमुख होऊन दरवाजास म्हणतो, "अरे, तूं इतका बळकट व मनुष्य इतका दुर्बल, असें कां असावें बरें?" तें भाषण ऐकून

इम्लाक म्हणाला, "महाराज, मनुष्य दुर्बल नाहीं. मनुष्याच्या आंगीं जें ज्ञान आहे त्याचें सामर्थ्य सर्वांपेक्षां अधिक आहे. जो यंत्रविद्येंत निपुण आहे तो जड पदार्थांच्या जोरास कांहींच मोजीत नाहीं. हा दरवाजा मजबूत दिसतो पण हवा तर मी यास दोन घटकेंत उघडून टाकीन; परंतु ही गोष्ट गुप्तपणें व्हावयाची नाहीं म्हणून मी तीं करीत नाहीं. आपणांस बाहेर पडण्याकरितां दुसरा कांहीं गुप्तपणें व्हावयासारखा उपाय योजिला पाहिजे."

एक दिवस ते दोघे डोंगराच्या बाजूनें फिरत असतां त्यांनीं कांहीं ससे डोंगराच्या बाजूवर उगवलेल्या झुडुपांत शिरून बसलेले पाहिले. पावसाळ्यांत तलाव फुगून पाणी चोहोंकडे पसरलें, त्या वेळीं त्यांच्या बिळांत पाणी शिरल्यामुळें ते ससे डोंगराच्या बाजूस झुडुपांच्या आड चढतां व तिरपीं बिळें पोखरून तेथें रहात होते. तें पाहून इम्लाक राजपुत्रास म्हणतो, "महाराज, प्राचीन लोकांचें असें मत आहे कीं, मनुष्यांनीं जीं अनेक यंत्रें व विखनें प्रथमतः योजिलीं तीं जनावरांनीं स्वाभाविक बुद्धीनें केलेलीं कृत्यें पाहून त्यावरून योजिलीं. तर या सशांचीं बिळें पाहून यांचें अनुकरण आपण केल्यास त्यांत आपणांस हलकेपणा नाहींसें मला वाटतें. सशांनीं ज्या रोखानें बिळें पोखरलीं आहेत, त्याच रोखानें आपण विवर पाडलें तर या दरींतून बाहेर पडण्यास आपणांस वाट होईलसें मला वाटतें. डोंगरांच्या मध्यभागीं जेथें खडपे पुढें झुकले आहेत त्या ठिकाणीं आपण खणण्यास आरंभ करून वरवर खणीत जावें म्हणजे कांहीं वेळानें दुसऱ्या आंगीं आरपार भोंक पडेल."

ही कल्पना ऐकून राजपुत्रास मोठा आनंद झाला. ही युक्ति सोपी असल्यामुळें ती सिद्धीस जाण्याविषयीं अगदीं संशय नव्हता.

नंतर वेळ अगदीं न गमावतां दुसऱ्या दिवशीं पहाटेस ते दोघे विवर पाडण्याजोगें स्थळ शोधावयास निघाले. मग मोठ्या श्रमानें अवघड अवघड ठिकाणीं चढून खडप्यांत व कांटेझाडांत पुष्कळ फिरले; परंतु मनाजोगी जागा त्यांस त्या दिवशीं सांपडली नाहीं. दुसरा व तिसरा असे आणखी दोन दिवस त्यांचे व्यर्थच गेले. पण चवथ्या दिवशीं त्यांस एक लहान आयतें विवर सांपडलें. त्याचें तोंड पुढें झुडपांची एक जाळी वाढल्यामुळें झांकून गेलें होतें. मग त्या ठिकाणीं डोंगरास आरपार भोंक पाडण्याचा त्यांनीं निश्चय केला.

इम्लाक यानें खडक फोडण्याकरितां व माती ओढून टाकण्याकरितां पाहारी

खोरीं, अशीं विखनें मिळविलीं, व तीं घेऊन दुसऱ्या दिवशीं सकाळीं नेमलेल्या ठिकाणीं जाऊन त्यांनीं खणण्याच्या कामास आरंभ केला. आरंभीं हुरूप फार असल्यामुळें त्यांनीं जिवापेक्षां अधिक मेहेनत केली; तेणेंकरून लौकरच दमून विसावा घेण्याकरितां त्यांस कांहीं वेळ हिरवळावर बसावें लागलें. राजपुत्रास श्रम करण्याचें कधींच ठाऊक नव्हतें. त्यामुळें तें काम त्यास फारच कठिण वाटून त्याचें धैर्य बरेंच खचलें. तें पाहून इम्लाक त्यास म्हणाला, " महाराज, उमेद खचूं देऊं नका. हा प्रथमचा दिवस आहे, म्हणून आपण इतक्या लौकर थकलों. आपणांस जसजसा अभ्यास होईल तसतशी अधिकाधिक काम करण्याची आपणांस शक्ति येईल. थोड्यांतच पहा, आज आपण फारसें काम केलें नाहीं, तरी दोनतीन हात विवर खोल झालें, तर असेंच कितीएक दिवस काम चाललें असतां हें विवर पलीकडल्या बाजूस जाऊन पोहोंचेल हें स्पष्ट आहे. मोठालीं कामें जीं तडीस जातात तीं बलानें जात नाहींत, तर कंटाळा न येऊं देतां सतत उद्योग करण्यानें जातात. हा आपल्या समोर राजवाडा दिसत आहे. याचे धोंडे प्रत्येक पाहिले असतां केवढाले लहान दिसत आहेत, परंतु ते लहान लहान धोंडे एकत्र झाल्यानें ह्या वाड्यास केवढी उंची व केवढा विस्तार आला आहे तो पहा! नित्य तीन तास जर नियमानें मनुष्य चालेल, तर सात वर्षांत पृथ्वीच्या परिघाइतकें त्याचें फिरणें होईल."

याप्रमाणें खणण्याचा सपाटा त्यांनीं दररोज चालविला असतां थोडक्याच दिवसांनीं त्यांस खडकांत आंगचेच एक भोंक लागलें; त्यामुळें फारसें खणल्यावांचून त्यांचा त्या डोंगराच्या पोटांत बराच लांब प्रवेश झाला. तें भोंक पाहून रासेलस म्हणाला. "आपल्या कामांत शकुन तर फार चांगला झाला." तें ऐकून इम्लाकनें उत्तर केलें, " महाराज, युक्तीच्या दृष्टीनें जीं दिसतात त्यांखेरीज आशा किंवा भय हीं दोन्ही धरणें नीट नाहीं. कारण आतां अनुकूल गोष्ट पाहून जर आपण हर्ष मानला, तर पुढें प्रतिकूल गोष्ट पाहून आपली उमेदही कदाचित् खचेल, आणि या असल्या पोकळ भयानें आपणास जन्मभर नुसता त्रास होईल.

" आपण काम करीत असतां एकादी अनुकूल गोष्ट सहज घडली तर तो केवळ नुसता शकुनच झाला असें नाहीं, तर तें आपलें काम तितकें सुलभ झालें असें समजावें. दृढनिश्चय धरून झटून काम करणाऱ्या पुरुषास पूर्वीं लक्षांत न आलेल्या अशा अनुकूल गोष्टी बहुत वेळ घडत असतात; पुष्कळ गोष्टी बेत करतांना कठिण वाटतात, परंतु खरोखरी करूं लागलें असतां त्या सोप्या आहेत, असें अनुभवास येतें."

---

इम्लाक म्हणाला, " महाराज, मनुष्य दुर्बल नाहीं. मनुष्याच्या आंगीं जें ज्ञान आहे त्याचें सामर्थ्य सर्वांपेक्षां अधिक आहे. जो यंत्रविद्येंत निपुण आहे तो जड पदार्थांच्या जोरास कांहींच मोजीत नाहीं. हा दरवाजा मजबूत दिसतो पण हवा तर मी यास दोन घटकेंत उघडून टाकीन; परंतु ही गोष्ट गुप्तपणें व्हावयाची नाहीं म्हणून मी ती करीत नाहीं. आपणांस बाहेर पडण्याकरितां दुसरा कांहीं गुप्तपणें व्हावयासारखा उपाय योजिला पाहिजे. "

एक दिवस ते दोघे डोंगराच्या बाजूनें फिरत असतां त्यांनीं कांहीं ससे डोंगराच्या बाजूवर उगवलेल्या झुडुपांत शिरून बसलेले पाहिले. पावसाळ्यांत तलाव फुगून पाणी चोहोंकडे पसरलें, त्या वेळीं त्यांच्या बिळांत पाणी शिरल्यामुळें ते ससे डोंगराच्या बाजूस झुडुपांच्या आड चढतों व तिरपीं बिळें पोखरून तेथें रहात होते. तें पाहून इम्लाक राजपुत्रास म्हणतो, " महाराज, प्राचीन लोकांचें असें मत आहे कीं, मनुष्यांनीं जीं अनेक यंत्रें व विखनें प्रथमतः योजिलीं तीं जनावरांनीं स्वाभाविक बुद्धीनें केलेलीं कृत्यें पाहून त्यावरून योजिलीं. तर या सशांचीं विळें पाहून यांचें अनुकरण आपण केल्यास त्यांत आपणांस हलकेपणा नाहींसें मला वाटतें. सशांनीं ज्या रोखानें बिळें पोखरलीं आहेत, त्याच रोखानें आपण विवर पाडलें तर या दरींतून बाहेर पडण्यास आपणांस वाट होईलसें मला वाटतें. डोंगरांच्या मध्यभागीं जेथें खडपे पुढें झुकले आहेत त्या ठिकाणीं आपण खणण्यास आरंभ करून वरवर खणीत जावें म्हणजे कांहीं वेळानें दुसऱ्या आंगीं आरपार भोंक पडेल. "

ही कल्पना ऐकून राजपुत्रास मोठा आनंद झाला. ही युक्ति सोपी असल्यामुळें ती सिद्धीस जाण्याविषयीं अगदीं संशय नव्हता.

नंतर वेळ अगदीं न गमावतां दुसऱ्या दिवशीं पहाटेस ते दोघे विवर पाडण्याजोगें स्थळ शोधावयास निघाले. मग मोठ्या श्रमानें अवघड अवघड ठिकाणीं चढून खडप्यांत व कांटेझाडांत पुष्कळ फिरले; परंतु मनाजोगी जागा त्यांस त्या दिवशीं सांपडली नाहीं. दुसरा व तिसरा असे आणखी दोन दिवस त्यांचे व्यर्थच गेले. पण चवथ्या दिवशीं त्यांस एक लहान आयतें विवर सांपडलें. त्याचें तोंड पुढें झुडुपांची एक जाळी वाढल्यामुळें झांकून गेलें होतें. मग त्या ठिकाणीं डोंगरास आरपार भोंक पाडण्याचा त्यांनीं निश्चय केला.

इम्लाक यानें खडक फोडण्याकरितां व माती ओढून टाकण्याकरितां पाहारी

खोरीं, अशीं विखनें मिळविलीं, व तीं घेऊन दुसऱ्या दिवशीं सकाळीं नेमलेल्या ठिकाणीं जाऊन त्यांनीं खणण्याच्या कामास आरंभ केला. आरंभीं हुरूप फार असल्यामुळें त्यांनीं जिवापेक्षां अधिक मेहेनत केली; तेणेंकरून लौकरच दमून विसावा घेण्याकरितां त्यांस कांहीं वेळ हिरवळावर बसावें लागलें. राजपुत्रास श्रम करण्याचें कधींच ठाऊक नव्हतें. त्यामुळें तें काम त्यास फारच कठिण वाटून त्याचें धैर्य बरेंच खचलें. तें पाहून इम्लाक त्यास म्हणाला, " महाराज, उमेद खचूं देऊं नका. हा प्रथमचा दिवस आहे, म्हणून आपण इतक्या लौकर थकलों. आपणांस जसजसा अभ्यास होईल तसतशी अधिकाधिक काम करण्याची आपणांस शक्ति येईल. थोड्यांतच पहा, आज आपण फारसें काम केलें नाहीं, तरी दोनतीन हात विवर खोल झालें, तर असेंच कितीएक दिवस काम चाललें असतां हें विवर पलीकडल्या बाजूस जाऊन पोहोंचेल हें स्पष्ट आहे. मोठालीं कामें जीं तडीस जातात तीं बलानें जात नाहींत, तर कंटाळा न येऊं देतां सतत उद्योग करण्यानें जातात. हा आपल्या समोर राजवाडा दिसत आहे. याचे धोंडे प्रत्येक पाहिले असतां केवढाले लहान दिसत आहेत, परंतु ते लहान लहान धोंडे एकत्र झाल्यानें ह्या वाड्यास केवढी उंची व केवढा विस्तार आला आहे तो पहा! नित्य तीन तास जर नियमानें मनुष्य चालेल, तर सात वर्षांत पृथ्वीच्या परिघाइतकें त्याचें फिरणें होईल "

याप्रमाणें खणण्याचा सपाटा त्यांनीं दररोज चालविला असतां थोडक्याच दिवसांनीं त्यांस खडकांत आंगचेंच एक भोंक लागलें; त्यामुळें फारसें खणल्यावांचून त्यांचा त्या डोंगराच्या पोटांत बराच लांब प्रवेश झाला. तें भोंक पाहून रासेलस म्हणाला. "आपल्या कामांत शकुन तर फार चांगला झाला. " तें ऐकून इम्लाकनें उत्तर केलें, " महाराज, युक्तीच्या दृष्टीनें जीं दिसतात त्यांखेरीज आशा किंवा भय हीं दोन्ही धरणें नीट नाहीं. कारण आतां अनुकूल गोष्ट पाहून जर आपण हर्ष मानला, तर पुढें प्रतिकूल गोष्ट पाहून आपली उमेदही कदाचित् खचेल, आणि या असल्या पोकळ भयानें आपणास जन्मभर नुसता त्रास होईल.

" आपण काम करीत असतां एकादी अनुकूल गोष्ट सहज घडली तर तो केवळ नुसता शकुनच झाला असें नाहीं, तर तें आपलें काम तितकें सुलभ झालें असें समजावें. दृढनिश्चय धरून झटून काम करणाऱ्या पुरुषास पूर्वीं लक्षांत न आलेल्या अशा अनुकूल गोष्टी बहुत वेळ घडत असतात; पुष्कळ गोष्टी बेत करतांना कठिण वाटतात, परंतु खरोखरी करूं लागलें असतां त्या सोप्या आहेत, असें अनुभवास येतें. "

———

# भाग चवदावा.

## रासेलस व इम्लाक हे काम करीत असतां रासेलसाची एक बहीण अवचित तेथें आली.

पुढें लौकरच त्यांचें तें विवर पर्वताच्या मध्यापर्यंत जाऊन पोहोंचलें. ते काम करीत असतां पुढें प्राप्त होणाऱ्या सुटकेचा विचार मनांत आणून झालेल्या श्रमाचा परिहार करीत. एक दिवस, उघड्या हवेंत बसून दम खावा म्हणून राजपुत्र विवरांतून खालीं उतरत असतां, त्या विवराच्या तोंडाशीं उभी राहिलेली त्याची बहीण निकाया त्याचे दृष्टीस पडली. तिला पाहतांच तो दचकला व आतां काय करावें म्हणून गोंधळून उगीच स्तब्ध उभा राहिला. तिला आपली गोष्ट सांगावयास त्याचा धीर होईना, व तिजपासून छपवण्यासही कांहीं युक्ति सुचेना. मग तत्काळ त्यानें असा विचार केला कीं, हिच्या विश्वासुकपणावर हवाला ठेवून हिला कांहींएक न चोरतां सर्व मजकूर कळवावा, म्हणजे हिला आपल्या थोरपणाचा अभिमान वाटून ही आपली गोष्ट गुप्त राखील व आपणांस सहाय्यही होईल. असा विचार करून त्यानें तिला सर्व सांगितलें.

राजकन्या म्हणाली, " दादा, मी तुमची पाळत राखून येथें आलें असें समजूं नको. मी आपल्या महालांत बसलें असतां खिडकींतून तुम्हां दोघांस दररोज त्याच त्याच वाटेनें जातांना पुष्कळ दिवस पाहिलें, आणि मला वाटलें कीं, या आंगास कोठें एकादी विशेष गार सावलीची किंवा कांहीं रानझाडें फुलल्यामुळें विशेष सुवासाची जागा असेल तिकडे तुम्ही जात असाल. याखेरीज दुसरें कांहीं माझ्या मनांत आलें नाहीं; व मी आज तुमच्यामागून येथें आलें, यांत तरी माझा उद्देश इतकाच होता कीं, तुमच्या सुखांत भागीदार व्हावें. याप्रमाणें वहिमानें नव्हे, तर केवळ स्नेहभावानें येथें मी येऊन तुमचा उद्देश मला कळला. यास्तव या तुमच्या मसलतींत मलाही घ्या. दादा, तुझ्याप्रमाणें मलाही या गुहेंत राहण्याचा कंटाळा आला आहेत, व बाहेर जगांत लोक काय करतात व कोणतीं सुखदुःखें अनुभवतात, हें जाणण्याची हांस तुजपेक्षां मला कमी आहे असेंही नाहीं; तर या कंटाळवाण्या जागेंतून तूं मला घेऊन जा. पहा, या गुहेचा

मला आधींच त्रास आला आहे आणि त्यांत तूंही गेलास म्हणजे मला क्षणभर सुद्धां चैन पडणार नाहीं. तुला मी खचित सांगतें कीं, तूं जरी आपणाबरोबर मला नेलें नाहींस, तरी तूं गेल्यावर मी या वाटेनें बाहेर निघून जाईन यांत संशय नाहीं."

रासेलस याची इतर बहिणींपेक्षां निकायावर फारच प्रीति होती, यास्तव त्याच्यानें तिला 'नाहीं' म्हणवलें नाहीं. राजपुत्रास या प्रसंगीं इतकेंच वाईट वाटलें कीं, आपण होऊन जर ही गुप्त गोष्ट तिला पूर्वींच कळविली असती तर आपणावर विश्वास ठेविलेला पाहून तिला विशेष संतोष होता; तर ही गोष्ट आपणापासून चुकली. नंतर असा विचार ठरला कीं, तिघांनीं एकमेकांच्या संगतीनें गुहेंतून जावें व विवराचें काम चालेल तोंपर्यंत निकाया हिनें बाहेर टेहळणीस राहून कोणी सहज फिरत फिरत किंवा जाणूनबुजून राजपुत्र व इम्लाक यांच्या मागून विवराकडे येऊं लागला तर त्यांस पूर्वीं इशारा देऊन सावध करावें.

पुढें कांहीं दिवसांनीं त्यांचें तें काम संपून आरपार विवर पडलें. नंतर त्या वाटेचे बाहेर पडून डोंगराच्या पलीकडल्या बाजूवर ते उभे राहिले, व तेथून खालीं लवणांतून वाहतांना नील नदीचा प्रवाह त्यांचे दृष्टीस पडला. तो प्रवाह ते फारच उंचावर असल्यामुळें त्यास अरुंद दिसत होता.

या प्रसंगीं भोंवतालचा अफाट प्रदेश पाहून राजपुत्रास जो हर्ष झाला तो त्याच्या अंतःकरणांत मावेना. देशोदेशीं फिरून वाटणारे चमत्कार तो मनांत आधींच अनुभवूं लागला, व त्या आनंदांत तल्लीन होऊन आपण बापाच्या राज्याच्या पार गेलों असें त्यास वाटूं लागलें. आतां इम्लाक ह्यास राजपुत्राची सुटका झालेली पाहून आनंद झाला खरा; परंतु जगांत मोठें सुख प्राप्त होईल म्हणून राजपुत्रास जसें वाटत होतें तसें त्यास वाटलें नाहीं. कारण, जगाचा त्यानें पुरतेपणीं अनुभव घेतला होता व त्यांतील गुणदोष त्यास सर्व कळले होते.

भोंवतालीं नजर पोंचत नाहीं असा अफाट प्रदेश रासेलसानें पूर्वीं कधीं पाहिला नव्हता, यास्तव तो प्रथमच पाहून त्याचें मन तिकडे इतकें वेधून गेलें कीं, त्यास गुहेंत परत जाण्याविषयीं मनांत वांछा होईना, मग घरीं आल्यावर त्यानें बहिणीस सांगितलें कीं, विवर तयार झालें आहे; आतां आपली तयारी करण्याचाच काय तो अवकाश आहे.

---

# भाग पंधरावा.

## राजपुत्र व राजकन्या आनंदगुहेंतून बाहेर पडून त्यांनीं केलेलें अनेक चमत्कारांचें अवलोकन.

बाजारांत नेलें असतां लक्षावधि रुपये ज्याची किंमत येईल असें पुष्कळ जवाहीर राजपुत्र व राजकन्या यांनीं बरोबर घेऊन तें इम्लाकाचे सांगण्यावरून त्यांनीं आपल्या आंगावरच्या पोशाकांत लपवून ठेविलें होतें. मग तयारी झाल्यावर पौर्णिमेच्या दिवशीं रात्रीं तीं तिघेजण राजवाड्यांतून चोरून बाहेर पडलीं. राजकन्येनें आपल्याबरोबर एक विश्वासूक व कृपेंतली दासी मात्र घेतली होती; पण त्या दासीस सुद्धां आपली यजमानीन कोणीकडे जाते आहे हें ठाऊक नव्हतें. तीं सर्वजणें डोंगरावर चढून विवराच्या वाटेनें पलीकडच्या बाजूस जाऊन हळूहळू खालीं उतरूं लागलीं. राजकन्या व तिची सखी या दोघी कधीं गुहेबाहेर पडल्या नव्हत्या. त्या डोंगराच्या दुसऱ्या बाजूस आल्या व चोहोंकडे पाहूं लागल्या, तों जिकडे तिकडे त्यांस अफाट मुलूख दिसूं लागला. किती दूर नजर लांबविली तरी पलीकडे आणखी प्रदेश आहेच, असें पाहून त्यांस असें भय पडलें कीं, आपण या अफाट व भयाण प्रदेशांत कोणीकडे चुकून जाऊं कोण जाणे. त्या पुढें चालेनात, व भयानें थरथरां कांपूं लागल्या. राजकन्या म्हणाली, "दादा, पुढें जावयास मला भय वाटतें; कारण आपल्या या रस्त्याचा शेवट मला अगदींच दिसत नाहीं, व या मैदानांतून आपण चाललों व चोहींकडून नवे नवे लोक आपल्या भोंवतालीं जमले तर आपण काय करावें?" राजपुत्रासही असेंच भय वाटलें; परंतु तें दाखविणें आपल्या मर्दुमकीस उचित नाहीं असा विचार करून त्यानें तें मनांतल्या मनांत ठेविलें. प्रकट करून मात्र दाखविलें नाहीं.

त्यांचें भय पाहून इम्लाक यास हंसें आलें. मग त्यानें नानाप्रकारें धीर देऊन त्यांस पुढें चालू केलें. तथापि राजकन्येस राहून राहून भय वाटतच होतें. परंतु नादानादानें तीं बरीच पुढें गेलीं; व आतां परत जाण्याची सोय राहिली नाहीं अशी जेव्हां तिच्या मनाची खात्री झाली, तेव्हां तिनें निरुपाय होऊन पुढें जाण्याचा दृढनिश्चय केला, व सर्व भय सोडून दिलें.

सकाळच्या प्रहरीं मैदानांतून चाललीं असतां त्यांस कितीएक गुरांचे कळप भेटले. गुराख्यांनीं दूध व नानाप्रकारचीं फळें त्यांस न्याहारीस आणून दिलीं. राजकन्येस वाटत होतें कीं, आपण जेथें जाऊं तेथें उतरावयास राजवाडा असेल, व जेवावयास पक्वान्नांनीं भरलेलीं ताटें असतील. मग त्या प्रसंगीं तसा प्रकार न दिसल्यावरून तिला मोठें आश्चर्य वाटलें. परंतु ती चालून दमली होती व पोटांत भूकही पुष्कळ लागली होती, ह्यामुळें तिनें दूध पिऊन कांहीं फळें खाल्लीं व तीं तिला इतकीं गोड लागलीं कीं, तसा गोड पदार्थ तिनें जन्मांत त्या आनंदगुहेंत चाखला नव्हता.

तेथून तीं हलक्या हलक्या मजला करीत पुढें चालतीं झालीं. हलक्या मजला करण्याचें कारण असें होतें कीं, राजपुत्रास व त्याचे बहिणीस श्रम करण्याची संवय अगदीं नव्हती, व त्यांच्या मनाची पक्की खात्री होती कीं, गुहेंत आपण नाहीं असें समजलें तरी आपण बाहेर निघून गेलों अशी शंका येऊन कोणीही आपल्या मागून शोधास यावयाचें नाहीं. पुढें थोड्याच दिवसांनीं तीं दाट वस्तीच्या प्रदेशीं आलीं. तेथें लोकांच्या अनेक प्रकारच्या रीतीभाती, व अनेक प्रकारच्या लहानमोठ्या पदव्या व अनेक तऱ्हेचे धंदे पाहून तें सर्वच अपूर्व असल्यामुळें राजपुत्र व राजकन्या यांस मोठा विस्मय वाटला. इम्लाक यास त्या सर्व गोष्टी जुन्याच होत्या म्हणून त्यांपासून तर त्यास कांहीं वाटलें नाहीं खरें; परंतु या नवख्या मनुष्यांचा विस्मय पाहून त्यासही मौज वाटली.

कोणी पाहिलें असतां हीं आपली खरी स्थिति छपवून वागताहेत असा संशय त्याच्या मनांत न येण्याजोगे त्यांचे पेहराव होते. तथापि राजपुत्र जेथें जेथें जाई तेथें तेथें त्याला वाटे कीं, मी सांगेन तें सर्वांनीं ऐकावें. व राजकन्येकडे कोणी आलें आणि आल्याबरोबर साष्टांग नमस्कार न केला म्हणजे तो दांडगेपणा वाटून ती दचके. यामुळें इम्लाकास मोठ्या सावधपणानें वागावें लागे; व कोणे वेळेस चुकून तीं आपलें खरें स्वरूप उघडकीस आणतील या भयानें त्यांस त्यांना फारच जपावें लागे. त्यांस साधारण लोक कसे वागतात याची चांगली माहिती होऊन त्याप्रमाणें स्वतः वागण्याची संवय लागावी म्हणून तो पहिल्याच गांवास त्यांस कितीएक दिवस घेऊन राहिला.

कांहीं दिवसांनीं राजपुत्रास व राजकन्येस समजत समजत समजलें कीं, कांहीं वेळ आपणांस आपला वास्तविक थोरपणा एकीकडे ठेवून आपल्या धौतलपणानें

व सभ्य रीतीनें जितका सन्मान मिळेल तितक्यावरच संतोष करून घेतला पाहिजे. नंतर तेथून निघून तीं समुद्रकिनाऱ्याच्या एका शहरास आलीं. तें मोठें बंदर होतें, त्यामुळें तेथें लोकांची फार गर्दी असे, व तेथील लोक व्यापारी असल्यामुळें त्यांच्या रीति राजपुत्रास व त्याच्या बहिणीस उद्धट व दांडग्या वाटण्यासारख्या होत्या. परंतु इम्लाकानें त्यांस पूर्वीं पुष्कळ उपदेश केला होता; त्यामुळें त्या गोष्टीपासून त्यांस विशेष त्रास झाला नाहीं.

सर्वच गोष्टी नवीन असल्यामुळें राजपुत्र व राजकन्या जेथें जेथें जात तेथें तेथें त्यांस पराकाष्ठेचा चमत्कार वाटे. म्हणून तीं कितीएक महिने त्या बंदराच्या शहरांतच राहिलीं. तें सोडून पुढें जाण्याची इच्छा त्यांस होईना. इम्लाक यासही ती गोष्ट इष्ट होती. कारण, तो समजत होता कीं, यांस लौकिक व्यवहाराचा चांगला परिचय झाल्यावांचून परमुलुखांत येऊन जाणें बरोबर नाहीं.

याप्रमाणें कितीएक दिवस लोटल्यावर इम्लाक यास असा धाक वाटूं लागला कीं, आपण या ठिकाणीं फारच राहिलों तर कदाचित् आपणांस कोणी ओळखील. नंतर त्यानें तेथून निघून पुढें जाण्याचा दिवस नेमिला. त्याच्या बरोबरीची मंडळी अगदीं गैरमाहित असल्यामुळें त्यांनीं कोणीकडे जावयाचें व कसें जावयाचें वगैरे सर्व विचार त्यावर टाकिला होता. मग एक गलबत सुएज येथें जात होतें. त्यावर त्यानें चौघांस बसावयास भाड्यानें जागा घेतली. नंतर जावयाची वेळ आली तेव्हां राजकन्या गलबतावर चढेना; तीस भय वाटूं लागलें. मग अनेक प्रकारें तिची समजूत केल्यावर मोठ्या मिनतवारीनें ती गलबतावर जाऊन बसली; आणि गलबत चालू झालें. तें थोड्याच दिवसांनीं सुखरूप जाऊन सुएज येथें पोहोंचलें. मग तेथून तीं खुष्कीच्या वाटेनें मिसर देशाची राजधानी जें केरो नामक नगर तेथें गेलीं.

---

# भाग सोळावा.

## तीं केरो शहरांत गेलीं व प्रथमतः त्यांस तेथील सर्व मनुष्यें सुखी आहेत असें वाटलें.

परस्थ लोक जीस पाहून थक्क होतात अशी ती केरो नामक नगरी जवळ आली असें पाहून इम्लाक राजपुत्रास म्हणतो, " महाराज, मी जें आपणांस

सांगत होतों तें हें केरो शहर; येथें मौज पाहण्याकरितां व व्यापार करण्या-करितां पृथ्वीवरच्या सर्व मुलुखांतून मुशाफर व उदमी येतात. येथें बऱ्यावाईट सर्व प्रकारचीं मनुष्यें व सर्व प्रकारचे धंदे आपल्या दृष्टीस पडतात. व्यापाऱ्यांची या शहरांत प्रतिष्ठा सर्वांत अधिक आहे. यास्तव मी व्यापारी बनतों व तुम्ही केवळ मौजेनें मुलूख पहावयास निघालेले असे मुशाफर बना. आपण श्रीमंत आहों अशी प्रख्याति व्हावयास फार दिवस लागणार नाहींत, व ती प्रख्याति झाली म्हणजे ज्याकडे पाहिजे त्याकडे आपला प्रवेश होईल. मग मनुष्याच्या स्थितीचे जितके प्रकार आहेत तितके सर्व या ठिकाणीं तुमच्या दृष्टीस पडले म्हणजे त्यांत सर्वोत्कृष्ट प्रकार कोणता तो आपण सावकाशपणें विचार करून शोधून काढवा."

नंतर ते गांवांत शिरले. पण प्रथमतः तेथील कलकल ऐकून त्यांचे कान बसले, व लोकांची पराकाष्ठेची गर्दी पाहून त्यांच्या जिवास त्रास झाला. इम्लाक यानें पुष्कळ शिकविलें होतें, परंतु बाळपणापासून जडलेल्या संवयीचें बळ अगदीं नाहींसें झालें नव्हतें; त्यामुळें राजपुत्र व राजकन्या रस्त्यांतून जात असतां त्यांस मोठा विस्मय वाटून वाईटही वाटे कीं, आपणांस रस्त्यांतून कोणीच नमत नाहीं, व अत्यंत हलके लोक बेधडक आपल्या आंगावरून जातात; कांहींच मर्यादा धरीत नाहींत. राजकन्येस तर हलक्या लोकापासून बरोबरी करून घेणें अगदीं सहन होईना. ती बिऱ्हाडीं गेल्यावर जी एक वेळ आपल्या खोलींत गेली ती कित्ती-एक दिवस बाहेर मुळींच पडली नाहीं. आपल्या सेवेकरितां ती आपली दासी पेकुया हिस मात्र येऊं देत असे.

इम्लाक यास व्यापाराची चांगली माहिती होती. त्यानें दुसऱ्या दिवशीं बाजा-रांत जाऊन जवाहीर मोडलें. आणि एक मोठा वाडा भाड्यानें रहावयास घेतला व त्यांत नानाप्रकारचें पुष्कळ सामान भरून तो चांगला सुशोभित केला. तेणें-करून हा कोणी मोठा लक्ष्मीवान् सावकार आहे अशी त्याची त्या शहरांत लौक-रच मोठी प्रसिद्धि झाली. तो बोलून चालून फार सुगर असे; त्यामुळें थोड-क्याच वेळांत त्याचा पुष्कळांशीं स्नेह झाला. हाताचा सढळ असल्यामुळें त्याज-कडे पुष्कळ लोक आश्रय मिळण्याकरितां येऊं लागले. त्याची विद्या व शहाण-पणा पाहून त्याचा स्नेह व्हावा म्हणून सर्व देशचे लोक नेहमीं त्याच्या घरीं येऊं लागले. राजपुत्रास भाषा येत नसल्यामुळें आलेल्या लोकांत बसून बोलण्याचा त्यास प्रसंगच येत नसे. त्यामुळें त्याचें अज्ञान किंवा नवखेपणा उघडकीस

आला नाहीं. पुढें जसजशी त्यास त्या देशाची भाषा येऊं लागली, तसतसें लोकांतल्या रीतीभातींचें ज्ञानही त्याचें वाढत गेलें.

इम्लाक यानें कितीएक दिवस पढवून राजपुत्रास नाण्याचें स्वरूप व त्याचा उपयोग यांविषयीं माहिती करून दिली. परंतु राजकन्या व तिची ती सखी यांस पुष्कळ दिवस अचंबा वाटत असे कीं, व्यापारी लोक सोन्यारुप्यांच्या या तुकड्यांचें करतात तरी काय ? व त्यांचा कांहींएक लक्षांत येण्यासारखा उपयोग नसतां उपयोगाचे जिन्नस देऊन हे तुकडे ते लोक इतक्या उत्कंठेनें कां घेतात ?

राजपुत्रास व त्याचे बहिणीस त्या देशाची भाषा चांगली यावयास दोन वर्षें लागलीं. तितक्या वेळांत इम्लाक यानें मनुष्यांच्या सर्व अवस्था व सर्व दरजे त्याच्या दृष्टीस पडतील अशी सर्व तयारी करून ठेविली. ज्याच्या ज्याच्या आचरणांत किंवा स्थितींत कांहीं विशेष म्हणून दृष्टीस पडला त्याशीं त्यानें स्नेह वाढविला. मिजाशी व व्यवस्थित, उद्योगी व आळशी, पैशानें थोर किंवा विद्येनें थोर, अशा प्रकारच्या लोकांकडे त्यानें जाणें येणें ठेविलें होतें.

दोन वर्षांच्या अंतीं राजपुत्रास भाषा चांगली आल्यावर व तिऱ्हाइतांशीं वागतांना कोणता सावधपणा ठेवावा हें समजूं लागल्यावर, तो इम्लाकाबरोबर चोहोंकडे जाऊन मंडळींत उठूं बसूं लागला; मनांतला उद्देश कीं, मनुष्याच्या सर्व स्थितींत अत्युत्तम स्थिति कोणती ती निवडून काढावयाची.

प्रथमतः कांहीं वेळ त्यास वाटलें कीं, निवड करण्याचे श्रम व्यर्थ आहेत; कारण त्यास सर्वही स्थिति सारख्याच सुखकर दिसल्या. जेथें जेथें तो जाई तेथें तेथें आनंदवृत्ति व कृपाळूपणाच त्याला दिसे; व जिकडे तिकडे लोक आनंदानें गाताहेत व कोणी स्वस्थपणें विनोद करताहेत, असें पाहून त्यास वाटूं लागलें कीं, हें सर्व जग समृद्धीनें पूर्ण भरलें आहे. सर्वांस त्यांच्या गरजेप्रमाणें व योग्यते-प्रमाणें सर्व वस्तु प्राप्त होतात. कोणत्या गोष्टीची ददात नाहीं, सर्व लोक हातानें सढळ व मनानें कनवाळू आहेत. असें पाहून तो आपल्या मनांत म्हणाला, "असल्या जगांत कोणी तरी दुःखी असेल बरें? कोणी असणार नाहीं."

ही त्याची आनंददायक भ्रांति इम्लाकानें दूर करण्याकरितां यत्न केला नाहीं. त्यानें मनांत आणिलें कीं, यास जगाचा अनुभव नसल्यामुळें यास हा सर्व प्रपंच इतका गोड भासतो आहे, तर त्यास त्याचा कडूपणा आपण होऊन इतक्यांतच

अनुक्रम
विभाग
क्रमांक
वाचनालय



कशास कळवावा ? तो त्यास लौकरच आपोआप कळला आणि त्याप्रमाणेंच झालें. तें असें कीं, एक दिवस राजपुत्र कांहीं वेळ उगाच स्तब्ध बसून इम्लाकास म्हणाला, " माझे सर्व सोबती तर सर्वदा एकसारखे सुखानुभव घेतांना दिसतात, आणि मला एकट्यास मात्र स्वस्थ वाटत नाहीं, व चैन पडत नाहीं, याचें कारण काय असेल तें असो. ज्या ज्या सुखाचें मी मोठ्या उत्कंठेनें संपादन करतों, तीं सर्व प्राप्त झालीं न झालीं तों, मला विरस वाटून त्यांचा त्रास येतो. मंडळी ख्यालीखुशाली करितात त्यांत मी जातों खरा; पण खरें विचाराल तर तेथें मला वास्तविक सुखानुभव होतो म्हणून मी तेथें जातों असें तादृश नाहीं; तर आपला आपणास विसर पडावा म्हणून मुख्यत्वेंकरून जातों; व इतक्या मोठ्यानें हंसतों, खेळतों, त्यांतला वास्तविक हेतु हाच असतो कीं, माझ्या मनांतला उदासपणा दुसऱ्याच्या मनांत न यावा."

इम्लाक म्हणाला, " दुसऱ्यांच्या मनाचा व्यापार समजण्यास रस्ता म्हटला म्हणजे आपल्या मनांतला व्यापार पाहून त्यावरून अनुमान करावें हाच होय. यास्तव जर आपली संतोषवृत्ति केवळ बनाऊ आहे असें तुम्हास ठाऊक आहे तर त्यावरून इतरांची संतोषवृत्तीही कदाचित् खरी नसेल असा संशय घेण्यास चिंता नाहीं. सर्व लोक बहुतकरून एकमेकांचा हेवा करीत असतात. वास्तविक सुख प्राप्त होणें नाहीं अशी मनुष्याची खात्री व्हावयास फार दिवस लागतात. प्रत्येकांस असें वाटत असतें कीं, मजवांचून सर्व दुसरे लोक सुखी आहेत; आणि अशा समजुतीनें स्वतः आपणास सुख प्राप्त होण्याची आशा त्याच्या ठायीं बहुत दिवस असते. कालच रात्रीं आपण ज्या मंडळींत गेलों होतों, तेथें सर्व लोक अशा रंगांत दिसत होते व असा विनोद चालला होता कीं, तसला आनंद या मृत्युलोकापेक्षां विशेष पुण्यवान् जो लोक असेल तेथच्याच भाग्यवान् लोकांस साजण्यासारखा होता. त्या प्रकारचा आनंद, चिंता व शोक यांनीं व्याप्त अशा या मृत्युलोकीं आढळेल असें कोणास वाटणार नाहीं. परंतु मी आपणांस खरें सांगतों कीं, ज्यास एकांतवासाचें भय वाटत नव्हतें असा एकदेखील त्या मंडळींत नव्हता. एकटें बसलें तर चैन पडत नाहीं, नानाप्रकारचे दुःखकारक विचार मनांत येतात, तर ते टाळावे याच बुद्धीनें ती सर्व मंडळी तेथें जमली होती. वास्तविक सुखी म्हटला म्हणजे एकदेखील नव्हता."

राजपुत्र म्हणाला, " तुम्ही म्हणतां हें सर्व मला लागू आहे. तें माझ्या सर्व सोबत्यांसही कदाचित् लागू असेल, नाहीं कोणी म्हणावें ? आतां एकंदर मनुष्य-

जातीस जीं साधारण दुःखें असतील तीं असोत; तथापि मनुष्यांच्या कांहीं अवस्था इतर अवस्थांपेक्षां चांगल्या आहेत, सर्वच सारख्या नाहींत. तेव्हां सर्वांत कमी दुःखाची जी असेल ती शोधून काढून तिचाच स्वीकार करावा, हें शहाणपणाचें काम आहे असें मला वाटतें."

इम्लाक म्हणाला, "सुख व दुःख यांची कारणें पाहूं गेलें असतां तीं अनेक प्रकारचीं व अनिश्चित आहेत, व कधीं कधीं ज्या कारणानें सुख उत्पन्न होतें तेंच कारण दुःखासही उत्पन्न करतें. तसेंच ज्याचें धोरण पूर्वी कांहींच असत नाहीं अशामध्येंच कांहीं गोष्टी घडून, त्यांपासून केव्हां केव्हां भलताच परिणाम उत्पन्न होतो. याप्रमाणें असा पराकाष्ठेचा गोंधळ आहे कीं, जर कोणी मनुष्य म्हणेल कीं, अमुक स्थिति सर्वांत चांगली असें स्पष्ट सिद्ध करून तिचा स्वीकार करावयाचा, तर तो मरेतोंपर्यंत जरी त्यानें शोध केला व विचार केला, तरी निर्णय म्हणून व्हावयाचा नाहीं. त्या शोधांतच त्याचा अंत होईल."

राजपुत्र म्हणाला, "असें तुम्ही म्हणतां खरें; परंतु ज्या ज्ञाते पुरुषांचें भाषण ऐकून ते आपणांस इतके थोर वाटतात व ज्यांच्या बुद्धीचा प्रौढपणा पाहून आपणांस इतका चमत्कार वाटतो, त्या पुरुषांनीं आपणांस अत्यंत सुखावह वाटली त्या स्थितीचा आश्रय केला नाहीं, हें कसें?"

इम्लाक म्हणाला, "विचारपूर्वक अमुक एक स्थिति पसंत करून तींत वागणारे फारच थोडे. मनुष्यें ज्या ज्या स्थितींत आपणास आढळतात ती स्थिति ज्या कारणांनीं त्यांस प्राप्त झाली आहे, त्या कारणांची घटना त्या मनुष्यांनीं पूर्वी विचार करून केली म्हणून झाली असें नाहीं. कित्येक स्थळीं तशी कारणघटना होऊं नये म्हणूनसुद्धां त्यांनीं यत्न केला आहे; आणि याच कारणामुळें तुम्ही जर पाहूं जाल, तर आपल्यापेक्षां आपल्या शेजाऱ्याची स्थिति चांगली असें ज्यास वाटत नाहीं असा एकमुद्धां मनुष्य तुम्हांला सांपडणार नाहीं."

राजपुत्र म्हणाला, "तुम्ही म्हणतां याप्रमाणें इतर मनुष्यांची अवस्था असली तरी मी राजकुळांत उत्पन्न झाल्यामुळें जी अवस्था उत्तम वाटेल ती साध्य करून घेण्याचें सामर्थ्य मला ईश्वरानें दिलें आहे, व जगांतल्या सर्व प्रकारच्या अवस्था पाहण्याची मला सोय आहे. तर मी आतां सावकाशपणें चांगला विचार करून सर्वांत चांगली स्थिति कोणती तें ठरवून तिचा आश्रय करणार. सुख हा पदार्थ या जगांत कोठें तरी असेलच यांत संशय नाहीं."

---

# भाग सतरावा.

## राजपुत्र रासेलसाचा रंगेल तरुण मनुष्याशीं समागम.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं निजून उठल्यावर राजपुत्रानें निश्चय केला कीं, वागण्याच्या निरनिराळ्या तऱ्हांचा स्वतः अनुभव घेऊन त्यांतून विशेष सुखाची व उत्तम तऱ्हा कोणती हें निवडून काढावयाचें. मग प्रथम त्यानें असें मनांत आणिलें कीं, तारुण्य मुख्यत्वें सुखानुभवाचें वय होय. तर केवळ इच्छा तृप्त करणें हेंच आपलें मुख्य काम आहे असें समजून सर्व वेळ अनेक प्रकारच्या सुखांचा आस्वाद घेण्यांत घालवितात, अशा तरुण मनुष्यांच्या मंडळींत आपण शिरावें, व तो वर्तनक्रम कसा आहे तें पहावें. तो स्वतः तरुण, शहाणा व सधन असल्यामुळें चैनी मनुष्यांच्या मंडळींत शिरण्यास त्यास अगदीं कठिण पडलें नाहीं. परंतु त्या वर्तनक्रमाचा त्यास फारच लौकर कंटाळा व वीट आला; कारण त्या मंडळींत मस्करी पुष्कळ असे, परंतु तींत खुबी किंवा मार्मिकपणा मुळींच नसे. कांहीं समर्पक कारण नसतां त्यांनीं उगीच हंसावें; खाणें, पिणें, इत्यादि केवळ इंद्रियतृप्तीच्या ग्राम्य साधनापलीकडे त्यांस कांहींच ठाऊक नव्हतें; चातुर्य, कल्पनाशक्ति, युक्तिप्रयुक्ति, इत्यादि मानसिक वृत्तींची ज्यांत गरज आहे अशा वरच्या प्रतीच्या सुखाची ओळख त्या बापड्यांस स्वप्नींही नव्हती. त्यांची चाल छचोरपणाची व हलकट असे. नेमस्तपणा, व्यवस्थितपणा, मर्यादा इत्यादि आवश्यक गुणांचा ते मूर्खपणें उपहास करीत; परंतु कोणी वजनदार मनुष्यानें त्यांकडे डोळे वटारून पाहिलें असतां ते दबत, व शहाण्यानें त्यांचा तिरस्कार केला असतां लाजून खालीं माना घालीत.

राजपुत्रानें मनांत निश्चय केला कीं, ज्या वर्तनक्रमाची आपली आपल्यासच लाज वाटते, त्याच्या योगानें आपणांस कधीं सुख व्हावयाचें नाहीं. तसेंच त्याच्या मनांत आणखी असेंही आलें कीं, पूर्वी मनांत कांहीं उद्देश योजून तो सिद्ध कसा होईल याचें कांहीं धोरण न करतां वागणें, व यदृच्छेनें कधीं उल्हास पावणें व कधीं खेद पावणें, हें विचारशक्तिसंपन्न प्राणी जो मनुष्य त्यास उचित नव्हे.

तो आपणाशी म्हणाला, " अहो, वास्तविक सुख जें म्हणतात तें असें अनिश्चित व नश्वर नसावें, तर निश्चित व चिरस्थायी असेंच असलें पाहिजे."

याप्रमाणें तो वर्तनक्रम अयोग्य समजून तो टाकावयाचा निश्चय राजपुत्रानें स्वतः तर केलाच; परंतु त्या मित्रांची संगत सोडण्यापूर्वी शिकवणीच्या दोन गोष्टी सांगून त्यांचे कान उघडले तर उघडून पाहण्याचा यत्न केल्यावांचून त्यास राहवेना; कारण ते मित्र अविचारी होते तरी ते मनाचे मोकळे होते व राजपुत्राशीं सोरस्यानें वागत असत, यामुळें त्यास त्यांचा कळवळा वाटला. मग एक दिवस तो त्यांस म्हणाला, " मित्रहो, आपण ज्या रीतीनें आयुष्य घालवीत आहों तिजविषयीं व असें जर आपण वागलों तर पुढें आपला परिणाम काय होईल याविषयीं मी शांतपणें विचार केल्यावरून मला असें दिसतें कीं, आपण फार चुकत आहों. हल्लीच्याप्रमाणें वागण्यांत आपणांस मोठें सुख होतें असें आपण समजतों. परंतु वास्तविक पाहतां यांत आपला फार तोटा आहे. पहा, मनुष्यानें आपलें तारुण्य असें खर्चिलें पाहिजे कीं, त्यास उतारवयांत दुःख व पश्चात्ताप हीं होणार नाहींत. जो विचार करीत नाहीं, त्यास शहाणपण कदापि येणें नाहीं. ज्याचा सर्वकाळ थट्टामस्करींत व हुच्चेपणांत जातो तो शेवट-पर्यंत अज्ञानच राहातो. तसेंच खाण्यापिण्यांत अनियमितपणें वागण्यानें घटकाभर जिवास हुशारी वाटून सुख झाल्यासारखें वाटतें खरें; परंतु तेणेंकरून आयुष्य कमी होतें, किंवा अनिवार्य रोग जडतात. मित्रहो, आपण हें मनांत आणिलें पाहिजे कीं, तारुण्य हें फार थोडा वेळ राहणारें आहे, चिरकाल राहणारें नाहीं. त्याची धुंदी अंगावर आहे तोंपर्यंत हे ख्यालीखुशालीचे क्षुल्लक विषय गोड वाट-तात; परंतु ती धुंदी निघून गेली म्हणजे हे विषय आपणांस अगदीं बेचव वाटूं लागतील व त्यांपासून आनंद न होतां उलटा त्रास होईल. उतारवयांत मनुष्यास समाधान वाटण्याचें साधन म्हटलें म्हणजे परोपकार करणें आणि सज्जन व सुज्ञ पुरुषांत बोज असणें हेंच होय. तर मित्रहो, आपण अद्यापि वाहवलों नाहीं तोंच आज सावध व्हावें, व आपणांस पुढें उतारवय येणारें आहे हें मनांत आणून आतांपासून वागूं लागावें; यांत शहाणपणा आहे. नाहीं तर ही वेळ अशी अविचारांत निघून गेली म्हणजे पुढें उतारवयांत आज केलेलीं मूर्खपणाचीं कृत्यें आपल्या जिवास खाऊं लागतील, व आजच्या अव्यवस्थित आहार-विहारानें आंगांतलि आरोग्य व शक्ति गमावून चिकटवून घेतलेल्या रोगापासून मरेतों पीडा सोसावी लागेल; व ती स्थिति फारच भयंकर आहे."

राजपुत्र असें भाषण करीत असतां हा काय बडबड करतो असा विस्मय वाटून ते एकमेकांच्या तोंडाकडे टकटका पाहूं लागले. सरतेशेवटीं राहावेनासें होऊन त्या सर्वांनीं एकदम खदखद हंसण्यास आरंभ केला. तेव्हां रासेलस खिन्न होऊन निमूटपणें तेथून चालता झाला.

आपण ज्या गोष्टी बोललों त्या सर्व खऱ्या होत्या, व आपल्या मनांतला हेतु त्यांचें कल्याण करण्याचा होता. अशी त्याच्या मनाची पक्की खात्री होती; तथापि त्या छचोर लोकांनीं जो त्याचा उपहास केला त्यापासून त्यास वाईट वाटल्यावांचून राहिलें नाहीं. मग कांहीं वेळानें चित्त स्वस्थ झाल्यावर त्यानें आपला शोध पुढें चालविला.

---

# भाग अठरावा.

## राजपुत्रास एक सुज्ञ व सुखी मनुष्य भेटला.

राजपुत्र एक दिवस नगरांतून रस्त्यानें चालला असतां एक मोठी इमारत त्यानें पाहिली. त्या वाड्याचे दरवाजे खुले होते, व रस्त्यानें जाणारे येणारे लोक पुष्कळ आंत जात होते, त्या लोकांबरोबर राजपुत्रही आंत गेला, आणि पाहतो तों ती व्याख्यानें देण्याची मोठी विस्तीर्ण जागा होती. आपल्या देशांत पुराणीक किंवा हरदास पुष्कळ लोकांस जसा बोध करतात, तसेंच त्या ठिकाणीं मोठमोठे पंडित मुख्य स्थानीं बसून नानाप्रकारच्या विषयांचें प्रतिपादन करीत, व हजारों लोक तें ऐकावयास जमत. राजपुत्र ज्या दिवशीं तेथें गेला होता त्या दिवशीं एक मोठा पंडित उंच स्थानीं बसून श्रोत्यांस उपदेश करीत होता. त्याच्या भाषणाचा विषय त्या दिवशीं असा होता कीं, मनुष्यास सुखप्राप्ति व्हावी अशी जर इच्छा आहे तर त्यानें कामक्रोधादिक मनोविकार आपल्या आळ्यांत ठेविले पाहिजेत. या विषयाचें तो मोठ्या आवेशानें प्रतिपादन करीत होता. त्याची मुद्रा भव्य होती, उच्चार व्यक्त व साफ होता, व भाषणपद्धति प्रौढ असून सुरस होती, विवेक आणि सद्वासना यांपेक्षां कामक्रोधादि दुर्वासना प्रबळ झाल्या असतां मनुष्याचा स्वभाव बिघडून तो नीचपणाला पावतो; तसेंच अविचार म्हणजे भ्रांति दुर्वासनांचें मूळ आहे; त्या

अविचारांचें प्राबल्य अंतःकरणांत झालें म्हणजे, अयोग्य मनुष्याच्या हातीं राजसत्ता आली असतां जसें होतें, तसा जिकडे तिकडे गोंधळ व अव्यवस्था होते. कामक्रोधादि बंडखोर बुद्धीच्या किल्ल्यांत शिरून, विवेकरूप राजाचा अंमल मानीतनासे होतात; इत्यादि गोष्टी अनेक प्रकारच्या उदाहरणांनीं स्पष्ट करून त्यानें श्रोत्यांच्या मनांत बिंबवून दिल्या. तो म्हणाला, "विवेक हा सूर्यासारखा आहे. त्याचा प्रकाश सदोदित सारखा असतो; आणि अविचार हा विजेसारखा आहे; त्याचा उजेड क्षणभर राहून नाहींसा होतो, त्याची चकाकी अनियमित असते, व त्याच्या अनुरोधानें जो चालेल तो चुकून शेवटीं दगा पावतो."

नंतर दुष्ट वासनांचा निग्रह करण्याचे जे निरनिराळे उपाय शास्त्रांत सांगितले आहेत, त्यांचें निरूपण करून, त्यांप्रमाणें ज्यानें मनोजय केला त्याच्या आनंदाचें त्यानें वर्णन केलें. तो म्हणाला, "याप्रमाणें मन ज्यानें जिंकलें तो पुरुष भीतीच्या बंधांतून सुटला; तशा पुरुषास आशा ठकवूं शकत नाहीं; व तो शोकास मोजीत नाहीं. असा पुरुष सर्वदा शांतपणें वागतो. कशींही संकटें आलीं असतां त्याच्या चित्तास क्षोभ होत नाहीं, व त्याचें समाधान ढळत नाहीं. निवांत असो किंवा मोठें वादळ होवो, सूर्य जसा गगनांत सदा सारखा संथपणें मार्गक्रमण करतो, तसा तो पुरुष संसारांत नेहमीं स्वस्थपणें वागतो."

"नंतर त्यानें कितीएक थोर पुरुषांचे दाखले सांगितले, कीं ज्यांस हर्ष किंवा शोक यांपासून कधींही क्षोभ झालाच नाहीं, व पामरजन ज्यांस दुःख किंवा सुख अशीं नांवें देतात त्या गोष्टी यदृच्छेनें घडत असतां त्यांच्या अंतःकरणांत विकार म्हणून झालाच नाहीं. त्यानें श्रोत्यांस असा बोध केला कीं, मित्रवियोग व दारिद्र्य, तसेंच आरोग्य, मित्रसमागम, द्रव्यलाभ इत्यादि गोष्टींस वाईट व चांगल्या म्हणण्याचा व मानण्याचा अज्ञान लोकांनीं उगीच परिपाठ घातला आहे, परंतु ही केवळ भ्रांति आहे; तर ही सर्वांनीं विवेक करून सोडून द्यावी, म्हणजे त्यांस दुष्टपणापासून कांहींएक भय होणें नाहीं. असें जो करील तो सर्वदा सुखी होईल, व हें स्थायी सुख जे जे यत्न करतील त्या सर्वांस प्राप्त होण्यासारखें आहे." असें बोलून त्यानें आपलें भाषण समाप्त केलें.

एकाद्या मोठ्या सत्पुरुषाचा उपदेश जसा ऐकावा तसें मोठ्या भक्तीनें व एकाग्र चित्तानें रासेलसानें हें वरील भाषण ऐकिलें. नंतर वाड्याच्या दरवाजांत

कांहीं वेळ उभा राहून, तो पंडित जेव्हां बाहेर पडूं लागला तेव्हां राजपुत्र त्यास म्हणाला, "महाराज, आपण वास्तविक ज्ञानी आहां; तर आपली घरीं भेट घेण्याची परवानगी असावी." हें त्याचें भाषण ऐकून तो पंडित विचारांत पडला; लौकर होय म्हणेना. इतक्यांत राजपुत्रानें मोहोरांनीं भरलेली पिशवी काढून त्याच्या हातावर ठेविली, तेव्हां त्यास मोठें आश्चर्य वाटून ती त्यानें मोठ्या संतोषानें घेतली.

घरीं आल्यावर राजपुत्र इम्लाकास म्हणाला, "आज मीं एक सुज्ञ पुरुष पाहिला. त्याच्या अंगीं, जें ज्ञान म्हणून मनुष्यास आवश्यक आहे, तें शिकविण्याचें पूर्ण सामर्थ्य आहे. तो मनुष्य आज विवेक व धैर्य यांचा दृढ आश्रय धरून संसारांत घडणाऱ्या घडामोडींस कांहीं जुमानीत नाहीं. काय तरी त्याचें ज्ञान सांगावें ! तो बोलूं लागला, कीं सर्व श्रोत्यांचीं अंतःकरणें एकाग्र होऊन त्याच्या भाषणाकडे लागतात;व तो प्रतिपादन करूं लागला म्हणजे त्याच्या युक्ति ऐकून सर्वांच्या मनाचें तत्काळ समाधान होतें. तर आजपासून पुढें त्या मनुष्यास गुरु करून त्याची सर्व विद्या शिकून घ्यावयाची व त्याप्रमाणें वागावयाचें."

इम्लाक म्हणाला, "लोकांस नीतीचा व ज्ञानाचा उपदेश करणारे जे आहेत त्यांस अशा उतावळीनें वाखाणूं नका, व त्यांवर विशेष विचार केल्यावांचून एकदम विश्वास ठेवूं नका. केवळ भाषणावरून ते कोणी महापुरुष असतीलसे वाटतात खरें;परंतु त्यांचें आचरण पाहिलें तर साधारण जनांपेक्षा ते थोर असत नाहींत."

इम्लाक असें म्हणाला खरें; परंतु तेणेंकरून राजपुत्राची खात्री झाली नाहीं. तो मनांत विचार करूं लागला कीं, जो मनुष्य मोठमोठीं बलवत्तर प्रमाणें आणून लोकांची खात्री करतो, त्या प्रमाणांनीं त्याच्या स्वतःच्याच मनाची खात्री झाल्यावांचून राहील कशी ? तर त्याच्या मनाची खात्री असलीच पाहिजे. नंतर दोनचार दिवस लोटल्यावर एक दिवस तो त्या पंडिताच्या घरीं गेला. दरवाजावर मनुष्य होता तो त्यास प्रथम आंत जाऊं देईना; पण रासेलसास द्रव्याचें सामर्थ्य पूर्वी समजलें होतें. त्यानें एक मोहोर काढून त्या माणसाच्या हातावर ठेवतांच त्यानें त्यास आंत सोडिलें. मग आंत जाऊन पहातो तों एका अंधक उजेडाच्या खोलींत उगीच बसलेला तो पंडित त्याच्या दृष्टीस पडला. रडून रडून त्याचे डोळे सुजले होते व तोंड उतरून निस्तेज झालें होतें !

राजपुत्रास पाहून तो पंडित म्हणाला, " अहो, तुम्ही अशा वेळेस आलां कीं, ज्या वेळेस मनुष्याच्या सहाय्याचा कांहींच उपयोग होणें नाहीं. आज मजवर जो अनर्थ गुदरला आहे, त्याचें निवारण होण्याचा मार्ग म्हणून नाहीं. जी वस्तु गमावल्याबद्दल मी शोक करीत आहे ती वस्तु कांहीं केलें तरी मला पुनः प्राप्त व्हावयाची नाहीं. पहा, मला एकुलतीएक अशी कन्या होती. ती फार कनवाळू असल्यामुळें ती वृद्धापकाळीं माझी सर्व प्रकारें शुश्रूषा करीलसें मला वाटत होतें. तिला ज्वर येऊन ती काल रात्रीं वारली. आतां मी उघडा झालों. आतां या जगांत मला दुसरें कोणी राहिलें नाहीं. "

राजपुत्र म्हणाला, " महाराज, मनुष्यें नेहमीं मरतात.तेव्हां अमुकच मनुष्य मेलें ही गोष्ट सूज्ञास नवल वाटण्यासारखी नाहीं. मृत्यु हा आपणां सर्वांच्या सन्निधच आहे, व प्रत्येक क्षणीं तो प्राप्त होण्याचा संभव आहे. यास्तव सर्वांनीं त्याविषयीं तयार असावें हें योग्य आहे. "

पंडित म्हणाला, " मुला, तूं लहान आहेस. तुला अद्यापि इष्टजनांच्या वियोगाचें दुःख माहीत नाहीं म्हणून असें बोलतोस. "

राजपुत्र म्हणाला, "महाराज,तर त्या दिवशीं आपण वासनांचा जय करण्याचे जे उपाय इतक्या खात्रीनें सांगितले, ते आपले आपणच विसरलां काय ? मृत्युकृत हानीपासून होणारें दुःख बंद करण्याचें सामर्थ्य ज्ञानाच्या आंगीं नाहीं तर मग ? महाराज, विचार करा.बाह्य पदार्थ जितके आहेत तितके सर्व नाशवंत आहेतच आहेत; अविनाशी म्हटलीं तर एक विवेक व सत्य हीं मात्र होत. "

पंडित म्हणाला, "अरे, सत्य आणि विवेक यांपासून कोणतें समाधान मला प्राप्त होणें आहे ? या प्रसंगीं त्यांचा काय उपयोग आहे ? त्यांपासून इतकेंच समजावयाचें ना, कीं माझी मुलगी एकदां मेली ती पुनः मला प्राप्त व्हावयाची नाहीं ! "

राजपुत्र स्वभावानें दयाळू होता. त्यानें विचार केला कीं, या वेळेस त्याच्या मनांतले विरोध काढून त्याच्या दुःखावर डाग देणें आपणांस उचित नाहीं. असें मनांत येऊन तो तेथून परत आला; परंतु त्याच्या मनाची इतकी खात्री झाली कीं, केवळ शब्दपांडित्यावर व केवळ बोलण्याच्या चातुर्यावर भरंवसा कदापि ठेवूं नये.

---

# भाग एकोणिसावा.

## रानांत राहणारे जे धनगर व गुराखी त्यांच्या स्थितीचें कांहीं वर्णन.

सर्वोत्कृष्ट स्थिति संसारांत कोणती ती निवडून काढण्याविषयींची राजपुत्राची उमेद अद्यापि होती तशीच होती. ती अजून अगदीं कमी झाली नव्हती. एके दिवशीं त्यानें असें ऐकिलें कीं, नील नदीच्या अगदीं खालच्या धबधब्याजवळ कोणी एक मोठा विरक्त जोगी राहतो. तो मोठा थोर आहे, म्हणून त्या जोग्याची कीर्ति सर्व मुलुखांत गाजत होती. त्या जोग्याच्या मठास जावयाचा राजपुत्रानें निश्चय केला. त्याच्या मनांतला हेतु कीं, लौकिकांत वागण्यानें जें सुख प्राप्त होत नाहीं तें सुख एकांतवासांत आहे कीं काय, व ज्यास सर्व लोक वयोवृद्ध व तपोवृद्ध समजून इतके वाखाणतात, त्याजपाशीं इहलोकचीं दुःखें टाळण्याची किंवा सहन करण्याची कांहीं अपूर्व कला आहे कीं काय, हें प्रत्यक्ष जाऊन पाहावें.

त्यानें तो विचार इम्लाक व आपली बहीण निकाया यांस सांगितला असतां तीं म्हणालीं, "बरें आहे. आम्हीही येतों." मग कांहीं दिवसांनीं तयारी झाल्यावर तीं चौघेंजणें कैरो शहरांतून निघून चालतीं झालीं. जातांना वाटेनें त्यांस एक मोठें मैदान लागलें. तेथें किती एक धनगर आपलीं खिल्लारें चारतांना त्यांस आढळले. तेथें कोंकरें मोठ्या आनंदानें कुरणांत इकडे तिकडे बागडत होतीं. तें पाहून इम्लाक म्हणाला, "प्राचीन ग्रीक कवींनीं धनगरांच्या स्थितीची फारच स्तुति केली आहे. ते म्हणतात कीं, या स्थितींत स्वस्थता पूर्णपणें असून कलह, चोरी, खून वगैरे दोष अगदीं नसतात. त्यांत आतां दोन प्रहरची वेळही झाली आहे, तर आपण या धनगरांच्या पालांत जाऊन वसूं, व त्यांशीं चार घटका संभाषण करूं; म्हणजे उन्हाची वेळही टळेल, व आपण ज्या वस्तूच्या शोधास लागलों आहों ती वस्तु म्हणजे सुख, तें खरोखरी धनगरांच्या या साध्या स्थितींतच सरतेशेवटीं आढळतें कीं, काय, हेंही कळेल."

हें त्याचें म्हणणें सर्वांनीं मोठ्या आनंदानें मान्य केलें. मग ते त्या धनगरांच्या पालांत जाऊन बसले. त्यांस त्यांनीं थोडासा पैसा दिला, त्यावरून खुष होऊन ते धनगर मोठ्या संतोषानें व मोकळ्या मनानें त्यांशीं संभाषण करावयास लागले.

परंतु ते धनगर लोक पराकाष्ठेचे अडाणी व अज्ञान होते. त्यांस आपल्या स्थितींत गुण कोणते व दोष कोणते याचा कांहींच विचार नव्हता, व त्यांचें बोलणें फारच अस्पष्ट व विसंगत होतें. त्यामुळें त्यांच्या मनांतला भाव कांहींच कळेना. तथापि इतकें स्पष्टपणें दिसून आलें कीं, ते आपल्या स्थितीस त्रासले होते व आपण हाडें झिजवून कष्ट करितों आणि श्रीमान् लोक उगीच स्वस्थ बसून त्या कष्टाचीं फळें अनुभवतात, असें मनांत आणून रात्रंदिवस ते त्यांच्या नांवें जळत व नेहमीं त्यांचा नाश इच्छीत.

त्यांचें भाषण ऐकून राजकन्या मोठ्या आवेशानें बोलली, " या हेवेखोर रानटी लोकांची संगत मला क्षणभरसुद्धां नको. आज जें मीं पाहिलें त्यावरून रानांतल्या या सुखाचा मासला पाहण्याची इच्छा पुनः मला कधींही होईलसें वाटत नाहीं. आतां प्राचीन काळीं या अवस्थेंत बहुत प्रकारचीं सुखें होतीं म्हणून जें वर्णन आहे, तें सर्वच खोटें असेल असें मला वाटत नाहीं. तसेंच वनांत व शेतांत राहण्यापासून जा शांत सुखें प्राप्त होतात, त्यांपेक्षां नगरांत राहून व लौकिकांत वागून कांहीं फायदा आहे असेंही मला वाटत नाहीं. माझी अशी मोठी इच्छा आहे कीं, कांहीं थोड्या सुशील व चतुर सख्यांसहवर्तमान बागांत फिरून आपल्या हातानें लावलेल्या झाडांचीं फुलें तोडावीं. तसेंच आपण बाळगलेल्या मेंढ्यांचीं कोंकरें जवळ घेऊन त्यांस गोंजारावें, किंवा ओढ्याच्या कांठीं झाडांच्या छायेस बसून आपल्या सख्यांपैकीं एकादीस एकादा सुरस ग्रंथ वाचावयास लावून हवा खात तो स्वस्थपणें ऐकावा, आणि याप्रमाणें आनंदानें काळ घालवावा. "

---

# भाग विसावा.

## ऐश्वर्यापासून भय.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं उठून तीं पुढें चालतीं झालीं. प्रहर दहा घटका दिवस येई तोंपर्यंत वाट चालल्यावर ऊन जेव्हां फार झालें, तेव्हां कांहीं वेळ विसावा घेण्याकरितां आसपास कोठें सावली असली तर पहावी म्हणून इकडे तिकडे पाहतात, तों कांहीं अंतरावर एक दाट झाडी त्यांच्या दृष्टीस पडली. त्या झाडींत शिर-

त्यावर तत्काळ त्यांस असें दिसलें कीं, येथून जवळपास कोठें मनुष्यांची वस्ती असावी. ह्या झाडींत फिरावयास मधलीं मधलीं झाडें तोडून वाटा केल्या होत्या, व त्या वाटांवर गर्द छाया असावी म्हणून समोरासमोरच्या झाडांच्या फांद्या वांकवून, त्या एकमेकांत गुंतवून टाकल्या होत्या. तसेंच मध्यें मध्यें खुल्या जागेंत उंचवटे करून त्यांवर फुलझाडें लाविलीं होतीं. या नागमोडी वळणानें गेलेल्या वाटेच्या बाजूनें एक लहानसा ओढा वाहात होता. तो मध्यें मध्यें रुंद व किंचित् खोल केला होता, व कोठें कोठें धोंड्यांच्या लहान ढिगांनीं त्याचा प्रवाह अडवून त्याचा खळखळाट विशेष होईलसें केलें होतें.

ज्याची आशा ध्यानींमनींसुद्धां नव्हती असें तें रमणीय स्थान अकस्मात् पाहून त्यांस फारच आनंद झाला. मग ते त्या झाडाखालून हळू हळू चालले आहेत, व असल्या निर्जन रानांत इतक्या मौजेची जागा तयार करण्यास कोणास वेळ फावला असावा, कोणीं आपलें चातुर्य खर्चिलें असावें, याविषयीं निरनिराळे तर्क करताहेत, तों कांहीं पुढें गेल्यावर वाद्यांचा मधुर ध्वनि त्यांच्या कानीं पडला व कुंजांत कितीएक तरुण पुरुष व तरुण स्त्रिया गातांना व नाचतांना त्यांच्या दृष्टीस पडल्या. आणखी पुढें जाऊन पाहतात तों एका सखल टेकडीवर एक मोठा वाडा दिसला. त्याच्या भोंवतालीं पुष्कळ झाडी होती. पांथस्थ लोकांनीं पाहिजे त्या घरीं उतरावयास जावें व ज्याच्या घरीं ते येतील त्यानें सामर्थ्यानुसार त्यांचा पाहुणचार करावा, अशी त्या देशांतील चाल असे. त्या चालीप्रमाणें ते त्या वाड्यांत गेले असतां यजमानानें मोठ्या उदारपणें व आपल्या ऐश्वर्याप्रमाणें त्यांचें आगतस्वागत केलें.

घरधनी मोठ्या लोकांत वागलेला व चतुर होता. त्यानें यांस पाहतांच यांच्या मुखचर्येवरून ताडलें कीं, हे कोणी तरी थोर लोक असावे. यावरून त्यानें त्यांस जेवण्याकरितां मोठा मेजवानीचा थाट केला. सर्व जेवावयास बसून संभाषण चालू झालें असतां इम्लाकाच्या सुरस भाषणांवरून त्यास समजलें कीं, हा मनुष्य मोठा धूर्त व विद्वान् आहे, व राजकन्येची फारच प्रौढ रीत पाहून ही कोणी मोठी कुलीन स्त्री आहे असा त्याच्या मनाचा निश्चय झाला. तिसऱ्या प्रहरचे सुमारास ते जाण्याविषयीं निरोप मागूं लागले असतां यजमान म्हणाला कीं, कृपा करून आजचा दिवस येथें मुक्काम केला असतां मजवर उपकार होतील. तें त्याचें भाषण मान्य करून तीं त्या दिवशीं तेथेंच राहिलीं. दुसऱ्या दिवशीं घरधन्यास त्यांनीं

रहावयाची इच्छा विशेष वाटून त्यानें पुनः आग्रह केला, व त्यांसही त्याची भीड तोडवेना. मग दोन तीन दिवस त्यांचा सहवास झाल्यावर तिऱ्हाइतपणा सोडून यजमान व पाहुणीं एकमेकांशीं मोकळ्या मनानें बोलूंचालूं लागलीं.

राजपुत्रानें दोनचार दिवस पाहिलें तों तेथील मनुष्यांच्या आनंदित वृत्ति त्याच्या दृष्टीस पडल्या; व बाहेर पहावें तों चोहींकडे बागेची व वनाची अपूर्व शोभा दिसे. याप्रमाणें घरांत व बाहेर जिकडे जिकडे त्याची नजर जाई तिकडे तिकडे आनंदच त्याच्या दृष्टीस पडल्यावरून त्याच्या मनांत आशा उत्पन्न झाली कीं, आपण जो पदार्थ शोधीत आहों, तो पदार्थ (खरें सुख) या ठिकाणीं खचित् सांपडेल. मग तो घरधन्यास म्हणाला, "अहो, तुम्ही मोठे धन्य आहां; कारण, आपणांस सर्व कांहीं सुखाच्या गोष्टी अनुकूळ आहेत, हें पाहून आम्हांस मोठा संतोष झाला." हें राजपुत्राचें भाषण ऐकून घरधन्यानें दुःखाचा मोठा उसासा टाकून उत्तर केलें, "महाराज, बाहेरून पहातां आपण म्हणतां याप्रमाणें दिसतें खरें; परंतु वास्तविक पुसाल तर मला मोठें दुःख आहे. या ऐश्वर्यामुळें माझ्या जिवास रात्रंदिवस मोठें भय आहे. या प्रांतांत जो मोठा अधिकारी आहे तो माझा मोठा शत्रु आहे. माझी दौलत मोठी असल्यामुळें व सर्व लोक मला चाहातात यामुळें तो मला नेहमीं पाण्यांत पहातो. तथापि या देशांतील सर्व मांडलिक राजांचा मला आश्रय होता त्यामुळें आजपर्यंत माझा बचाव झाला. परंतु थोरांच्या मित्रत्वाचा भरंवसा नाहीं. हेच मांडलिक राजे माझ्या दौलतीचा अंश मिळावा या लोभानें मिसर देशाच्या राजाशीं एक होऊन माझा कधीं घात करतील, हें सांगवत नाहीं. हें सर्व भय मनांत आणून मी कितीएक दिवसांपूर्वीं आपलें सर्व द्रव्य दूर मुलखीं पाठवून दिलें आहे. यत्किंचित् वांकडी गोष्ट दिसल्याबरोबर आपण स्वतः तिकडे निघून जाण्याची तयारी ठेविली आहे. मी परागंदा झालों म्हणजे माझे दावेकरी माझ्या वाड्यांत शिरून हवे तसे नाचतील, व मीं इतके दिवस खपून तयार केलेल्या या स्थलाचा हवा तसा उपभोग घेतील, ही गोष्ट मनांत येऊन मला फार वाईट वाटतें."

त्याचें तें संकट ऐकून सर्वांस वाईट वाटून तीं त्यांस म्हणालीं, "तुम्हांस उगीच्या उगीच स्वदेश सोडावा लागतो हा मोठा जुलूम आहे." ही अन्यायाची गोष्ट ऐकून राजकन्येस फारच दुःख झालें, आणि त्या संतापानें तिची प्रकृति बिघडून ती आपल्या खोलींत जाऊन निजली. पुढें आणखी थोडे दिवस त्या गृहस्थाच्या घरीं राहून तीं सर्व तेथून निघून पुढें चालतीं झालीं.

# भाग एकविसावा.

## एकांतवासाचें सुख-जोग्याची हकीकत.

वाटेनें शेतकऱ्यांस विचारीत विचारीत तिसऱ्या दिवशीं तीं जोग्याच्या मठाजवळ येऊन पोहोंचलीं. हा मठ डोंगराच्या एका बाजूस खडक फोडून तयार केला होता व त्याच्या वरच्या आंगास डोंगरावर नारळींची व ताडांची दाट झाडी होती. या ठिकाणापासून नील नदीचा धबधबा इतक्या अंतरावर होता कीं, त्याचा तेथून एकसारखा मंद ध्वनि मात्र नेहमीं ऐकूं येत असे. या नादानें कटकट न होतां अंतःकरणाची वृत्ति एकाग्र होऊन मननाकडे लागे, व वारा सुटून ताडामाडांच्या झावळ्या वाजूं लागल्या म्हणजे तर वर सांगितलेला प्रकार विशेषच होई. डोंगरांत आंगचीच त्या ठिकाणीं एक कपारी होती, ती मनुष्यकृतीनें सुधारून तेथें पुष्कळ निरनिराळ्या जागा केल्या होत्या. त्या जोग्यानें निरनिराळ्या कामांकरितां योजल्या होत्या. रस्त्यानें चालतांना कोणा वाटसरांस रात्र झाली व एकाएकीं पावसानें गांठलें, आणि ते तेथें आश्रयास आले, तर त्यांस उतरावयास जागा जोगी देत असे.

राजपुत्र वगैरे मंडळी संध्याकाळची तेथें पोहोंचली. त्या वेळीं तो जोगी मठाच्या दारापाशीं बाहेरच्या आंगास एक बांक टाकून त्यावर वारा खात बसला होता. त्याच्या बाजूस एक पुस्तक व कांहीं लेखण्या व कांहीं कागद होते; व दुसऱ्या बाजूस कुऱ्हाड, वाकस वगैरे अनेक प्रकारचीं विखनें पडलीं होतीं; हीं आलीं तें प्रथम जोग्यास कळलें नाहीं, त्यामुळें तो एकटा असल्याप्रमाणें बसला होता. त्याची मुखचर्या पाहून राजकन्या आपल्या सोबत्यांस म्हणालीः—
"मला जर विचाराल तर याच्या मुखचर्येवरून यास स्वतः वास्तविक सुख प्राप्त झालें आहे, किंवा तें प्राप्त करून घेण्याचा मार्ग दुसऱ्यास सांगण्याचें सामर्थ्य याच्या आंगीं आहे, असें दिसत नाहीं."

मग त्या सर्वांनीं त्यास मोठ्या आदबीनें सलाम केला असतां त्यानेंही त्यांस परतून सलाम केला. त्याच्या सलाम करण्याच्या रीतीवरून स्पष्ट दिसून आलें कीं, तो मनुष्य पूर्वीं दरबारांत पुष्कळ वागला असावा. तो

म्हणाला:—" बाबांनो, तुम्ही रस्ता चुकल्यामुळें कदाचित् येथें आलां असाल. तसें झालें असल्यास कांहीं चिंता नाहीं. तुम्हांस येथें रात्रीच्यारात्र खाणेंपिणें व निजावयास आंथरूण यांची मठांत व्हावी त्याचप्रमाणें सोय होईल. मनुष्यास अवश्य जें जें पाहिजेच तें सर्व येथें आहे, पण त्यापेक्षां अधिक म्हणजे मिजाशीच्या वस्तु मात्र येथें नाहींत; व तुम्हीही त्यांची जोग्याच्या झोपडींत अपेक्षा करणार नाहींच."

त्यांनीं उत्तर केलें कीं, " आपणांसारख्या साधूच्या हातून कांहीं जरी प्राप्त झालें तरी तो मोठा श्रेयस्कर प्रसादच आहे." नंतर तीं मठांत शिरलीं. आंत पाहतात तों जागा फारच स्वच्छ होती, व वस्तु जेथल्या तेथें ठेवलेल्या असल्या-मुळें कोठें कांहीं पसारा नव्हता, तें पाहून सर्वांस मोठा संतोष झाला त्यांस भूक लागली असेल असें समजून त्या जोग्यानें त्यांपुढें खावयास शिजविलेलें मांस व प्यावयास मद्य आणून ठेविलें; परंतु तो स्वतः फळेंमुळें खाऊन पाणी प्याला. दुसऱ्या कशास शिवला नाहीं. त्याच्या भाषणांत थट्टामस्करी नसून तें चित्तास संतोष करणारें होतें; व परमार्थपर असून त्यांत स्वमताभिमान अगदीं नव्हता. त्याचे ते गुण व ती वृत्ति पाहून सर्वांच्या मनांत त्याजविषयीं पूज्यबुद्धि तत्काळ उत्पन्न झाली, व राजकन्येस असा पश्चात्ताप झाला कीं, विचार केल्याशिवाय आपण प्रथमदर्शनीं यास उगीच एकाएकीं नांव ठेविलें.

मग कांहीं वेळ साधारण भाषण झाल्यावर इम्लाक जोग्यास म्हणाला:— " महाराज, आपली वृत्ति व थोरपणा पाहिल्यावर आतां आपली कीर्ति इतकी दूरवर पसरल्याचें नवल आम्हांस वाटत नाहीं. आम्ही कैरो शहरांत रहात असतों. तेथें आपल्या ज्ञानाची पराकाष्ठेची प्रशंसा ऐकून आपल्या दर्शनास आलों आहों. हा तरुण मुलगा व ही तरुण मुलगी यांचीं अद्यापि लग्नें झालीं नाहींत. त्यांच्या मनांत असें आहे कीं, जगांत अत्यंत उत्तम जी स्थिति असेल ती शोधून काढून तिचा आश्रय करावा व या गोष्टींत आपला बुद्धिवाद ऐकावा म्हणून हीं आपल्या पायांपाशीं आलीं आहेत."

जोग्यानें उत्तर केलें, " बाबांनो, चांगल्या रीतीनें जो वागेल त्यास सर्व अवस्था चांगल्या आहेत. आतां सर्वोत्कृष्ट अवस्था निवडून काढण्याविषयीं जर म्हणाल, तर दुःख होण्याचीं उघड जीं कारणें आहेत तीं जितकीं टाळवतील

तितकीं टाळावीं. या साधारण नियमापेक्षां मला दुसरा कांहीं विशेष उपाय सांगतां येत नाहीं."

राजपुत्र म्हणाला, "जो सर्वसंग सोडून एकांतीं सर्वकाळ वास करतो तो खचित दुःखाच्या सर्व कारणांस टाळतो. ही गोष्ट, महाराज, आपण आपल्या उदाहरणानें सर्व जनांस दाखवीत आहां."

जोगी म्हणाला, "बाबा, मी आज पंधरा वर्षें एकांतवासांत घालविलीं खरीं; परंतु माझें उदाहरण पाहून दुसऱ्या कोणीं असें करावें, असा माझा अगदीं अभिप्राय नाहीं. मी तारुण्यदशेंत शिपायाचा धंदा करीत होतों. पुढें पायरीपायरीनें वाढत वाढत मुख्य सेनापतीच्या पदवीस चढलों. मोठमोठ्या फौजा हाताखालीं घेऊन मी मोठमोठे विस्तीर्ण देश काबीज केले. तसेंच मोठमोठ्या लढायांत तरवार गाजविली, व वेढा घालून बिकट बिकट ठिकाणीं सर केलीं. शेवटीं माझ्या वरची जागा रिकामी झाली ती मला मिळण्याची असून माझ्या खालच्या एका अधिकाऱ्यास मिळाली. तेणेंकरून मला फार वाईट वाटलें, व ज्वानीचा भर निघून गेल्यामुळें आंगांतली कुवतही कमी वाटूं लागली. मग विचार केला कीं, संसारांत दुःखें, कलह व पापवासना या फारच आहेत; तर सर्व सोडून देऊन एकीकडे जाऊन शेवटचें वय निवांतपणांत घालवावें. पूर्वी आमचा एक वेळ पराभव होऊन शत्रूनीं पाठलाग केला असतां या कपारींत दडून बसून म्यां जीव बचावला होता. मग असा निश्चय केला कीं, याच ठिकाणीं राहून आयुष्याचे जितके दिवस राहिले असतील तितके काढावे. नंतर पाथरवट वगैरे कितीएक कारागीर आणून येथें खडक फोडून सोईच्या जागा केल्या व निर्वाहास जे जिन्नस पाहिजेत ते सर्व येथें सांठवून येथें राहूं लागलों.

"एकादा खलाशी दर्यांत वादळानें गांठावा आणि तो जीव बचावून बंदरास येऊन पोहोंचला म्हणजे त्यास कांहीं वेळ मोठा आनंद होतो; त्याप्रमाणें मीं बहुत वर्षें लष्कराच्या धामधुमींत व कलकल्यांत घालवून एकाएकीं निवांत ठिकाणीं येऊन स्वस्थ राहिलों. त्यामुळें पहिल्यानें कितीएक दिवस मला फार समाधान वाटलें. या स्थितींत नवेपणामुळें जी गोडी वाटत होती, ती कांहीं दिवसांनीं नाहींशी झाल्यावर, या भोंवतालच्या रानांत ज्या अनेक प्रकारच्या वनस्पति आहेत व अनेक प्रकारचे धोंडे व खनिज पदार्थ आहेत, तीं पाहून त्यांच्या आंगीं गुण कोणते आहेत वगैरे विचार करून मी पुष्कळ वर्षें करमणूक केली; परंतु

अलीकडे त्याही शोधाचा कंटाळा येऊन त्यांतही मन लागेनासें झालें आहे. कांहीं दिवसांपासून माझें मन व्यग्र होऊन चैन पडेनासें झालें आहे. कोणी बोलावयास नाहीं व कांहीं करमणूक नाहीं. यामुळें उगीच एकटें बसलें म्हणजे अनेक प्रकारच्या शंका येऊन बुद्धीस व्यामोह होतो, व अनेक प्रकारचे अप्रयोजक तरंग अंतःकरणांत उठतात. परोपकार व सत्कृत्यें करण्याचे प्रसंग गमावल्यावांचून मला दुष्कृत्यें टाळतां आलीं नाहीं असें जेव्हां जेव्हां मनांत येई तेव्हां तेव्हां माझी मला मोठी लाज वाटे. व आतांशा मला असें वाटावयास लागलें आहे कीं, मी एकांतवास जो स्वीकारला तो परमार्थाकरितां तादृश स्वीकारलासें नाहीं, तर जगाविषयीं द्वेषबुद्धि मनांत येऊन तिच्याच योगानें ही गोष्ट झाली. तर असल्या वैराग्यापासून काय फळ आहे ? कांहीं नाहीं. उद्योग नसल्यामुळें मूर्खपणाच्या व नानातऱ्हेच्या गोष्टी नेहमीं मनांत गोंधळत असतात व कितीदां काढलें तरी त्यांजकडे पुनः पुनः मन जातें. मला पश्चात्ताप होतो कीं, एकीकडे एकटा येऊन राहिल्यानें नफ्यापेक्षां माझा तोटाच फार झाला. आतां कोणी असें म्हणेल कीं, एकटा राहिल्यानें दुष्ट लोकांच्या सहवासानें कदाचित् वाईट गुण लागते ते लागले नाहींत; पण त्यावर माझें असें उत्तर आहे कीं, चांगल्या सज्जन व ज्ञानी लोकांच्या भाषणापासून व उपदेशापासून जो लाभ व्हावयाचा, तोही पण असें केल्यानें अंतरला. लोकांमध्यें राहण्यांत गुण अधिक कीं दोष अधिक, याचा मी फार दिवस विचार करीत होतों, शेवटीं गुण अधिक असा आज सकाळीं बुद्धीचा निर्णय झाल्यावरून उद्यां येथून निघून गांवांत किंवा नगरांत जाऊन राहण्याचा मीं निश्चय केला आहे. सर्वसंगपरित्याग करून जो एकांतीं जाऊन राहतो तो लोकांमध्यें राहण्यापासून होणाऱ्या सुखास मुकेल हें खचित आहे; परंतु तसें केल्यानें त्याची बुद्धि परमार्थाकडे विशेष लागेलच याचा भरंवसा नाहीं. "

ह्या त्याचे भाषणावरून सर्वांस मोठा विस्मय वाटला. नंतर तीं त्यास म्हणालीं कीं, " महाराज, आपली इच्छा असल्यास आम्हांबरोबर कैरो शहरास चलावें. " तें म्हणणें त्यानें मान्य केलें. मग त्यानें जवळपास पुष्कळ द्रव्य पुरून ठेविलें होतें तें काढून घेऊन तो त्यांच्या समागमें नगरास आला. जवळ आल्यावर नगर जेव्हां दिसावयास लागलें तेव्हां तें पाहून जोगयास जो हर्ष झाला तो सांगतां पुरवेना.

———

# भाग बाविसावा.

## सृष्टीच्या नियमाप्रमाणें जो वागतो त्यास सुख होतें.

त्या केरो शहरांत कितीएक विद्वान् लोक कांहीं दिवसांत नेमानें एकत्र जमत असत. त्या जमण्याचा त्यांचा हेतु असा असे कीं, ते नेहमीं व्यासंगांत चूर असत, तर त्या व्यासंगापासून थकलेल्या मनास कांहीं वेळ करमणूक व्हावी, व विचार करून आपल्या बुद्धीनें जो सिद्धांत केला तो दुसऱ्याच्या सिद्धांताशीं किती जमतो व किती जमत नाहीं हें पहावें. त्यांची बोलण्याचालण्याची रीत कांहींशी उद्धट असे खरी, तथापि त्यांचें भाषण ऐकिलें असतां तेणेंकरून ज्ञान वाढावें असें असे; व त्यांचे परस्पर जे वादविवाद चालत ते फार मार्मिकपणानें होत. आतां हें खरें होतें कीं, ते वाद करतांना कधीं फारच तापत. व ज्या विषयावर वाद उत्पन्न झाला तो विषय अगदीं विसरून उगेच आडरानांत भटकत. तसेंच कितीएक दुर्गुण बहुतेकांत साधारण असत. ते असेः—प्रत्येकास असें वाटे कीं, आपण सांगूं तें सर्वांनीं अनन्यभावें मान्य करावें; तसेंच इतरांची बुद्धि, ज्ञान कमी लेखवले असतां प्रत्येकास संतोष वाटे.

या सभेंत त्या जोग्याची गोष्ट काढून राजपुत्र म्हणाला कीं, "त्यानें इतका विचार करून एकांतवास करण्याचा निश्चय करून व कितीएक वर्षे त्या निश्चया-प्रमाणें वागून लोकांत कीर्ति मिळविली, असें असतां शेवटीं त्या मार्गास त्यानें दूषण ठेवून तो सोडला याचा मला मोठा विस्मय वाटतो."

या गोष्टीवर त्या सभेंतील निरनिराळ्या पंडितांचीं निरनिराळीं मतें पडलीं. कोणी म्हणाले कीं, त्या जोग्यानें चांगला विचार केल्यावांचून तो मार्ग स्वीकारला त्यामुळें त्यास तो पुढें चालविणें प्राप्त झालें, व त्यानें जें दुःख भोगलें तीं त्यास त्याच्या मूर्खत्वाबद्दल योग्य शिक्षा झाली. त्या सभासदांत एक वयानें सर्वांपेक्षां लहान होता. तो तर मोठ्या खातरीनें म्हणाला कीं, तो जोगी खचित मोठा ढोंगी असावा. दुसऱ्या कितीएकांचें म्हणणें असें पडलें कीं, सर्वजनसमुदायांत वागून त्याच्या हिताकरितां श्रम करणें हा प्रत्येक मनुष्याचा धर्म आहे. त्याअर्थीं तो जो सर्वांस सोडून एकीकडे जाऊन उगीच राहिला हा त्यानें मोठा अन्याय केला.

कोणी आणखी दुसरे पंडित तेथें होते त्यांचा अभिप्राय असा होता कीं, सर्वजन-समुदायाच्या हिताकरितां श्रम करावे हा प्रत्येक मनुष्याचा धर्म खरा, परंतु त्यानें मरेतोंपर्यंत केलें पाहिजे असें नाहीं. कांहीं मर्यादा आहे तितकें आयुष्य जन-समुदायाचें हित करण्याकडे घालविलें म्हणजे तो लोकऋणापासून मुक्त होतो. मग बाकी आयुष्य एकांतवास करून आपल्या जन्माचें सार्थक करण्याकडे त्यानें घालविल्यास कांहीं चिंता नाहीं.

राजपुत्र जोग्याची गोष्ट सांगत असतां एका पंडिताचें चित्त तिजकडे फार लागलेसें दिसत होतें. तो म्हणाला, " मला वाटतें कीं, तो जोगी थोड्याच दिवसांनीं पुनः एकांतवास करावयास जाईल आणि पुनः कांहीं वेळानें लोकांत येऊन राहील. आतां मध्येंच मेला किंवा लाज वाटून तसें त्यानें न केलें तर ती निराळी गोष्ट; केवळ मनाच्या कलानें म्हटलें म्हणजे मी म्हणतों अशीच त्याची वागणूक होईल. कारण, सुखाची आशा मनुष्याच्या अंतःकरणांत अशी बळकट ठसली आहे कीं, कितीदां जरी प्रयत्न फसले तरी ती आशा त्याच्या मनांतून नाहींशी होत नाहीं. तसें विद्यमान् स्थिति कोणती कां असेना, तींत त्यास कांहीं तरी दुःख वाटतें, व तें दुःख कबूल करावें लागतें, परंतु ती स्थिति सोडून कांहीं दिवस झाले म्हणजे तीच पुनः चांगली वाटूं लागून तीविषयीं इच्छा होते. आज मनुष्यमात्राची अशी स्थिति आहे खरी; तथापि कितीएक वर्षांनीं अशी वेळ खचित येईल कीं, तेव्हांपासून पुढें मनुष्यांच्या इच्छा अतृप्त राहणार नाहींत. सर्व सुखी होतील. दुःखी कोणी राहणार नाहींत. आतां कोणी आपल्या मूर्खपणानें आपणास दुःख करून घेतील तर गोष्ट वेगळी."

हें भाषण संपल्यावर दुसरा एक पंडित, ज्यास तें भाषण केव्हां संपेलसें झालें होतें, तो म्हणाला, " ती वेळ केव्हां येईल असें कां म्हणतां? जे ज्ञानी आहेत त्यांस ती आलेलीच आहे. आज जगांत दुःख असण्याची कांहीं गरज नाहीं. जे कोणी आज जगांत दुःख पावत असतील त्यांच्या त्या दुःखास त्यांचा मूर्खपणाच केवळ कारण आहे. दुसरें कांहीं कारण नाहीं. दयाळू सृष्टि-कर्त्यानें सुख हा पदार्थ सर्वांस प्राप्त होईसा करून ठेवला असतां तो कोणत्या रीतीनें प्राप्त होईल हें विचारणें किती वेडेपणाचें काम आहे बरें? सुख प्राप्त होण्यास मार्ग हाच कीं, सृष्टिकर्त्यानें जे नियम घालून दिले आहेत त्याप्रमाणें वागावें म्हणजे झालें. हे नियम सर्वत्र व सर्वदा सारखे आहेत. ते देशभेदानें किंवा

कालभेदानें भिन्न होत नाहींत. ते शिकावयाला नकोत. ते सर्वांचे अंतःकरणांत जन्मतःच उत्पन्न झाले आहेत. जो या नियमांप्रमाणें वागेल त्यास आशाभंगापासून किंवा इच्छा अतृप्त राहिल्यापासून कदापि दुःख होणें नाहीं. वस्तु प्राप्त झाल्या किंवा त्या जवळून गेल्या तरी त्याच्या मनाचें समाधान ढळत नाहीं. जसजशी वस्तुस्थिति पालटते त्याप्रमाणें तिच्या अनुरोधानें तो यत्न करतो किंवा उगीच बसतो. इतर लोक लांब लांब लक्षणें बांधून व मोठमोठ्या भ्रामक युक्ति काढून आपण मोठे विद्वान् झालों असें समजतील तर समजोत; परंतु वास्तविक शहाणपण प्राप्त होण्याचा मार्ग इतका कठिण नाहीं. तो सृष्टिकर्त्यानें फार सोपा करून ठेवला आहे. रानांतील हरणें व झाडावरचीं पांखरें यांजकडे पहा. हे प्राणी त्यांच्या मनास स्वाभाविक ज्या ज्या प्रेरणा होतात त्याप्रमाणें वागतात. त्यांच्या स्थितीचा विचार करा. ते त्या स्वाभाविक प्रेरणांच्या अनुरोधानें चालतात. तेणेंकरून ते सर्वदा सुखी असतात. तर तें पाहून आपण शुष्क वाद करावयाचें सोडून स्वाभाविक प्रेरणांस अनुसरून वागावयास शिकावें. असें वागावें, तसें वागावें म्हणून जे असंख्य पोकळ व कल्पित नियम शहाणपणाचे नसतां गर्व वाहणाऱ्या लोकांनीं करून ठेवले आहेत ते सर्व एकीकडे ठेवून मनुष्यानें हा एक सिद्धांत सर्वकाळ मनांत धरून त्याप्रमाणें वागावें. तो सिद्धांत हाच कीं, सृष्टिकर्त्याचा संकेत उल्लंघणें म्हणजे सुखास मुकणें होय."

इतकें भाषण करून तो पंडित मोठ्या डौलानें भोंवतालीं पाहूं लागला; व त्याच्या मुखचर्येवरून असें दिसलें कीं, आपण आज हा बोध करून लोकांचें मोठें कल्याण केलें असें त्यास वाटत होतें. राजपुत्र मोठ्या विनयानें त्यास म्हणाला, "महाराज इतर सर्व मनुष्यांप्रमाणें मलाही सुखप्राप्तीची मोठी इच्छा आहे, यास्तव मी एकाग्र चित्त करून आपलें सर्व भाषण ऐकिलें. आपणासारख्या विद्वान् पंडितानें इतक्या खात्रीनें सांगितलेला सिद्धांत खरा असेल याविषयीं मला संशय नाहीं. परंतु एकच प्रश्न पुसणें आहे तो हाच कीं सृष्टिकर्त्याच्या नियमांप्रमाणें किंवा स्वाभाविक प्रेरणांस अनुसरून वागावें म्हणजे काय ?"

पंडितानें उत्तर केलें, "तुम्हांसारख्या विनीत व भाविक मनुष्यानें प्रश्न केला असतां त्याच्या प्रश्नाचें समाधान करण्याविषयीं मी सर्वदा सिद्ध आहे. सृष्टिकर्त्याच्या नियमांप्रमाणें किंवा स्वाभाविक प्रेरणांस अनुसरून वागावें, म्हणजे कार्यें व कारणें यांचे गुण व त्यांचे परस्परसंबंध यांचा यथास्थित विचार करून

तदनुसार वागावें, सर्व प्राण्यांस सुख व्हावें म्हणून ही सृष्टिकर्त्यानें योजना केली आहे. तिशीं आपल्या कृत्यांचा मिलाफ असावा. सारांश, जी वस्तुस्थिति चालू असेल तिचा रोख पाहून तदनुकूल आपली वर्तणूक असावी."

हें उत्तर ऐकून राजपुत्राच्या मनांत तत्काळ आलें कीं, जितकें जितकें त्यांचें प्रतिपादन ऐकावें तितकी तितकी समजूत विशेष न होतां उलटें मन विशेष गोंधळांत पडतें; अशांतलाच हा एक पंडित आहे. यास्तव यास विशेष प्रश्न करून उपयोग नाहीं. मग आपलें भाषण ऐकिलें असें त्यास सुचविण्याकरितां मान हालवून तो उगाच राहिला. परंतु त्या पंडितास असें वाटलें कीं, राजपुत्रास आपलें मात्र भाषण मानवलें व बाकीच्या सर्व सभासदांचा पराजय झाला. नंतर तो उठून चालता झाला. जातां वेळच्या त्याच्या मुद्रेवरून असें दिसलें कीं, आपण आज विद्यमान वस्तुस्थितीचा रोख पाहून त्यास अनुकूल वागलों, असें त्यास वाटत होतें.

---

# भाग तेविसावा.

## लोकस्थिति पाहण्याचें काम राजपुत्र व त्याची बहीण यांनीं आपणां दोघांत वांटून घेतलें.

रासेलस चिंताग्रस्त होऊन घरीं आला. आतां पुढें काय करावें हें त्यास सुचेना. शोध करून पहातां त्याच्या दृष्टीस असें पडलें कीं, विद्वान् व अविद्वान् या दोघांसही सुखप्राप्तीचा मार्ग ठाऊक नाहीं. तथापि त्याचे वय थोडें होतें यामुळें त्यानें आपल्या मनास उमेद दिली कीं, कांहीं चिंता नाहीं; आणखी शोध करण्यास व अनुभव घेऊन पाहण्यास आपणास पुष्कळ वेळ अद्यापि आहे; व सुखप्राप्तीचा मार्ग कोठें तरी सांपडेलच सांपडेल. त्यानें आपले विचार व शंका इम्लाक यास कळविल्या; परंतु त्यानें त्या शंकांचें निवारण न करतां उलट्या आणखी शंकाच काढल्या. हें राजपुत्रास रुचलें नाहीं. त्यामुळें इतःपर पुढें आपल्या बहिणीशीं या बाबतींत विशेष बोलण्याचा परिपाठ घालून तो विशेष मोकळेपणानें

आपल्या अंतःकरणांतील गोष्टी तिला कळवूं लागला; कारण, वास्तविक सुख प्राप्त होण्याचा मार्ग सांपडण्याची उमेद याचेप्रमाणें तिलाही होती, व त्यामुळें आजपर्यंत केलेले यत्न जरी फसले तरी ते सफल होतील असें ती त्यास वारंवार उत्तेजन देत असे.

ती त्यास म्हणाली, "दादा, संसारांतला अनुभव म्हटला म्हणजे तो आपणांस अद्यापि फारच थोडा आहे. आपल्या हातून सूक्त किंवा असूक्त कृत्यें कांहींच घडलीं नाहींत. स्वदेशांत आपणापाशीं राजेपणा होता खरा, परंतु वास्तविक अम्मल आपल्या हातीं कधींच आला नाहीं; व या परदेशांत आल्यापासून लोकांचा बाहेरचा व्यापार आपण बराच पाहिला; तथापि ते आपल्या घरांत कसे वागतात याची आपणांस कांहींच माहिती नाहीं. ही माहिती आपणांस व्हावी अशी इम्लाकाची इच्छा दिसत नाहीं. मला असा संशय येतो कीं, या संसारांत वास्तविक सुख म्हणून कोठेंही नाहीं, असें इम्लाक पहिल्यापासून आपणांस सांगत आला आहे, तें त्याचें म्हणणें कदाचित् खोटें पडेल, या भीतीनें तो आपणांस वर सांगितलेली माहिती करून देण्यास अनुकूल होत नाहीं. तर आतां हें काम आपण आपणां दोघांत वांटून घेऊं. ऐश्वर्यवान् व अधिकारी लोक दरबारांत कसे वागतात तें तूं पहा; व साधारण लोक आपापल्या कुटुंबांत कसे वागतात याचा शोध मी करित्यें. पुष्कळ लोकांचें कल्याण करण्याचें सामर्थ्य ज्यांहीं करून येतें अशीं जीं ऐश्वर्य व सत्ता हींच कदाचित् अत्यंत सुख देणारीं असतील, किंवा संसारांत जें वास्तविक सुख आहे, तें जे लोक मध्यम स्थितींत वागतात व मोठें ऐश्वर्य नसल्यामुळें मोठीं अचाट कृत्यें करण्याचें ज्याचे मनांत येत नाहीं, व खाण्यापिण्याची ददात नसल्यामुळें दारिद्र्य व संकटें हींही ज्यांस ठाऊक नसतात, अशा लोकांत कदाचित् नांदत असेल. नाहीं कोणीं म्हणावें ! तर ही गोष्ट प्रत्यय घेऊनच ठरविली पाहिजे."

---

# भाग चोविसावा.

## मोठमोठे ऐश्वर्यवान् व अधिकारी ह्यांस सुख किती आहे, याविषयीं राजपुत्राचा शोध.

बहिणीचा हा विचार राजपुत्रास फारच आवडून त्यानें तिला मोठी शाबासकी

दिली. नंतर दुसऱ्या दिवशीं मोठी स्वारी तयार करून त्या प्रांतांत तुर्कदेशच्या बादशाहाचा ठेवणाईत जो मुख्य सुभेदार होता, त्याच्या दरबारांत तो भेटीकरितां गेला. त्याचें ऐश्वर्य व इतमाम पाहून त्या दरबारांत त्याचा मोठा सन्मान झाला. हा कोणी थोर राजाचा मुलगा परमुलूख पाहावयास फिरत आहे, असें समजून त्या दरबारच्या मोठमोठ्या अमीरउमरावांनीं त्याशीं पुष्कळ स्नेह केला, व व स्वतः मुख्य सुभेदारांशींही त्याचें कितीएक वेळ संभाषण झालें.

पहिल्यापहिल्यानें त्यास असें वाटूं लागलें होतें कीं, सर्व ज्यास एवढा मान देतात, ज्याच्या तोंडचा शब्द झेलतात, व ज्याचे हुकूम सगळ्या प्रांतांत चालतात, त्या पुरुषाच्या स्थितींत खचित मोठें सुख असलें पाहिजे. तो आपल्या मनाशीं म्हणाला, "चातुर्यानें व शहाणपणानें देशाचा बंदोबस्त ठेवून हजारों लोकांस सुखी करण्यासारखा दुसरा कोणता मोठा आनंद असेल? कोणताही असणें नाहीं. परंतु हा थोर आनंद प्राप्त होण्यास सर्वांवर सत्ता हवी, व ती एकापेक्षां अधिकांच्या हातीं संभवत नाहीं; यास्तव हा आनंदही सर्व देशांत एकासच व्हावयाचा. यावरून असें मानणें प्राप्त पडतें कीं, या वरच्या सुखांपेक्षां निराळें व पुष्कळांस प्राप्त होण्यासारखें कांहीं सुख असलें पाहिजे; कारण, तें असल्यावांचून एकाच मनुष्यास सुख व्हावें म्हणून लक्षावधि मनुष्यें त्यांच्या अमलांत कधीं वागावयाचीं नाहींत."

या कल्पना वारंवार त्याच्या मनांत असत; परंतु त्यांत तथ्यांश किती आहे हें कळेना. पुढें दरबारांतल्या लोकांस नजरनजराणा त्यानें पुष्कळ वांटला; व त्यामुळें त्यांशीं विशेष संघट्टन जेव्हां झालें, तेव्हां लौकरच त्याच्या दृष्टीस आलें कीं मोठाल्या हुद्यावरचा प्रत्येक अंमलदार इतर सर्वांचा द्वेष करतो व इतर सर्व त्याचा द्वेष करतात. तसेंच दुसऱ्यास बुडविण्याकरितां गुप्त मसलती करणें व आपल्या नाशाच्या मसलती होत असतील त्या पकडणें, दुसऱ्यास पेंचांत पाडणें व दुसऱ्याच्या पेंचांतून सुटणें, फळ्या करणें, दंगा करणें, या व्यापारांत लोक रात्रंदिवस निमग्न असत. मुख्य सुभेदाराजवळ जे लोक असत, ते तो काय करितो याची बातमी ठेवून ती कळविण्याकरितां बादशाहानें गुप्त पणें पाठविलेले असत. सर्व मागें त्याची निंदा करीत व तो कोठें चुकेल आणि कोठें त्यास पकडूं म्हणून सदासर्वदा डोळ्यांत तेल घालून जपणीस बसलेले असत.

शेवटीं एके दिवशीं बादशाहाची पहिले सुभेदारावर गैरमर्जी होऊन त्यानें नवा सुभेदार पाठविला. त्या अधिकाऱ्यानें पहिले सुभेदारास कैद करून व त्याच्या पायांत बेड्या घालून त्यास कुस्तुंतुनियेंत बादशाहाकडे पाठवून दिलें; त्यापुढें त्याचें तिकडे काय झालें हें कोणास कांहीं कळलें नाहीं !

ही सर्व हकीकत बहिणीस सांगून राजपुत्र म्हणाला, " आतां सुभेदाराच्या गोष्टीवरून मोठी सत्ता व अधिकार हातीं असणें हें काय चांगलें म्हणावें, कीं वाईट म्हणावें ? सत्तेपासून मनुष्याचें खरें कल्याण होत नाहीं; किंवा हाताखालच्या अमलांत मात्र भय आहे, पण तो स्वतंत्र असला म्हणजे त्यांत कांहीं भय नाहीं व तो सुखास कारण होतो, असें तर नसेलना ? तुर्कस्थानच्या बादशाहाच्या एवढ्या विस्तीर्ण राज्यांत बादशाहाच काय तो एकटा वास्तविक सुखी पुरुष असावा काय ? किंवा आपले गुप्त शत्रु कोणत्या वेळीं आपला घात करतील ह्या घोर रात्रंदिवस त्याच्याही जिवास असेल काय कोण जाणे ! "

पुढें लौकरच नवा नेमलेला दुसरा सुभेदार पदच्युत झाला; कुस्तुंतुनियेहून असें वर्तमान आलें कीं, ज्या बादशाहानें त्या सुभेदारास एवढ्या मोठ्या हुद्यावर चढविलें होतें त्या बादशाहास लष्करी लोकांत फिसाद होऊन त्यांनीं ठार मारिलें व नवा बादशाहा गादीवर बसला. त्याचे हेतु व कृपेंतील मंडळी वगैरे सर्व निराळीं असल्यामुळें पहिलें सर्वच चक्र फिरलें !

---

## भाग पंचविसावा.

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

### राजकन्येनें जो शोध करण्याचें पतकरलें होतें त्य तो शोध तिनें श्रम घेऊन केला, परंतु त्यांत इष्ट पदार्थ ( सुखाचा मार्ग ) सांपडला नाहीं.

मागल्या भागांत वर्णिलेल्या कृत्यांत राजपुत्र गुंतला असतां इकडे राजकन्येनेंही पुष्कळ कुटुंबाशीं ओळख पाडली. कारण, मनुष्य बोलूनचालून गोड व हाताचें सढळ असलें म्हणजे त्याचा प्रवेश ज्यांत होत नाहीं अशीं घरें फारच थोडीं.

पुष्कळ कुटुंबांत हंसून खेळून चांगल्या व आनंदवृत्तीच्या तरुण मुली तीस आढळल्या परंतु राजकन्या निकाया हांस इम्लाक कवि व तिचा भाऊ रासेलस यांचें गंभीर संभाषण ऐकण्याची संवय लागली होती, त्यामुळें त्या पोरींच्या पोरकट व अप्रौढ गोष्टी तिला रुचेनात. तिनें पाहिलें तों त्यांच्या बुद्धींत पोंच कमी, त्यांच्या इच्छेचे विषय हलकट व त्या हंसतखेळत त्यांत वास्तविक खुबी किंवा चातुर्य हीं कांहींच नसत. त्यांचीं सुखें असलीं क्षुल्लक असून तीं सारीं शुद्ध असावीं, पण तेंही नव्हतें. एकमेकींच्या अप्रयोजक गोष्टींविषयीं हेवा व दावा यांचें त्या सुखास विरजण असे. देखणेपणाविषयीं त्या नेहमीं एकमेकींचा हेवा करीत. हा तर त्यांचा मूर्खपणा होता; कारण, हा गुण अंगीं कमी असल्यास खेद केल्यानें तो वाढतो किंवा पुष्कळ असल्यास लोकांनीं निंदा केल्यानें कमी होतो असा अर्थ नाहीं.*त्यापैकीं कितीएकांचें मन त्यांच्यासारख्याच पोरकट समजुतीच्या तरुण पुरुषांवर जडलें असे. तसेंच कितीएकजणी त्यांच्या मनाची उगीचच लहर लागून एकादा पुरुष चार दिवस बरासा वाटला म्हणजे त्यावर आपली प्रीत जडली असें मानीत;परंतु खरोखर पाहिलें असतां खरी प्रीत म्हणून जो पदार्थ आहे त्याचा लेशही त्यांस ठाऊक नसे. पुरुष सुशील व शहाणा पाहून त्यावर प्रीत ठेवावी, असा प्रकार त्या कांहींच जाणत नसत; त्यामुळें त्यांच्या प्रीतीचा शेवट बहुतकरून दुःखदायक होई. पण हर्षाप्रमाणें खेदही त्यांच्या मनांत फार वेळ रहात नसे. त्यांचें मन फार चंचळ असल्यामुळें कोणतीही गोष्ट त्यांच्या मनांत फार वेळ टिकत नसे. पाण्यांत खडा टाकावा म्हणजे चक्राकार लाटा होतात व तितक्यांत दुसरा खडा टाकला असतां दुसऱ्या लाटा उत्पन्न होऊन त्या पहिल्या लाटांस विसकळतात किंवा नाहींशा करतात. तसेंच त्यांनीं आज एक विषय पाहिला म्हणजे त्याविषयीं त्यांचें मन आज अगदीं मोहून जावें, इतक्यांत उद्यां दुसरा विषय सहज दृष्टीस पडला म्हणजे त्याचाच नाद लागून पहिल्याचा छंद अगदींच विसरून जावा.

एकाद्या गरीब जनावराबरोबर जसें खेळावें तसें निकाया या अज्ञान पोरींबरोबर खेळे. ती त्यांपेक्षां फारच प्रौढ असल्यामुळें तिचा स्नेह असल्यानें त्यांस प्रतिष्ठा

---

* युरोपखंडांत व इतर दुसऱ्या पुष्कळ मुलुखांत प्रौढ वयांत लग्नें होतात व ज्या स्त्रीपुरुषांचीं मनें जमतात त्यांचें बहुतकरून लग्न होतें, अशी रीत आहे. त्या रीतीस अनुसरून हें वर्णन आहे.

वाटे खरी, परंतु तिच्या संगतीनें त्यांस सुख होत नसे; हें राजकन्येच्या लौकरच लक्षांत आलें. तथापि तिनें त्यांचा स्नेह सोडला नाहीं. कारण त्यांच्या मनाची वास्तविक काय स्थिति आहे हें तिला समजून घेणें होतें. राजकन्या मोठी चतुर व मनमिळाऊ होती. तिनें सहज त्यांच्या पोटांत शिरून त्यांचें सर्व हितगुज काढून घेतलें. ज्या दुःखानें मनांत झुरत त्या आपलीं सर्व दुःखें हिजपाशीं सांगत; व आपले मनोरथ सिद्धीस जाऊन आपण लौकरच सुखी होऊं, असें ज्यांस वाटे त्याही प्रेमांत येऊन आपला भावी आनंद सर्व हिजपाशीं प्रकट करीत.

उन्हाळ्यांत बसण्याकरितां नील नदीच्या कांठीं बागेंत निवांत ठिकाणीं एक बंगला असे. त्या बंगल्यांत राजपुत्र व त्याची बहीण हीं संध्याकाळीं बहुतकरून हवा खात, व संभाषण करीत बसत. त्याप्रमाणें तीं एक दिवस बोलत बसलीं असतां राजकन्येची दृष्टि नदीच्या प्रवाहाकडे जाऊन ती तीस म्हणतेः— " हे नदी, तुझी पुष्कळ मुलखांत गति आहे. तुझ्या तीरीं ऐशीं प्रकारचे निरनिराळे लोक राहतात, तर तूं ज्या राजाच्या मुलखांत जन्म पावली आहेस, त्या राजाची कन्या तुला एक प्रश्न विचारते, त्याचें कृपा करून उत्तर दे;—कीं ज्यांत अगदीं दुःख म्हणून नाहीं असें एक तरी घर तुझ्या पाहण्यांत आलें आहे काय ?"

हें तिचें भाषण ऐकून रासेलस म्हणाला, " ताई, यावरून स्पष्ट दिसतें कीं, दरबारी लोकांत जसें सुख नाहीं तसें तें सुखवस्तुपणें राहण्यांतही नाहीं. "

राजकन्येनें उत्तर केलें, ' दादा, कितीएक दिवसांपूर्वीं तूं आणि मी सौख्य शोधण्याचें काम आपणांत वांटून घेतलें होतें. त्या आपल्या संकेताप्रमाणें मीं कितीएक कुटुंबांशीं ओळख पाडली. जीं घराणीं अत्यंत सुखी आहेत व ज्यांत त्रासाचा लवलेश नाहीं अशीं वाटत होतीं त्यांशीं आधीं स्नेह केला; पण खरेंच सांगतें कीं, ज्यांत धुसपुस नाहीं व तंट्या नाहीं असें एकसुद्धां घर मला सांपडलें नाहीं. सर्वत्र कांहींना कांहींतरी त्रास व दुःख हीं आहेतच.

" मला असें वाटलें होतें कीं, गरीब लोकांत स्वस्थता सांपडणें नाहीं, व त्यामुळें त्या लोकांत त्या वस्तूचा मीं शोध केला नाहीं. परंतु जे लोक खाऊनपिऊन सुखी दिसत होते त्या लोकांतही खरोखर पहातां दारिद्र्य माझ्या दृष्टीस पडलें. या कैरोसारख्या मोठमोठ्या शहरांत दारिद्र्य निरनिराळ्या रूपानें दृष्टीस पडतें. मनुष्य दरिद्री असतां तो बाहेरून मोठा डामडौल करून कधीं कधीं

आपले दारिद्र्य झांकतो, व कधीं कधीं उधळेपणा करतो. प्रत्येक मनुष्य आपलें दारिद्र्य दुसऱ्यांच्या दृष्टोत्पत्तीस न यावें म्हणून फार झटत असतो. हें घेतलेलें श्रीमंतीचें सोंग शोभण्याकरितां लोक नानाप्रकारचे उपाय लढवीत असतात, व आजचा दिवस मारून नेला, आतां उद्यां काय तजवीज करावी, या योजनेंत त्यांचें सर्व आयुष्य खर्चतें.

" आतां हें दारिद्र्यदुःख पुष्कळ ठिकाणीं आढळलें, परंतु तें पाहून मला फारसें वाईट वाटलें नाहीं; कारण त्याचें निवारण करण्याचें सामर्थ्य माझ्या आंगीं होतें. परंतु मी द्रव्य देऊं लागलें असतां तें कितीएकांनीं घेतलें नाहीं. मीं त्यांस ददात आहे असें ताडलें, यावरून जसा त्यांस माझा राग आला, त्याप्रमाणें मी त्यांस ती ददात घालविण्याकरितां संतोषानें पैसा देऊं लागल्यें त्याचा संतोष वाटला नाहीं. ज्या कितीएकांस फारच अडचण होती त्यांनीं मीं दिलेला पैसा तर घेतला; पण माझ्या हातून त्यांवर उपकार झाला, ह्या गोष्टीची त्यांस नेहमींची तळमळ झाली. आतां कितीएक असेही लोक आढळले, कीं मी त्यांच्या उपयोगीं पडल्याचा त्यांस खरोखर आनंद वाटला; व पुनः स्वार्थ करून घेण्याची आशा न बाळगतां, व तोंडावर माझी कांहींएक स्तुति न करितां माझें ते सतत बरें इच्छित असतीलसें मला वाटतें."

---

# भाग सव्विसावा.

## घरभारी होऊन आयुष्य क्रमण्यावर राजकन्येचे विचार.

राजकन्या निकाया हिनें आपल्या भाषणाकडे आपल्या भावाचें मन वेधलेसें पाहून पुढें भाषण चालविलें. ती म्हणाली, " कुटुंबें सधन असोत किंवा दरिद्री असोत, कशींही तीं असलीं तरी त्यांत बहुतकरून वैमनस्य व धुसपुस हीं असतातच. इम्लाक म्हणतो कीं, ' राज्य हें एक मोठें कुटुंबच होय ' आणि त्याप्रमाणें रूपक उलटून कुटुंब हें लहानसें राज्यच होय, असें म्हटल्यास चिंता नाहीं. लहान राज्यांत ( कुटुंबांत ) बहुतकरून नेहमीं तंटे व अधिकारक्रांति असतात. वर्तनस्थितींचें ज्यास अनुभवशीर ज्ञान नाहीं, त्यास असें खचित वाटेल कीं,

कुटुंबांत आईबाप व मुलें यांमध्यें परस्परांविषयीं सतत सारखें प्रेम असेल; परंतु वास्तविक पहातां, मुलें अगदीं अल्पवयी असतात तोंपर्यंत मात्र वर सांगितलेला प्रकार असतो खरा; परंतु मुलें मोठीं झालीं म्हणजे तीं आईबापांशीं बरोबरी व स्पर्धा करूं लागतात. तीं जरी एकमेकांच्या उपयोगीं पडतात तरी परस्परांस नांवें ठेवूं लागतात, व हेवा उत्पन्न होऊन त्यांमधील प्रेमभाव बिघडतो.

" आईबापें व मुलें प्रायः एकोप्यानें वागत नाहींत. आईबापांची सर्व माया आपणा एकट्यावर बसावी याविषयीं प्रत्येक मूल झटत असतें. असें करण्यास मुलांना कांहीं तरी कारण संभवतें. तें कारण योग्य किंवा अयोग्य हा विचार वेगळा! परंतु आईबापांस कांहीं कारण नसतां तीं मुलांची विशेष माया जडण्याकरितां त्यांच्या नजरेस आपलीं परस्परांचीं उणीं आणतात. यामुळें कांहीं मुलांचा भरंवसा बापावर अधिक असतो व कांहींचा आईवर अधिक असतो; आणि तेणेंकरून कुटुंबांत कपटें व तंटे यांचा प्रवेश होतो.

" आईबापें व मुलें, म्हणजे कुटुंबांतील वृद्ध मनुष्यें व तरुण मनुष्यें, यांच्या समजुतींत स्वभावतःच मोठी तफावत असते. कारण मुलांच्या आंगांत तारुण्याची धमक असल्यामुळें जगांतील वास्तविक स्थितीच्या अज्ञानामुळें त्यांच्या उमेदीची धांव पुढें असते. व पुष्कळ गोष्टी त्यांस घडण्यासारख्या दिसतात. वृद्ध मनुष्यांचा बहुत वेळ आशाभंग झालेला असतो, व त्यांस जगाचा वास्तविक अनुभव असतो. यामुळें त्यांची उमेद खचलेली असते. याप्रमाणें त्या दोघांच्या समजुतींत भेद असला तरी कोणाकडेही मूर्खत्व किंवा दोष नाहीं. वसंतकाळीं सुंदर व नाजूक पालवीनें आणि चित्रविचित्र व मनोहर रंगाच्या फुलांनीं सुशोभित असें वन एकानें पाहिलें; व दुसऱ्यानें तेंच वन कडक उन्हाळ्याच्या शेवटीं त्यांतील झाडांचीं सर्व पानें वगैरे झडून जाऊन खराटे झाले आहेत, व जिकडे तिकडे रखरखीत दिसत आहे अशा स्थितींत पाहिलें; तर त्या दोघांच्या वनाविषयींच्या समजुतींत जसा भेद पडेल, तसाच तरुण मनुष्यांच्या व वृद्ध मनुष्यांच्या संसारसुखा-विषयींच्या मतांत भेद पडणारा आहे. वृद्ध मनुष्यांचीं जीं भाषणें तरुण मनुष्यांच्या अनुभवास अगदीं विसंगत दिसतात, तीं त्यांनीं खरीं कशीं मानावीं?"

" तसेंच तरुण मनुष्यांस जो उपदेश तीं तोंडानें करितात, त्याप्रमाणें वागणारीं वृद्ध मनुष्यें फारच थोडीं निघतील. आपलें इष्टकार्य सिद्ध करून घेण्याचेही प्रकार

वृद्ध मनुष्यांचे व तरुण मनुष्यांचे अगदीं निराळे असतात. वृद्ध मनुष्यास जें कार्य कर्तव्य असतें तें तो हळूहळू तजविजीनें व युक्तीनें सिद्धीस नेण्यास झटतो. तरुण मनुष्यास वाटतें कीं, मी आपलें कार्य आपल्या अकलेच्या व पराक्रमाच्या जोरावर घडवून सिद्ध करीन. वृद्ध मनुष्य धनवंताचा बोज ठेवून त्यास नमून असतो. तरुण मनुष्यास वाटतें कीं, केवळ श्रीमंत असण्यांत काय थोरवी आहे? जो बुद्धिमान् व पराक्रमी तोच मात्र मोठा. वृद्ध मनुष्याच्या मतें लौकिकांतील चाणाक्षपणा व धूर्तता हे गुण अतिश्रेष्ठ होत. तरुण मनुष्य मनाचा मोकळेपणा, उदारता व निर्भय, धाडस हे गुण अत्यंत चाहातो. जो तरुण मनुष्य दुसऱ्याचें वाईट चिंतीत नाहीं त्यास असें वाटतें कीं, आपलेंही दुसरा कोणी वाईट चिंतीत नाहीं, व त्या समजुतीनें तो सर्वांशीं मोकळ्या मनानें व विश्वासानें वागतो; परंतु वृद्ध मनुष्यास जगांतील दुष्टाव्यापासून व कपटापासून ठेंचा लागलेल्या असतात. यामुळें त्याचा स्वभाव वहिमखोर झालेला असतो, व त्याचा विश्वास लौकर कोणावर बसत नाहीं. तसेंच ज्या लुच्चेगिऱ्यांपासून त्यास इजा झाली असते त्या लुच्चेगिऱ्या करण्याविषयीं तो स्वतःही कधीं कधीं प्रवृत्त होतो. तरुण मनुष्याचें हूडपणाचें आचरण पाहून वृद्ध मनुष्यास राग येतो, आणि वृद्ध मनुष्याचा वहिमी स्वभाव व भ्याडपणाचें वर्तन पाहून तरुण त्याचा तिरस्कार करतात. याप्रमाणें त्यांच्या समजुतींत स्वाभाविक विरोध असल्यामुळें आईबाप व मुलें यांच्या मधली प्रीति उत्तरोत्तर कमी कमी होत जाते. आणि स्वभावतः ज्यांचा इतका निकट संबंध तीं जर एकमेकांच्या दुःखास व त्रासास कारण होतात, तर परस्पर प्रेम व समाधान हीं या जगांत दुसऱ्या कोणत्या ठिकाणीं मिळण्याची आपण आशा करावी?"

वहिणीचें हें भाषण ऐकून राजपुत्र म्हणतो, "ताई, मला खचित वाटतें कीं, कोणी एकादें दुर्दैवी कुटुंब तुझ्या नजरेस पडलें असावें व त्याच्या स्थितीच्या अवलोकनावरून घरभारीपणाच्या स्थितीविषयीं हा प्रतिकूल व भ्रांतिरूप ग्रह तुझ्या मनांत उत्पन्न झाला असावा. अत्यंत मायेचा व प्रीतीचा ज्यांचा संबंध अशीं जीं मनुष्यें—म्हणजे आईबाप व मुलें—त्यांच्यामध्यें वैमनस्य पडण्याचीं अनिवार्य स्वाभाविक कारणें असावीं ही कल्पना माझें मन अगदीं घेत नाहीं."

राजकन्या उत्तर करिते, "वैमनस्य म्हणजे अनिवार्य आहे आणि सर्वकाळ व सर्व ठिकाणीं तें उत्पन्न होतेंच असें माझें म्हणणें नाहीं. परंतु तें वैमनस्य उत्पन्न होऊं न देणें फार कठिण आहे. कुटुंबांतील सर्वही मनुष्यें सुशील आहेत असें

फारच क्वचित् आढळतें. सुशील व दुर्वृत्त यांचें तर कधीं पटावयाचें नाहीं; आणि दुर्वृत्तदुर्वृत्त यांचें पटण्याचा संभव तर त्याहीपेक्षां कमी. जीं मनुष्यें सुशील असतात, त्यांचे सद्गुण भिन्न प्रकारचे व अतिशयाकडे प्रवृत्त होणारे असल्यास त्यांचेंसुद्धां नीट जमत नाहीं. साधारण रीतीनें पाहतां असें आढळतें कीं, जीं मातापितरें खरोखरी सन्मानास योग्य असतात त्यांचा मुलें सन्मान ठेवतात; कारण ज्याचें आचरण उत्तम असतें तो लोकांत कधींही अपमान पावत नाहीं, असा सामान्य नियम आहे."

"घरभारीपणांत आणखी कितीएक दुःखें व त्रास आहेत. कितीएकांचीं गृहच्छिद्रें त्यांच्या चाकरमाणसांस कळलीं असतात, त्यामुळें त्या चाकरमाणसांचे चाकर होऊन त्यांस रहावें लागतें. कितीएक लोकांचे नातलग श्रीमंत असतात व त्यांपासून हे द्रव्यप्राप्तीची आशा करीत असतात, परंतु हे नातलग हेकडखोर व छांदिष्ट असल्यामुळें त्यांची मनधरणी त्यांस करितां येत नाहीं; व उघडपणें त्यांस दुखवितांही येत नाहीं; त्यामुळें हे नेहमीं मोठ्या काळजींत असतात. कांहीं कुटुंबांत नवरे तामसी व द्वाष्ट असतात, व कोठें बायका कृत्या व करनकन्या असतात आणि दुःख देण्यापेक्षां त्रास देणें सोपें आहे: यास्तव एकाच्या शहाणपणापासून व सद्वर्तनापासून पुष्कळांस जरी सुख होत नाहीं तरी दुसऱ्याच्या मूर्खपणानें किंवा दुराचरणानें पुष्कळांस पीडा मात्र खचित होते."

राजपुत्र म्हणाला, "लग्न केल्याचे जर असे परिणाम आहेत तर दुसऱ्या मनुष्याशीं जन्माचा संबंध करून त्याच्या हातीं आपलें सुखदुःख देण्यास मला फारच भय वाटतें; न जाणों खराब बायकोशीं गांठ पडल्यास जन्माची पीडा चिकटून घेतल्यासारखें होणार."

राजकन्येनें उत्तर केलें, "याच धाकानें लग्न न करतां एकटीं फटिंग राहणारीं कितीएक मनुष्यें माझ्या पाहण्यांत आलीं आहेत, परंतु त्यांच्या शहाणपणानें त्यांस मोठें सुख प्राप्त झालें असें मला अगदीं वाटत नाहीं. तसल्या लोकांस कोणी मित्र किंवा मायेचें माणूस नसल्यामुळें त्यांस सर्व वेळ उदासपणांत घालवावा लागतो; व कांहींतरी पोरकट करमणूक काढून किंवा दुराचरणाच्या नादांत शिरून तीं आपल्या आयुष्याचे कंटाळवाणे दिवस कंठितात; आपण कमी सुखी आहों ही समजूत त्यांच्या जिवास नेहमीं खाते; व त्यामुळें ते मनांत जळतात व लोकांस नांवें ठेवितात. ते घरांत नेहमीं त्रासलेले असतात, व चौघांत गेले

असतां लोकांचीं छिद्रें शोधितात. संसारसुखबहिष्कृत हे लोक ज्या संसारसुखास मुकले असतात, तें सुख दुसऱ्यास प्राप्त होतांना त्यांस पाहावत नाहीं. त्यांत बिघाड पाडण्यांत त्यांस मोठा संतोष वाटतो, व तसें करण्याविषयीं ते नेहमीं झटतात. ज्यास दुसऱ्याची कळकळ नाहीं, व ज्याविषयीं दुसऱ्या कोणासही कळकळ नाहीं, किंवा ज्याचा उत्कर्ष झाला असतां दुसऱ्यास हर्ष होत नाहीं किंवा ज्यास विपत्ति आली असतां कोणीही हळहळत नाहीं, तसल्या मनुष्याचें जिणें फारच दुःखाचें होय. अशा प्रकारें जो आयुष्य घालवितो तो एकांतवास करतो असें म्हणण्यापेक्षां मनुष्यजातीनें त्यास बहिष्कृत केलें आहे असें म्हणणें विशेष शोभतें. लग्न केल्यापासून पुष्कळ पिडा आहेत खऱ्या; परंतु सुखेंही पुष्कळ आहेत. परंतु तें न करतां फटिंग राहण्यांत सुख मुळींच नाहीं; काय तें दुःखच वांट्यास यावयाचें."

रासेलस म्हणाला, "तर मग करावें तरी काय ? जिकडे पहावें तिकडे अडचणीच दिसतात. जितका अधिक विचार करावा तितका बुद्धीस अधिकच भ्रम व संशय होतो !"

---

# भाग सत्താविसावा.

## थोर अधिकाराविषयीं.

कांहीं वेळ संभाषण खळलें होतें. मग आपल्या बहिणीच्या भाषणाविषयीं स्वस्थपणें विचार करून राजपुत्र म्हणतो, "ताई, मला वाटतें कीं, घरभारीपणाच्या व एकटें राहण्याच्या स्थितीचें त्वां अवलोकन केलें खरें; परंतु त्याविषयीं प्रतिकूल ग्रह मनांत धरून अवलोकन केलें; तेणेंकरून नसतीं दुःखें व वाईटपणा हीं त्या स्थितींत तुला भासलीं असावीं यांत संशय नाहीं. इम्लाक कवीनें त्या स्थितींतल्या दोषांचें वर्णन केलें होतें; परंतु तूं त्या स्थितींत जे दोष वर्णितेस त्यापुढें ते त्यानें सांगितलेले दोष कांहींच नाहींतसे वाटतात. असो. पण मोठे तालेवारीचे लोक व मोठा अधिकारी यांस वास्तविक सुख प्राप्त झालें काय, याचा शोध करून पाहावयाचें काम मीं पतकरिलें होतें त्या शोधाअंतीं मला काय समजलें तें तुला कळवितों. ऐक. मीं जें पाहिलें त्यावरून माझी खात्री झाली कीं,

खरें समाधान, मोठें वैभव किंवा मोठा अधिकार यांच्या योगानें प्राप्त होणें नाहीं. तें पैसा देऊन विकत घेतां येत नाहीं; किंवा अधिकाराच्या जोरानें त्यास वश करतां येत नाहीं. ज्याचें वैभव व अधिकार मोठा त्यांच्या कृत्यांचा पसाराही मोठाच असतो; व पसारा मोठा असला म्हणजे त्यास शत्रूही फार होतात, व त्याचे यत्न फसण्याचा संभवही अधिक होतो. ज्यास पुष्कळ लोक खुष राखावयाचे असतात, किंवा पुष्कळांवर ज्यास अंमल करावयाचा असतो, त्यास तें सर्व काम स्वतः आवरत नाहीं; यामुळें त्यास कितीएक हस्तक किंवा मदतनीस बाळगावे लागतात. त्यांपैकीं कितीएक कपटी व दुष्ट असतात आणि कितीएक मूर्ख किंवा अज्ञान असतात. मूर्ख व अज्ञान आपल्या मसलतींनें त्यास भलत्या वाटेस लावतात, आणि कपटी व दुष्ट त्याचा विश्वासघात करतात. तसेंच त्यानें एकाचें मनोधारण केलें असतां दुसऱ्याचें मन दुखवल्यावांचून रहात नाहीं. ज्यांचा त्याच्या हातून नफा नाहीं ते त्यानें आपला तोटा केला असें समजून त्याचा द्वेष करूं लागतात. मनुष्याच्या हातीं केवढाही मोठा अधिकार असला तरी त्यांच्या हातून सर्वांवर उपकार होणें अशक्य आहे व ज्यांवर उपकार होत नाहीं ते त्यावर रुष्ट होतात. व या रुष्ट होणारांची संख्या सर्वकाळ फार मोठी असते."

राजकन्या म्हणाली, " योग्य कारण नसतां उगीचच्या उगीच रागावणाऱ्या मूर्ख लोकांच्या रागास मी कधींही जुमानणार नाहीं, व त्यांनीं गडबड केल्यास त्यांचें मला सर्वकाळ योग्य शासन करतां येईल असें मला वाटतें. कारण खऱ्याचा पक्ष सर्वकाळ सबळ असतो असें मी समजत्यें. "

राजपुत्रानें उत्तर केलें, "जे लोक वर सांगितलेल्या प्रकारें रागावतात त्या सर्वांच्याच रागास योग्य कारण नसतें असें म्हणतां येत नाहीं. अधिकारी कितीही हुषार, सावध व दक्ष असला, व तो कितीही रास्तपणानें अधिकार बजावीत असला तरी कांहीं लोकांस त्याच्या कृत्यापासून राग येण्यास योग्य कारण राहीलच राहील. कधीं कधीं योग्य व लायक मनुष्यें दरिद्री असल्यामुळें किंवा विरुद्ध पक्षांत असल्यामुळें त्यांची योग्यता मोठी असूनही ती अधिकाऱ्यांच्या लक्षांत येत नाहीं. तसेंच अधिकाऱ्यांच्या हातीं कितीही सत्ता असली तरी सर्व योग्य मनुष्यास त्यांच्या त्यांच्या योग्यतेनुरूप फळ प्राप्त करून देण्याचें सामर्थ्य त्यांस असत नाहीं. तेव्हां एकादा कमी योग्यतेचा मनुष्य वरच्या पदवीस चढविला असतां ज्यापेक्षां तो कमी असतो त्यास असें खचित वाटतें कीं, अधि-

काऱ्याच्या पक्षपातानें किंवा मेहेरबानीनें त्या कमी योग्यतेच्या मनुष्याची बढती झाली. शिवाय अधिकारी कितीही थोर मनाचा, निःपक्षपाती व गुणांचा परीक्षक व चाहाणारा असला, तरी ज्या जागा वगैरे देण्याचें त्याच्या हातीं असतें त्या देण्यास सर्वकाळ निश्चित व एक नियमानें चालून ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणेंच पूर्ण न्यायानें त्या जागा वगैरे त्याच्या हातून वांटल्या जातील, ही गोष्ट असंभाव्य आहे. त्या देतांना कधीं कधीं मित्रत्वानें व लोभानें त्याचें मन वळेल; कधीं कधीं तो आपल्या मित्रांच्या शिफारशी ऐकेल; ज्यापासून त्यास कधींही उपयोग व्हावयाचा संभव नाहीं त्यावरही कधीं कधीं दुसऱ्यानें सांगितल्यावरून तो मेहेरबानी करील; त्याचा ज्यांवर लोभ असेल त्याचे ठायीं नसते गुण व योग्यता कधीं कधीं तो कल्पील; तसेंच पूर्वी जे त्याच्या उपयोगीं पडले असतील ते त्या विशेष हुद्यास फारसे लायक नसले तरीही त्यांचे उपकार स्मरून त्यांस तो ते देईल. याप्रमाणें कधीं कधीं लांच देऊन अगर खुशामत करून मिळविलेल्या शिफारशीवर भरंवसा पटून अयोग्य मनुष्यांस मोठमोठ्या पदव्या मिळून त्यांहून योग्य मनुष्यें तशींच रडत मागें पडतील."

ज्यास पुष्कळ करावें लागतें, त्याच्या हातून कांहीं तरी चुकी होतेच व या चुकीचा परिणाम त्यास भोगावा लागतो. आतां त्याच्या हातून चुकी होत नाहीं, सर्व काम तो वाजवी करितो असें कल्पिलें, तरी त्याच्या कृत्यांत वाजवी किंवा गैरवाजवी म्हणणारे लोक असतात. त्यांत दुर्जन असतात ते लुच्चेगिरीनें त्यावर खोटे दोष ठेवतात व त्याचा द्वेष करतात; आणि सज्जनही गैरसमजुतीनें कधीं कधीं त्यास नांवें ठेवतात.

"यावरून हें उघड होतें कीं, अत्यंत उंच ज्या पदव्या आहेत त्या खऱ्या सुखाचीं स्थानें नव्हत. खरें सुख राजमंदिरें व सिंहासनें यांच्या वाऱ्यालाही उभें रहात नाहीं. तें कोठें वास करीत असल्यास अल्पसंतोषी गरिबांच्या झोंपड्यांत वसत असेल, असें मी समजतों. कां कीं, जो आपल्या शक्तीच्या बाहेर उपद्व्याप करीत नाहीं, ज्यास आपल्या सर्व कृत्यांची देखरेख स्वतः करतां येते, व ज्यावर विश्वास ठेवावयाचा तीं सर्व मनुष्यें जो स्वतःच्या माहितीनें पारखून ठेवतो व ज्यास फसवल्यापासून कोणास नफानुकसान नसतें, असल्या मनुष्यास सर्वकाळ समाधान कां नसेल? त्याचा आशाभंग कशानें होणार आहे? असल्या मनुष्यास कोणतीही पीडा होण्याचा संभव दिसत नाहीं. त्यानें सर्वदा सत्कृत्यांत काळ

घालवावा, दुसऱ्यांवर प्रीति करावी व त्यांची प्रीति करून घ्यावी, आणि अखंड समाधानवृत्तींत असावें."

राजकन्या बोलली, "पूर्ण सदाचरणानें वागलें म्हणजे पूर्ण समाधान खचित प्राप्त होईल, या गोष्टीचा निर्णय या जगांत होण्याचा संभव नाहीं. तथापि इतकें म्हणण्यास चिंता दिसत नाहीं कीं, मनुष्याचें जें सदाचरण दृष्टीस पडतें त्याच्या मानानें त्यास सुख होतांना आढळत नाहीं. सर्व आधिभौतिक दुःखें व बहुतेक सर्व राजकीय संकटें हीं सज्जनांस व दुर्जनांस सारखींच भोगावीं लागतात. दुष्काळ पडला असतां सज्जन व दुर्जन सारखेच उपाशी मरतात; राज्यांत तंटे पटले असतां त्यांच्या झपाट्यांत दोघांचा सारखाच नाश होतो; समुद्रांत, तुफानांत सांपडले असतां दुर्जन बुडतात व सज्जन वांचतात असें घडत नाहीं. तसेंच देशावर परचक्र आलें असतां दोघांचा सारखाच चुराडा होतो. सदाचरणानें जो वागतो त्यास नफा इतकाच आहे कीं, त्याचें मन त्यास कधीं खात नाहीं; व परलोकीं आपणांस उत्तम सुख होईल अशी त्याची खातरी असल्यामुळें त्याच्या मनास समाधान असतें. या गोष्टीच्या योगानें या जगांत कशींही संकटें आलीं तरी तीं सोसण्याचें सामर्थ्य असतें, परंतु सोसण्याचें सामर्थ्य म्हटलें यावरूनच तें सामर्थ्य ज्यांस आहे त्यांस दुःख होतें हें उघड आहे."

---

# भाग अठ्ठाविसावा.

## रासेलस व निकाया यांचें आणखी संभाषण.

राजपुत्र म्हणाला, "ताई, साधारण मनुष्यांच्या आयुष्यक्रमणाच्या अनेक प्रकारांत गुण कोणते व दोष कोणते या विचारांत सर्व मुलखांवर गुदरणाऱ्या दुष्काळ, राज्यक्रांति इत्यादि मोठमोठ्या कहरांचे दृष्टांत त्वां घेतले येणेंकरून तुझ्या भाषणांत अतिशयोक्तीचा दोष आला असें वाटतें; बहुतेक लोकांस ग्रंथांतल्या वर्णनावरूनच केवळ या भयंकर अनर्थांची माहिती असते; स्वतःच्या अनुभवावरून त्यांतील दुःख जाणणारे फारच थोडे. असले गहजब अत्यंत भयंकर

असल्यामुळें दयाळू ईश्वर ते फारच क्वचित् घडूं देतो. संसारांत जीं दुःखें आपल्या अनुभवास येत नाहींत तीं कल्पून त्यांस नसता वाईटपणा लावणें बरोबर नाहीं. कोणी कोणी परचक्राचे हल्ले, दुष्काळ, सांथी इत्यादि अनर्थांचा क्षुल्लक कारणांवरून संभव कल्पून त्यांची लोकांस व्यर्थ भीति घालतात, व त्यांतील दुःखांचें अतिशयोक्तीनें वर्णन करितात; तसें भाषण केल्यानें ते आपणास मोठे वक्ते समजतात; परंतु त्यांचें तें अप्रयोजक व भीति उत्पन्न करणारें पांडित्य मला अगदीं आवडत नाहीं."

"ज्या आधिभौतिक किंवा राजकीय उत्पातांनीं देशचे देश लयास जातात, त्या उत्पातांविषयीं मनुष्यांनीं विचार करणें व्यर्थ आहे कारण, ते विचारानें टळणें नाहींत. परंतु हेंही उघड आहे कीं, राष्ट्रांचीं राष्ट्रें ज्यांच्या योगानें संहार पावतात असल्या अनर्थांचें जितकें भय वाटतें तितकें दुःख त्यांपासून होत नाहीं; कारण, त्यांच्या झपाट्यांत जे सांपडतात त्यांचा तत्काळ शेवटच होतो. मग दुःखानुभव कसला होणार? याशिवाय राजकीय अनर्थांविषयीं असें दिसतें कीं, देशाचा राजा सौम्य असला किंवा क्रूर असला, त्याची फौज रणांत जय पावून शत्रूचा पाठलाग करीत असली किंवा पराभव पावून पळ काढून परत येत असली, कसेंही असलें, तरी साधारण प्रजेपैकीं बहुतेकांच्या सुखदुःखांत कांहीं तफावत पडत नाहीं. त्यांचीं जीं नेहमींचीं सुखदुःखें असतात तींच त्यांच्या अनुभवास येतात. राज्यांत तंटे लागून मोठी उलथापालथ झाली तरी शेतकरी, कारागीर, उदमी यांचे धंदे जसेच्या तसेच चालत असतात. नेहमींच्या निर्वाहाचे जिन्नस लोकांस हवे असतात, व ते त्यांस मिळतात. त्यांत तफावत पडत नाहीं व मुलखांतल्या नेहमींच्या कृत्यांचें राहाटगाडगें न बदलतां तसेंच चालू असतें."

"तर ज्या गोष्टी फार क्वचित् घडणाऱ्या असल्यामुळें ज्या आपणांस कदाचित् कधींही घडणार नाहींत व ज्या घडूं लागल्या असतां आपण कांहीं केलें तरी बंद व्हावयाच्या नाहींत, त्यांचा व्यर्थ विचार आपण कशास करावा? सृष्ट पदार्थांचे नियम बदलणें किंवा राज्यांच्या व्यवस्था अमुक प्रकारें असाव्या असें ठरविणें या गोष्टी मुळींच आपल्या हातीं नाहींत. आपल्यासारख्या साधारण मनुष्यांनीं कसें वागावें, कोणत्या प्रकारें चाललें असतां त्यांत आपलें हित आहे, व कोणत्या प्रकारें वागल्यापासून आपलें नुकसान आहे, याचा विचार करून आपल्या अकलेप्रमाणें कल्याण करून घ्यावें, इतकेंच आपलें वास्तविक काम आहे."

" मला वाटतें कीं, लग्न करणें हें मनुष्यस्वभावास अत्यंत अनुसरून आहे. पुरुष व स्त्रिया यांनीं परस्परांचे सोबती व्हावें, असा सृष्टिकर्त्याचा स्पष्ट संकेत दिसतो. यावरून मला पक्केपणीं वाटतें कीं, विवाह हा मनुष्यास सुखप्राप्ति होण्याचा एक निश्चित उपाय असला पाहिजे. "

राजकन्येनें उत्तर केलें, " माझें मत निराळें आहे. मला असें भासतें कीं, मनुष्यास दुःख होण्याचे जे अनेक प्रकार आहेत त्यांपैकींच विवाह होय. माझ्या पाहण्यांत असें आलें आहे कीं, कधीं कधीं नवरा व बायको यांचे स्वभाव विरुद्ध असल्यामुळें किंवा त्यांच्या समजुती जमत नसल्यामुळें त्यांचे कज्जे होतात; कधीं कधीं दोघेंही सद्गुणी असतात. परंतु त्यांच्या सद्गुणांचा विरोध असतो व दोघेंही वास्तविकपणें चांगल्या रीतीनें वागत असतां त्यांचें एकमेकांशीं पटत नाहीं; कधीं कधीं तर कांहीं कोणाच्या ध्यानींमनीं नाहींत अशीं अकल्पित कारणें वडून त्यांचें जन्माचें वितुष्ट पडतें. अशा प्रकारचीं स्त्रीपुरुषांत बिघाड उत्पन्न करणारीं अनेक कारणें अनेक तऱ्हेचीं मनांत आलीं असतां चित्तास असें वाटूं लागतें कीं, विवाह हा शास्त्रास संमत आहे असें नाहीं; तर त्याविषयीं, शास्त्रकर्त्यांची अनुज्ञा मात्र आहे. म्हणजे मनुष्यानें अविवाहित राहवेल तर तो उत्तम पक्ष; परंतु कामवासनादिकांची ज्यास पीडा फार होते, ज्याच्यानें त्यांचें दमन करवत नाहीं, त्यानें निरुपायास्तव विवाह करावा. तो वस्तुतः गौणपक्ष, असें जें बहुतेक देशांतील शास्त्रवेत्त्यांचें म्हणणें तें खरें आहे. "

रासेलस हसून म्हणतो, " ताई, लग्न करण्यापेक्षां एकटें राहण्यांत दुःख अधिक, असें तूं नुक्की आतांच म्हणत होतीस ना ? तें विसरलीस वाटतें. दोन्ही स्थिति कदाचित् दुःखाच्या संभवतील; परंतु दोन्हीही एकमेकांपेक्षां अधिक दुःखाच्या असें कदापि संभवणार नाहीं. मनांत खोट्या समजुती शिरल्या असल्या म्हणजे त्या अशाच एकमेकांस खोडतात, आणि तेणेंकरून सत्याचा प्रवेश होण्यास मार्ग होतो. "

राजकन्या किंचित् रागावून उत्तर करिते, " दादा, माझ्या मघांच्या व आतांच्या बोलण्यांत तूं विरोध काढलास खरा; परंतु मला त्या विषयाचें पूर्ण ज्ञान नसल्यामुळेंही तो संभवतो. असें असतां, केवळ त्या विरोधावरून माझें मत मुळींच खोटें असें अनुमान तुजसारखा शहाणा मनुष्य काढील असें मला वाटलें नव्हतें. ज्या

विषयांचा विस्तार मोठा व ज्यांत विभाग फार, त्यांचें यथास्थित बरोबर आकलन होणें डोळ्यांस जसें कठिण, तसें तें मनासही कठिणच असतें. जेव्हां सर्व विषय एकवटीनें आपल्यास दिसतो किंवा मनांत बिंबतो, तेव्हां त्याच्या निरनिराळ्या भागांतील गुणदोषांचें स्पष्ट ज्ञान होऊन कोणचा विशेष ग्राह्य याचा बरोबर निर्णय होतो. परंतु लग्न करणें किंवा तें न करतां एकटें राहणें या विषयांचा संबंध शेंकडों दुसऱ्या गोष्टींशीं असल्यामुळें ते फार अफाट व गहन आहेत. त्यांचें एकदम एकवटपणानें आकलन करणें, मनुष्य कितीही बुद्धिमान् असला तरी, त्याच्या शक्तीच्या बाहेर आहे. तेव्हां असल्या विषयांचा विचार करणें झाल्यास तो भागशःच करावा लागतो; व त्याप्रमाणें तो करतांना त्या त्या वेळच्या मनाच्या कलाप्रमाणें एकदां हा भाग विशेष ग्राह्य वाटतो, व दुसऱ्यांदा दुसराच भाग तसा वाटतो. असा प्रकार सर्वांस होणारा आहे तेव्हां त्याप्रमाणें मला होऊन माझीं दोन वेळां दोन प्रकारचीं मतें पडलीं यांत मोठें नवल तें काय झालें? राजनीति, नीति, इत्यादि संकीर्ण व गोंधळाच्या विषयांवर विचार करीत असतां विचारणीय विषयांचें एकवटपणें आकलन होत नसल्यामुळें आपल्या व दुसऱ्याच्या मतांत जसा फेर पडतो, तसा कधीं कधीं आपल्या स्वतःच्या दोन वेळच्या मतांतही फेर पडतो. परंतु गणित, भूमिति इत्यादि ज्या विषयांचें एकवटीनें आकलन होतें, त्यांविषयीं मात्र विचार करणारांत कदापि होत नाहीं. त्यांची सर्वकाळ एकवाक्यताच असते."

बहिणीचें असें आवेशयुक्त भाषण ऐकून राजपुत्र म्हणाला, "ताई, एवढ्या आवेशानें कां बोलतेस? बारीक कोट्या काढून एकमेकांचा पराजय करावा या हेतूनें आपण बोलत बसलों नाहीं. तर खरें काय तें काढण्याचा यत्न करीत आहों. आपला यत्न सिद्धीस गेल्यास त्यांत आपला दोघांचा सारखाच नफा आहे व तो फसल्यास दोघांचा सारखाच तोटा आहे. लग्न केल्यापासून कांहीं पीडा चिकटतात इतक्याच कारणावरून लग्न करणें वाईट असें जें तूं अनुमान करतेस त्यांत तूं खचीत चुकतेस, असें मला वाटतें. पहा, तुझें म्हणणें खरें असेल तर जीवितांतही कितीएक दुःखें अनिवार्य आहेत. त्यांवरून जीवित ईश्वराची देणगी नव्हे, असेंही तुला कबूल करावें लागेल; पहा, लग्न करण्याची रीत मोडल्यास जगांत वस्ती कशी राहील? एक तर जग ओस पडेल किंवा सर्व मनुष्यें व्यभिचारी होतील."

राजकन्येनें उत्तर केलें, "जगांत वस्ती कशी राहील याची काळजी मला कशास पाहिजे! व मला वाटतें तुलाही ती काळजी वाहण्याची जरूर नाहीं.

हल्लीं जगांत जीं मनुष्यें आहेत तीं, आपण आज लग्न करणें वाईट असें ठरविलें म्हणजे त्या नियमास अनुसरून पुढें प्रजा उत्पन्न करण्याचा क्रम मुळीं सोडतात, आणि पृथ्वीवरून मनुष्यजाति अगदीं नाहींशी होते याविषयीं मला भय वाटत नाहीं. आपणांस सगळ्या जगाचा विचार करण्याची गरज नाहीं; आपला आपण विचार केला म्हणजे पुरे आहे."

---

# भाग एकुणातिसावा.

रासेलस म्हणतो, " अगे ताई, पण एकंदर सर्व जातींत जें हितकारक तें त्या जातींतील प्रत्येक व्यक्तीसही हितकारक असतें असा नियम आहे; त्यावरून लग्न करण्याची रीत मनुष्यजातीस जर आवश्यक आहे तर ती रीत प्रत्येक मनुष्यासही हितावह असली पाहिजे. असें जर असेल तर नेहमींच व अनिवार्य जें कर्तव्य कृत्य तें पीडेचें कारण होय, व जातीच्या म्हणजे तींतील कितीएकांच्या सोईकरितां दुसऱ्या कितीएकांस दुःख भोगणें अगत्य आहे, असें मानावें लागेल; व असें मानल्यानें ईश्वराच्या सृष्टिव्यवस्थेच्या नियमांत किती व्यंगता येते, हें तुझ्या ध्यानांत आलेंच असेल. शिवाय लग्न करणें व तें न करितां एकटें राहणें या दोन अवस्थांची तुलना करतांना तूं दुसऱ्या स्थितींतील जीं दुःखें सांगितलीं, त्यांचीं कारणें आवश्यक असल्यामुळें तीं दुःखें अनिवारणीय दिसतात; परंतु पहिल्या स्थितींतल्या दुःखाकडे पाहतां त्यांचीं कारणें आगंतुक असल्यामुळें तीं दुःखें जपलें असतां टाळतां येतील, असें वाटतें. माझी खात्री आहे कीं, शहाणपणानें व स्वार्थबुद्धि सोडून वागलें असतां घरभारीपणाची स्थिति फार सुखाची होईल. पुष्कळांस ही स्थिति पीडादायक होते याचें कारण इतकेंच आहे कीं, या जगांत पुष्कळ मनुष्यें मूर्ख व केवळ स्वार्थ पहाणारीं अशीं आहेत; तीं बहुतेक तारुण्याच्या प्रथम भरांत लग्नें करतात. त्या वयांत विषयवासना फारच उद्दाम असल्यामुळें विवेकास मनांत वाव नसतो; बुद्धि कच्ची असून जगाचा अनुभव नसल्यामुळें योग्य निर्णय करण्याचें तिला सामर्थ्य नसतें, दूरदृष्टि तर त्या वयांत मुळींच असत नाहीं; व ज्याशीं आपली जन्माची गांठ घालावयाची त्याच्या समजुती, संवई, स्वभाव, अक्कल, आचरण हीं आपल्याशीं जम

पडण्याजोगीं आहेत किंवा नाहींत याचा विचार केल्यावांचून तशा अज्ञान वयांत केलेल्या लग्नापासून पीडा व पश्चात्ताप हीं उत्पन्न होतात यांत नवल तें कोणतें ? ''

''लग्न जमण्याची साधारण रीत म्हटली म्हणजे येणेंप्रमाणें आहे:—एकादा अल्पवयी पुरुष व तशीच अल्पवयी स्त्री यांची सहजवृत्त्या गांठ पडते; अथवा त्यांच्या गांठीचा योग जुळवून आणला असतो. अशा प्रसंगीं तीं एकमेकांकडे प्रेमानें पहातात, व अदबीनें वागतात. नंतर घरीं गेल्यावर त्या कोत्या समजुतीच्या स्त्रीपुरुषांस मनोरंजन करण्यासारखे दुसरे प्रौढ विषय नसल्यामुळें हा नवीन स्नेह त्यांस गोड वाटून त्यांच्या मनांत गोंधळूं लागतो, व त्यांना एकमेकांस भेटण्याची उत्कंठा वाढून परस्परांवांचून चैन पडेनासें होतें. त्यावरून आपलें अक्षय प्रेम जमलें, असें समजून तीं एकमेकांशीं लग्नसंबंध करितात. परंतु तेरड्याच्या फुलाच्या रंगाप्रमाणें त्यांचें नवाळीचें प्रेम लवकरच फिक्कें पडूं लागून थोड्याच दिवसांत अगदीं विटतें. ही गोष्ट साधारण विचार केला असतां पूर्वी समजण्यासारखी असून केवळ गैरवाकबपणामुळें त्यांच्या ती लक्षांत येत नाहीं, व आपल्या मूर्खपणास दोष न देतां तीं उगीच दैवास निष्ठुरपणाबद्दल ठपका देतात. ''

मुलें बरोबरीचीं होऊन आईबापांशीं बरोबरी करूं लागतात, याचेंही कारण अल्पवयी असतां लग्न करणें हेंच होय. संसारांतील थोरपणाचा बापास कंटाळा येण्यापूर्वींच मुलगा तो मिळविण्यास उत्सुक होतो; आणि दोन्ही गिह्यांस तो प्राप्त होण्याची सवड नसल्यानें दोघांत स्पर्धा उत्पन्न होते. तसेंच आईची नटण्या मुरडण्याची हौस पुरी होण्यापूर्वींच मुलगी चमकूं लागते, त्यामुळें प्रत्येकीस दुसरी आपली बरोबरी करण्यास नसावी अशी इच्छा सहज उत्पन्न होते.

'' लग्न म्हणजे न फिरणारा जन्माचा संबंध आहे, तेव्हां हा मोठा धिमेपणानें पुष्कळ विचार करून करावयाचा; या कामांत घाई उपयोगी नाहीं, हें शहाण्याच्या सहज ध्यानांत येईल; व तसें केलें असतां वर सांगितलेल्या सर्व अडचणी सहज दूर होतील. तारुण्याच्या पहिल्या भरांत मनुष्याची वृत्ति उल्हासयुक्त असते व त्यास थट्टामस्करीची गोडी असते, म्हणून त्या वयांत एकट्यास काळ क्रमण्यास अगदीं कठिण नसतें. तसेंच लग्नास उशीर केला असतां तें करणाऱ्याच्या आंगीं विशेष प्रौढता येते व जगाच्या अनुभवानें बुद्धीहि चांगली परिपक्व होते. तेणेंकरून

विशेष शोध करण्यास व विशेष शहाणपणामुळें निवड करण्यास अधिक सवड सांपडते. उशिरानें लग्न केलें असतां निदान एक फायदा तर खचित होतो कीं, आईबापें व मुलें यांमध्यें पुष्कळ अंतर राहिल्यानें मुलांनीं आईबापांची बरोबरी करण्याचा संभव नसतो."

निकाया म्हणाली," तर्कानें जें ध्यानांत येत नाहीं व स्वतःच्या अनुभवानें जें माहीत नाहीं, तें लोकांच्या म्हणण्यावरूनच मानलें पाहिजे. लोकांत तर अशी म्हण आहे कीं, उशिरानें जीं स्त्रीपुरुषें लग्न करतात त्यांमध्यें मोठेंसें प्रेम असत नाहीं. लग्न लवकर करावें किंवा उशिरां करावें, व कोणत्या प्रकारांत नफा विशेष, या गोष्टींचा निश्चय करणें विशेष महत्त्वाचें असल्यामुळें त्याविषयीं मोठे चतुर, सूक्ष्मदर्शी व ज्यांची माहिती मोठी, अशा मनुष्यांचें मत मीं घेतलें. त्यांचें मत एकंदरींत उशीरां लग्न करण्याच्या विरुद्ध पडलें. ते म्हणाले कीं, ज्यांच्या समजुती व संवयी ठरून दृढ झाल्या आहेत, ज्यांचे स्नेहसंबंध पक्के झाले आहेत, व वागणुकीचे मार्ग निश्चित होऊन गेले आहेत, अशा ( म्हणजे प्रौढ वयाच्या ) स्त्रीपुरुषांनीं एकमेकांशीं जन्माची गांठ घालून घेऊन आपलें सुख एकमेकांच्या हातीं देण्यांत मोठा धोका आहे."

" जगांत स्वतंत्रपणें वागणाऱ्या कोणत्याही दोन मनुष्यांच्या वागणुकीचा प्रकार अगदीं एक असण्याचा संभव फारच कमी आहे, व ज्यास ज्या प्रकारची संवयीनें गोडी लागली तो,तो प्रकार दुसऱ्याकरितां सोडील,असेंही क्वचितच घडणार आहे. अल्प वयांत मनुष्याच्या मनाच्या आवडी व त्रास हीं निश्चित झालीं नसतात, परंतु प्रौढ वयांत संवईनें तीं दृढ होऊन त्यांचा वागण्याचा कांहीं तरी एकादा क्रम ठरून जातो. मग तो स्वीकारलेला क्रम दृढनिश्चयानें तसाच चालवण्यांत त्यास आनंद वाटतो, व तो सोडण्यास लाज वाटते. आतां मी हें कबूल करतों कीं, स्त्रीपुरुष एकमेकांस योग्य व प्रतिष्ठित समजत असल्यास तीं परस्परांस संतुष्ट ठेवण्याची इच्छा बाळगतील, हें खरें आहे; तथापि त्यांचे स्वभाव दृढ झालेले असल्यामुळें परस्परांचीं मनें अगदीं मिळून जाण्यास त्या स्वभावांत जी बदल होण्याची गरज असते ती होत नाहीं. पहा, फार दिवसांच्या ज्या संवई असतात त्या सहज मोडत नाहींत. आपली पडून गेलेली एकादी रीत बदलण्याची आपणास इच्छा होऊन तसें करूं लागल्यास तो यत्न प्रायः सिद्धीस जात नाहीं;

मग स्वतःकरतां जें आपल्याकडून होत नाहीं, तें दुसऱ्याकरतां आपण करण्याचा कितीसा संभव आहे बरें ?"

इतक्यांत राजपुत्र मध्यें म्हणूं लागला, "पण ताई, बायको अगर नवरा यांची निवड करतांना जो गुण मुख्य पहावयाचा, तो तर तूं मुळींच विसरलीस, असें दिसतें. लग्न करावयाचें मनांत आणून मी जर बायको शोधूं लागलों, तर ती युक्ति ऐकून घेऊन ती बरोबर पटली असतां तीप्रमाणें वागण्यास कबूल होणारी आहे कीं नाहीं, हें प्रथमतः पाहीन."

राजकन्या हंसून उत्तर करिते, "आपणांस मोठे शहाणे म्हणविणारे पंडित संसारांतील गोष्टींचा विचार करतांना चुकतात ते असेच! नित्याच्या व्यवहारांत हजारों विषय असे येतात कीं, युक्तीप्रयुक्तीनें त्यांचा निर्णय कधीं व्हावयाचा नाहीं; ते विषय असे असतात कीं, त्यांविषयीं बारकाईचा शोध करून कांहीं उपयोग नसतो, व त्यांस तर्कशास्त्राचे नियम लावून कोणी भवति न भवति करूं लागल्यास तो केवळ उपहासास मात्र पात्र होतो! तीं कृत्यें अशीं असतात कीं, तीं करणें अवश्य असतें. दादा, तूं आणखी असें एक मनांत आण कीं, मनुष्यमात्राची एकंदर स्थिति पाहतां कोणत्याही प्रसंगीं लहान किंवा मोठ्या कर्तव्यकृत्याचीं सर्व साधकें व बाधकें मनांत आणून वागणारीं किती बरें सांपडतील? मी तर असें समजत्यें कीं, ज्या स्त्रीपुरुषांस सकाळीं उठलें म्हणजे काय करावयाचें, प्रत्येक कृत्यांत नफा व नुकसान काय, असे वादविवाद करून ठरवणें पडत असेल, तीं स्त्रीपुरुषें अत्यंत हतभाग्य होत; त्यासारखी जिगजीग व त्रास कोणासच नाहीं!

"उशिरानें लग्न केल्यास आईबापें मुलांच्या स्पर्धेपासून सुटतील हें खरें आहे; परंतु या नफ्याबद्दल त्यांस दुसरा मोठा तोटा सोसावा लागेल. तो असा कीं, त्या आईबापांस पंगू व अज्ञान अशा बालपणांत तीं मुलें पाळण करणारांच्या भरंवशावर बहुतकरून टाकावीं लागतील; निदान तीं शहाणीं व थोर होऊन उत्तम प्रकारें नांदूं लागलीं, हें सुख तर त्यांच्या खचित दृष्टीस पडणार नाहीं."

"उतारवयांत लग्न करणाऱ्यांस मुलांच्या स्पर्धेपासून भय जसें कमी तसें त्यांस लग्नापासून होणारें सुखही पण कमीच. तारुण्याच्या नवाळींतील प्रेमाच्या अवर्णनीय गोडीस तीं मुळींच मुकतात; तसें अल्पवयांत लग्न झालें असतां दोघांचेही स्वभाव, समजुती, आवडी वगैरे हीं दृढ झालेलीं नसल्यामुळें नित्य सहवासानें

बदलून त्यांचा चांगला जम बसण्याजोगा असतो. ती सोय प्रौढ वयांत लग्न केलें असतां मुळीं नाहींशी होते. लोकांत अनुभवही असा आहे कीं, उतारवयांत जीं लग्नें करितात त्यांची प्रीति मुलांवर फार असते. पण जीं पूर्ववयांत लग्नें करतात त्यांचें प्रेम परस्परांवर अधिक असतें."

राजपुत्र म्हणाला, "या दोन प्रेमांचा स्वाभाविक विरोध नाहीं. फार लहान नव्हे व फार प्रौढ नव्हे अशा वयांत लग्न केलें असतां दोन्ही प्रेमांचा लाभ होईल, व लग्नाचीं सर्व सुखें प्राप्त होऊन त्यांपासून कधीं कधीं उत्पन्न होणाऱ्या पीडाही टळतील, असें मला पक्कें वाटतें. हें योग्य ध्येय कोणतें हें मात्र काढलें पाहिजे. व चांगला सूक्ष्म विचार केला असतां तें काढतांही येईल, अशी माझी खात्री आहे."

राजकन्या हंसून म्हणाली, "इम्लाक कवि नेहमीं म्हणत असतो कीं, 'या जगांतील सुखें हीं सृष्टिकर्त्यानें एकमेकांपासून दूर दूर ठेविलीं आहेत.' त्याचें तें म्हणणें, जसजसा विचार करावा, तसतसें मला अधिक खरें भासतें. या संसारांतील सुखांची घटना अशी कांहीं चमत्कारिक आहे कीं, एका सुखाच्या पाठीस मनुष्य लागलें म्हणजे दुसरें सुख त्यास दुरावल्यावांचून राहात नाहीं. मूर्खपणानें किंवा अति शहाणपणानें मनुष्य दोन्हीं सुखांस कदाचित् मुकेल, पण दोन्हींही त्यास सांपडलीं असें मात्र कदापि होणार नाहीं. यास्तव अति विचार करणें वेडेपणा होय. सृष्टिकर्त्यानें जें दिलें नाहीं तें साध्य करण्याविषयीं जो झटतो त्यास त्या यत्नांत यश कोठून येणार आहे? या संसारांत अनेक प्रकारचीं सुखें आहेत खरीं; परंतु तीं एकमेकांस विरुद्ध आहेत. त्यांतकीं आपणांस कोणतीं हवींत याचा निर्णय करून मनुष्यानें तीं उचलावीं. आपण जीं निवडलीं तद्विरुद्ध सुखें आपण निवड केलीं तेव्हांच गमावलीं. त्यांच्या प्राप्तीविषयीं त्यानें व्यर्थ शीण पावूं नये. आपण स्वीकारलीं त्यांतच संतोष मानून स्वस्थ रहावें. पहा, आंब्याच्या मोहोराचा सुगंध व त्याच्या पिकलेल्या फळांची गोडी हीं जशीं एकाच काळीं मिळणें अशक्य, किंवा नदीच्या उगमाजवळचें व तिच्या मुखाजवळचें पाणी एकदम चाखतां येणें अशक्य, त्याप्रमाणेंच विरुद्ध सुखांचा अनुभव मिळणेंही अशक्य होय, हें तूं पक्कें समज."

---

# भाग तिसावा.

राजपुत्र रासेलस व राजकन्या निकाया यांचा मागील भागांत वर्णिल्याप्रमाणें वादविवाद चालला असतां, इम्लाक कवि तेथें आला. त्यास पाहून राजपुत्र रासेलस म्हणाला, " महाराज, घरभारी होऊन राहण्याच्या स्थितीचें वर्णन आमची ताई बराच वेळ करीत आहे. व त्या स्थितींत इतकीं दुःखें व त्रास ती दाखवीत आहे कीं, तीं दुःखें व त्रास ऐकून उत्तम स्थितीचा पुढें आणखी शोध करण्याविषयींची माझी उमेद बहुतकरून खचून गेली आहे."

इम्लाक कवीनें हंसून उत्तर केलें, " मुलांनो, आयुष्य क्रमण्याचा सर्वोत्कृष्ट मार्ग कोणता याचा शोध करण्याच्या नादांत गुंतून, जाणाऱ्या आयुष्यापासून होणाऱ्या नफ्यास तुम्ही मुकत आहां! पहा, तुम्ही किती दिवस या एकाच शहरांत फिरून घालवीत आहां! हें शहर कितीही मोठें असलें व यांत कितीही तऱ्हेचे लोक असले तरी यांत पाहण्यासारख्या नवीन गोष्टी फारच थोड्या राहिल्या असतील. आपण हल्लीं कोणत्या देशांत आहों हें तुम्ही विसरलां, असें वाटतें. या मिसर देशांतील लोक अत्यंत प्राचीनकाळीं मोठे पराक्रमी व विद्वान् होते, अशी प्रख्याति आहे. मनुष्यजातींत विद्या जी उदयास आली ती या देशांत आली, व येथून पृथ्वीवरील सर्व इतर देशांत तिचा प्रकाश फांकत व वाढत गेला. तसेंच सृष्टपदार्थांस आपणांस सुखावह करण्याच्या युक्ति-ज्यास कला असें म्हणतात-व पुष्कळ लोक एकत्र राहिले असतां त्यांचा एकमेकांस उपद्रव तादृश न होतां परस्परांहून परस्परांस उपयोग होण्यासारखे नियम-ज्यांस लोकव्यवस्था किंवा लोकमर्यादा म्हणतात,—त्या सर्वांचें उत्पत्तिस्थान हाच देश होय. या गोष्टींचें मूळ शोधूं लागलें असतां मिसर देशांतच पत्ता येतो, पलीकडे जात नाहीं."

" या परमविख्यात व पराक्रमी प्राचीन मिस्री लोकांनीं बांधलेल्या कांहीं इमारती अद्यापि आहेत, त्यावरून त्या लोकांचा अद्भुत उद्योग व करामत हीं स्पष्टपणें दिसून येतात. या इमारती अशा भव्य व अवाढव्य आहेत कीं, आज सर्व दुनियेंत आपणांस अधिक शहाणे व हुषार म्हणविणारे युरोपियन लोकही यापुढें आमचीं कामें फिकीं आहेत, असें कबूल करतात. या इमारती आपले कित्ते करून

अर्वाचीन शिल्पी यांतलि खुब्या शिकविण्याविषयीं व त्या आपल्या कामांत आणण्याविषयीं झटतात. या प्राचीन लोकांच्या कामांपैकीं जीं कांहीं कामें सर्वभक्षक काळाच्या झपाट्यांतून अद्यापि उरलीं आहेत, त्यावरून त्यांच्या नष्ट झालेल्या कामांचें बरेंच अनुमान आपणांस करतां येतें.

राजपुत्र रासेलस म्हणाला, "दगडांचा गंज व मातीचे ढीग पाहण्याची माझ्या मनास तादृश प्रबल उत्कंठा नाहीं; तर अनेक प्रकारचीं मनुष्यें व त्यांच्या स्थितींच्या अनेक तऱ्हा पाहण्याची मला पराकाष्ठेची गोडी आहे. मी जो देशपर्यटनास निघालों आहे, तो जुन्या मोडक्या देवळांचे राहिलेले भाग मोजण्याकरितां किंवा रद्द पडून बुजून गेलेल्या नगरांचा माग लावण्याकरितां निघालों नाहीं. तर हल्लीं जगांत मनुष्यांच्या ज्या स्थिति विद्यमान् आहेत त्या पाहण्याकरितां निघालों आहे.

राजकन्या निकाया म्हणाली, " जगाची विद्यमान् जी स्थिति आहे तिजकडे मुख्यत्वें आपणांस लक्ष दिलें पाहिजे, व तसें करणें योग्यही आहे. प्राचीन काळचे थोर पराक्रमी लोक व त्यांनीं करून ठेविलेलीं कामें यांशीं आम्हांस काय कर्तव्य आहे ? जो काळ निघून गेला तो आतां कधींही परत येणें नाहीं व त्या काळाच्या पराक्रमी पुरुषांचा वर्तनक्रम कसाही असला तरी हल्लींच्या स्थितीस तो जमण्यासारखा नाहीं, तेव्हां तो समजून काय उपयोग आहे ? "

इम्लाक कवीनें उत्तर केलें:—"कोणत्याही वस्तूचें वास्तविक स्वरूप जाणणें म्हणजे तिचे परिणाम जाणले पाहिजेत. तेव्हां मनुष्यांचें पूर्ण ज्ञान होण्यास त्यांचीं कृत्यें जाणणें आवश्यक आहे. कोणत्या हेतूनें तीं प्रवृत्त झालीं, व कोणत्या मनोवृत्तींनीं त्यांस उत्तेजन दिलें हें कळलें म्हणजे मनुष्याच्या मनास उत्तेजन देऊन प्रवृत्त करणारीं अत्यंत प्रबल कारणें कोणतीं, हीं आपणांस माहीत होतात. विद्यमान् स्थितीचें वास्तविक ज्ञान होण्याकरितां ती भूतकाळच्या स्थितीशीं ताडून पाहिली पाहिजे. कारण कोणत्याही वस्तूस वाईट म्हणावयाचें तें तुलनेनेंच म्हणावयाचें असतें. तेव्हां वर्तमान स्थिति बरी वाईट म्हणतांना भूतस्थितीशींच तिला ताडिलें पाहिजे; कारण भविष्यस्थितीचें आपणास मुळींच ज्ञान नसल्यामुळें तिशीं तुलना करण्याचा संभव नाहीं. खरोखरी पाहिलें असतां विद्यमान् स्थितीविषयीं आपलें मन फार थोडा विचार करितें; तें बहुतकरून भावी स्थितीच्या विचारांत किंवा भूतस्थितीच्या आठवणींतच प्रायः गुंतलेलें असतें मनुष्याच्या मनाच्या मुख्य वृत्ति म्हटल्या म्हणजे आनंद, दुःख, प्रीति, द्वेष, आशा आणि भय ह्या

होत. यांपैकीं आनंद व दुःख हीं भूतगोष्टींविषयींच असतात. व आशा आणि भय हीं भावी स्थितीविषयीं असतात; म्हणजे पहिल्यांचा विषय भूतस्थिति व दुसऱ्यांचा विषय भविष्यस्थिति झाली. आतां प्रीति, द्वेष यांचाही विषय भूतस्थिति होय. कारण ज्या विषयांविषयीं त्या मनोवृत्ति होतात ते विषय त्या मनोवृत्तींच्या पूर्वींच असले पाहिजेत. कां कीं ते विषय त्या मनोवृत्तींचें कारण होत; व कारण कार्यापूर्वीं असलें पाहिजे, असा सर्वसामान्य नियम आहे. ''

'' तसेंच विद्यमान् जी स्थिति आहे ती पूर्वस्थितीपासून झाली आहे. तेव्हां विद्यमान्‌काळीं आपली स्थिति चांगली असून आपण सुखी असल्यास त्या सुखाचें कारण काय, किंवा हल्लीं आपली स्थिति वाईट असून आपण दुःख भोगीत असल्यास त्या दुःखाचें कारण काय, हें समजण्यास आपणांस भूतस्थितीचें यथास्थित ज्ञान आवश्यक आहे. आपण केवळ स्वार्थबुद्धीनें वागत असलों तरी इतिहासाचें म्हणजे भूतस्थितीचें ज्ञान आपल्या फायद्याचें आहे. आतां दुसऱ्याच्या बऱ्याचीं कामें करण्याचें ओझें ज्यांनीं माथ्यावर घेतलें आहे असे जे राजे, राजकीय पुरुष वगैरे यांस तर इतिहासाची माहिती करून घेणें फारच जरूर आहे; ती त्यांनीं करून न घेतल्यास त्यांचा अन्याय आहे; ज्ञान होण्याचीं साधनें असतां जो जाणून बुजून अज्ञान राहतो तो केवळ मूर्खच नव्हे, पण गुन्हेगार होय; व त्याच्या अज्ञानापासून होणाऱ्या पीडेचा दोष त्याच्या माथ्यावर येतो. ''

'' इतिहासांत विषय बहुत असतात, परंतु त्या सर्वांत मनुष्यांचीं मनें कसकशीं विकास पावत व अधिकाधिक ज्ञानसंपन्न होत गेलीं, त्यांमध्यें विद्या कशी उत्पन्न झाली व तिची वृद्धि कशी होत गेली, कलाकौशल्यें कशीं उद्भवलीं व कशीं सुधारत गेलीं, विद्येस व कलांस कधीं कधीं उत्कर्षकाळ व कधीं कधीं ऱ्हासकाळ कसे आले, इत्यादि गोष्टींची हकीकत फारच उपयोगी व चमत्कारिक आहे. मोठमोठ्या लढाया व राज्यक्रांति ह्यांची माहिती राजेलोकांस विशेषेंकरून अवश्य आहे; तरी त्यांसही विद्या व कलाकौशल्यें यांच्या उदयाचीं व वृद्धीचीं कारणें समजणें कमी आवश्यक आहे, असें समजूं नये. कारण राज्यें योग्य रीतीनें चालवणें जसें त्यांचें काम आहे, तसें आपली बुद्धि व मन सुधारणें व सज्ञान करणें हेंही त्यांचें कमी काम आहे, असें नाहीं. ''

'' तसेंच असा एक सर्वसामान्य नियम आहे कीं, कोणतीही गोष्ट उदाहरणानें जशी मनांत भरते तशी केवळ उपदेशानें भरत नाहीं. शिपाई जो तयार

अनुक्रम ३००५४
विभाग कां।वा
क्रमांक २२२५

होतो तो रणांगणांत युद्ध करून करूनच होतो, केवळ लढाईच्या गोष्टी ऐकून होत नाहीं; तसेंच उत्तम चितारी होण्यास मनुष्यास हातांत कलम घेऊन वारंवार चित्रेंच काढलीं पाहिजेत, त्या कलेविषयीं केवळ नियम समजून घेऊन उपयोग नाहीं. शौर्याच्या कृत्यांपेक्षां कलेच्या कृत्यांत हा विशेष गुण आहे कीं, शौर्याचीं अद्भुत कृत्यें पाहण्याची संधि फारच थोड्यांस सांपडते; पण कलेचे अद्भुत चमत्कार पाहण्याची ज्यास इच्छा होईल त्यास ते सहज पाहण्यास सांपडतात."

"कलेचीं चमत्कारिक कृत्यें पाहिलीं असतां, प्रथमदर्शनीं मन आश्चर्यानें थक्क होतें; परंतु त्यांस उत्साहशक्ति म्हणजे हिंमत असल्यास आश्चर्याचा झटका संपल्याबरोबर हें अद्भुत कृत्य कोणत्या उपायांनीं सिद्ध झालें असेल, अशी आकांक्षा घेऊन त्या उपायांच्या शोधाकडे तें वळतें. असें झालें म्हणजे कलेचीं अद्भुत कृत्यें पाहण्यापासून होणाऱ्या खऱ्या उपयोगास आरंभ झाला. वर सांगितलेल्या शोधाकडे आपलें मन लागलें म्हणजे त्या शोधापासून आपलें ज्ञान व कल्पना हीं वाढतात. कधीं कधीं उच्छिन्न झालेली कला पुन्हा उदयास येते, किंवा आपल्या मुलखांत ती अपूर्ण दशेंत असल्यास ती सुधारून पूर्णावस्थेस चढते. आपण आपल्या वेळची स्थिति पूर्वस्थितीशीं ताडून पाहिली असतां आपल्या वेळची स्थिति उत्तम ठरल्यास आपणांस आनंद वाटतो, व आपल्या वेळच्या स्थितींत प्राचीन स्थितीपेक्षां न्यूनता आढळल्यास ती पूर्ण करण्याविषयीं आपण यत्न करण्याची इच्छा करतों. कोणत्याही दृष्टीनें पाहिलें तरी प्राचीन स्थिति समजण्यापासून फायदाच आहे."

इम्लाक कवीचें हें सयुक्तिक व मार्मिक भाषण ऐकून राजपुत्र म्हणालाः— "महाराज, पहाण्यासारख्या ज्या या देशांत गोष्टी असतील त्या पाहण्याविषयीं मी उत्सुक आहें." राजकन्या बोलली, "महाराज, प्राचीन लोकांच्या कृत्यांच्या अवलोकनानें ज्ञान संपादन करण्यांत मलाही संतोषच आहे."

इम्लाक कवि म्हणालाः—"बाबांनो, प्राचीन मिसी लोकांच्या थोरपणाचें व त्यांच्या अद्भुत मेहनतीचें लोकोत्तर चिन्ह म्हटलें म्हणजे त्यांनीं बांधलेले मनोरे होत. त्यांस पिरामिद म्हणतात. ह्या इमारती डोंगरासारख्या विशाळ असून इतक्या जुन्या आहेत कीं, अत्यंत प्राचीन लेखांत सुद्धां पुरातन इमारतींप्रमाणें त्यांचें वर्णन करून त्यांविषयीं अमुक अमुक गोष्टी ऐकिवांत आहेत, असेंच लिहिलें आहे. यावरून इतिहास लिहिण्याची चाल उत्पन्न होण्यापूर्वींचीं तीं कामें आहेत

असें स्पष्ट सिद्ध होतें. या अद्भुत मनोऱ्यांपैकीं अत्यंत मोठा जो मनोरा आहे तो अद्याप आहे व इतका जुना असतां कालाच्या योगानें त्यास कांहींएक इजा झालीसें दिसत नाहीं."

राजकन्या निकाया म्हणाली, "ठीक आहे; उद्यां सकाळीं आपण ते मनोरे पहावयास निघूं. मीं त्या मनोऱ्यांविषयीं पुष्कळ गोष्टी ऐकिल्या आहेत; तर ते आंतून व बाहेरून मीं आपल्या डोळ्यांनीं प्रत्यक्ष पाहिल्यावांचून मला चैन पडावयाचें नाहीं."

---

# भाग एकतिसावा.

## तीं पिरामिद पहावयास जातात.

मग आदल्या दिवशीं निश्चय ठरल्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं तीं निघालीं. स्वस्थपणें मनाची हौस पूर्ण होईतोंपर्यंत पिरामिद पाहावयाचा त्यांचा बेत असल्यामुळें कांहीं काळपर्यंत तेथें राहण्याकरितां त्यांनीं उंटावर लादून तंबू घेतले होते. तीं लहानसहान मजला करीत, व वाटेनें जातांना आसपास चमत्कारिक पाहण्यासारखीं ठिकाणें आढळल्यास, वांकडी वाट करून तीं तीं सर्व पाहात. याप्रमाणें त्यांनीं कितीएक वसलेलीं गांवें पाहिलीं, व तेथील गोष्टी लोकांपासून ऐकून घेतल्या.

मग थोरल्या मनोऱ्याजवळ येऊन पोहोंचल्यावर त्याचा विस्तृत पाया व गगनचुंबित उंची पाहून त्यांस अचंबा वाटला. जगाच्या शेवटापर्यंत टिकण्याच्या उद्देशानें बांधलेल्या त्या इमारती बांधतांना पिरामिदाचाच आकार बांधणारांनीं कां पसंत केला, याचीं कारणें इम्लाक कवीनें त्यांस उघड करून सांगितलीं. पिरामिदाचा आकार गाजरासारखा पायाशीं मोठा असून वर निमुळता होत गेला असल्यामुळें, वारा, पाऊस, इत्यादि स्वाभाविक कारणांनीं त्यांस इजा होईनाशी झाली आहे. सगळ्यांत ज्यांचा धक्का सहन करण्यास अत्यंत कठिण असे जे धरणीकंप, त्यांपासूनसुद्धां या इमारतींस धोका म्हणण्यासारखा नाहीं. कारण ज्यानें पिरामिदही पडतील तो धक्का इतका बळकट पाहिजे कीं, त्यानें ते ज्यावर आहेत तें महाद्वीपसुद्धां प्रायः उकलून जाईल.

 ९५६४

त्यांनीं त्या पर्वतप्राय मनोऱ्याची लांबी, रुंदी व उंची हीं सर्व मोजलीं व त्याच्या पायांशीं तंबू ठोकले. दुसऱ्या दिवशीं तो मनोरा आंतून पहावयाचा निश्चय करून आंतील जागा व वाटा दाखविण्याकरितां नेहमीं तें काम करणारे तेथील कांहीं लोक पैसा देऊं करून बरोबर घेतले; व पहिल्याच गुहेच्या तोंडापर्यंत वर चढून जाऊन तीं त्या गुहेंत शिरणार इतक्यांत राजकन्येची दासी पेक्युआ ही त्या गुहेंत डोकावतांच दचकून मागें वळली आणि भयानें थरथर कांपूं लागली. तिची अवस्था पाहून राजकन्येनें विचारलें, "अगे, तूं कशास भ्यालीस ? तूं इतकी कांपतेस कां ?" पेक्युआनें उत्तर केलें, "या गुहेचें तोंड बिळ्यासारखें लहान असल्यामुळें व आंत अंधार असल्यामुळें आंत शिरावयास धीर होत नाहीं. मला वाटतें कीं, या अंधारी गुहेंत खचीत भुतें रहात असतील; तीं आपण आंत गेलों म्हणजे अक्राळविक्राळ रूपें धारण करून आपणांपुढें एकदम उभीं राहतील, व कदाचित् आपणांस येथें कोंडून टाकून कधींच बाहेर पडूं देणार नाहींत." असें बोलून भयानें गांगरून तिनें राजकन्येच्या गळ्यास मिठी मारिली.

निकाया म्हणाली, "अगे वेडे, भुतांचेंच काय तें भय ना! इतकेंच असल्यास तुला संभाळून परत आणण्याचा जिम्मा मजकडे लागला. मी तुझ्या केसाला देखील धक्का लागूं देणार नाहीं. अगे, जीं मनुष्यें मेलीं त्यांपासून कांहीं भय नाहीं. जें मनुष्य मरून एक वेळ जमिनींत गाडलें तें पुनरपि कदापि दिसणें नाहीं हें पक्कें समज."

इम्लाक कवि म्हणाला, 'जे मेले ते पुनः कदापि दिसणें नाहींत, असा एकदम सिद्धांत तर माझ्यानें करवत नाहीं. कारण सर्व देशांत व सर्व काळीं मेलेलीं मनुष्यें कधीं कधीं दृष्टीस पडतात; अशी समजूत आहे. ही समजूत नाहीं असे लोक कधीं व कोठेंही नाहींत; तेव्हां ही सर्व जगाची समजूत अगदीं खोटी व निराधार आहे असें कोणीं म्हणावें? माझ्यानें तर तसें म्हणवत नाहीं. लोक विद्वान् असोत अथवा अडाणी असोत, कसेंही असलें तरी मेलेलीं मनुष्यें कधीं कधीं दृष्टीस पडतात, या गोष्टी त्या लोकांत नियमानें असतात, व त्या गोष्टी त्यांपैकीं पुष्कळ लोक खऱ्या मानतात, असेंच सर्वत्र आढळतें. पृथ्वीवरील बहुतकरून सर्व लोकांत सर्वकाळ जी समजूत दृष्टीस पडते तिची व्याप्ति होण्यास तिच्या खरेंपणाशिवाय दुसरें समर्पक कारण संभवत नाहीं. एकमेकांपासून अत्यंत दूर राहणारे जे लोक व ज्यांमध्यें दळणवळण कधींही नसल्यामुळें एकाच्या गोष्टी

दुसऱ्यांनीं ऐकण्याचा संभव नाहीं, अशा लोकांत एकसारखें सर्व मुलुखांत व सर्व काळीं या गोष्टीस खोटी म्हणणारीं कांहीं कांहीं मनुष्यें आढळतात खरीं; परंतु त्या तेवढ्यांच्या आक्षेपानें सामान्य एकंदरींच्या ऐक्यमतानें आलेलें प्रमाण दुर्बळ होत नाहीं. शिवाय जे तोंडानें पिशाच्चें दिसत नाहींत म्हणून म्हणतात, तेही आपल्या भितरेपणानें ती गोष्ट कबूल करितात.

" तथापि पेक्युआच्या मनांत आधींच जी भयाची धडकी भरली आहे, ती अधिक करावी असा माझा अगदीं इरादा नाहीं. मी असें म्हणतों कीं, या मनोऱ्याच्या आंतील गुहांमध्यें इतर ठिकाणांपेक्षां पिशाच्चें कां राहावीं, आणि तीं कदाचित् या गुहांमध्यें राहात असलीं तरी निरपराध व शुद्ध मनाच्या मनुष्यांस पीडा करण्याची इच्छा व शक्ति त्यांस कां असावी, याचें कारण कांहीं दिसत नाहीं. आपण या गुहांमध्यें गेल्यानें पिशाच्चांस कांहीं उपद्रव करतों, किंवा त्यांचें कांहीं नेतों, असा अर्थ नाहीं; मग आपणांवर त्यांस रुष्ट होण्याची काय गरज आहे बरें ? "

राजकन्या आपल्या सखीचें शांतवन करून व तिला धीर देऊन म्हणाली, " अगे वेडे, तूं भितेस कां ? मी तुझ्यापुढें चालत्यें व इम्लाक कवि तुझ्या मागून चालेल. असें केल्यावर तुला भय कशाचें ? अगे, तूं हबशी देशाच्या राजाच्या कन्येची सखी आहेस हें मनांत आण. असें भिणें तुला योग्य आहे काय?"

पेक्युआनें उत्तर केलें, " ताईसाहेब, मी आपली दासी खरी आणि आपली मर्जी असल्यास मी मरायास सुद्धां खुषी आहे. परंतु असल्या भयंकर अंधाराच्या गुहेंत गुदमरून मरण्याविषयीं आपण मला आग्रह करूं नये. आपली दुसऱ्या रीतीनें मरण्याची मला आज्ञा झाल्यास मी तयार आहे. महाराज, आपण आज्ञाच कराल तर माझ्यानें ती मोडवणार नाहीं. हुकुमाप्रमाणें मी गुहेंत शिरेन. पण एक वेळ आंत गेलें असतां जिवंत मी परत येणार नाहीं, हें खचीत आहे. "

राजकन्येनें पाहिलें कीं, दासीस पराकाष्ठेची भीति वाटली आहे. तिला आग्रह करून किंवा समजुतीच्या गोष्टी सांगून कांहीं उपयोग नाहीं. मग ममतेनें तिला पोटाशीं धरून ती म्हणाली, ' बरें तर, मी तुला आंत येण्याविषयीं आग्रह करीत नाहीं. परत जा आणि आम्ही येऊं तोंपर्यंत तंबूत बसून ऐस. ' पेक्युआचें तशानेंही समाधान होईना. ती निकायाची पायधरणी करून म्हणूं लागली कीं, ताईसाहेब, मी पदर पसरून सांगत्यें येवढें ऐका. आणि त्या द्वाड भेसूर गुहेंत

जाऊं नका. राजकन्येने उत्तर केलें, 'अगे, आपल्या उपदेशानें मला तुझ्या आंगांत धीटपणा आणतां येत नाहीं हें खरें, तरी तुजपासून भ्याडपणा शिकणें मला योग्य नाहीं; तसेंच मी ज्या उद्देशानें इतक्या दूर आलें तो सोडणेंही मला फार अनुचित आहे.

---

# भाग बत्तिसावा.

## तीं मनोऱ्यांत गेलीं.

मग पेक्युआ खालीं उतरून तंबूंत येऊन बसली आणि राजपुत्र, राजकन्या व इम्लाक हीं पिरामिदाच्या गुहेंत शिरलीं. तीं सगळ्या सज्ज्यांवरून फिरलीं, संगमरवरी दगडांचीं थोर थोर घुमटें त्यांनीं पाहिलीं; तसेंच ती इमारत ज्यानें बांधिली त्याचें प्रेत तींत ठेविलें आहे, अशी गोष्ट सांगून एक पेटी तेथें दाखवीत असतात, ती ही त्यांनीं पाहिली; मग कांहीं वेळ एका मोठ्या दालनांत विसावा घेण्याकरितां तीं बसलीं असतां इम्लाक कवि म्हणतोः—

"या दुनियेंत मनुष्यानें जीं म्हणून कामें केलीं आहेत त्या सर्वांत अत्यंत मोठें जें हें काम तें बारकाईनें यथास्थित पाहून आज आपण आपली फार दिवसांची हौस पूर्ण केली. यापेक्षांही मोठें मानवी कृत्य म्हटलें म्हणजे एक राहिलें आहे तें कोणतें म्हणाल तर चीन देशांतील भिंत होय.

"आतां ती भिंत बांधण्याचें कारण समजण्यास फार सोपें आहे. तें असें कीं, चीन देशांतील संपत्तिमान् परंतु भित्रे लोक यांनीं आपल्या हद्दीपलीकडल्या अडाणी पण शूर लोकांच्या हल्ल्यांपासून आपला बचाव व्हावा, म्हणून ती भिंत बांधिली आहे. ते अडाणी लोक कलाकौशल्य जाणत नसल्यामुळें त्यांस उपयुक्त उद्योग करून आपला निर्वाह करण्याचें फार कठिण पडतें. त्यांस स्वतः मेहनत करून संपत्ति उत्पन्न करण्यापेक्षां दुसऱ्या उद्योगी लोकांनीं श्रम करून उत्पन्न केलेली संपत्ति मारहाण करून लुटण्याचें सोपें वाटतें. गिधाडें जशीं कोंबड्यांच्या घरट्यांवर धाड घालतात, तसे हे रानटी लोक आपल्या उद्योगी शेजाऱ्यांवर वेळोवेळ घाले घालून त्यांस लुटतात. या लुटारू लोकांच्या उपद्रवानें ती भिंत आवश्यक झाली व त्यांच्या अडाणीपणानें तीपासून उपयोगही झाला.

" परंतु पिरामिद बांधण्याचें कारण काढणें वरच्याप्रमाणें सोपें नाहीं. तें कशाकरतां बांधलें असावें, याविषयीं कल्पक लोक अनेक तर्क करतात, व आपल्या समजुतीप्रमाणें कारणें सांगतात; परंतु तीं चांगलीं समर्पक वाटत नाहींत. कोणी म्हणतात कीं, शत्रूंनीं प्रबळ होऊन पाठलाग केला असतां कांहीं वेळ लपून बसण्याकरितां या जागा केल्या. परंतु या जागा त्या कामास संकुचित असल्यामुळें तें कारण जमत नाहीं. कोणी तर्क करतात कीं, द्रव्य लपवून ठेवण्याकरितां हीं ठिकाणें केलेलीं असावीं; परंतु तो उद्देश असता तर इतक्याच बंदोबस्तानें ती गोष्ट कमी खर्चानें करतां येती. तर वास्तविक असें दिसतें कीं, कांहीं तरी अचाट कृत्य करावें, तें करावयास असल्यावांचून चैन पडत नाहीं, असा कांहीं मनुष्यांचा स्वभाव असतो; तसली इच्छा तृप्त करण्यासाठीं बांधणारांनीं या इमारती बांधल्या आहेत. स्वतांच्या उपयोगास व सुखास जें पाहिजे तें सर्व अनुकूळ ज्यांस आहे तेही कृत्रिम उपायांनीं आपल्या इच्छा वाढवितात. मनुष्याची इमारती बांधण्याविषयीं प्रथम प्रवृत्ति उपयोगासाठीं होते खरी, परंतु तो उपयोग परिपूर्ण झाला तरी त्याचा बांधण्याचा नाद सुटत नाहीं. तो मग डामडौलाकरितां कामें बांधूं लागतो, व अशा अचाट कामांचे बेत धरतो कीं, त्याची सर्व शक्ति तिकडे खर्च व्हावी व तें काम संपल्यामुळें नवीन कृत्य करण्याकरितां योजण्याची त्यास गरज पडूं नये.

" या मिसरी जुनाट मनोऱ्याकडे पाहिलें म्हणजे मला असें वाटतें कीं, संसारांतील सुखें मनुष्याच्या मनास तृप्त करण्यास अगदीं अपुरतीं आहेत–या सिद्धांताचे हे मनोरे एक ढळढळीत व सबळ प्रमाण होत. ज्याची सत्ता व पराक्रम अमर्याद व वास्तविक कृत्रिम इच्छा तृप्त करून उरेशी ज्याची अपार संपत्ति, असा एकदा राजा राजसत्ता चालवून व पराक्रम करून कंटाळला असावा व सर्व प्रकारचीं ऐहिक सुखें उपभोगून त्या सुखास विटला असावा; आणि त्यानें उतार वयांत आपल्या खिन्न मनास कांहीं तरी अचाट कृत्यें काढून रिझवावें, अशा उद्देशानें हजारों मजुरांस कामास लावून कांहीं विशेष हेतु न धरतां केवळ कांहीं तरी उद्योग व्हावा एवढ्याच इरायानें या पर्वतप्राय इमारती रचल्या असाव्या, अशी माझी समजूत आहे. याखेरीज या अवाढव्य इमारती बांधण्याचा दुसरा कांहींएक उद्देश दिसत नाहीं. जो कोणी आपल्या नेमस्त स्थितीचा असंतोष मानून राजाच्या ऐश्वर्यांत मोठें सुख आहे, असें मानीत असेल व अमर्याद सत्ता

व अपार संपत्ति हीं असलीं म्हणजे त्यांच्या योगानें अक्षय आनंदांत काळ जातो असें ज्यास वाटत असेल, त्यानें या मिसरी जुनाट मनोऱ्यांकडे पाहून आपली समजूत केवळ भ्रांति आहे, असें समजावें."

---

# भाग तेहेतिसावा.

## राजकन्येस संकट प्राप्त झालें.

नंतर त्या ठिकाणाहून उठून तीं पूर्वीच्या आंधारी वाटेनें गुहेंतून बाहेर पडून खालीं उतरूं लागलीं. परत येत असतां राजकन्या आपल्या सखीस सांगण्याकरितां गुहेंत पाहिलेल्या चमत्कारांची संगतवार हकीकत मनांत जुळून तयार करीत होती, व ती सांगून त्या वेड्या भित्र्या पोरीची मस्करी करण्याचें तिच्या मनांत फार होतें. परंतु तीं खालीं तंबूंत येऊन पाहातात तों यांचीं सर्व चाकर मनुष्यें खिन्न व उदास बसलीं आहेत, पुरुष मंडळीचीं लाजेनें व भयानें तोंडें उतरून गेलीं आहेत, व बायका मुळमुळू रडताहेत, असें त्यांच्या दृष्टीस पडलें.

मग झालें काय म्हणून शोध करतां एका चाकरानें सांगितलें कीं," महाराज, आपण मनोऱ्यांवर चढून गुहेंत शिरलां असाल किंवा नसाल इतक्यांत चोरट्या अरबांची एक टोळी आम्हांवर येऊन पडली. आम्ही थोडेजण असल्यामुळें आम्हांस त्यांशीं लढवेना. ते तंबूंत शिरले आणि सर्व लुटून व आम्हांस कैद करून घेऊन जाणार, इतक्यांत तुर्की घोडेस्वारांची एक टोळी दैववशात् अकस्मात् तेथें आली. ती पाहून ते चोरटे अरब तसेच घाईनें पळाले. परंतु जातां जातां त्यांनीं पेक्युआबाई व दुसऱ्या दोन दासी उंटावर चालून बरोबर नेल्या; आमच्या चिथावणीवरून तुर्की घोडेस्वार त्यांचा पाठलाग करीत गेले आहेत, परंतु त्यांस ते सांपडण्याची आशा वाटत नाहीं."

हें वर्तमान ऐकून राजकन्येस फारच दुःख झालें. व राजपुत्रासही आपला मोठा अपमान झालासें वाटून रागाच्या झपाट्यांत त्यानें स्वतः त्या चोरट्यांचा पाठलाग करण्याचा बेत करून आपल्या चाकरांस तयार होण्यास हुकूम केला. परंतु या प्रसंगीं इम्लाक कवि त्यास म्हणालाः—"महाराज, तुम्ही जिवाचा संताप केल्यापासून व तुमच्या शौर्यापासून या प्रसंगीं काय नफा होईलसें आप-

णांस वाटते ? पहा, अरब लोक लढावयास किंवा पळून जाण्यास शिकविलेल्या घोड्यावर आहेत आणि आपणांस बसावयास केवळ ओझ्यांचीं जनावरें आहेत. तेव्हां आपण त्यांचा पाठलाग करून काय होणार आहे ? आपण येथून गेलों असतां राजकन्या मात्र कदाचित् गमावूं; परंतु पेक्युआ मिळण्याचा संभव काडीभरही मला दिसत नाहीं."

इतक्यांत चोरट्या अरबांचा पाठलाग करावयास गेलेले तुर्की स्वार परत आले, आणि म्हणाले कीं, आम्ही दूरवर दवड केली, पण ते चोरटे आम्हांस सांपडले नाहींत. हें ऐकून राजकन्येस अत्यंत दुःख होऊन ती फारच शोक करूं लागली. राजपुत्र रासेलसही हिरमुष्टी होऊन 'अरे! तुम्ही अगदी भ्याड व नादान दिसतां' अशा त्या स्वारांस शिव्या देण्याच्या रंगांत आला होता. पण इम्लाक कवि म्हणाला कीं, तुर्की स्वारास चोरटे भेटले नाहींत ही गोष्ट फारशी वाईट झाली, असें मला वाटत नाहीं; कारण मला वाटतें कीं, जर ते चोरटे सांपडते तर ते दुष्ट लोक धरलेल्या कैदी माणसांस न सोडतां बहुतकरून त्यांचा जीव घेते. तर तो अनर्थ टळला हें बरेंच झालें.

---

# भाग चौतिसावा.

## तीं पेक्युआ दासीवांचून केरो शहरास परत आलीं.

मग त्या ठिकाणीं अधिक वेळ राहून कांहीं नफा नसल्यामुळें तीं केरो शहरास परत वळलीं. परत येत असतां अनेक प्रकारचे विचार त्यांच्या मनांत आले. कोणी म्हणाले कीं, आपण वेड्या हौसेच्या नादीं भरून हे मनोरे पहावयास आलों हें बरोबर केलें नाहीं. ज्या सरकारच्या अमलांत असे दिवसाचे दरवडे पडतात व माणसें धरलीं जातात, तें सरकारच खराब व दुष्ट, असें कोणी सरकारास दोष देऊं लागलीं. बरोबर संरक्षणार्थ शिपाई व स्वार घेण्याची आपण हयगय केली हा आपलाच मूर्खपणा, असा कोणी आपणांस टपका ठेवूं लागलीं. तसेंच अमुक तजवीज केली असती तर असा अनर्थ न गुदरता, अशी गोष्ट घडून गेल्यावर सुचणारी पोकळ कल्पना कोणी करूं लागलीं; व सर्वांनीं असा निश्चय केला कीं, पेक्युआ हीस कांहीतरी युक्ति करून शोधून खचीत सोडून आणावयाची; परंतु ती गोष्ट करावी कशी याबद्दल कोणास समर्पक युक्ति सुचेना.

याप्रमाणें बोलत बोलत तीं घरीं येऊन पोहोंचल्यावर राजकन्या आपल्या महालांत गेली. तेथें तिच्या दासी तिचें शांतवन करूं लागल्या. त्या म्हणाल्या, " बाईसाहेब, मनुष्यमात्रास बरेवाईट दिवस आहेतच. चार दिवस सुखाचे व चार दुःखाचे सर्वांस भोगावे लागतात. पेक्युआनें बहुत दिवस सुखाचे अनुभवले, तेव्हां आतां कांहीं थोडें संकट भोगण्याचें आल्यास कांहीं नवल नाहीं. ती कोठें असली तरी तिचें परिणामीं कल्याणच होईल, असें आम्हांस वाटतें; कारण ईश्वरसंकेतानें ज्या गोष्टी घडतात त्या आरंभीं कडू वाटल्यास तरी त्यांचा शेवट गोडच होतो. बाईसाहेब, आणखी आम्ही सांगतों कीं, पेक्युआ गेली म्हणून काय झालें ? आपणांस दुसरी सोबतीण सहज मिळेल."

राजकन्येनें कांहीं एक उत्तर केलें नाहीं. तथापि त्यांनीं समजावणीचें भाषण चालविलेंच होतें. वास्तविक म्हटलें म्हणजे पेक्युआ गेल्याबद्दल त्यांस कांहींच वाटलें नव्हतें. राणीची ती आवडती असल्यामुळें तिचा त्या हेवाच करीत होत्या. व ती गेल्यानें त्यांस मनांत उलटें समाधान वाटलें.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं राजपुत्रानें तेथील मुख्य अंमलदारास याद लिहून झालेलें नुकसान कळवलें. व दाद लावण्याविषयीं अर्ज केला. त्या अंमलदारानें याद वाचल्याबरोबर चोरट्यांवर रागावलेंसें दाखवून त्या दुष्टांचा शोध करून त्यांस जबर शिक्षा करतों असें सांगितलें. परंतु वास्तविक पाहतां त्यानें त्यांस पकडण्याविषयीं काडीइतका सुद्धां यत्न केला नाहीं. खरोखरीच म्हटलें तर चोरट्यांच्या खाणाखुणा अगर रहाण्याची जागा वगैरे कोणास कांहींच ठाऊक नसल्यामुळें त्यांचा शोध करणें अशक्यच होतें.

पुढें लवकरच दिसून आलें कीं, अंमलदारांच्या हातून कांहीं दाद लागत नाहीं. त्यांस जितक्यांस शिक्षा करण्याचें सामर्थ्य असतें तितक्यांपेक्षां अधिक गुन्हे त्यांच्या कानीं येऊं लागले, व त्यांस ज्यांची दाद लागत नाहीं असे अन्याय घडूं लागले, म्हणजे अधिकारी कोणत्याच गुन्ह्याकडे लक्ष न देतां स्वस्थ बसूं लागतात, व अर्जदार डोळ्यांआड झाले म्हणजे त्यांचे अर्ज विसरतात.

नंतर पेक्युआचा शोध लावण्याविषयीं इम्लाक यानें अंतस्थ रीतीनें खटपट चालविली. त्यास लौकरच कितीएक लोक भेटले; व ते म्हणाले कीं, "आम्हांस चोरट्या अरबांच्या प्रत्येक टोळीचा ठावठिकाण बरोबर माहीत आहे, व त्या सर्व टोळ्यांतील मुख्य लोकांशीं आमचा सदोदित व्यवहार चालतो. तर तुम्हीं

कांहीं खर्च केल्यास तुमची दासी आम्ही सहज आणून देऊं." या लोकांपैकीं कितीएक लुच्चे लोक वाटखर्चाकरितां म्हणून बराच पैसा घेऊन जे निघून गेले ते पुनः परत आले नाहींत. दुसऱ्या कितीएकांनीं अनेक बातम्या सांगून पुष्कळ पैसा उपटला, परंतु त्या बातम्यांपैकीं एक शब्दही खरा नव्हता. असें झालें तरी राजकन्येनें आपल्या दासीचा शोध करण्याचा नाद सोडला नाहीं. कोणी उपाय सांगितला, व तो कितीही असंभवी दिसला तरी तो ती करून पाही. याप्रमाणें नेहमीं त्या नादांत राहून तिनें पेक्युआ सांपडण्याची आशा जाऊं दिली नाहीं. एक तजवीज फसली नाहीं तो दुसरी कोणी तरी सुचवीच; एक जासूद एकीकडून व्यर्थ हेलपाटा घेऊन परत येत आहे तों दुसरा जासूद दुसरीकडे ती पाठवी.

याप्रमाणें खटपट चालली असतां दोन महिने लोटले, परंतु पेक्युआचा कांहीं एक शोध लागेना. ती आज न उमगली तर उद्यां उमगेल, याप्रमाणें तीं एकमेकांस उमेद देत असत. परंतु कांहींच थांग लागेना तेव्हां त्यांची उमेद होत होत कमी होऊं लागली. अशी चोहोंकडून निराशा झाली; कोणताही इलाज चालेना; तेव्हां राजकन्येची उमेद अगदीं खचून ती फारच कष्टी झाली व फार शोक करूं लागली. ती म्हणाली, "मी मूर्खपणानें त्या पोरीस परत कां बरें जाऊं दिलें? मी दृढनिश्चय करून तिला आंत घेऊन जात्यें तर आज हा अनर्थ कशास येता? मी तिचा लाड न करत्यें तर तिच्यानें माझी आज्ञा न मोडवती व भुतांपेक्षां माझा धाक तिला अधिक वाटता. मीं रागावून एक वेळ तिजकडे पाहिलें असतें तर ती लागलींच मीं सांगितल्याप्रमाणें वागण्यास कबूल झाली असती. मी मूर्ख कां बरें बोलल्यें नाहीं? त्या अज्ञान वेड्या पोरीचें बोलणें म्यां कां ऐकिलें?"

हें तिचें भाषण ऐकून इम्लाक म्हणाला, "बाईसाहेब, तुमच्या सद्गुणांपासून दुर्दैवानें असा दुःखकारक परिणाम उत्पन्न झाला एवढ्यावरून त्या सद्गुणांस दुर्गुण समजूं नका, व त्या सद्गुणाबद्दल स्वतः आपणांस नांव ठेवूं नका. पेक्युआच्या भित्रेपणामुळें तिची दया आपणांस जी आली ती आपली मनोवृत्ति स्तुत्य व उदारपणाचीच समजली पाहिजे, तो आपला दोष नव्हे. आपण योग्य रीतीनें वागलें असतां त्या वागण्यापासून जे परिणाम होतात त्यांची जबाबदारी आपणाकडे नाहीं; ज्यानें आपणास वागण्याचे नियम घालून दिले

आहेत, व जो आपण लावून दिलेल्या नियमांस अनुसरून वागणारांस परिणामीं कधीं दुःख होऊं देत नाहीं, त्या ईश्वराकडे आहे. त्यानें लावून दिलेल्या नियमांस मोडून एकादें सुख मिळविण्याचा आपण यत्न करूं लागलों असतां आपणांपेक्षां अनंतपट अधिक ज्याचें शहाणपण त्यानें पसंत केलेला मार्ग सोडला व आपल्या क्षुल्लक शहाणपणाचा दिमाख त्याच्या अगाध चातुर्यापुढें चालविला असें होतें; व त्या वागण्याची सर्व जबाबदारी आपल्या माथ्यावर आपण घेतों. मनुष्यास सृष्टींतील कार्यकारणभावांचें इतकें ज्ञान नाहीं कीं, त्यानें अयोग्य मार्गानें योग्य गोष्ट सिद्ध करण्यास धजावें. आपण योग्य रीतीनें जेव्हां वागत असतों, तेव्हां त्या वागण्यापासून आपलें नुकसान झालें तरी आपण यथायोग्य वागलों आहों, तेव्हां परिणामीं देव आपलें कल्याणच करील अशी आपली खातरी असते, व तिच्या योगानें जिवास समाधान असतें. परंतु जर आपण आपल्याच शहाणपणाच्या जोरावर वागूं लागलों आणि योग्य आचरण, व अयोग्य आचरण यांतील भेद न जुमानून अयोग्य रीतीनें आपलें कल्याण करून घेण्याचा यत्न चालविला, तर तो सिद्धीस गेला तरी आपणांस सुख व्हावयाचें नाहीं. कारण आपण अयोग्य रीतीनें वागून ईश्वराचा अपराध केला ही गोष्ट सर्वकाळ आपल्या जिवास खाईल. आणि वर सांगितलेला यत्न फसला, तर आपणांस दुहेरी दुःख सोसावें लागेल. यत्न सफळ न झाल्यामुळें निराशेचें दुःख पहिलें, व अयोग्य मार्ग स्वीकारल्यानें ईश्वराची आज्ञा मोडली, हा तीव्र पश्चात्ताप, हें दुसरें दुःख."

इम्लाक कवि म्हणतो "राजकन्ये, तूंच मनांत आण कीं, पेक्युआचे मनांत आंतून पहावयास यावयाचें असतें आणि तूं आपल्या हुकुमाच्या जोरानें तिला तंबूंत राहिल्यावर तेथून तिला चोरट्यांनीं कैद करून नेली असती; किंवा तूं जबरीनें तिला मनोऱ्यांत नेत असतां ती भयानें तुझ्या डोळ्यांपुढें प्राण सोडती, तर मग तुला किती बरें दुःख व पश्चात्ताप हीं झालीं असतीं !"

राजकन्येनें उत्तर केलें, "महाराज, तसें झालें असतें तर मी आजपर्यंत वांचल्येंच नसत्यें. त्या माझ्या निर्दयपणाची आठवण मला वारंवार होऊन वेड लागतें किंवा माझा मला तिटकारा येऊन मी पश्चात्तापाच्या वेदनांनीं झुरून मरत्यें."

इम्लाक म्हणाला, "बरें तर, तूं तिजवर दया करून जुलूम केला नाहींस, या तुझ्या सदाचरणाचें तूर्त इतकें खचित फळ आलें कीं, या घडलेल्या हानीबद्दल तुझें मन तुला जाचीत नाहीं, हें फळ कांहीं लहान नव्हे !"

---

# भाग पस्तिसावा.

## राजकन्या सखीच्या वियोगामुळें झुरूं लागली.

कांहीं वेळ लोटल्यावर राजकन्येचा तो सखीचा वियोग आंगवळणीं पडला; व ती हानि तिच्या अपराधानें घडली नसल्यामुळें तिच्या योगानें होणारें दुःख तिला सहन होऊं लागलें. तिला सोबतिणीची वारंवार आठवण होऊन खिन्नता नेहमी येई; परंतु पूर्वी दुःखानें जीव अगदीं कासावीस होत असे, तसा तो होई-नासा झाला. सकाळपासून संध्याकाळपर्यंत ती पेक्युआनें केलेल्या व बोललेल्या गोष्टींची आठवण काढीत उगीच उदासवाणी बसे व त्या गोष्टी मनांत घोळी. तिला वाटे कीं, आतां आपली व तिची या जन्मांत गांठ पडत नाहीं, ती आप-णास मेली आणि असें समजून तिचीं भाषणें व तिचे बुद्धिवाद वारंवार आठवी, व माझी पेक्युआ या प्रसंगीं मला काय मसलत देती व मला काय करावयास सांगती, असा प्रत्येक क्षुल्लक प्रसंगींही तर्क करीत बसे.

पेक्युआविषयीचें तिच्या मनांतील प्रेम तिच्या दुसऱ्या दासीस ठाऊक नव्हतें व त्या पेक्युआचा हेवा करीत; यास्तव ती त्यांपाशीं मन मोकळें करून बोलत नसे. आतां मनांतील गोष्टी उघडपणें सांगून भाषणसुख अनुभवण्यास कोणी सखी नसल्यामुळें तिला नवीन विषय पाहून ज्ञान संपादण्याची पहिल्यासारखी हौस नाहींशी झाली. या वेळीं रासेलस तिचे मनास करमणूक करण्याविषयीं झटत असे. त्यानें गवई लोक बोलावून गाणें करावें, परंतु ती तें ऐकत बसली तरी तिचें चित्त त्याकडे असूं नये. तसेंच तिला अनेक कला शिकविण्याकरितां कितीएक शिक्षक ठेवून दिले, त्याजवळ ती शिकत बसे; परंतु तिचें मन तिकडे नसल्यामुळें काल शिकविलेला धडा पुनः नव्याप्रमाणें आज शिकवावा लागे. तिला कोणचेंच सुख गोड लागेना, व अमुक गोष्ट करून घ्यावी, असा मनास उल्हास येईना. आग्रहामुळें ती अनेक मनोरंजक विषयांकडे चित्त लावी, परंतु तें पुनः पुनः त्यांविषयीं कंटाळून पेक्युआच्या विरहाकडे वळे.

ती दररोज सकाळीं इम्लाक कवीस सांगे कीं, " महाराज, आपण माझ्या पेक्युआचा शोध लावण्याविषयीं होईल तितकी खटपट करावी. तिळमात्रही कसर

अनुक्रम ३००५८
विभाग का.वा.
क्रमांक २२९

करूं नये, व कितीही खर्च झाला तरी मागें घेऊं नये.” तसेंच [illegible] संध्या-काळीं तो घरीं आला म्हणजे ‘आज काय केलें, कांहीं पत्ता लागला कीं नाहीं’ म्हणून नित्य विचारी.’ याप्रमाणें नित्य काम चालल्यामुळें व [illegible] समाधान होईल अशी बातमी त्यास सांगावयास नसल्यामुळें दररोज कांहीं थांग लागला नाहीं, असें खेदकारक उत्तर देण्यास तो कंटाळला व तिच्याकडे तो जाण्यास अळंटळं करूं लागला. ती त्याची वृत्ति तिच्या मनांत येऊन तिनें त्यास एक दिवस बोलावून आणिलें, आणि त्यास म्हणाली, “ महाराज, तुम्ही आतांशा मजकडे येऊन कांहींच वर्तमान कळवीत नाहीं, असें कां करितां ? मला गोड लागेल असें वर्तमान तुम्हांस लागत नाहीं यावरून मी तुम्हांवर रागावल्यें किंवा तुम्ही हयगय करतां असें समजत्यें. असें तुम्हांस वाटत असल्यास ती तुमची चूक आहे. मला तसें कांहीं एक वाटत नाहीं. माझ्या दुःखानें मी झुरत्यें त्याबद्दल तुमच्यावर माझा काडीमात्र टपका नाहीं. पण महाराज, तुम्ही पहिल्याप्रमाणें आतांशा मजकडे येत नाहीं याचेंही मला एका प्रकारें नवल वाटण्याची गरज नाहीं. दुःखी माणसाजवळ बसावयास कोणासही रुचत नाहीं; सर्व त्याचा सह-वास टाळतात. याचें कारण उघडच आहे. दुसऱ्याच्या दुःखाची कर्मकटकट ऐकल्यापासून स्वतः जो दुःखी आहे त्यास सुद्धां त्रास येतो, मग तसा नाहीं त्यास त्रास येईल यांत काय चमत्कार आहे ? या संसारांत सुखाचा काळ फारच थोडा आहे; तेव्हां त्या थोड्या काळाचा लोकांचीं दुःखें ऐकून कोण विरस करूं इच्छील ? ज्याचें त्यास दुःख थोडें आहे काय म्हणून त्यानें दुस-ऱ्याच्या दुःखाचा आणखी वांटा उचलावा ?

“ पण कविराज, निकायेचें रडगाणें कोणासही ऐकावयास नको अशी वेळ लौकरच येईल. ती आतां फार दूर नाहीं. मला या संसारांत सुखाची आशा राहिली नाहीं. मला या संसारांतील खोट्या सुखांचा व त्यांच्या आशेनें जिवास फसविण्याचा कंटाळा आला आहे, व मीं असा बेत योजला आहे कीं, सर्वसंग सोडून कोठें तरी एकाद्या अप्रसिद्ध मठांत जाऊन रहावें; व तेथें वेळ जाण्याकरितां कांहीं धर्मकृत्यें किंवा परोपकाराचीं कृत्यें करावीं; तसेंच मनांतील विषयवासना जिंकून आणि चित्त पवित्र करून परलोकचें साधन करावें; कीं, जेथें अखंड सुख प्राप्त होतें व जेथें माझ्या प्रिय पेक्युआचा अखंड समागम प्राप्त होईल अशी मला पूर्ण आशा आहे. ”

इम्लाक कवीनें उत्तर केलें, " बाई, दृढ निश्चयांनीं आपणास उगीच बांधून घेऊं नको, व आपल्या कृतीनें नवीन दुःखें उत्पन्न करून आपल्या जिवाची पीडा वाढवूं नको. पेक्युआची तुला विस्मृति पडली म्हणजे एकांतवासाचा कंटाळा येऊं लागेल. तूं सोबतिणीच्या सहवासास अंतरशील खरी; परंतु एक सुख गमावलें हें व जीं दुसरीं सुखें अनुकूल आहेत तींही टाकण्यास मोठें समर्पक कारण दिसत नाहीं ! "

राजकन्या म्हणाली, " जेव्हां पेक्युआ मला नाहींशी झाली तेव्हांपासून टाकावयास किंवा राखावयास मजपाशीं सुखच मुळीं राहिलें नाहीं. जिला प्रीति करण्यास किंवा विश्वास ठेवण्यास कोणी राहिलें नाहीं, तिला आशा करावयास काय उरलें आहे ? व जिचें सर्वस्व गमावलें तिला पुढें अधिक गमावण्याची कसली भीति आहे ? ही गोष्ट सर्वांनीं मान्य केली पाहिजे. कीं, या जगांत मनुष्यास जें थोडेंबहुत सुख प्राप्त होतें तें संपत्ति, ज्ञान व सदाचरण हीं त्याजवळ असल्यानें होतें; पण संपत्ति खर्चिल्याशिवाय तिचा उपयोग नाहीं व ज्ञान दुसऱ्यास दिल्यावांचून व्यर्थ आहे. तेव्हां संपत्ति व ज्ञान यांपासून सुख होण्यास दुसऱ्याची अपेक्षा आहे. पण तीं मीं कोणास द्यावीं ? सदाचरणापासून सुख होण्यास मात्र इतरांची गरज नाहीं; पण सदाचरण एकांतांतही करितां येतें, त्यांस लोकांत राहण्याची काय गरज आहे ? "

इम्लाक म्हणाला, " बाई, सदाचरण एकांतवासांत घडतें कीं नाहीं याचा तूर्त मी विचार करीत नाहीं. एकांतवासाचा अनुभव घेणाऱ्या जोग्यानें काय गोष्टी कबूल केल्या हें तुला आठवत असेलच. मला खचित वाटतें कीं, पेक्युआचा तुला विसर पडला म्हणजे तुला एकांतवासाचा वीट येईल; व लोकांत पुनः वागण्याची जोग्याप्रमाणें उत्कंठा होईल यांत संशय नाहीं. "

निकाया म्हणाली, " ती गोष्ट कधीं होणें नाहीं. मी या जगांतील दुर्गुण व मूर्खपणा जितके पाहीन तितकी तितकी मला माझ्या पेक्युआचा उदारपणा व मनाचा भोळेपणा, तिचा भिडस्तपणा व मनमिळाऊपणा, तिचा इमानीपणा व गुप्त गोष्टी राखण्याचें सामर्थ्य, या अप्रतिम सद्गुणांची अधिक अधिक आठवण होईल, व अशी मैत्रीण गमावल्याचें अधिक अधिक दुःखच होईल. "

इम्लाक म्हणाला, "बाई, ज्यावर एकाएकीं एकादा अनर्थ गुदरतो त्याच्या मनाची स्थिति कशी असते म्हणशील, तर अशी कल्पना कर कीं, पृथ्वी नुकती

उत्पन्न झाली आहे व तिच्यावरील लोकांस रात्र व दिवस नियमित वेळानें येतात हें अनुभव नसल्यामुळें कळलें नाहीं; आणि तशा लोकांना दिवस जाऊन प्रथमच रात्र पाहिली असतां त्यांच्या मनाची स्थिति, ही वरच्या स्थितीस उत्तम उपमा आहे. त्या लोकांस असें वाटलें असेल कीं, आतां आम्ही अक्षय काळोखांत बुडालों; आतां इतःपर आम्हांस उजेड दिसणें नाहीं. तसें एकाएकीं मोठें दुःख ज्यावर गुदरतें त्यास त्या दुःखाच्या काहुरापलीकडे कांहींच दिसत नाहीं व तें काहूर जाण्याचा संभवसुद्धां त्यांच्या मनांत येत नाहीं. तथापि त्या दृष्टांतांतील लोकांस नियमित काळानें काळोख जाऊन पुनः उजेड मिळतो, तसेंच दुःखा-मागून सुख आल्यावांचून कदापि राहात नाहीं. परंतु जे कोणी दुःखाच्या भरांत आपणांस कधींही आतां सुख होणें नाहीं असें समजून भावी सुखाच्या साधनाचा नाश करितात ते दृष्टांतांतील अज्ञान मनुष्यांनीं आतां पुढें आपणांस उजेड प्राप्त होणें नाहीं, आतां आपणांस डोळ्यांचा काय उपयोग आहे, असें समजून ते फोडून टाकिले, तर जसा त्यांचा मूर्खपणा झाला असता, तसा मूर्खपणा करितात. आपलीं शरीरें जशीं सदोदित बदलत असतात म्हणजे त्यांतील जुने भाग नष्ट होऊन नवीन भाग त्यांत येतात, त्याचप्रमाणें आपल्या मनाचीही स्थिति आहे. त्यांतून म्हणजे आपल्या मनांतून प्रत्येक क्षणीं कांहीं समजुती व वासना जात असतात, व नवीन येत असतात. शरीरांतील किंवा मनातील मोठा अंश एकदम जाईल तर त्यापासून इजा होईल. तर तसें होत नाहीं; पण सूक्ष्म रीतीनें बदल चालू असते, व ती सूक्ष्म रीतीनें थोडी थोडी चालत असल्यामुळें अनुभवास येत नाहीं व लक्षांत येत नाहीं. मनाच्या समजुतींत व वासनांतही अशींच सूक्ष्म रीतीनें बदल होत असते. तसें दूरत्वाचा जसा डोळ्यावर परिणाम आहे तसा मनावरही आहे. कालरूप मोठ्या नदीच्या प्रवाहावरून आपण वाहत चाललों असतां जो जो विषय मागें पडतो त्याचें त्याचें महत्त्व कमी होत जातें, व जो पुढला विषय जवळ येतो तो तो मोठा वाटूं लागतो. तर एकांतीं बसून व लोकांत हिंडण्याफिरण्याचें सोडून आपल्या मनास नसती पीडा कां करून घेत्येस? चौघांत जाऊं येऊं लागलीस म्हणजे मनास करमणूक होऊन पेक्युआचा पडत पडत विसर खचित पडेल. तिच्यासारखी तुझ्या मनास आवडणारी एकादी सोबतीणही तुला कदाचित् सांपडेल, नाहीं कशावरून म्हणतेस ?"

आपलें भाषण तिच्या मनांत पुरें ठसलें नाहीं असें पाहून तो तीस पुनः म्हणाला, "बाई, निदान इतकें तरी ऐक कीं, सर्व उपाय संपले, असें झाल्यावांचून तरी तूं निराश होऊं नको. त्या बापड्या तुझ्या पेक्युआविषयीं अद्यापि तजविजी चालल्या आहेत, व याहीपेक्षां आम्ही अधिक झटून मेहनत करूं. परंतु तुला मात्र आम्हांला असें वचन दिलें पाहिजे कीं, मी एक वर्ष वाट पाहीन व वर्ष लोटल्यावर संसार सोडून जोग घेण्याचा विचार करीन."

राजकन्येस ही अट सयुक्तिक वाटून तिनें तसें करण्याविषयीं वचन दिलें. पेक्युआ सांपडण्याविषयीं इम्लाक यास फार आशा नव्हती खरी, तरी त्यास असें वाटत होतें कीं, एक वर्ष लोटलें असतां राजकन्येला पेक्युआचा खचित विसर पडेल, व संसार सोडून वैराग्य घेण्याची तिची इच्छा निःसंशय नाहींशी होईल.

---

# भाग छत्तिसावा.

राजकन्येनें 'मी एक वर्षपर्यंत जोग घेण्याचें तहकूब करत्यें,' असें वचन दिल्यावरून, व इम्लाक कवि आणि राजपुत्र यांनीं कबूल केल्याप्रमाणें तिची प्रियसखी जी पेक्युआ हिचा शोध लावण्याविषयीं मोठी खटपट चालविल्यावरून ती राजकन्या अगदींच एकांतीं बसून रात्रंदिवस सखी गमावल्याबद्दल खेद करीत होती, ती थोडथोडी चौघांत बसूंबोलूं व हसूंखेळूं लागली. असें करूं लागल्यानें तिचा शोक तिला न कळत हळूहळू कमी होऊं लागला. तथापि आपल्या त्या प्रिय सखीविषयींचें दुःख कमी होईल असें तिला वाटत नव्हतें, व तें कमी होण्याविषयीं तिची खुषीही नव्हती; यामुळें, जिला कधींही मी विसरावयाची नाहीं असा तिचा निश्चय होता, त्या पेक्युआचा कांहीं वेळ विसर पडून तिचें चित्त एकाददुसऱ्या गोष्टीकडे जडेल असें जेव्हां तिला आढळे, तेव्हां ती स्वतः आपणावर फारच रागावे, व मी किती अधम आहें, अशा आपणास शिव्या देई.

कांहीं दिवसांनीं तिनें दिवसांतून कांहीं तास ठरवून त्या वेळीं दररोज एकीकडे बसून पेक्युआचे गुण आठवावे व ती गमावल्याबद्दल शोक करीत बसावें. त्या नियमित वेळीं ती आपल्या खोलींतून बाहेर आली म्हणजे रडल्यानें तिचे डोळे लाल झालेले व तिची मुद्रा म्लान झालेली दिसे. असा क्रम कांहीं आठवडेपर्यंत

चालला. कधीं विशेष निकडीचें काम आलें म्हणजे नेमलेला शोक करण्याचा तास टळे. पुढें निकडीच्या कामामुळें जी अळंटळं होत असे ती सरासरी कामाकरितांही होऊं लागली. कांहीं काळानें त्या शोक करण्याच्या कृत्याचा मुळींच विसर पडूं लागला, व कांहीं महिने लोटल्यावर नियमित वेळीं शोक करण्याचा क्रम अगदींच नाहींसा झाला.

असें झालें तरी पेक्युआविषयींचें तिच्या मनांतील वास्तविक प्रेम व खरा मित्रभाव हीं काडीमात्रही कमी झालीं नव्हतीं. तिची तिला शेंकडों कारणांनीं आठवण होई; व खऱ्या मित्रत्वाची गरज जेथें आहे असे शेंकडों प्रसंग जेव्हां येत, तेव्हां तिला पेक्युआ गमावल्याबद्दल फारच हळहळ वाटे. ती इम्लाक कवीला नेहमीं असें सांगे कीं, "महाराज, तुमच्या हातून होईल तितकी तजवीज करून पेक्युआचा शोध काढा. या कामांत पैसा खर्चण्याविषयीं व मेहनत करण्याविषयीं कसर करूं नका. असें अमोल माणूस पुनः प्राप्त होणें ईश्वराधीन आहे; तथापि आपल्याकडून व्हावयाजोगा हरएक यत्न आपण केला, आपल्याकडून हयगय झाली नाहीं, इतकें तरी समाधान मला सर्वदा वाटेल असें करा. महाराज, पण आम्ही वास्तविक सुख कोठें आहे याचा शोध लावण्यास निघालों, आणि त्या शोधाअंतीं काय निष्पन्न झालें बरें? मला खचित वाटतें कीं, वास्तविक सुख या जगांत नाहीं! पहा, या जगांतील स्थिति अशी दिसते कीं, अत्यंत सुख देणारे जे विषय तेच अत्यंत दुःख देण्यास कारण होतात! तर जे आपणाजवळ सतत राहण्याची निश्चिति नाहीं, ते विषय संपादून आपल्या भावी दुःखाचा पाया आपण आपल्याच हातांनीं कशास घालावा? महाराज, यापुढें कितीही उत्तम गुण दृष्टीस पडले व कितीही दयाळू स्वभाव आढळला, तरी मी तर त्यावर चित्त बसूं देणार नाहीं. कारण, तसें करण्यानें माझी पेक्युआ गमावून मला जसें दुःख झालें तसें पुनः कशावरून नाहीं होणार?"

---

# भाग सदतिसावा.

## पेक्युआची बातमी लागली.

राजकन्येपासून वचन घेतल्यानंतर जे जासूद पेक्युआच्या शोधाकरितां चोहोंकडे पाठवले होते, त्यांपैकीं एक जासूद सात महिन्यांनीं परत आला. तो

पुष्कळ मुलूख हिंडला, परंतु कोठें कांहींच शोध लागेना. शेवटीं न्युबिआ देशाच्या सरहद्दीपर्यंत तो गेला. तेथें त्यास बातमी लागली कीं, मिसर देशच्या हद्दीवर एक अरब सरदार आहे,त्याच्या किल्ल्यांत पेक्युआ व तिच्या दासी कैदी आहेत. हा अरब सरदार वाटा लुटून उपजीविन करणारा असल्यामुळें तो खंड घेऊन पेक्युआ व तिच्या दासी यांस मोकळ्या करण्यास राजी आहे, व त्यांच्या खंडाबद्दल तो पांचशें मोहोरा मागत आहे, असें त्यानें येऊन सांगितलें.

ही बातमी ऐकून राजकन्येस जो हर्ष झाला तो त्रिभुवनांत माईना. तिनें आपल्या भावाची विनवणी केली कीं,यत्किंचित्‌ही विलंब न करतां माझ्या पेक्युआस सोडून आणण्याची तजवीज करावी. वास्तविक पाहिलें असतां खंडाची रक्कम मोठी नसल्यामुळें ती द्यावी किंवा नाहीं याविषयीं विचार नव्हता. त्या गोष्टीविषयीं सर्वांचें मत एकच होतें. तथापि इम्लाक कवीचा विश्वास बातमीदारावर कांहीं बसेना, म्हणून त्याजवळ खंडाचा पैसा देऊन पेक्युआस सोडवून आणण्यास त्यास परत पाठविण्याविषयीं तो अनुमत देईना. शिवाय अरब सरदार इमानानें वागेल किंवा नाहीं याविषयींही त्यास संशयच होता. त्यास अशी शंका होती कीं, आपण विश्वासानें त्या अरबाच्या हातीं पैसा दिला असतां तो पैसा व माणसें अडकवून टाकील. त्या तसल्या दरवडेखोराच्या हाताखालीं आपला हात सांपडूं देणें त्यास नीट वाटत नव्हतें. आतां त्यास या राज्यांत बोलवावें, तर तो इकडे येण्यास कबूल होण्याचा संभव दिसत नव्हता. कारण, इकडे आल्यास इकडील अंमलदार आपणास पकडतील हें त्याला भय होतें.

याप्रमाणें उभयपक्षीं एकमेकांचा विश्वास नसतां त्यांचा व्यवहार सिद्धीस जाणें मोठें कठिण होतें. शेवटीं पुष्कळ विचार करून इम्लाक कवीनें एक तोड काढली, ती अशी कीं, बातमी आणणाऱ्या जासुदानें त्या अरब सरदारास सांगावें कीं,तुम्हीं पेक्युआ व तिच्या दासी यांच्याबरोबर आपले दहा हत्यारबंद स्वार देऊन मिसर देशाच्या वरील प्रांताच्या सरहद्दीवर सेंत आंतनी नांवाचा मठ आहे, तेथें त्यांस पाठवावें; व आम्हीही तितकेच तसे स्वार पांचशें मोहरा देऊन तेथें पाठवितों; त्या ठिकाणीं तुमच्या लोकांनीं आमचीं माणसें आमच्या लोकांच्या स्वाधीन करून त्यांजपासून खंडाचा पैसा घ्यावा.

ही तजवीज सयुक्तिक असल्यामुळें अरब सरदार नाकबूल करणार नाहीं असें समजून त्यांनीं आपलीं माणसें एकदम त्या मठाकडे रवाना केलीं; तेथें

पोहोंचल्यावर इम्लाक त्या बातमीदारास बरोबर घेऊन अरब सरदाराच्या किल्ल्याकडे गेला. राजपुत्र रासेलस त्याबरोबर तिकडे जाण्यास फार उत्कंठित झाला होता. परंतु त्यास तसें करण्यास इम्लाक कवि व त्याची बहिण हीं रुकार देईनात. त्या अरब सरदारानें आपल्या जातीच्या चालीप्रमाणें आपल्या घरीं आलेल्या पाहुण्यांचा चांगला आदरसत्कार केला व थोड्या दिवसांनीं पेक्युआ व तिच्या दासी यांस नेमलेल्या मठांत आणून सुखरूप पोहोंचविलें. तसेंच संकेताप्रमाणें खंडाचा पैसा घेऊन त्यानें त्यांस त्यांच्या मित्रांच्या स्वाधीन केलें. इतकेंच नाहीं तर वाटेंत उपद्रव न व्हावा म्हणून आपण करो शहराजवळ त्या सर्वांस पोहोंचविण्यास आला.

राजकन्येची व पेक्युआची भेट झाल्यावर त्यांस जो पराकाष्ठेचा आनंद झाला तो शब्दांनीं वर्णवत नाहीं. नंतर हितगुजाच्या गोष्टी मोकळ्या मनानें बोलण्याकरितां त्या राजकन्येच्या खोलींत एकांतीं गेल्या. मग कांहीं वेळानें त्या बाहेर मंडळींत येऊन बसल्या. नंतर राजपुत्रानें विचारल्यावरून, ती धरली गेल्यापासून आपली गोष्ट सांगण्यास पेक्युआनें आरंभ केला.

---

# भाग अडतिसावा.

## पेक्युआची गोष्ट.

पेक्युआ म्हणाली, " मला चोरांनीं कधीं व कसें जबरीनें कैद करून नेलें हें तुम्हांस चाकरांनीं सांगितलेंच असेल. ती गोष्ट अशी अकस्मात् घडली कीं, तिच्या योगानें मी कांहीं वेळ अगदीं भांबावून गेल्यें. मला देहभानसुद्धां राहिलें नाहीं. मग भय व दुःख यांस मनांत जागा कोठून असणार? इतक्यांत तुर्की स्वार त्या चोरट्यांच्या पाठीस लागले; त्या वेळेस दरवडेखोरांनीं घोडे हांकण्याची जी घाई केली व जो गोंधळ झाला, त्याच्या योगानें माझें होतें नव्हतें तेंही देहभान नाहींसें झालें. खरें म्हटलें म्हणजे त्या तुर्की स्वारांस अरबांच्या अंगावर चालून जाण्याची छाती नसो अगर ते आपणांस सांपडत नाहींतसें त्यांस वाटो, त्यांनीं कांहीं वेळ त्यांचा पाठलाग करण्याचा आव घालून ते मागें फिरले.

" मग पाठलाग होण्याचें भय नाहींसें झालें असें पाहून अरबांनीं पळण्याचा वेग कमी केला. याप्रमाणें धामधूम कमी झाली तेव्हां मी देहभानावर येऊन मला नव्या स्थितीचें भय वाटूं लागलें व दुःख होऊं लागलें. कांहीं वेळानें अरबांची ती टोळी एका सुंदर कुरणांत ओढ्याच्या कांठीं विसावा घेण्यास उतरली. ती जागा फार सुंदर होती, व तेथें सावलीचीं मोठमोठीं पुष्कळ झाडें होतीं. मला माझ्या दोन दासींनिशीं त्यांनीं एकीकडे बसूं दिलें व कोणी माझी समजूत करण्यास व बेअदबीनें भाषण करण्यास आमच्याजवळ आलें नाहीं. या ठिकाणीं बसल्यें असतां माझ्या नवीन स्थितीचें दुःख पूर्णपणें माझ्या लक्षांत आलें. माझ्या दासी मुळमुळ रडूं लागल्या. त्या दीनवाणी तोंडें करून मधून मधून मजकडे पहात. आमची वास्तविक स्थिति कोणती आहे, आम्हांस कोठें नेणार, व आमची सुटका होण्याचा कांहीं मार्ग आहे कीं नाहीं, याविषयीं मला तर्क करतां येईना. ज्या लोकांच्या हातीं आम्ही सांपडलों होतों ते लोक चोरटे व रानटी असल्यामुळें त्यांच्या अंतःकरणांत न्यायबुद्धीपेक्षां दयामाया अधिक असेल, असें मला वाटेना. यामुळें ते कोणत्या वेळेस कामवासनेनें वेडे होऊन आम्हांस काय म्हणतील व त्यांच्या इच्छेस आडव्या झाल्यास कोणते प्रकारें काय हाल करतील, हें भय पोटांत उत्पन्न झालें. तथापि मी आपलें मन आवरून त्या बापड्या दासींस पोटाशीं धरिलें. त्यांच्या तोंडावरून हात फिरवून त्यांचें सांत्वन केलें. मी त्यांस म्हणाल्यें,' बायांनो, हे लोक अजून आपल्याबरोबर अदबीनें वागत आहेत, व यांस शत्रूकडून पाठलाग होण्याचा आतां धाक राहिला नाहीं; त्याअर्थी आतां आपल्या जिवास धोका राहिला नाहीं. तर इतकें तरी आपणांस समाधानच मानिलें पाहिजे.'

" पुनः घोड्यावर बसून कूच करण्याची वेळ आली तेव्हां मजबरोबर त्या पोरी घोड्यावर बसेनात व त्यांनीं मला मिठ्या मारल्या त्या सोडीनात. परंतु 'असा हट्ट करून, आपण ज्यांच्या हातीं सांपडलों आहों त्यांस राग आणणें हें शहाणपण नव्हे, तुम्ही मुकाट्यानें घोड्यावर बसा,' असें मी निक्षून त्यांस सांगितल्यावरून त्या निरुपाय होऊन घोड्यावर बसल्या. मग संध्याकाळपर्यंत आम्ही निर्जन अरण्य रानांतून चालतः होतों. रात्र होऊन चांदणें पडल्यावर आम्ही एका डोंगराच्या पायथ्याशीं आलों. तेथें पूर्वींच कांहीं चोरटे लोक येऊन पोहोंचले होते व त्यांनीं तंबू ठोकून आगट्या पेटविल्या होत्या. ज्या अरब सर-

दारांच्या हातीं आम्ही होतों त्यांचे ते चाकर होते, व आपला धनी आला असें पाहून त्यांस मोठा आनंद झाला. त्या अरब सरदारांवर त्याच्या आश्रित लोकांची व चाकरांची मोठी प्रीति होती असें स्पष्ट दिसे.

" आम्हांस एका मोठ्या तंबूंत नेऊन बसविलें. तेथें अरबांच्या कितीएक बायका होत्या. त्यांनीं तयार केलेल्या अन्नाचें एक ताट भरून आमचे पुढें ठेविलें. मला भूक नव्हती तरी त्या बापड्या पोरींनीं खावें म्हणून मीं थोडेंसें खाल्लें. जेवण आटपल्यावर त्यांनीं आम्हांस निजण्याकरितां जाजमें अंथरून दिलीं. मग झोंप लागून दुःखाचा थोडासा विसर पडला तर पहावा म्हणून मी दासीस आपल्या आंगावरील पोशाख उतरण्यास सांगितलें. त्या दासी माझें ऐकणार नाहींत असें त्या अरबिणीस वाटलें असावें; कारण, माझ्या दासी आज्ञे-प्रमाणें करूं लागल्या हें पाहून त्यांस नवल वाटलें, व माझ्या आंगावरील झगा निघाल्यावर त्याखालील माझ्या आंगांतली किनखाबी बंडी तर त्या पाहून अगदीं दिपून गेल्या. एकानें तर भीत भीत किनखाबाच्या फुलांवर हात फिरवून पाहिला. नंतर एक अरबीण उठून दुसऱ्या तंबूंत गेली. आणि दुसऱ्या अरबिणीस घेऊन आली. ती दुसरी स्त्री पदवीनें व योग्यतेनें त्या पहिल्या स्त्रीपेक्षां अधिक दिसत होती. आंत येतांच तिनें चालीप्रमाणें मला सलाम केला, व मला हातीं धरून ती एका लहान तंबूंत गेली. तेथें पहिल्याहून चांगली बिछाईत होती. त्या तंबूंत मी व माझी दासी अशा निजलों.

" दुसऱ्या दिवशीं सकाळीं मी बसल्यें असतां तो अरब सरदार तेथें आला. त्याला पाहतांच मीं उठून ताजीम दिली व त्यानेंही लवून मोठ्या अदबीनें मला सलाम केला. तो म्हणाला, 'बाईसाहेब, आपण माझ्या हातीं सांपडलां त्या वेळीं माझ्या बायकांनीं मला कळविलें आहे कीं, माझ्या छावणींत राजकन्या आहे." मीं उत्तर केलें, महाराज, आपल्या बायका भलतेंच समजल्या, व त्यांनीं आपणांस भलतें कळविलें. महाराज, मी परमुलुखांतली गरीब स्त्री आहे. या देशांत कांहीं कारणामुळें आल्यें होत्यें; व लवकरच येथून स्वदेशीं परत जाणार होत्यें; पण दुर्दैवानें येथेंच जन्मभर बंदिवान् होऊन राहण्याचा योग आणिला आहे. असो, ईश्वराची इच्छा ! ' सरदार पुनः म्हणाला, "बाई, आपण कोणीही असा, व कोणत्याही मुलुखाच्या असा, आपल्या व आपल्या दासीच्या पोशाखावरून आपण थोर पदवीच्या व श्रीमंत आहां, असें उघड

दिसतें. खंड देऊन सुटण्याचें देवानें आपणांस अनुकूल केलें असतां जन्मभर कैदेंत राहण्याची गोष्ट आपण कां बोलतां ? मी स्वाऱ्या करितों त्या पैसा मिळविण्याकरितां, किंवा खरें म्हटलें असतां, आमचा मुलूख ज्यांनीं जुलमानें बळकावून घेतला त्यापासून खंडणी घेण्याकरितां करितों. खरोखर पाहिलें तर हा मुलूख आम्हां अरब लोकांचा आहे. हा हल्लींच्या राज्यकर्त्या जुलमी लोकांनीं अन्यायानें आम्हांपासून बुचाडून घेतला आहे. तर न्यायानें जें आम्हांस मिळत नाहीं तें निरुपाय होऊन तरवारीच्या जोरानें आम्हांस त्यापासून घ्यावें लागतें आतां आपण म्हणाल कीं, ज्या जुलमी लोकांनीं तुमचा मुलूख बळकावला आहे, त्यांस तुम्ही लुटा; आम्हां तिऱ्हाइतांस कां नाडतां ? तर यावर आमचें उत्तर असें आहे कीं, एकदां लढाईची गर्दी उसळली म्हणजे तेथें भेद राखतां येत नाहीं. अपराधी व मगरूर यांस शिक्षा करण्याकरितां उपसलेली तरवार कधीं कधीं निरपराधी व गरीब यांवरही पडते, उपाय चालत नाहीं. ”

मी म्हणाल्यें, “ दंग्यांत सांपडून ती तरवार मज अनाथावर पडेल असें कालपर्यंत माझ्या ध्यानींमनींसुद्धां नव्हतें. ”

सरदार म्हणाला, ‘ बाईसाहेब, संकटास तोंड देण्याविषयीं शहाण्यानें सर्वकाळ तयार असावें. तीं केव्हां अवचित येतील याचा नेम नसतो. शत्रूच्याही मनांत पूज्यबुद्धि व दया हीं नियमानें यावीं असें जर असतें, तर तुम्हांसारख्या सज्जन मनुष्यांस कधींही पीडा न होती. परंतु दुःखें व संकटें यांच्या तावडींत दुर्जन व सज्जन, लहान व मोठे सारखेच सांपडतात. तर आपण खेद करूं नये. माझा स्वभाव निर्दय व उगीच दुसऱ्यास पीडा देण्याचा नाहीं, प्रतिष्ठित व थोर लोकांच्या चालीं मी जाणतों. मी तुमचा खंड ठरवीन; व तुमच्या आप्तांकडून कोणी तुमच्या शोधास आल्यास व तुम्ही कोणी मनुष्य तिकडे पाठविल्यास, त्यास तिकडून इकडे व इकडून तिकडे जाण्याचे परवाने देईन, व केलेला करार इमानानें पाळीन, ही आपण पक्की खातरी बाळगावी. ’

पेक्युआ मंडळीस म्हणते, “त्या अरब सरदाराचें असें सुज्ञपणाचें भाषण ऐकून मी आनंद पावल्यें, हें सांगावयास नको. पैशानें तो वळणार आहे, असें समजल्यानें मला धीर आला व मनांतील भीति पुष्कळ कमी झाली. माझी पक्की खातरी झाली कीं, खंडाबद्दल कितीही पैसा पडला तरी मला सोडविण्याविषयीं माझी धनीन राजकन्या खर्चाची काडीभरसुद्धां पर्वा करणार नाहीं. मी त्यास म्हणाल्यें, ‘महा-

राज, आपण कृपाळूपणानें मला वागविल्यास मी आपले उपकार विसरून कृतघ्नपणाचा बट्टा कधीं लावून घेणार नाहीं, हें आपण पक्कें समजावें. साधारण पदवीच्या मुलीबद्दल मागण्यासारखा पैसा आपण खंडाबद्दल मागितला असतां तो माझ्या आप्तांकडून आपणांस निःसंशय मिळेल. परंतु मी इतकेंच सांगत्यें कीं, मला राजकन्या समजून भलतीच रक्कम मागूं नये.' त्यानें उत्तर केलें, 'तुमच्याबद्दल खंड मागावयाचा तो मी नीट विचार करून मागेन.' असें हंसत हंसत बोलून व मला मुजरा करून तो निघून गेला."

"तो गेल्यावर लवकरच अरबिणी माझ्या भोंवतालीं जमल्या; व त्या एकमेकींच्या चढाओढीनें माझी खुशामत करूं लागल्या. फार तर काय, त्यांनीं माझ्या दासींचीसुद्धां पुढें पुढें होऊन सेवा आरंभिली. कांहीं वेळानें आम्ही तेथून पुढें चालतीं झालों, व आम्हांस श्रम न व्हावे म्हणून त्या सरदारानें लहानच मजला केल्या. चौथ्या मुक्कामाच्या दिवशीं अरब सरदारानें मला कळविलें कीं, 'तुमच्या खंडाबद्दल मी चारशें मोहरा घेईन.' मी उत्तर केलें कीं, 'ठीक आहे. आपण मला व माझ्या दासींना याप्रमाणें शेवटपर्यंत कृपाळूपणें वागविल्यास खंडाबद्दल चारशें मोहरा देऊन मी आपले उपकार स्मरून आपणांस शंभर मोहरा अधिक देईन.'

"या वेळपर्यंत मला द्रव्याचा प्रभाव ठाऊक नव्हता, तो या वेळीं समजला. मीं असें वचन देतांच त्या सर्व टोळींची मालकीण मी झाल्यें. मी हुकूम करीं त्याप्रमाणें सर्व मनुष्यें वागूं लागलीं. माझ्या मर्जीप्रमाणें मजला लहान अगर मोठ्या होत, व मला विचारून मी सांगें तेथें चाकरमाणसें तंबू ठोकीत व माझ्या दासी नेहमीं माझ्याजवळ असत. आम्हीं त्या फिरस्ती लोकांच्या रीतीभाती पाहून करमणूक करीत असूं. तसेंच वैरान रानांत प्राचीन काळच्या सुंदर व भव्य मोडक्या इमारती जागोजागीं पुष्कळ आहेत, त्या आडव्या वाटेंत असल्या तरी आम्हीं जाऊन पहात असूं.

"ज्या अरब सरदाराच्या हातांत आम्ही सांपडलों होतों तो केवळ अज्ञान व अक्षरशत्रु होता असें समजूं नका. तो मोठा चाणाक्ष असून त्यानें बरीच विद्या संपादिली होती. ज्योतिषविद्या त्यास बरीच अवगत होती. तो ताऱ्यांच्या गतींच्या अवलोकनानें व होकायंत्रावरून रस्ते समजत असे. तसेंच कोणत्या ठिकाणीं पहाण्यासारख्या कोणकोणत्या जागा आहेत, हेंही त्यास ठाऊक असे.

तो मला म्हणे कीं, जेथें लोकांचें जाणेंयेणें फार नाहीं किंवा जाण्यास जेथें कठिण, अशा ठिकाणच्या इमारती चांगल्या राहतात व पुष्कळ दिवस टिकतात. देशाचा ऱ्हासकाळ आला असतां, त्या देशांत जेथें वस्ती दाट तेथें उत्तम व थोर इमारतींचा नासधूस लवकर होतो. लोक आपलीं नवीं घरें बांधण्याकरितां खाणींतून दगड काढण्याचे श्रम न करतां त्या इमारतींचे आयते घडीव दगड उखळून आणतात आणि अडाणी व आळशी लोक गोठे व कोठारें बांधण्याकरितां मोठालीं सुंदर राजमंदिरें व देवळें मोडून त्यांतील सामान आणतात.

---

# भाग एकुणचाळिसावा.

पक्युआ मंडळीस आपली गोष्ट पुढें सांगते, " महाराज, याप्रमाणें आम्ही कितीएक दिवस फिरत होतों. तो अरब सरदार बोलण्यांत असें दाखवी कीं, मला अनेक चमत्कार दिसून माझ्या मनाची करमणूक व्हावी म्हणून आपण फिरतों. परंतु मला वाटतें कीं, तसें करण्यांत त्याचा स्वतःचा कांहींतरी मतलब असावा. तिरसटपणा करण्यांत व रागावण्यांत कांहीं उपयोग नाहीं, फुकट जिवास मात्र त्रास, असा विवेक करून जें जें घडे त्यांत संतोष दाखविण्याविषयीं मी झटूं लागल्यें; व तसें करण्यानें माझ्या मनास बरीच शांतता आली. तथापि मला माझी जिवलग मैत्रीण निकाया हिचा क्षणभरदेखील विसर पडला नाहीं. नव्या नव्या जागा व चमत्कारिक मनुष्यें व त्यांच्या रीतीभाती पाहून दिवसास करमणूक होई; परंतु रात्र झाली कीं, इकडील आठवण होऊन चित्तास फारच वाईट वाटे. माझ्या दासींनीं आपला सर्व भार मजवर लोटला होता. व ते चोरटे लोक माझी चांगली अदबी ठेवितात व मला खुष राखण्याविषयीं झटतात, असें त्या पोरीस दिसूं लागल्यापासून त्यांच्या मनांतील घोर व उदासपणा हे नाहींसे झाले, व त्यांची वेळ सुखानें जाऊं लागली. त्यांस हसतांखेळतां पाहून मला आनंद होई, व त्यांचा आपल्यावरचा भरंवसा पाहून मनांत त्या बापड्याविषयीं माया येई. तो अरब सरदार मुलखांत जिकडे तिकडे फिरतो, तो केवळ पैसा मिळविण्याकरितां फिरतो असें समजल्यापासून माझ्या मनांतली भीति अगदीं नाहींशी झाली. द्रव्य-लोभ हा दुर्गुण खरा, तथापि त्याचा रोख आपणास समजतो यामुळें तो दुर्गुण

ज्याचे आंगीं असतो त्याचें मन वळविण्यास कठिण पडत नाहीं. इतर दुर्गुण निरनिराळ्या मनुष्यांस निरनिराळ्या प्रकारांनीं भासतात. एका गर्विष्ठ मनुष्यास जी गोष्ट आवडते तीच गोष्ट दुसऱ्या गर्विष्ठ मनुष्यास मोठा राग आणण्यास कारण होते. ह्यास्तव गर्विष्ठ मनुष्याचें मनोधारण करून त्याची प्रीति संपादन करणें फार कठिण पडतें. द्रव्यलोभ्याची गोष्ट तशी नाहीं; त्याचें मन अनुकूल करण्याचा मार्ग उघड आहे. त्याच्या म्हणण्याप्रमाणें पैसा दिला म्हणजे सांगाल ती गोष्ट करण्यास तो तयार असतो.

" सरतेशेवटीं कांहीं दिवसांनीं आम्ही त्या सरदाराच्या रहावयाच्या मुख्य ठिकाणीं जाऊन पोहोंचलों. त्याचा वाडा नील नदीच्या एका बेटांत आहे. ही इमारत चिरेबंदी असून मोठी विस्तीर्ण व बंदोबस्ताची आहे. तेथें पोहोंचल्या-नंतर तो सरदार मला म्हणाला, ' बाईसाहेब, आज बरेच दिवस आपण फिरत आहां त्यामुळें थकलां असाल. आतां हें घर आपलें आहे, असें आपण समजावें, आणि कांहीं दिवस येथें स्वस्थ रहावें. येथील सर्व माणसें धन्याप्रमाणें आपला हुकूम मानतील. मी लढाई करून उपजीवन करितों हें आपणांस मीं पूर्वीं कळविलेंच आहे. त्याकरितांच ही एकीकडची अप्रसिद्ध जागा मीं राहण्यास काढली आहे. येथून मला एकाएकीं शत्रूच्या आंगावर जाऊन पडतां येतें व लढाई झाल्यावर गुप्तपणें पाठलागाचें भय न बाळगतां येथें येतां येतें. आपण येथें स्वस्थपणें रहावें. या ठिकाणीं सुखाचीं साधनें थोडीं आहेत खरीं; परंतु येथें भय अगदीं नाहीं. हा या ठिकाणचा मुख्य गुण आहे.' नंतर त्यानें जनानखा-न्यांतील उत्तम जागा मला नेमून दिली व तेथें मला पोहोंचवून सलाम करून तो निघून गेला."

"त्या सरदाराचे बायकांस नवऱ्यानें आपल्या उरावर ही नवी सवत आणिली असें वाटून प्रथम त्या माझा द्वेष करूं लागल्या. परंतु त्यांस लवकरच समजलें कीं, ही कोणी मोठी थोर पदवीची स्त्री आहे, व खंड मिळण्याकरितां आपल्या नवऱ्यानें ती येथें कैदेंत ठेविली आहे ही बातमी लागल्यानंतर त्या माझा हेवा करीनाशा झाल्या, व चढाओढीनें उलटी माझी खुशामत करूं लागल्या."

" बाई, तुम्ही अगदीं काळजी करूं नका, तुमची येथून सुटका होऊन तुम्ही लौकरच आपल्या मित्रमंडळांत जाऊन पडाल, असें त्या ठिकाणीं गेल्यावर त्या सरदारानें पुनः मला आश्वासन दिल्यावरून माझ्या मनास अधिक धीर आला, व

जागा नवी असल्यामुळें तेथील चमत्कार पाहून माझ्या मनास कांहींशी करमणूक झाली. आम्ही ज्या वाड्यांत रहात होतों तो उंच असल्यामुळें त्याच्या गच्च्यांवरून कितीएक कोसपर्यंत भोंवतालचा मुलूख दिसत असे, व नील नदी वांकणांवाकणांनीं जातांना दूरपर्यंत दिसे. दिवसाची मी सूर्याच्या गतीनें जिकडे जिकडे शोभा येई त्या त्या प्रदेशीं फिरे. पूर्वीं कधींही पाहिल्या नव्हत्या अशा पुष्कळ गोष्टी मीं त्या मुलुखांत पाहिल्या. मोठाल्या सुसरी व जलवारू हीं जनावरें त्या एकीकडल्या मुलुखांत पुष्कळ आहेत, व त्यांपासून उपद्रव होण्याचें भय नसे; तरी त्यांस पाहून मला फार भय वाटे. मीं इम्लाक कवीच्या तोंडून ऐकिलें होतें कीं, नील नदींत जळमाणसें व जलदेवता असतात, असें त्या मुलुखांत फिरून आलेले युरोपियन सांगतात. त्यावरून मीं अरब सरदारास तीं माणसें व देवता कोठेंशा असतात, असें विचारलें असतां तो माझ्या भोळवटपणास हंसून म्हणाला कीं, त्या केवळ गप्पा आहेत, तसे प्राणी मुळींच नाहींत."

"त्या सरदारास ज्योतिषविद्येचा व तारे पाहण्याचा फार शोक होता. तो नित्य रात्रीं मला गच्चीवर नेऊन तारे दाखवी, व त्यांचीं नांवें काय व ते फिरतात कसे, याविषयीं मला माहिती करून देई. या विद्येची मला मनापासून गोडी नव्हती, तरी त्याच्या संतोषाकरितां तो जें शिकवी तिकडे लक्ष दिलेसें मला दाखवावें लागे. त्याला त्या ज्ञानाचा मोठा अभिमान होता व मलाही दुसरें काम नसल्यामुळें मी त्याच्या गोष्टी ऐके व तेणेंकरून माझा वेळ बराच लोटत असे. दररोज दिवसास त्याच त्याच गोष्टी पाहून माझा जीव कंटाळे त्यामुळें रात्रीं उगीच बसून त्रास न यावा म्हणून मी तारे पाही. परंतु कितीएक वेळां लोकांस असें वाटे कीं, हिची टक ताऱ्याकडे लागली आहे, परंतु वास्तविक म्हटलें म्हणजे माझ्या दृष्टीचा रोख मात्र आकाशाकडे असे; पण माझ्या अंतःकरणाचा सर्व लय माझी प्रियसखी निकाया या वेळेस काय करीत असेल व काय म्हणत असेल या गोष्टीकडे लागलेला असे. कांहीं दिवसांनीं तो अरब सरदार स्वारीस गेला असतां मला आपल्या दासी जवळ घेऊन, त्याबरोबर आपण बंदींत सांपडलों आहों, येथून सुटका कशी व कधीं होते, याविषयीं पुनः पुनः बोलत बसून वेळ लोटावी लागत असे."

राजकन्या निकाया म्हणाली, "अगे, त्या अरब सरदाराच्या बायका तेथें होत्या, त्यांशीं स्नेह करून त्यांस आपल्या गोष्टी सांगून व त्यांच्या गोष्टी आपण ऐकून तूं

आपली करमणूक करून कां घेतली नाहींस? कांहीं काम करून किंवा खेळ काढून तेथें त्यांचा वेळ जात होता कीं नाहीं? आणि तुलाच वेळ जातां जात नसे याचें कारण काय? त्या ज्या स्थितींत आपला जन्माचा जन्म काढतात त्या स्थितींत तुझ्यानें कांहीं थोडे महिने सुद्धां काढवेनात, हें कसें ? ''

पेक्युआनें उत्तर केलें, '' बाईसाहेब, त्या स्त्रियांचे खेळ व करमणुकीचे मार्ग अगदींच पोरकट असत. विशेष प्रौढपणा ज्याच्या मनास आला आहे, त्यास ते खेळ व करमणुकीचे मार्ग कधींही गोड लागावयाचे नाहींत.त्यांचे जे खेळ असत, ते सर्व केवळ शरीरव्यापाराचे असत, त्यांत मनाचा कांहींच व्यापार नसे.असल्या खेळांनीं आपल्यासारख्यास काय करमणूक होणार? शिवाय माझें चित्त सर्वकाळ केरो नगराकडे गुंतलेलें असे, त्यामुळें त्यांशीं बोलण्याचा किंवा खेळण्याचा मला त्रास येई. बाळगलेलीं पांखरें जशीं पिंजऱ्यांत एका काडीवरून दुसऱ्या काडीवर उड्या मारतात, तशा त्या बायका या खोलींतून त्या खोलींत धांवत; किंवा कुरणांत कोंकरें अथवा वासरें जशीं बागडतात तशा त्या वेड्या-वांकड्या नाचत. कधीं कधीं दुसऱ्यास घाबरविण्याकरितां कोणी पडून मोठी दुखापत झाल्याचें मिष करावें, किंवा एकीनें लपून बाकीच्यांनीं तिला शोधून काढूं लागावें; केव्हां केव्हां नदीच्या प्रवाहांत लांकडाचे तुकडे किंवा पानें किंवा एकादा हलका पदार्थ वहात चालला असला म्हणजे त्याकडे किंवा आकाशांत ढगाचे निरनिराळे चित्रविचित्र आकार होतात त्यांकडेच टक लावून घटका घटका पाहात त्यांनीं बसावें, हें त्यांचे करमणुकीचे प्रकार असत.

'' आतां त्यांचें काम म्हटलें म्हणजे शिवणें व काशिदा काढणें हें असे. या कामांत मी व माझ्या दासी त्यांस कधीं कधीं मदत करीत असूं: परंतु असें करीत बसलें असतां कधीं कधीं बोटें आपला व्यापार करतात आणि मन त्यांची देखरेख करण्याचें काम सोडून भलत्याच विषयाकडे भटकत असतें, ही गोष्ट आपणास ठाऊक असेलच, मीं सांगावी असें नाहीं. तसें निकायासारख्या प्रिय सखीच्या वियोगानें विरस व खिन्न झालेल्या मनास रेशमी फुलें काढण्याचा व्यापार म्हणजे रिझवील, हीही गोष्ट असंभवनीयच आहे. असो.

'' पण त्या बायकांशीं संभाषण करूनही तादृश करमणूक होण्यासारखी नव्हती. त्या बापड्या अज्ञान स्त्रियांजवळ बोलावयास काय असणार आहे? लहान-पणापासून जनानखान्याच्या कैदेंत राहिलेल्या त्या स्त्रियांनीं काय पाहिलें असतें?

शिवाय त्यांस वाचतां येत नसतें, यास्तव नानाप्रकारचे ग्रंथ वाचून माणसास माहिती होत असते, तोही मार्ग त्यांस अनुकूल नाहीं. त्यांचें ज्ञान व माहिती म्हटली म्हणजे नेहमीं त्यांच्या डोळ्यापुढें येणारे थोडे विषय मात्र त्यांस ठाऊक असतात; पण त्याबाहेरच्या वस्तूंचीं नांवेंसुद्धां त्यांस ठाऊक असण्याची मारामार. मग त्यांच्या गुणांच्या ज्ञानाची तर गोष्टच नको. मला त्या आपल्या मंडळींत विशेष शहाणी मानीत; यास्तव त्यांचे तंटे त्या मजकडे तोडावयास वारंवार आणीत व माझ्या बुद्धीनें जें रास्त दिसे तें मी त्यांस सांगत असे. त्यांतील एकमेकींपासून एकमेकींच्या उखाळ्यापाखाळ्या ऐकण्याची जर मला गोडी असती तर प्रत्येकजण मला बाकीच्यांच्या लांब लांब गोष्टी सांगीत. परंतु त्या भाकडकथा ऐकण्याचा मला कंटाळा येई, व त्या एकमेकींचा द्वेष करीत. त्यांचीं कारणें अशीं क्षुल्लक असत कीं, तीं त्या सांगूं लागल्या म्हणजे मला त्यांस बोलतांना बंद केल्यावांचून राहवत नसे."

राजपुत्र रासेलस म्हणाला, "अगे, तुझ्या सांगण्यावरून असें दिसतें कीं, तो अरब सरदार विद्वान् व चतुर पुरुष असावा. तेव्हां तसल्या पुरुषास या असल्या अज्ञान व पशुतुल्य बायका कशा आवडत व त्यांपासून त्याचें रंजन कसें घडे? त्या पराकाष्ठेच्या देखण्या व मारू तरी होत्या काय?"

पेक्युआनें उत्तर केलें, "महाराज, त्या स्त्रिया देखण्या खऱ्या; परंतु चतुर व मार्मिक पुरुषाचें चित्त वेधण्यास आवश्यक जो बुद्धीचा चपलपणा व स्वभावाचा थोरपणा यांची शोभा व खुमारी त्यांच्या सौंदर्यांत नसल्यामुळें तें रसिक मनुष्यास पचपाचित वाटतें. त्या अरब सरदाराचें त्या स्त्रियांवर मोठें व खरें प्रेम आहे, असें नाहीं. मनुष्य वाटेनें चालतांना एकादें तऱ्हेवाईक व चमत्कारिक फूल आढळलें असतां मौजेनें तें तोडून हातीं घेतो व कांहीं वेळानें तें फेकून देतो, त्याप्रमाणें त्याचें त्या स्त्रियांशीं वागणें आहे. त्यांच्या मित्रत्वापासून किंवा सहवासापासून त्यास कांहीं आनंद आहे व त्यांची त्याला गोडी आहे, असा मुळींच अर्थ नाहीं. केवळ क्षणिक ग्राम्यसुखाकरितां त्यास त्या पाहिजेत. त्या त्याच्या भोंवतालीं खेळत बागडत असतां मनुष्याभोंवतीं पोरें अगर जनावरें उड्या मारीत असल्या-प्रमाणें तो मर्जी लागल्यास त्यांकडे पाहतो. त्यांची पर्वा त्यास मुळींच असत नाहीं. त्यांचें चित्त आपणांकडे विशेष वेधण्याकरितां त्या एकमेकींच्या चढा-

ओढीनें झटत असतां कधीं कधीं तो त्या सर्वांचाच अव्हेर करून तेथून निघून जातो; त्यांस ज्ञान नसल्यामुळें त्यांचें भाषण ऐकणारास कंटाळवाणें वाटतें. तसेंच त्यांस मनुष्याची पारख नसल्यामुळें त्यांनीं प्रेम केलें, किंवा दाखविलें तर त्या योगानें त्यांस अभिमान किंवा उपकार वाटत नाहीं. जिनें दुसरा पुरुषच पाहिला नाहीं तिला आपण आवडलों असें पाहून पुरुषास आपण उत्तम आहों असें वाटण्यास काय जागा आहे? व जिच्या प्रेमाच्या खरेपणाविषयीं त्याची खात्री होत नाहीं, व तें प्रेम दाखविण्यांत त्यांस संतुष्ट करण्यापेक्षां सवतीस त्रास देण्याचा जिच्या मनांत उद्देश अधिक, त्या स्त्रीच्या ममतेचा त्या पुरुषास काय उपकार वाटणार आहे? त्यास कांहीं दुसरें तादृश काम नसलें म्हणजे रिकामा वेळ घालविण्याकरितां त्या बायकांशीं तो बोलत खेळत बसे, हीच काय ती त्यांची परस्पर प्रीति; ज्या ठिकाणीं पुरुष स्त्रीस हलकट व नीच समजतो, व जिच्या योगानें त्यास मोठें सुख किंवा वियोगानें तादृश्य दुःखही वाटत नाहीं, व अशा स्त्रीवर त्याची जितकी व ज्या प्रकारची प्रीति वसत असेल तशी त्या अरबाची त्या बायकांवर प्रीति आहे."

हें तिचें भाषण ऐकून इम्लाक कवि म्हणाला, "अग, असल्या ठिकाणाहून इतकी सहज सुटून आलीस तेव्हां तूं मोठी दैववान् समजली पाहिजेस! कारण, तुझ्या म्हणण्यावरून तो अरब सरदार शहाण्या व चतुर मनुष्याविषयीं फार भुकेला दिसतो व त्याच्या घरीं तर त्या गुणांचा मुळींच दुष्काळ आहे. तेव्हां त्याला आमच्या पेक्युआबाईचें रसिक व चतुराईचें संभाषण म्हटलें म्हणजे केवळ अमृताची मेजवानीच झाली असावी."

पेक्युआनें उत्तर केलें, "महाराज, आपण म्हणतां त्याप्रमाणें मलाही कांहीं वाटतें. मला सोडावें कीं नाहीं याविषयीं तो बरेच दिवस संशयांत होता. कारण, खंड मिळाला म्हणजे तुमची सुटका करतों, असें पक्कें वचन जरी त्यानें दिलें होतें, तरी कैरो शहरास तुम्हांस माझी बातमी कळविण्यास जासूद पाठविण्याची मी गोष्ट काढली म्हणजे कांहीं तरी सबब काढून ती गोष्ट तो लांबणीवर टाकी. त्याच्या घरांत मी अडकून पडल्यें असतां त्यानें भोंवतालच्या मुलुखांत लूट करण्याकरितां कितीएक स्वाऱ्या केल्या व त्या स्वाऱ्यांत त्याच्या इच्छेप्रमाणें पुष्कळ लूट सांपडती तर तो कदाचित् मला न सोडता. तो स्वारीहून परत आला म्हणजे मजकडे येई व मला त्या स्वारीची सर्व तपशीलवार हकीकत सांगे. आणि घडलेल्या

गोष्टींविषयीं मी जे काय गुणदोष आपल्या समजुतीप्रमाणें काढी ते तो चित्त देऊन ऐके. तो मजबरोबर सर्व काळ मोठ्या ममतेनें वागे, व माझा मोठा मान ठेवी. तो मला मोठ्या हौसेनें व मन लावून ताऱ्यांची माहिती करून देई. माझ्या मित्रांकडे माझीं पत्रें कधीं पाठवितां, म्हणून मी फार गळ घालून विचारूं लागल्यें व तो तें काम लौकर करीत नाहीं म्हणून खिन्नता दाखविली म्हणजे मी म्हटल्याप्रमाणें तुमची मोकळीक करीन, मी आपला शब्द फिरविणारा मनुष्य नव्हे, तुम्ही स्वस्थ असा, इत्यादि गोडीचीं भाषणें करून तो माझें समाधान करी. पुढें मीं त्यांचा फार पिच्छा पुरविला. पुष्कळ वायदे सांगून ते टळल्यामुळें आणखी वायदे करण्याची त्यास लाज वाटूं लागली, तेव्हां तो आपले लोक तयार करून निकडीच्या कामाच्या मिषानें निघून गेला. व जातांना वाड्यांतलि सर्व मनुष्यांवर मला मुख्य करून माझ्या हुकुमांत सर्वांस वागण्यास सांगितलें. याप्रमाणें मला मोकळी करण्याचें त्यानें जाणूनबुजून दिरंगाईवर टाकिलेंसें पाहून मला फारच दुःख झालें, व तुम्हीही फार दिवस माझा पत्ता न लागल्याकारणानें मला विसराल आणि केरो शहर सोडून कोणीकडे निघून जाल, आणि तसें झालें म्हणजे मला मरेतोंपर्यंत त्या नील नदीच्या बेटांत कैदेंत रहावें लागेल, असा धाक माझ्या मनांत उत्पन्न झाला."

"कांहीं दिवसांनीं मी मोकळिकीविषयीं अगदीं निराश झाल्यें, व माझ्या चित्तास फार खिन्नता व उदासपणा येऊन त्या सरदारांशीं फारशी बोलेनाशी झाल्यें; व त्याचें मनोधारण करण्याचें अगदींच सोडून दिलें. पुढें असें झालें तेव्हां तो माझ्या दासींशीं अधिक संबंध ठेवूं लागला. तें पाहून माझ्या मनांत असें भय उत्पन्न झालें कीं, मजवर त्याचें प्रेम जडलें असतां जसा तोटा आहे तसाच त्यांवर तें जडलें असतांही आहे. आणि हा विचार मनांत आल्यापासून याचा व त्यांचा स्नेह विशेष वाढूं लागला हें मला आवडेना. परंतु ती भीति माझ्या मनांत फार दिवस राहिली नाहीं. कारण, माझा उदासपणा कमी होऊन माझी पहिली उल्हासवृत्ति थोडीशी त्याच्या दृष्टीस पडूं लागतांच त्याचें चित्त मजकडे वळलें व तो त्या दासींशीं फारसा बोलेनासा झाला. असें झालें असतां माझ्या मनांतील पूर्वींची काळजी माझीच मला अप्रयोजक व वेडेपणाची वाटूं लागली.

इतके दिवस झाले, इतक्या मुदती टळल्या, तरी तो खंडाचा पैसा मागण्याकरितां तुमच्याकडे निरोप पाठवीना; व तुमच्याकडून शोधाकरितां आलेल्या मनु-

ष्यास माझा पत्ता लागून तो जर तेथें न येता, तर त्या सरदारानें आपण होऊन कधींही तुम्हांकडे निरोप पाठविला नसता, असें मला वाटतें. पैसा हातीं येण्याविषयीं तो आपण होऊन यत्न करण्यास खुषी नव्हता खरा, तथापि पैसा चालतच जेव्हां घरीं आला तेव्हां मात्र त्याची आशा त्यास सुटेना. मग त्यानें मोठ्या जलदीनें इकडे निघण्याची तयारी केली. या वेळेस मला राखावें कीं द्रव्य मिळवावें असा कांहीं वेळ त्याच्या मनांत विचार चालला असावा असें दिसतें; परंतु कामवासनेवर द्रव्यलोभाचा पगडा चढून त्यानें द्रव्य स्वीकारून मला सोडण्याचा निश्चय केला. असो. तयारी झाल्यावर निघावयाच्या वेळेस जनानखान्यांतील त्या बायकांचा मीं निरोप घेतला. माझा व त्यांचा इतक्या दिवसांचा सहवास पडला होता, तरी मी जाऊं लागल्यानें त्यांस कांहींही वाटलें नाहीं. आम्हीं इकडे येत असतां वाटेनें सांगण्यासारखें कांहींएक घडलें नाहीं. येथें आल्यावरची हकीकत तुम्हांस ठाऊक आहेच. ही सर्व माझी हकीकत."

याप्रमाणें पेक्युआनें आपली गोष्ट संपविल्यावर राजकन्या निकाया हिनें मोठ्या प्रेमानें पोटाशीं धरलें, व राजपुत्र रासेलस यानें खंडाखेरीज जितका पैसा बक्षीस देण्याचा तिनें कबूल केला होता त्यापेक्षां दुप्पट पैसा देऊन त्या अरब सरदारास खुष करून परत पाठविलें.

---

# भाग चाळिसावा.

## एका विद्वान् मनुष्याची हकीकत.

तीं सर्व केरो शहरास परत आलीं. व तीं सर्व एके ठिकाणीं पुनः मिळाल्यानें त्यांस इतका आनंद झाला होता कीं, तीं कितीएक दिवस एकमेकांस सोडून बाहेर गेलीं नाहींत. राजपुत्रास विद्येंत बहार वाटूं लागली, आणि तो एके दिवशीं इम्लाक कवीस म्हणाला कीं, " विद्यापरायण होऊन आपलें सर्व आयुष्य विद्यासंपादन करण्यांत एकांतीं घालवावें, अशी मला इच्छा उत्पन्न झाली आहे."

इम्लाक कवि म्हणाला, " ह्याविषयीं तुम्ही पक्का निश्चय करण्यापूर्वीं अगोदर अशा एकांतवासापासून कोणते अनर्थ होणारे आहेत त्यांचा विचार करावा. आणि ज्यांनीं आपले दिवस एकांतीं विद्याप्राप्तींत घालविले आहेत त्यांचें सम्मत घ्यावें, हें ठीक दिसतें. आनंदगुहेंत येण्यापूर्वीं माझा एका महा विद्वान् ज्योतिष्याशीं मोठा स्नेह जमला होता. त्यानें चाळीस वर्षें अंतरालांतील गोलांच्या गति वगैरेविषयीं विचार करण्यांत घालविलीं, व पुष्कळ गणितें केलीं. महिन्यांतून एकदां तो आपल्या कांहीं मित्रांस बोलावून त्यांस त्या महिन्यांत केलेले शोध कळवितो, व ते ऐकून त्यास आनंद वाटतो. यानें पुष्कळ पाहिले आहे व हा तुमच्या मैत्रीस योग्य आहे असें म्हणून कोणी एकानें माझी व त्याची ओळख घालून दिली. प्रायः ज्या मनुष्याचे विचार एकाच विषयाकडे गढून जाऊन बाकीच्या गोष्टींचा विचार करण्यास त्यास संवड सांपडत नाहीं, अशा मनुष्यास बोलक्या व ज्यानें पुष्कळ पाहिलें व ऐकिलें आहे, अशा माणसाच्या समागमांत सुख वाटतें. याचप्रमाणें त्याची गोष्ट होती. माझ्या बोलण्यानें त्यास आनंद वाटे, मी प्रवासाच्या गोष्टी सांगू लागलों म्हणजे त्यास हासें येई; आणि नक्षत्रांचा विसर पडून क्षणभर या लोकच्या गोष्टीत त्याचें मन लागे.

" दुसरे एके दिवशीं मी मोकळेपणा पाहून त्याजकडे गेलों, व पुन पहिल्याप्रमाणें माझ्या भेटीनें त्यास आनंद वाटला. त्या वेळेपासून मला वाटेल तेव्हां त्याजकडे जाण्याची मोकळीक मला मिळाली. जेव्हां जेव्हां मी जाई तेव्हां तेव्हां तो विचार करण्यांत वगैरे गुंतलाच असे; तरी मी आलों म्हणजे कांहीं वेळ माझ्याशीं बोलण्यांत घालविण्यास त्यास हर्ष वाटे. आम्हांस एकमेकांच्य भाषणानें सुख होई; कारण, जें मला माहीत होतें तें समजून घेण्याची त्यास इच्छा असे, तसेंच मलाही त्याच्या शास्त्रीय गोष्टी समजून घेण्याची हौस असे. असें होतां होतां दिवसेंदिवस मजवर त्याचा विश्वास जडत चालला; व मलाही त्याची गहन विचारशक्ति पाहून आल्हाद होई. त्याची धारणाशक्ति मोठी असून त्याच्या स्मृतींत पुष्कळ गोष्टी रहात. तो विषयास लागून सभाषण करी, व त्याचें बोलणें घोटाळ्याचें नसे. "

" तो असा विद्वान् आहे त्याप्रमाणें खरेपणानें वागणारा व परोपकारबुद्धीचा असून तो आपल्या बुद्धीनें मोठमोठे शोध करी; आणि त्यास विद्येचें व्यसन असे; तरी इतर कोणत्याही गोष्टींचा उल्हास नाहीं असें नव्हतें. तो आपल्या पैशानें

गरीबगुरिबांस मदत करी व कोणी अनीतीनें वागतांना दिसल्यास त्यास तो सदाचरणाचा उपदेश करी. त्याजवळ जाण्याची ज्यांस गरज लागे त्यांची तो मोठ्या उद्योगांत असून अगदीं एकांतीं बसला असला तरी भेट घेई. तो म्हणे कीं, मी ऐदी व चैनी लोकांस येथें येऊं देत नाहीं खरा, तरी धर्म करण्याची सवड मी कधीं वायां घालवीत नाहीं. मनुष्यानें हेंव तर अंतरालांतील पदार्थांविषयीं विचार करावा, त्यास चिंता नाहीं; पण सदाचरण तर त्यास अवश्य केलें पाहिजे."

राजकन्या म्हणाली, "हा मनुष्य खचित सुखी असावा."

इम्लाक कवि म्हणाला, "मी पहिल्याप्रमाणें वरचेवर त्याजकडे जाई, व त्याचें संभाषण ऐकण्याची माझी आवड अधिक अधिक वाढे. तो प्रौढ असे, पण आग्रही नसे; व त्याची चालचलणूक सभ्य असून लोकांत जशी बाह्यात्कारी असते तशी नसे, आणि तो ज्या शास्त्रीय गोष्टीय सांगे त्या तो आपलें ज्ञान लोकांस दिसावें म्हणून सांगत नसे. हे राजकन्ये, तुला जसें आतां वाटतें तसेंच मलाही पहिल्यानें वाटलें कीं, यासारखा सुखी दुनियेंत कोणी नसेल, व मी त्यास म्हणें कीं, तुम्ही खरोखर फार सुखी आहां. जेव्हां जेव्हां मी असें म्हणे तेव्हां तेव्हां तो माझे बोलण्याकडे फारसें लक्ष देत नसे व त्यावर उत्तर देते वेळेस कांहीं तरी मोघम बोलून बोलण्याचा ओघ दुसऱ्या कशावर तरी घालवी.

"याप्रमाणें मी त्यास संतुष्ट करण्याविषयीं व तोही संतुष्ट होण्याविषयीं तत्पर असे, तरी त्याच्या एकंदर चालचर्येवरून मीं सहज तर्क केला कीं, यास दुःख देणारा कांहीं तरी विचार त्याच्या मनांत येऊन यास दुःख होत असावें. तो केव्हां केव्हां मोठ्या उत्कंठेनें सूर्याकडे पाही व भाषण करीत असतां मध्येंच थांबे. जेव्हां आम्ही दोघेच असूं तेव्हां तो उगीच एकसारखा माझ्या तोंडाकडे बघे व त्यावरून असें दिसे कीं, याच्या मनांत कांहीं बोलावयाचें आहे; पण बोलावें कीं नाहीं, याविषयीं अजून याचा निश्चय होत नाहीं. तो कधीं कधीं असाल तसें बोलावलें आहे असा निरोप पाठवून मला बोलावून नेई, परंतु मी गेल्यावर त्यास कांहीं विशेष सांगावयाचें नसे, तसेंच एकादे वेळेस मी जावयास निघालों असतां तो मला परत बोलावी, व कांहीं वेळ उगाच बसून अधिक न सांगतां मला जावयास सांगे."

---

# भाग एकेचाळिसावा.

## ज्योतिष्याच्या दुःखाचें गुप्त कारण.

" असें चालत असतां एके दिवशीं त्याची गुप्त गोष्ट बाहेर पडली. एके दिवशीं रात्रीं तो व मी दोघे त्याच्या घराच्या गच्चीवर बसून बृहस्पतीच्या एका उपग्रहास ग्रहण लागून त्याचा मोक्ष होणार होता तो पहात होतों. इतक्यांत एकाएकीं सर्व आकाशभर ढग पसरले, त्यामुळें आमचा हेतु सिद्धीस गेला नाहीं. कांहीं वेळ तसेंच कांहीं न बोलतां अंधारांत बसल्यावर तो ज्योतिषी मला म्हणाला, 'अरे इम्लाका, तूं माझा स्नेही असल्यानें मी पुष्कळ दिवस आपणास धन्य मानीत आहें. ज्ञानाशिवाय सचोटीचा कांहीं उपयोग नाहीं; आणि ज्ञान आहे पण सचोटी नाहीं, तर त्यापासूनही भयंकर अनर्थ होणारे आहेत. परंतु विश्वासुक मनुष्याचे जे गुण परोपकारबुद्धि, अनुभाविकपणा आणि धैर्य ते सर्व तुझ्या ठायीं वसताहेत. मी बहुत दिवस एक काम संभाळलें आहे, व तें माझ्या मागें पहाण्यास दुसरा कोणी नाहीं; तर तें मी थकल्यावर व माझ्या शरिरास वेदना लागल्या म्हणजे तुजवर सोंपविल्यास मला फार संतोष होईल.'

हें त्याचें भाषण ऐकून यानें आपला बहुमान केला असें मला वाटून मी त्यास म्हणालों, 'महाराज, जेणेंकरून आपणांस सुख होईल त्यांतच मलाही सुख आहे.'

" नंतर तो म्हणाला, 'अरे इम्लाका ! ऐक, मी जें आतां तुला सांगणार तें तुला पहिल्यानें खचित खोटें वाटेल, पण यांत खोटेपणाचा लेशही नाहीं. आज पांच वर्षे हवेचें नियमन व ऋतूंची वांटणी हीं माझ्याकडे आहेत. माझ्या आज्ञेनें सूर्याची गति एका वृत्तापासून दुसऱ्या वृत्तापर्यंत होत आहे. ढग माझ्या आज्ञेनें वृष्टि करतात, व तसेंच नील नदीस पूरचपूर येऊन ती तुफान वाहते. इतकें असतां एक वायु मात्र माझें ऐकत नाहीं. व शेकडों लोक वादळ होऊन समुद्रांत मरतात. पण माझा कांहीं इलाज चालत नाहीं. हें मोठें काम मीं बरोबर न्यायानें इतके दिवस केलें, व पृथ्वीवरील सर्व राष्ट्रांस ऊन व पाऊस सारखां वांटून दिलीं. जर करतां मी ढगांस कोठें तरी एकेच ठिकाणीं ठेवलें असतें, व विषुववृत्ताच्या कोणत्या तरी बाजूसच सूर्याची गति केली असती, तर दुसऱ्या गोलार्धावरील लोकांची काय दुर्दशा झाली असती !'

# भाग बेचाळिसावा.

अनुक्रम ३००५६
विभाग ......
क्रमांक ......
दाँ. बि....

" मला वाटतें, त्या ज्योतिष्याला अंधार असतांही माझ्या मुद्रेवरून, ह्यास आपल्या बोलण्यानें अचंबा वाटला व आपलें बोलणें ह्याला खरें वाटत नाहीं असें वाटलें असावें, कारण, कांहीं वेळ थांबून तो पुनः म्हणूं लागला, ' अरे इम्लाका, तुला माझें बोलणें खरें वाटत नाहीं याचा, मला राग येत नाहीं व आश्चर्यही वाटत नाहीं; कारण, हा अधिकार माझ्यापूर्वीं बहुधा कोणास मिळालाच नसेल; व मला जो मिळाला आहे, तो हा ईश्वराचा मजवर प्रसाद आहे किंवा क्षोभ आहे, हेंही मला पक्कें समजत नाहीं. जेव्हांपासून हा अधिकार मला मिळाला तेव्हांपासून मी उलटा पूर्वीपेक्षां दुःखीच झालों आहे, व हें काम बजावण्यास जो मला सतत हुशारपणा राखावा लागतो त्याबद्दल बक्षीस म्हटलें म्हणजे केवळ मी करतों तें चांगलें करितों, असें जें मला वाटतें तें हेंच होय.'

" मी म्हणालों, ' आपण हें काम हातीं घेऊन किती वर्षें झालीं ? "

" तो म्हणाला, ' सुमारें दहा वर्षांमागें आकाशांतील फेरफार दररोज पहाण्याच्या संवईमुळें एक दिवस माझ्या मनांत असा विचार आला कीं, जर ऋतूंचें नियमन मजकडे असतें तर मीं पृथ्वीवरील लोकांस आबादानी करून दिली असती. हा विचार माझ्या मनांत दृढ बसून गेल्यामुळें मी रानांत रात्रंदिवस असें कल्पी कीं, मीं आज ह्या देशावर, उद्यां त्या देशावर, याप्रमाणें मोठी वृष्टि करवीत, व त्या वृष्टीच्या मानानें त्या देशावर ऊनही पाडवीत आहें. तेव्हांपर्यंत जगाचें हित करण्याची मला केवळ इच्छाच होती, पण तें करण्याचा अधिकार मला मिळेलसें कधींही माझ्या मनीं आलें नव्हतें.

' एके दिवशीं उष्णतेनें कोमजलेल्या देशाकडे पहात असतां मला वाटलें कीं जर दक्षिण पर्वतावर वृष्टि करून मला **नील** नदीस पूर आणवला तर काय मौज होईल ! नंतर मीं आपल्या मनामध्येंच पावसास पडण्यास आज्ञा केली; व माझ्या आज्ञेस आणि **नील** नदीच्या पुरास एकच गांठ पडली. यावरून माझी खात्री झाली कीं, पावसानें माझी आज्ञा मान्य केली.'

" मी म्हटलें, " अशी गोष्ट दुसऱ्या कारणानें कशावरून झाली नसेल? **नील** नदीस कांहीं नेमलेल्याच दिवशीं पूर येत नसतो."

" ज्योतिषी म्हणाला, ' हा विचार माझ्याही लक्षांत तेव्हा आला. मला जें वाटलें होतें तें खोटें कशावरून नसेल, म्हणून मीं पुष्कळ दिवस विचार केला. मला कधीं कधीं वाटे कीं, मला वेड तर लागलें नसेलना ! व आतां ही गुप्त गोष्ट तुझ्यासारख्याशिवाय दुसऱ्या कोणासही सांगण्यास मीं धैर्य केलें नसतें. तुला सांगण्याचें कारण एवढेंच कीं तुला अशक्य कोणतें, व अद्भुत कोणतें, तसेंच खोटें कोणतें, व अविश्वास्य कोणतें, हें निवडण्याचें ज्ञान चांगलें आहे.'

" मी म्हणालों, ' जें आपण खरें म्हणून समजतां अथवा खरें समजतां असें आपणांस वाटतें, तें अविश्वास्य कसें म्हणतां ? '

" ज्योतिषी म्हणाला, ' याचें कारण इतकेंच कीं, हें खरें आहे असें मला बाह्य प्रमाणांनीं सिद्ध करितां येत नाहीं. आणखी मला तर्कशास्त्रावरून पक्कें समजतें कीं, माझी एकाद्या गोष्टीविषयीं खात्री झाली आहे एवढ्यावरूनच ती गोष्ट दुसऱ्यानें खरी मानावी हें रास्त नव्हे; कारण, मजप्रमाणें त्याची खात्री झालेली नाहीं. एवढ्याकरितां वादविवाद करून ही गोष्ट सिद्ध करूं पाहण्याचे श्रम मी घेत नाहीं. इतकें पुरें आहे कीं, हा अधिकार मला आहे, हें मी पक्कें समजतों, व तो अधिकार मला असून तो मी बजावीतही आहें. परंतु मनुष्यास थोडे दिवस वांचणें आहे, व वृद्धपणामुळें मी थकत चाललों आहे, यास्तव असा समय लवकरच येणार आहे कीं, जेव्हां ऋतूंचा नियंता धुळीस मिळून जाईल, तेव्हां माझ्यामागें हा अधिकार कोणास द्यावा म्हणून मला मोठी चिंता होती, व जे कोणी माझ्या ओळखीचे आहेत त्यांत हा कोणास द्यावा म्हणून मीं रात्रंदिवस विचार करीत होतों, तों तुझ्याशिवाय दुसऱ्या कोणास तो योग्य नाहीं अशी माझी खात्री झाली. "

---

# भाग त्रेचाळिसावा.

## ज्योतिष्याचें स्वरहस्यनिवेदन.

" ज्योतिषी म्हणाला, ' आतां तुला जें सांगतों तें लक्ष लावून ऐक; कारण, माझ्या सांगण्याप्रमाणें तूं चालल्यास सगळ्या जगाचें कल्याण होणारें आहे.

इम्लाका, पहा कीं, आपण राजाचें काम मोठें कठिण म्हणतों, पण राजास वागवावयाचीं काय तीं दहापांच लाखच मनुष्यें असतात, आणि तितक्यांचेंही त्याच्या हातून फारसें कल्याण किंवा अकल्याण होत नाहीं; मग ज्याच्याकडे वायु, उदक वगैरेंचें व उजेड, उष्णता, इत्यादि ज्या ईश्वराच्या मोठ्या देणग्या त्यांचें नियमन आहे, त्याची तर केवढी यातायात म्हटली पाहिजे ! एवढ्या-करितां तुला सांगतों कीं, मजकडे चित्त दे.

' मी पृथ्वी व सूर्य यांच्या स्थितीविषयीं पुष्कळदां विचार केला, व त्यांची विद्यमान परस्पर स्थिति बदलून अनेक गोष्टी करण्याचें मनांत आणिलें. केव्हां केव्हां मी पृथ्वीचा आस एकीकडे वळवून पाही, व केव्हां केव्हां क्रांतिवृत्ताचें स्थित्यंतर करी. परंतु कांहीं केलें तरी सर्व जगास पहिल्यापेक्षां अधिक सुख होईल असा फेरफार माझ्यानें करवेना. सूर्यमालेंत दूरचे जे ग्रह आहेत त्यांचा विचार मनांत न आणतांही जरी मी हा कांहीं फेरफार करूं लागलों, तरी त्यामुळें पृथ्वीच्या एका भागास जो लाभ होई त्याबद्दल तिच्या दुसऱ्या भागाची तितकी हानि होई. म्हणून वर्षाचें नियमन करतांना हवा तो फेरफार करण्याचें आपणास सामर्थ्य आहे म्हणून फुगून जाऊन तूं तसें कधीं करूं नको, व ऋतूंच्या क्रमांत पालट केल्यानें आपल्या मागें आपली चिरकाल ख्याति होईल, असाही विचार मनांत बाळगूं नको. जगाच्या दुःखाचें कारण होऊन विख्यातीस चढणें हें सुज्ञ मनुष्यास कधीं आवडत नाहीं. त्यांतून जर तूं अशा करण्यानें आपल्या देशच्या लोकांचें कल्याण करूं पाहशील तर तसें कृत्य तर तुला फारच अनुचित. इतर देशांची नागवण करून सगळा पर्जन्य आपल्या देशावर पाडण्याची हाव धरूं नको. आपणांस नील नदी पुष्कळ आहे. '

" मीं त्यास वचनपूर्वक सांगितलें कीं, ' हा अधिकार मला मिळाल्यावर तो चालविण्यांत मी त्यापासून तिळमात्रही ढळणार नाहीं.' नंतर स्नेहभावानें त्यानें माझा हात आपल्या हातानें धरला व मला जावयास सांगितलें. तो म्हणाला, ' आतां माझें चित्त स्वस्थ झालें. मला हवा होता त्याप्रमाणें शहाणा व सद्गुणी मनुष्य तूं मला मिळालास व तुला सूर्याचें वतन देण्यास मला फार संतोष वाटतो.' "

हें सर्व भाषण राजपुत्रानें एकाग्र चित्त करून ऐकिलें. परंतु राजकन्येस हसें आलें व पेक्युआचें तर हंसतां हंसतां पोट दुखूं लागलें. तें पाहतांच इम्लाक कवि म्हणाला, " बायांनो, ह्या विपत्तीप्रमाणें संसारांत दुसरी कोणतीही विपत्ति नाहीं,

तर तीस हंसणें हें निर्दयपण व मूर्खत्व होय. ह्या मनुष्याची विद्वत्ता व सुजनता हीं फारच थोड्यांत असतील, पण ही त्याची विपत्ति सर्वांवर येण्यासारखी आहे. जे प्रसंग आपणांवर कधीं गुदरतील याचा कांहींच नेम सांगवत नाहीं, त्या सर्वांत विवेचनशक्तीचा लोप हा मोठा भयंकर प्रसंग आहे."

हें ऐकतांच राजकन्येचें हंसें बंद झालें, व पेक्युआनें खालीं मान घातली. ह्या दोघांपेक्षां रासेलसास त्या ज्योतिष्याबद्दल फार वाईट वाटलें; व त्यानें इम्लाक कवीस विचारलें कीं, "मनाचे असे विकार पुष्कळांस होतात कीं कसें, व हे कशापासून उत्पन्न होतात?"

---

# भाग चवेचाळिसावा.

## अनावर कल्पनेचे भयंकर परिणाम.

इम्लाक कवि म्हणाला, "विचारशक्ति कितीदां विघडते हें जर मी सांगूं लागलों तर वरवर विचार करणारास माझें बोलणें खरें वाटणार नाहीं. फार तर काय, पण जर आपण अगदीं वास्तविकपणें पाहूं लागलों, तर बिघाड झाला नाहीं असें कोणाचेंच मन नाहीं. असा कोणीही नाहीं कीं, ज्याच्या कल्पनेचा पगडा त्याच्या विवेचनशक्तीवर कधीं कधीं बसत नाहीं, व ज्याचे विचार त्याच्या इच्छेनुरूप उद्भवतात व जातात. सर्व मनुष्यांच्या मनांत कधीं ना कधीं तरी मिथ्या कल्पना येतातच, व जें कधींही घडणार नाहीं तें खरोखरच होईल, असें समजून त्याची उगीच मिथ्या आशा किंवा भय सर्व धरतात. वेड लागणें म्हणजे कल्पनेची विवेचनशक्तीवर सत्ता बसणें. जोपर्यंत आपण ही कल्पनेची सत्ता पुरतेपणें बसूं देत नाहीं, तोंपर्यंत आपणास लागलेलें वेड लोकांच्या नजरेस येत नाहीं, व तें लागलें आहे असें लोक म्हणत नाहींत; परंतु जेव्हां ही सत्ता अनिवार होते, व बोलण्याचालण्यांतही स्पष्ट उमगते, तेव्हां आपण त्यास वेड असें म्हणतों.

"जे आपणांशीं फारच विचार करीत असतात त्यांस आपल्या मनास मिथ्या भास वाटूं देणें व कल्पनासृष्टींत निमग्न होणें हीं आवडूं लागतात. जेव्हां आपण एकांतीं असतों तेव्हां आपण केव्हां केव्हां मोकळे असतों, व विचार करून करून

कंटाळा आला असल्यामुळें असे विचार मनांत सहज येतात. ज्याला इंद्रियगोचर पदार्थांत सुख वाटत नाहीं, त्यास विचारांतच सुख वाटून तो नसती स्थिति आपणास कल्पितो; कारण, आपल्या स्थितींत वास्तविक ज्यास सुख वाटतें असा कोण आहे? कोणीही नाहीं. असा विचार करीत तो भडकून जातो, व आपल्यास अत्यंत आवडती स्थिति आपणांस खचित येईल असें समजून तो अलभ्य सुखाची आशा करितो व नसता अभिमान व्यर्थ बाळगतो. त्याच्या मनांत भावी आनंद एकावर एक घोळत असतात व जीं सुखें सृष्टिनियमांनीं किंवा संपत्तीनेंही देववणार नाहींत अशांत त्याचें मन रंगून जातें.

" असें होतां होतां कांहीं विशेष विचार मनावर दृढ होतात; त्यापुढें दुसरे विचार गोड न वाटून जेव्हां मनास कंटाळा येतो किंवा विचार करण्यास कांहीं नसतें, तेव्हां ते आवडते विचार मनांत येऊन वास्तविक होणाऱ्या गोष्टींचा विचार केल्यानें जेव्हां मनास गंमत वाटत नाहीं, तेव्हां त्या असत्यमय भासानें मनास सुख वाटतें. मग हळूहळू कल्पनेची सत्ता बसत जाते, व होतां होतां पुरतेपणीं बसते. मग भासही खऱ्या गोष्टीच वाटूं लागतात, खोट्या समजुतींचा पगडा मनावर बसतो, व स्वप्नप्राय आनंदांत किंवा दुःखांत मन निमग्न होऊन तसेंच सर्व आयुष्य जातें."

इम्लाक कवि आणखी म्हणाला, " हे राजपुत्रा, तुला जे एकांतवासाचे अनर्थ सांगितले ते हे. गोसाव्याच्या सांगण्यावरून झालेंच कीं, त्यानें सद्गुण वाढत नाहींत, व आतांच्या वृत्तांतावरून तर त्यानें ज्ञानही वाढत नाहीं असें ठरलें."

पेक्युआ म्हणाली, " तर यापुढें मी आपणास हबशी देशाची राणी कधींही मानणार नाहीं. जेव्हां मी एकटी असे तेव्हां दरबारचे रिवाज वगैरे सुधारण्याविषयीं मनांत आणीं; तेव्हां मी आपल्या मनांत उंच पदवीचे लोक मला लवताहेत व गरीब लोकांवर मी मेहरबानी करीत आहे असें कल्पीं. मी सोईवार जाग्यांत हवेच्या उठवण्यांत, डोंगरावर राया लावण्यांत, व अशा रीतीनें लोकोपकार करण्यांत इतकी गढून जाई कीं, तशांत जर राजकन्या आली, तर तिला मुजरा करण्याचेंही मला भान रहात नसे."

राजकन्या म्हणाली, " मीही आतांपासून आपणास धनगरीण कल्पिणार नाहीं. धनगरणीच्या स्थितीचा स्वस्थपणा व दुसरे सद्गुण हे माझ्या मनास पसंत वाटून मी आपल्या मंदिरांतच रानांतल्याप्रमाणें वारें सुटून मेंढ्या ओरडताहेतसें

कल्पीं, कधीं कधीं झार्डांत अडकलेल्या कोंकरांस सोडवीं, व कधीं कधीं लांडग्या-चर धांवे. गांवढेकरणीप्रमाणें मी पोशाक केला आहे व मी धनगरीण आहे, हा भास दृढपणें मजवर बिंबवण्याकारितां तो पोशाक मी घालून तोंडानें नळी वाजवित्यें आहे व माझ्यामागें मेंन्ध्या येताहेत, असें मी मनांत आणित्यें."

राजपुत्र म्हणाला, " तुझ्याहीपेक्षां विलक्षण तऱ्हेचा आनंद मी अनुभवीं. मला असें वाटे कीं, मी जें राज्य करीन त्यांत किंचितही न्यून असणार नाहीं. मी प्रजेस सर्व अन्यायापासून निवारून व त्यांचे सर्व दुर्गुण काढून त्यांस नेहमीं स्वस्थतेंत राखीन. हे विचार मनांत आल्यामुळें मी प्रजेस सुधारण्याचे पुष्कळ बेत काढिले व पुष्कळ उपयोगी कायदे बनविले. असे एकांतवासांत केल्यानें कधीं कधीं मौज वाटे व कधीं कधीं विचार करण्याचे श्रम पडत. पण माझ्या बापाचें व भावाचें मरण मनांत आणून त्या वेळेस त्याबद्दल मला कांहींच खेद वाटत नसे, हें आतां जेव्हां मनांत येतें, तेव्हां माझें मला विलक्षण आश्चर्य वाटतें."

इम्लाक कवि म्हणाला, "मनोराज्याचे असे प्रकार आहेत.पहिल्यानें ते आपणास व्यर्थ दिसतात, पण ते वारंवार मनांत आणल्यानें हळूहळू खरेच भासूं लागतात."

---

# भाग पंचेचाळिसावा.

## त्यांचें एका वृद्ध मनुष्याशीं संभाषण.

सूर्यास्ताचा समय येऊन ठेपला म्हणून तीं घरीं परत येण्यास निघालीं. त्या वेळेस चंद्रोदय झाला होता, व चंद्राचे किरण नील नदीच्या पाण्यावर चमकत होते. अशा मौजेंत तीं नील नदीच्या तिरानें चालत असतां त्यांनीं थोड्या अंतरावर एक वृद्ध मनुष्य पाहिला. ह्या मनुष्यास राजपुत्रानें पंडितांच्या समाजांत संभाषण करितांना बहुत वेळां ऐकिलें होतें;त्यावरून तो म्हणाला, "ह्या मनुष्यानें विचार करून आपलें मन शांत केलें आहे. तरी ज्योतिष्याप्रमाणें हा भ्रमिष्ट झाला नाहीं; तर आज या मनुष्याचें आपल्या स्वतःच्या स्थितीविषयीं काय मत आहे तें ऐकूं. येणेंकरून मनाचा उद्वेग हा तरुण मनुष्यासच होतो, व तो मनुष्यास पुढें होत नाहीं किंवा कसें, हें आपणांस स्पष्ट कळेल."

असें राजपुत्र बोलतो आहे तोंच तो वृद्ध मनुष्य त्यांजवळ आला व त्यानें त्यांस सलाम केला. त्यांनीं त्यास आपल्याबरोबर येण्यास बोलविलें. तो त्यांस अकस्मात् भेटला म्हणून परस्परांचें भाषण इकडच्या तिकडच्या गोष्टींविषयीं कांहीं वेळ झालें. त्यास पुष्कळ बोलणें आवडत होतें व तो मोकळ्या मनाचा होता, यास्तव त्याच्याशीं बोलत असतां त्यांस चालण्याचे श्रम कांहीं वाटले नाहींत. हीं आपणांस मान देतात असें समजून त्यास संतोष वाटला, आणि राजपुत्राच्या विनंतीवरून त्यांजबरोबर तो त्यांच्या घरीं गेला. त्यांनीं त्यास उंच जागा देऊन त्याच्यापुढें दारू व मुरंबा ठेवला.

राजकन्या म्हणाली, “ महाराज, आमच्यासारख्या तरुण व अज्ञानी लोकांस ज्याची कल्पनाही करवणार नाहीं, असें सुख आपणासारख्या विद्वान् मनुष्यास सूर्यास्तसमयीं चालण्यानें खचित होत असेल. तुम्ही जें जें पहातां त्याचें कारण व गुण तुम्हांस समजतात. नद्या कां वहातात, ग्रहांच्या प्रदक्षिणेस किती काळ लागतो, हें सर्व तुम्हांस कळतें. जें जें म्हणून तुम्हीं पाहतां त्यावर तुम्हांस विचार करतां येतो, व त्यावरून आपण इतर मनुष्यांहून किती श्रेष्ठ आहों, हें तुमच्या मनांत वरचेवर येत असेल.”

तो म्हणाला, “ बाईगे, नदीच्या कांठानें फिरावयास रंगेल तरुण लोकांसच सुख वाटेल. वृद्ध मनुष्यांस स्वस्थता असली म्हणजे पुष्कळ आहे. आतां मला जगांत नवें कांहींच राहिलें नाहीं. जेव्हां मी चोहोंकडे पहातों तेव्हां यापेक्षां सुखाच्या दिवसांत जें मीं पाहिलें आहे तें मला आठवतें. मी झाडाला टेकून उभा राहिलों म्हणजे त्याच झाडाच्या सावलींत मी पूर्वी आपल्या मित्राबरोबर नील नदीस जो वर्षाचे वर्षास पूर येतो त्याविषयीं विवाद केलेला मला आठवतो; व मनांत येतें कीं, मित्राची काय गति झाली तीच आपलीही होणार! मी वृद्धि-क्षय होणाऱ्या चंद्राकडे वर पाहिलें असतां ऐहिक वस्तूंची चंचल गति मनांत येऊन मला खेद होतो. सृष्टिविषयक सिद्धांतांत आतां मला फारशी मौज वाटत नाहीं; कारण, ज्या वस्तूंचा आणि माझा लवकरच वियोग होणार त्यांशीं मला काय करावयाचें आहे ? ”

इम्लाक कवि म्हणाला, “ ऐहिक वस्तूंत जरी तुम्हांस आनंद वाटत नाहीं, तरी जन्मास येऊन आपण दुसऱ्यांच्या उपयोगीं पडलों व प्रतिष्ठा मिळविली, हें मनांत येऊन तरी निदान तुम्हांस करमणूक खचित होत असेल, व सर्व जी तुमची वाखाणणी करतात तींत तुम्हांस संतोष वाटत असेल.”

पंडित दुःखाचा सुस्कारा टाकून म्हणाला, " मनुष्यास वृद्धत्व आल्यावर लोकांनीं त्याची स्तुति करुन त्यास वास्तविक कांहीं फायदा नाहीं. मला स्तुतीचें आतां कारण काय ? जर माझी आई असती तर तिला आपल्या पुत्राची कीर्ति झाल्यानें संतोष होता; अथवा जर माझी बायको असती तर तिला नवऱ्याची प्रतिष्ठा झाल्यानें प्रतिष्ठा वाटती. पण तसें कांहीं नाहीं. मी आपल्या मित्रांपैकीं व शत्रूंपैकीं एकटाच मागें उरलों आहे. मला आतां कशाचीही फारशी पर्वा राहिली नाहीं; कारण, माझ्या सुखदुःखाचा विभागी मजशिवाय दुसरा कोण आहे ? जोंवर तरुणपण असतें तोंवर पुढील सुखाची आशा असल्यामुळें व बहुत दिवस वांचण्याचा भरंवसाही असल्यामुळें आपल्या प्रशंसेंत सुख वाटतें; परंतु मजवर तर जरेचा अम्मल दिवसेंदिवस बसत चालला आहे; यास्तव लोकांनीं माझा द्वेष केला तर त्यांत मला दुःख नाहीं, आणि त्यांनी मजवर लोभ केला किंवा मला सन्मान दिला तरी त्यांमध्यें सुखही नाहीं; झाला तर मजपासूनच त्यांस लाभ होईल, मला त्यांपासून कांहींएक नाहीं. आतां संपत्ति व्यर्थ आहे, आणि मोठा हुद्दा असला तरी त्यामुळें दगदग मात्र होणार. मीं दिवस कसे घालवले, हें जेव्हां मी पाहतों तेव्हां आपलें कल्याण करून घेण्याच्या हातच्या सवडी मीं दवडल्या, पोरकट छंदांत पुष्कळ वेळ घालवला, व त्याहीपेक्षां पुष्कळ व्यर्थ रिकामपणांत घालवला, त्याचें स्मरण होऊन माझ्या जिवास खातें. मी पुष्कळ बेत करून ते जसेचे तसेच राहिले, व पुष्कळ हातीं धरलेले टाकले. एवढें बरें कीं, मी कांहीं घोर कर्म केलें नाहीं, त्यामुळें माझें मन शांत रहातें. मजसारख्यास जगांतील सुखदुःखें व्यर्थ आहेत, हें जरी मी जाणतों, तरी त्यांत माझें मन पूर्ववत् आसक्त होतें, तें काढण्यास मी प्रयत्न करतों; लीनता धरून, सृष्टिक्रमाप्रमाणें जो समय लवकरच येणार त्याची मी वाट पहातों; व येथल्यापेक्षां उत्तम स्थितीला पावून, जें सुख मला येथें मिळालें नाहीं, व जे सद्गुण मला येथें माझ्या आंगीं आले नाहींत, तें सुख व ते सद्गुण मला तेथें प्राप्त होतील अशी मी आशा धरून आहे."

इतकें बोलून तो उठून चालता झाला. त्याच्या भाषणानें सर्वांवर आयुष्याचें क्षणभंगुरत्व ठसून गेलें. राजपुत्रानें विचार केला कीं, यानें आपल्या स्थितीविषयीं जें सांगितलें त्याजवरून निराश होणें हें रास्त नाहीं; कारण, म्हातारपणांत मनुष्य उद्विग्न होतें, आणि जर मनुष्यास थकल्यावर स्वास्थ्य प्राप्त होतें, तर ज्वानीच्या दिवसांत सुख असलेंच पाहिजे. ज्याअर्थीं आयुष्याची संध्याकाळ शांत असते, त्याअर्थीं दुपार तेजस्वी असावी.

राजकन्येस वाटलें, कीं, म्हातारी मनुष्यें मत्सरी असतात, म्हणून तरुण लोकांची हिम्मत खचवून त्यांस बरें वाटतें. तिला माहीत होतें कीं, जिनगीदार आपल्या वारसाचा हेवा करतात; व पुष्कळ असे खोट्या बुद्धीचे असतात कीं, जें सुख ते भोगतात त्यांत त्यांस दुसरा वांटेकरी खपत नाहीं.

पेक्युआनें तर्क केला कीं, तो दिसतो त्यापेक्षां अधिक वयाचा असेल व तो श्रमिष्ट होऊन उदास झाला असावा; किंवा त्यावर कांहीं तरी संकट येऊन तो त्रासलेला असावा. ती म्हणाली, "सर्वांचा स्वभावच आहे कीं, जी आपली स्थिति तीच सर्वांची म्हणावी."

त्याची हिंमत खचवावी अशी इम्लाक कवीची इच्छा नव्हती. त्यांनीं आपआपलें समाधान केलेलें पाहून त्यास हंसूं आलें; आणि त्यांच्या वयांत आपला ऊर्जितकाळ असेल, असें जें त्यास वाटे व त्यांच्याप्रमाणेंच तो आपलें जें समाधान करी, त्याचेंही त्यास स्मरण झालें. त्यानें विचार केला कीं, जें ज्ञान यांस वयपरत्वें येईलच तें आजच सांगून ह्यांचें मन कशास उगीच दुखवा ? मग राजकन्या व पेक्युआ निजावयास गेल्यां. त्या सर्वांचे मनांत ज्योतिष्याचा श्रमिष्टपणा घोळत होता. त्यांनीं इम्लाक कवीस विनोदानें सांगितलें कीं, "आपण आज अधिकारारूढ होऊन तेवढें उद्यां सूर्यास अमळ उशीरानें उगवावयास सांगा."

---

# भाग शेचाळिसावा.

## राजकन्या व पेक्युआ यांनीं ज्योतिष्याची भेट घेतली.

त्या ज्योतिष्याविषयीं राजकन्या व पेक्युआ ह्यांचें संभाषण होऊन यांस तो फारच विलक्षण तऱ्हेचा मनुष्य वाटला, व विद्वत्ता, सौजन्य इत्यादि गुणांनीं मनासही फार आवडला; त्यामुळें त्याचा व आपला परिचय व्हावा ही त्यास मोठी उत्कंठा होऊन त्याविषयीं त्यांनीं इम्लाक कवीस विनंति केली.

हें काम अंमळ कठिण होतें; कारण, त्या शहरांत जरी पुष्कळ लोक युरोपांतून येऊन राहिलेले असून त्यांचे रिवाजही स्वदेशाप्रमाणेंच होते व तसेंच

दुसऱ्या ठिकाणाहून आलेले लोकही त्यांच्या रीतीला अनुसरून त्यांच्याप्रमाणेंच स्त्रियांशीं निःशंक व्यवहार ठेवीत, तरीही त्या ज्योतिष्याची भेट स्त्रियांनीं कधींही घेतली नव्हती; ह्यामुळें, तो स्त्रियांची भेट घेतो कीं नाहीं याविषयीं संशय होता. तरी त्यांनी आपला बेत साधण्याकरितां पुष्कळ युक्ति काढल्या. अडचणींत आलेल्या लोकांस तो मदत करीत असे, म्हणून तसा बहाणा करून त्याची भेट घेण्याविषयीं त्यांनीं विचार काढला. परंतु थोडी वाटाघाट झाल्यावर त्यांस असें वाटलें कीं, असें केल्यानें ओळख मुळींच होणार नाहीं. कां कीं त्याबरोबर पुष्कळ बोलावयास सांपडणार नाहीं. रासेलस म्हणाला, "हें खरें आहे, तरी याविषयीं मला आणखी बोलणें आहे. पहिल्यापासून माझी अशी समजूत आहे कीं, एकादा कोणी सद्गुणी असल्यामुळें तो जर दुसऱ्यांच्या कपटाकडे लक्ष देत नाहीं, तर तेवढ्यावरून लहान किंवा मोठ्या कार्याकरितां त्यास फसवणें, हें सर्व मनुष्यजातीला फसवणें आहे. फसवण्यानें मनुष्यावरचा विश्वास उडतो व परोपकाराची वृद्धि खचते. जो मनुष्य मोठा बुद्धिमान् असतो त्यास हलकट मनुष्यांची आपणास ठकवण्याची बुद्धि कळून आली असतां फार संताप येतो. तर तुमचें सोंग या ज्ञानसंपन्न मनुष्याच्या जेव्हां लक्षांत येईल तेव्हां त्यासही असाच राग येईल; व अशानें तुमच्यावर जो त्याचा अविश्वास होईल, त्यामुळें कदाचित् तो उपदेश करण्याचें बंद करील व धर्मही करणार नाहीं. असें झाल्या-वर मग मनुष्यमात्राविषयीं त्याच्या मनांत जी आढी पडेल ती कोणाच्यानें दूर करवेल व त्रासलेल्या त्याच्या अंतःकरणास पुनः कोणाच्यानें स्वस्थता देववेल?"

राजपुत्राच्या या भाषणावर कोणी उत्तर केलें नाहीं; व इम्लाक कवीस वाटलें कीं याची उत्कंठा कदाचित् नाहींशीही होईल. पण तसें झालें नाहीं. दुसऱ्या दिवशीं पेक्युआ म्हणाली कीं, 'ज्योतिष्याची भेट होण्याची मला एक बरीशी युक्ति सुचली आहे. ती अशी कीं, अरबाच्या बंदांत असतां केलेला अभ्यास पुढें चाल-विण्याची इच्छा धरून आलें आहे असें मी त्यास कळवीन. राजकन्येविषयीं त्यानें विचारलें तर तिनें सांगावें कीं, मी हिजबरोबर शिकणारी आहे; किंवा हिच्या येण्याचें कारण असें कीं, पुरुषाच्या भेटीस जातांना एकट्या बायकोनें जाणें व्यवहारास नीट दिसत नाहीं.' इम्लाक कवि म्हणाला, "मला असें दिसतें कीं, तुमचा त्यास लवकरच कंटाळा येईल. जे विद्यासंपन्न असतात त्यांस दुसऱ्यास शास्त्रांतील पहिल्या पहिल्या गोष्टी सांगत बसण्याचा त्रास येतो; तसाच ह्यासही

येईल; आणि जरी कदाचित् त्यानें त्या सांगितल्या तरी दुसरे पुष्कळ सिद्धांत व विचारही त्यांबरोबर तो सांगेल, व ते तुम्हांस समजतील किंवा नाहीं ह्याविषयीं मला मोठीच शंका वाटते." पेक्युआ म्हणाली, " त्या गोष्टींची काळजी तुम्हांस नको; मला त्याकडे न्या म्हणजे झालें. मला किती माहिती आहे हें तुम्हांस काय ठाऊक आहे? निदान एवढें तरी माझ्या स्वाधीन आहे कीं, तो जें म्हणेल त्यास मी संमतिच देईन, व तेणेंकरून माझें अज्ञान उघडीस येणार नाहीं."

ह्या संकेताप्रमाणें इम्लाक कवीनें ज्योतिष्यास कळविलें कीं, कोणी एक परदेशची ज्ञानेच्छु स्त्री आपली कीर्ति ऐकून आपणापाशीं विद्या संपादन करण्याची इच्छा धरून आली आहे. ही अपूर्व गोष्ट कळतांच त्यास आश्चर्य वाटलें, व कांहीं भाषण होऊन त्यानें तें मान्य केल्यावर जेव्हां त्यास समजलें कीं, उद्यां ती येणार आहे, तेव्हां आजचा दिवस केव्हां जातो अशी त्यास पराकाष्ठेची उत्कंठा लागली.

दुसऱ्या दिवशीं राजकन्या व तिची सखी उंची पोषाख करून इम्लाक कवीस बरोबर घेऊन ज्योतिष्याकडे गेल्या. त्याम आपणाशीं मोठ्या अदबीनें वागतांना पाहून ज्योतिष्यास आनंद वाटला. सलाम वगैरे होतांना ज्योतिषी गोंधळून गेला; पण संभाषण सुरू झाल्यावर जें त्यानें भाषण केलें त्यावरून इम्लाक कवीनें सर्व खरें सांगितलें, अशी त्याची खात्री झाली. ज्योतिषाचा अभ्यास करण्याचें तुमच्या मनांत कशानें आलें, असें त्यानें विचारल्यावरून पेक्युआनें पिरामिदां-जवळ झालेला सर्व वृत्तांत सांगून अरबाच्या बेटांत ती राहिली होती तेंही सांगितलें. तिनें सर्व वृत्तांत मनोवेधक रीतीनें निवेदन केला, व तेणेंकरून ज्योतिषशास्त्रावर बोलणें चाललें. तेव्हां पेक्युआनें तिला जें कांहीं माहीत होतें तें सर्व सांगितलें. त्यावरून हिची बुद्धि अलौकिक आहे, असें त्याला वाटलें, व या शास्त्राचा अभ्यास सोडूं नका म्हणून त्यानें तिला विनवून सांगितलें. याप्रमाणें ती त्याकडे वरचेवर जाई, व त्यासही तसाच त्यामुळें अधिकाधिक संतोष वाटे. त्यांशीं संभाषण करितांना त्याची उल्हासवृत्ति होऊन त्यास सुख वाटे. म्हणून तो कांहीं तरी करून त्यांस रमविण्यास पाही, कीं तशानें तरी त्यांचा समागम पुष्कळ दिवस व्हावा. त्यांस रिझविण्यांत तो तत्पर असे, तेणेंकरून हळू-हळू त्याच्या मनापासून चिंतेचें काहूर नाहींसें होऊं लागलें व ती जेव्हां परत जात तेव्हां ऋतुनियमनाचें पूर्वीचें काम त्यास करणें पडे, त्यामुळें त्यास दुःख होई.

ह्याप्रमाणें कित्येक महिने राजकन्येनें व पेक्युआनें त्याचें भाषण ऐकिलें; परंतु त्यावरून त्यास अजून पूर्वींचें वेड आहे कीं नाहीं, ह्याविषयीं त्यांचा निश्चय

होईना. त्या दोघी पुष्कळ वेळां बोलण्याच्या ओघांत ती गोष्ट आणीत, परंतु तो सहज त्यांच्या हिकमतींतून पार पडे; व त्यांना कितीही यत्न केले तरी दुसऱ्याच विषयावर बोलणें नेई.

त्यांचा परिचय पुष्कळ झाला, तेव्हां त्या त्यास इम्लाक कवीच्या घरीं बोलावून आणवूं लागल्या; व तेथें त्या त्याचा बहुमान करीत. हळूहळू त्याचें मन लौकिक गोष्टींत रमूं लागलें. तो नित्य लौकर येऊन पुष्कळ वेळ त्यांबरोबर राहूं लागला; व त्यांस अनुसरून झटून वागून आपल्यावर त्यांची मर्जी होईलसें करूं लागला. त्यांस आपली गरज लागेनाशी होऊं नये म्हणून तो कधीं कधीं कांहीं नव्या शास्त्राविषयीं वगैरे माहिती सांगे व जेव्हां ती कोठें मौजेनें किंवा कांहीं पाहण्याच्या उद्देशानें जाण्यास निघत, तेव्हां हाही त्यांबरोबर जाई.

त्याच्या ज्ञानाविषयीं व प्रामाणिकपणाविषयीं राजपुत्राची व राजकन्येची खात्री होऊन त्यांस वाटलें कीं, हा सांगेल तें खरें मानण्यास कांहीं चिंता नाहीं. मग त्याचा जो त्यांनीं इतका सन्मान केला, त्यापासून कांहीं भलत्याच आशा त्यानें मनांत बाळगूं नयेत, म्हणून त्यांनीं आपण कोण आहों, आपला इकडे येण्याचा हेतु कोणता, हें सर्व त्यास उघडपणें सांगितलें, व विचारलें कीं, आपणांस संसारांत उत्तम स्थिति कोणती वाटते ?

ज्योतिषी म्हणाला, "ह्या संसारांत ज्या अनेक स्थिती आहेत त्यांमध्यें अमुक एक चांगली म्हणून निवडून माझ्यानें सांगवणार नाहीं. एवढें मात्र मला ठाऊक आहे कीं, मी कांहीं ठीक निवड केली नाहीं. सर्व आयुष्य शास्त्राभ्यासांत घालवून त्यांतील सुखाचा अनुभव घेणें मला घडलें नाहीं; व ज्या शास्त्राचा मीं अभ्यास केला तीं अशीं आहेत कीं, त्यांचा संसारांत प्रायः फारच थोडा उपयोग होणार. मी ज्ञान संपादन करून साऱ्या सांसारिक सुखांस मात्र मुकलों. स्त्रीसमागमाचें प्रेमळ सौख्य, तसेंच मुलेंबाळें, इष्टमित्र इत्यादि सर्व मला अंतरलीं. इतरांपेक्षां मला कांहीं अधिक शास्त्रीय गोष्टी कळल्या म्हणावें तर त्यांच्यामुळें मला भय, अस्वस्थता वगैरे मोठीं अनिष्टें हींही त्यांबरोबर प्राप्त झालीं. परंतु जगांतील व्यवहारांत माझें मन अंमळ लागूं लागल्यापासून त्या गोष्टीही मला आतां पक्क्या खऱ्याशा वाटत नाहींत. अलीकडे कांहीं दिवस स्वच्छंदपणें गमतींत वेळ घालवूं लागल्यापासून मला असें वाटूं लागलें आहे कीं, मी शोध करून भ्रांतींत मात्र पडलों व पुष्कळ दुःख व्यर्थ भोगलें."

ज्योतिष्याचें वेड जात चाललेलें पाहून इम्लाक कवीस आनंद झाला. मग ऋतुनियमनाचा विसर पडेतोंपर्यंत व त्याची विवेचनशक्ति पुनः पहिल्याप्रमाणें प्रकट होईतोंपर्यंत त्यास ग्रहांविषयीं विचार करूं द्यावयाचा नाहीं असा त्यानें बेत केला.

ह्यानंतर ज्योतिषी त्यांचा परममित्र झाला, व त्यांच्या मसलतींत, विनोदांत वगैरे शिरूं लागला. सर्व त्याशीं अदबीनें वागत, व रासेलसास ज्ञानाची उत्कंठा असे. म्हणून तो सर्वदा कांहींना कांहीं तरी त्यास विचारीत असे. ह्याप्रमाणें त्यास नेहमीं उद्योग असे; तो व रासेलस सर्व दिवसभर सृष्टींतील कौतुकें वगैरे पाहात, व त्यामुळें संध्याकाळीं बोलण्यास पुष्कळ विषय असत, व दुसऱ्या दिवशीं काय करावें याचा बेत होऊन तीं निजावयास जात.

असें चालत असतां इम्लाक कवीस ज्योतिषी म्हणाला कीं, "मी सारा वेळ आनंदांत घालवूं लागल्यापासून, पूर्वींची जी माझी सृष्टीवरील सत्तेविषयीं भ्रांति होती ती आतां हळूहळू नाहींशी होत चालली आहे. पूर्वीं जें मत मला कोणासही खरें करून दाखवितां येत नसूनही खरें वाटे, तेंच आतां मला संदिग्ध दिसूं लागलें आहे. जर मी कदाचित् कांहीं वेळ एकटाच असलों, तर ते पूर्वींचे विचार मनांत येऊन माझी विवेचनशक्ति कुंठित होते खरी; पण राजपुत्राशीं भाषण करूं लागतांच व पेक्युआ मजकडे येतांच ते विचार नाहींतसे होऊन जातात. जसा एकादा भूताखेताची भीति बाळगणारा मनुष्य दिव्याचा उजेड असतां स्वस्थ असतो, व अंधारांत आपणांस भय तरी कशाचें वाटतें, असें त्यासच आश्चर्य वाटतें पण दिवा मालवतांच पुनः तींच भयें त्यास वाटूं लागतात, त्याप्रमाणें माझी स्थिति आहे; व मला एकादे वेळेस वाटतें कीं, मजवर सोंपविलेलें मोठें काम बळेंच विसरून असल्या मोठ्या कामाच्या हयगईचा दोष माथीं घेऊन तर मी उगीच स्वस्थ बसत नसेन ना? जर मी जाणूनबुजून दोषी होत असेन, व ह्या महत्त्वाच्या गोष्टीविषयीं माझी खात्री होत नसून केवळ अशानें आपली दगदग चुकते, येवढ्याच स्वार्थानें जर मी बळेंच खात्री मानीत असेन, तर केवढा दुर्धर दोष माझ्या शिरीं येईल?"

इम्लाक कवि म्हणाला, "पातकाचा जो मनास धाक वाटतो, त्याबरोबर असणाऱ्या कल्पनेच्या विकारासारखा बरा होण्यास कठिण, असा दुसरा विकार नाहीं.

हा विकार झाला असतां कल्पना व मन हीं दोन्हीं आपणास गांजतात, आणि कल्पनेचे भास व मनाचे हुकूम ह्यांत आपणास बरोबर निवड करतां येत नाहीं. जर कल्पनेंत अनीतीच्या गोष्टी आल्या तर त्या दुःख देतात, म्हणून आपण त्यांकडे मन लावीत नाहीं. पण जेव्हां उदासीनतेचे विचार करावेच लागतात, तेव्हां ते मनांत न आणण्यास कांहीं प्रतिबंधक रहात नाहीं; कारण, मनापासून त्यांस दूर करण्याची आपणांस भीति वाटते. म्हणून देवभोळे लोक नेहमीं उदास असतात, व उदासीन लोकही प्रायः देवभोळे होतात.

"पण जे विचार केवळ भित्रेपणामुळेंच तुमच्या मनांत येतात, त्यांनीं आपल्या विवेचनशक्तीचा लोप होऊं देऊं नका. जितकें कर्तव्य खरें असतें, तितक्या कर्तव्याच्या हयगईचा दोष आपणावर येतो; पण हें कर्तव्य फारच थोडे आहेसें विचारा—अंतीं तुम्हांस समजतें व प्रतिदिवशीं त्याचा खरेपणा तुम्हांस कमी कमी वाटतो; म्हणून मधून मधून जें खरें ज्ञान तुम्हांस होतें, तें दृढ करा; व तुमचे तुम्हांसच मध्यें मध्यें खोटे वाटणारे संशय ते तुमच्या मनांत आले असतां, त्यांचें खंडन करण्यास सिद्ध होऊं नका; तर ते आले असतां कांहीं तरी कृत्यांत मन गुंतवा, अथवा पेक्युआ हिजशीं संभाषण करा. आणखी हा विचार तुम्ही मनांत पक्का वागवून ठेवा कीं, सर्व मनुष्यजातीच्या मानानें पाहूं लागलें तर तुम्ही केवळ एका रजःकणासारखे आहां; व तसेंच तुम्हांवर कांहीं अलौकिक ईश्वरी प्रसाद व्हावा, किंवा अतिशय दुःखें तुम्हांस भोगावयास लागावीं अशी योग्यता किंवा दुष्टपणाही तुमच्या अंगीं नाहीं."

---

# भाग सत्तेचाळिसावा.

## राजपुत्र येऊन बोलण्यास नवा विषय निघाला.

ज्योतिषी म्हणाला, "हें सर्व माझ्या मनांत बहुत वेळां येऊन गेलें आहे. परंतु अनिवार कल्पनेच्या योगानें माझी विवेचनशक्ति बुजून जाऊन कांहीं

गोष्टीविषयीं पक्का विचार करून ती खरी किंवा खोटी ठरविली असतांही माझ्या मनास संदेह वाटे. परंतु अलीकडे तुमच्या सहवासामुळें माझें मला आतां स्पष्ट दिसतें कीं, एकांतवासांत भासमय कल्पना मनांत बाळगून व्यर्थ मीं स्वस्थतेची हानि केली होती. उदास मनुष्यास आपली दुःखें दुसऱ्यास सांगण्याचा त्रास असतो, तरी तीं मीं तुला मात्र सांगितलीं; दुसरे पुष्कळ माझे मित्र होते, व त्यांपैकीं कोणास सांगितली असतीं तर ते खचित त्यांचें निवारणही करिते. मला जसें वाटत होतें तसेच तुझेही विचार आहेत हें पाहून मला आनंद वाटतो, व मी खचित जाणतों कीं, तूं भ्रमिष्ट नाहींस व दुसऱ्यास भ्रमांत घालावें अशी तुझी इच्छाही नाहीं. इतके दिवस जो माझ्या मनाला भ्रम जडला होता तो कांहीं काळानें निघून जाऊन पुढील आयुष्य स्वस्थतेंत घालवण्यास सांपडेल अशी मला आशा आहे. ''

इम्लाक कवि म्हणाला, '' तुम्ही जे इतके विद्यासंपन्न व सदाचरणी आहां, त्या तुम्हांस स्वस्थतेच्या लाभाची खचित खात्री असेल. ''

इतकें चाललें आहे तों राजपुत्र, राजकन्या व तिच्या दासी हीं सगळीं आलीं; व राजपुत्रानें विचारिलें कीं, उद्यांकरितां कांहीं करमणूक काढली आहे कीं नाहीं? त्यावर निकाया म्हणाली, '' सर्वांची गोष्ट अशीच आहे कीं, आपली आतांची स्थिति बदलून दुसरी चांगली येईल अशा विचारांतच सुख वाटावें. वास्तविक पहातां यांत कांहींच अर्थ नाहीं; कारण दुसरी स्थिति आली असतां पुनःही तशीच स्थित्यंतराची इच्छा होते. अजून जगांतल्या सर्व वस्तु मीं पाहिल्या नाहींत, तर आजपर्यंत पाहिलें नाहीं असें कांहीं तरी उद्यां पहाण्यास मिळालें असतां मौज होईल. ''

रासेलस म्हणाला, '' मनुष्यास समाधान होण्यास वैचित्र्याची इतकी आवश्यकता आहे कीं, तींच तींच सुखें पुनः भोगल्यानें मला आनंदगुहेचाही कंटाळा आला; तरी मी जेव्हां मनांत आणीं कीं, सेंट आथोनीचे महंत तर सर्व आयुष्य एकसारख्या समाधानवृत्तीनें कष्टांत घालवीत, तेव्हां मी सुखांत असतांही पहा कसा आपणास दुःखी मानतों, असें म्हणून मी आपली निर्भर्त्सना करी. ''

इम्लाक कवि म्हणाला, ''ह्या लोकांस मठांत काळ घालवूनही हबशी राजपुत्रापेक्षां सुख होतें. तें जें जें करतात त्यांत त्यांचा चांगला हेतु असतो. ते जें करतात तें त्यास आवश्यक असतें म्हणून त्यांस टाकवत नाहीं व शेवट त्याचें

सत्फलही त्यांस प्राप्त होतें. ईश्वरभजन करण्यानें ते परलोकाकरितां आपणांस सिद्ध करतात; व तो समय जसजसा जवळ येतो तसतसे ते अधिक सिद्ध होत जातात. त्यांचा वेळ अगदीं बांधलेला असतो, व एक कर्तव्य संपतें तों दुसरें करावयाचें असतेंच. यास्तव आपण करतों याचें परिणामीं काय होईल कोण जाणें, असा विकल्प त्यांच्या मनांत येत नाहीं व एकसारखा सुस्तपणांत वेळ न गेल्यानें त्यांना कंटाळाही येत नाहीं. दर घटकेस कांहीं ना कांहीं तरी नेमून ठेविलेलें असतेंच. तसेंच त्यांच्या नित्यकृत्यांत त्यांस समाधानच वाटतें; कारण, हें सत्कर्म आहे व ह्यामुळें अक्षय सुखाची आपणांस प्राप्ति होईल अशी त्यांची खात्री असते."

राजकन्या म्हणाली, "तुम्ही असें समजतां काय, कीं मठांत राहून व्रत-पालन करण्यांत कांहीं विशेष श्रेयस्कर आहे? जो लोकांत वागून गरिबास धर्म करितो, अज्ञानांस विद्यादान करितो, किंवा दुसऱ्या अनेक प्रकारांनीं लोकहित करितो, त्यासही परलोकसाधन होत नाहीं काय? तफावत एवढीच कीं, तो महंताप्रमाणें आपणांस दंड करून घेत नाहीं, व कोणास दुःख न देतां जें सुख भोगण्यास त्यास सांपडतें तें तो भोगतो."

इम्लाक कवि म्हणाला, "ह्याविषयीं विद्वानांचीं अनेक मतें आहेत. व ह्यांचा निर्णय करतांना सदाचरणी लोकही भ्रांतिजलांत सांपडले आहेत; यास्तव याविषयीं मला निश्चयात्मक कांहींच सांगतां येत नाहीं. जो कोणी जगांत वागून सन्मार्गानें चालतो त्याची मठांत राहून सदाचरणी असणाऱ्यापेक्षां शाबास खरी; कारण लोकांत वागत असून मोहपाशांत न सांपडणारा थोडा! म्हणून ज्याच्यानें अशा वासना जिंकत नाहींत, त्यानें संसार सोडून मठाचा आश्रय केला असतां कांहीं वाईट नाहीं. कित्येकांस परहित करण्याचें सामर्थ्य नसतें, व तसेंच दुःख देणेंही पण त्यांच्या हातीं नसतें. पुष्कळ दारिद्र्याच्या पीडेनें बेजार झालेले अस-तात, व धन मिळविण्याविषयीं केलेले कष्ट व्यर्थ झालेले पाहून ते त्याची आसच सोडून देतात, तसेंच पुष्कळांस म्हातारपणामुळें व रोगामुळें संसारांतील दगदग सोसेनाशी होते. मठांत राहिल्यावर दुर्बळास वगैरे सुखाचा आसरा सांपडतो, थकलेल्यास विश्रांति मिळते, व जे नैमिष्ठ असतात त्यांस व्यत्ययाशिवाय खुशाल विचार करावयास सांपडतें. ईश्वरभजनाच्या व विचार करण्याच्या ज्या मठ इत्यादि जागा, त्या मनुष्यास स्वभावतःच अशा पसंत वाटतात कीं, त्या ठिकाणीं

राहून, सर्वसंगपरित्याग करून, आपणाप्रमाणें थोर बुद्धीचे चार मित्र घेऊन, आयुष्याचा शेवट सत्कर्मांत करावासें वाटत नाहीं, असा बहुधा कोणी नसेल ! ''

पेक्युआ म्हणाली, ''असें करण्याचें मीं बहुत वेळ मनांत आणलें, व राजकन्याही मला कितीएकदां म्हणाली आहे कीं, लोकांत वागत असतांच मला मरण आलें तर तें माझ्या मनाजोगतें होणार नाहीं.''

इम्लाक कवि म्हणाला, ''ज्यांत कोणास पीडा होत नाहीं व दुराचार होत नाहीं अशीं सुखें भोगण्यास कांहीं चिंता नाहीं, हें सर्वांस संमत आहेच. सुख भोगल्यानें जें कांहीं अनिष्ट घडतें तें परिणामीं असतें. सुख भोगण्यांत त्याच्या स्वतःपासून कांहीं वाईट नाहीं; पण त्यापासून अनिष्ट असें होतें कीं, आपली ह्या जगांतील स्थिति आपण क्षणिक मानीत असतांही ती त्यामुळें आपणास आवडूं लागते; तसेंच आपणास पुढें होणारें जें कांहीं अनंत दुःख किंवा सुख, त्याकडे आपलें मन लागत नाहीं, म्हणजे अनंत सुखदुःखांचा काळ प्रत्येक क्षणीं जवळ जवळ येत आहे, व ज्याचा आरंभ झाल्यावर त्यास अंत कधींच नाहीं, त्याकडे आपलें मन लागत नाहीं. देहदंड वगैरे करण्यांत कांहीं सत्कर्म नाहीं, पण त्या कर्मांचा इतका उपयोग आहे कीं, इंद्रियजन्य सुखाच्या वासना तें काढून टाकतें. पुढें जें अनंत सुख प्राप्त होणार व ज्याची आपण सर्व इच्छा बाळगतों, त्यास अटकावच कांहीं नाहीं व भयही कशाचें नाहीं.''

राजकन्येचें बोलणें बंद झालें; मग रासेलस ज्योतिष्यास म्हणाला, ''आम्हांस कांहीं नवी मौज दाखविण्यासारखी आणखी आहे काय ? ''

ज्योतिषी म्हणाला, ''तुमची ज्ञान संपादण्याची इच्छा इतकी विशाळ आहे कीं, कांहीं नवी मौज तुम्हांस दाखविणें म्हणजे कठिण काम आहे. तथापि जिवंत मनुष्यांपासून जी तुमची करमणूक होत नाहीं ती मेलेल्यापासून आज होईल. या देशांत ज्या अपूर्व वस्तु पाहण्याजोग्या आहेत, त्यांपैकींच येथल्या प्राचीन काळच्या कबरी आहेत. ह्यांत फार पुरातन काळच्या लोकांचीं प्रेतें ठेविलीं आहेत. त्यांस कांहीं गुणकारक द्रव्यें लावल्यामुळें तीं न कुजतां पहिल्याप्रमाणें राहिलीं आहेत.''

रासेलस म्हणाला,''ह्या पाहण्यापासून काय करमणूक होईल ती होवो, मला तर कांहीं वाटत नाहीं. तथापि ज्याअर्थी दुसरें कांहीं पाहण्यासारखें नाहीं, त्याअर्थी आज हेंच पाहूं; व व्यर्थ वेळ घालवूं नये म्हणून जसा मी कधीं कधीं कांहीं उगीच विचार करीत बसतों, त्यांपैकींच हें समजेन.''

मग त्यांनीं पैसा देऊन कांहीं स्वार आपणांबरोबर घेतले व सर्वजण कबरीकडे गेलीं. तीं थडग्यांच्या गुहांत उतरत होतीं, तेव्हां राजकन्या पेक्युआ दासीस म्हणाली, "आपण आज पुनः पूर्वीप्रमाणें प्रेतांच्या जागीं जात आहों, व तूं खचित आमच्याबरोबर येणार नाहींस तर आज तरी आम्ही परत येऊं तोंपर्यंत सुरक्षित ऐस म्हणजे झालें." पेक्युआ म्हणाली, "छे, आज मी नाहीं मागें राहणार, मी तुझ्या आणि राजपुत्राच्यामध्यें चालेन."

मग तीं सर्व आंत उतरलीं; आणि नागमोडी वाटेनें खोल गुहांत गेल्यावर त्यांनीं दोहोंबाजूंनीं ओळीनें ठेविलेलीं प्रेतें पाहिलीं. तें सर्व पाहून सर्वांस मोठा चमत्कार वाटला.

---

# भाग अठ्ठेचाळिसावा.

## इम्लाक कवीचें आत्म्याच्या स्वरूपाविषयीं संभाषण.

राजपुत्र म्हणाला, "कांहीं लोक प्रेतांचें दहन करतात, कांहीं तीं भुईंत पुरतात व सर्व लोक चालीप्रमाणें क्रिया करून कोणत्या तरी रीतीनें त्यांस दृष्टीआड करितात. असें असून मिस्र देशचे लोकच इतका खर्च करून प्रेतें राखून ठेवतात याचें कारण काय असावें?"

इम्लाक कवि म्हणाला, "जुन्या चालीचें मूळ पाहूं लागलें असतां फार करून सांपडत नाहीं; कारण, ज्या कारणास्तव एकादी चाल निघते, ती तें कारण नाहींसें झाल्यावरही राहते. आतां ज्या विलक्षण वेडगळ चाली असतात, त्यांचें कारण पाहूं जाणें अगदीं व्यर्थ आहे. कारण, जी चाल समजुतीनें मुळीं काढलेली नव्हे, तिचें सयुक्तिक कारण कसें सांपडेल? माझी पूर्वीपासून अशी समजूत आहे कीं, प्रेतें मसाले लावून जे लोक राखून ठेवतात, ते आपल्या इष्टमित्रांच्या मृत-देहाची दुर्दशा होऊं नये अशा बुद्धीनें ठेवीत असावे; आणि हेंच कारण समर्पक दिसतें. दुसरें असें कीं, अशाच आस्थेनें सर्वांचीं शरीरें ठेवूं लागल्यास तसें करणें अशक्य आहे. जर सर्वांचींच प्रेतें मसाले लावून ठेविलीं असतीं, तर जिवंत

मनुष्यांस राहण्यास जागाच न उरती! मला वाटतें, श्रीमान् व थोर लोकांचीं प्रेतें मात्र त्यांनीं राखून ठेविलीं व बाकीचीं सर्व होतील तशीं होऊं दिलीं.

तथापि सर्व लोक असें म्हणतात कीं, मिसरी लोक येवढ्याकरितां प्रेतें राखून ठेवीत कीं, जोंपर्यंत शरिराचा नाश झाला नाहीं तोंपर्यंत त्यांत आत्मा राहतो, अशी त्यांची समजूत होती व असें केल्यानें मृत्यु येणार नाहीं असें त्यांस वाटे.

निकाया राजकन्या म्हणाली, " काय ! मिसरी लोक इतके शहाणे असून आत्म्याविषयीं त्यांची अशी वेडगळ समजूत असेल ? जर देहाशीं वियोग झाल्यावर आत्मा राहील, तर शरिराच्या व्यापारांनीं त्यास काय होणार ? "

ज्योतिषी म्हणाला, " जेव्हां धर्म चांगला होता त्या वेळेस मिसरी लोकांच्या समजुती अशाच असल्या पाहिजेत. जरी प्राचीन काळापेक्षां आतां पुष्कळ गोष्टी उघडकीस आल्या आहेत, तरी अजून आत्म्याचें खरें स्वरूप कळतच नाहीं. कोणी अद्यापि म्हणतात कीं, आत्म्यास जडत्वही कदाचित् असेल; तरी तो अमर आहे असेंही पण तेच मानतात. "

इम्लाक कवि म्हणाला, " कोणी आत्मा जड आहे असें म्हणतात, हें मला ठाऊक आहे; पण ज्या मनुष्याला, लेशमात्र म्हणून विचारशक्ति आहे तो असें कधीं म्हणणार नाहीं. कारण, अतिशय विचार करून ज्ञात्यांनीं मनाचें अजडत्व सिद्ध केलें आहे; आणि समंजस लोकांच्या विचारावरून व शास्त्रांच्या सिद्धांताप्रमाणें एकमतें जडास सचेतनत्व नाहीं हें सिद्ध आहे. "

द्रव्यास चेतना आहे. किंवा प्रत्येक परमाणु विचारशक्तियुक्त प्राणी आहे, हें कधीं कोणींही मानलें नाहीं; आणि जर कांहीं द्रव्य मात्र अचेतन म्हणावें, तर मग बाकीचें सचेतन म्हणण्यास आधार कोणता ? द्रव्याद्रव्याची भिन्नता केवळ आकार, वजन, गति, गतीची दिशा, इत्यादि वस्तूंत मात्र असूं शकेल; पण ह्यापैकीं कोणत्या गुणाचा कोणत्या प्रकारें सचेतनत्वाशीं संबंध असणार ? गोलत्व किंवा चौकोनीपणा; प्रवाहीपणा, महत्त्व किंवा सूक्ष्मत्व, त्वरित गति किंवा मंद गति; हें सर्व द्रव्याच्या अस्तित्वाचे प्रकार आहेत, व यांपैकीं कोणाचाही सचेतन धर्माशीं बिलकूल संबंध नाहीं. जर द्रव्याचा स्वभाव अचेतनत्व आहे, तर त्यास सचेतनत्व देण्यास कांहीं फेरफारच केला पाहिजे; आणि जे म्हणून फेरफार त्यास करतां येतील, ते सर्व सचेतनत्वधर्मापासून निराळे आहेत. "

ज्योतिषी म्हणाला, "हें खरें; पण देहात्मवादी लोक म्हणतात कीं, आपणांस ठाऊक नाहीं असे गुण कदाचित् द्रव्याच्या अंगीं असतील, कोणास माहीत? तर मग कसें?"

इम्लाक कवि म्हणाला, "आपणांस कांहीं गोष्टी ठाऊक नाहींत एवढ्यावरून जें स्पष्ट दिसतें तेंही जो खोटें म्हणून म्हणतो, व जो सर्वांनीं मानलेल्या गोष्टीस ती कदाचित् अन्यथा असेल, असें म्हणतो, त्यास विचारशक्ति नाहीं असें समजावें. द्रव्याविषयीं जें काय आपणांस माहीत आहे, तें हें कीं, तें जड व अचेतन आहे. ही गोष्ट अनुभवसिद्ध असतां, आपणांस कांहीं गोष्टी माहीत नाहींत म्हणून जर ती खोटी म्हणावी तर. यापुढें मनुष्याची विचारशक्तिच चालणें नाहीं. जें आपणांस माहीत नाहीं त्यावरून जर ज्ञात गोष्टींविषयीं आपण निर्णय करूं लागलों, तर कोणासही—फार तर काय? सर्वज्ञात्या ईश्वरासही कांहींच निश्चित म्हणून सांगतां यावयाचें नाहीं!"

ज्योतिषी म्हणाला, "तुमच्या म्हणण्यानें ईश्वराची शक्ति लहान म्हटलीशी होते. परंतु हें म्हणणें आपणां मनुष्यांस उचित नाहीं."

इम्लाक कवि म्हणाला, "एक म्हणणें दुसऱ्या म्हणण्याशीं जमत नाहीं; एक सिद्धांत एकाच वेळीं खरा आणि खोटा असत नाहीं; एकच संख्या सम व विषम होऊं शकत नाहीं; किंवा ज्यास सचेतनत्व देतां येत नाहीं त्यास सचेतन कोणाच्यानेंही करवणार नाहीं; असें जर म्हटलें तर ईश्वराच्या अनंत शक्तीस लहान म्हटल्याचा दोष येतच नाहीं."

राजकन्या म्हणाली, "हें खरें असो किंवा खोटें असो, हें मोठ्या उपयोगाचें आहेसें मला वाटत नाहीं. पण मी विचारतें कीं, तुम्ही जें आतां आत्म्याचें अजडत्व बरेंच स्थापित केलें, त्या गुणामध्येंच त्याचें अविनाशित्वही येतें तें काय?"

इम्लाक कवि म्हणाला, "अजडास कोणते गुण आहेत ते आपणांस कळत नाहींत, पण कोणते नाहींत तेवढे मात्र समजतात, म्हणून त्याविषयीं साफ कांहीं म्हणवत नाहीं. ज्या कारणांनीं द्रव्याचा नाश होतो, त्या कारणाचें कार्य अजडावर होत नसल्यामुळें त्यांत सततत्व स्वाभाविकच आहे, अशी कल्पना आहे. जी वस्तु नश्वर असते तिचा नाश तिचे परमाणु विभक्त झाल्यानें होतो. यावरून, जें–परमाणुघटितच नव्हे, व म्हणून अर्थात् ज्यांची विघटना संभवत नाहीं

त्याचा स्वभाव, विकार किंवा नाश कसा होऊं शकेल, ह्याची आपणांस कल्पना होत नाहीं. "

रासेलस म्हणाला, " कोणताही पदार्थ स्थूलत्वविरहित असा मला मनांतच आणतां येत नाहीं. स्थूलत्व असलें म्हणजे त्यास परमाणु असलेच पाहिजेत, व आतां तुमच्याच बोलण्यावरून झालें आहे कीं, ज्यास परमाणु आहेत त्याचा नाश होऊं शकतो. "

इम्लाक कवि म्हणाला, "अरे, तूं जर आपल्या कल्पनांविषयीं अंमळ विचार करशील तर हें तुला इतकें विलक्षण वाटणार नाहीं. द्रव्य जसें खरें आहे तशाच कल्पनाही खऱ्या आहेत, तरी त्यांस स्थूलत्व कोठें आहे ? पहा, तूं मनोरा मनांत आणलास तर पृथ्वीच्या पृष्ठावर जसा मनोरा खरा आहे तशीच मनोऱ्याची कल्पनाही तुझ्या मनांत आलेली खरीच आहे, कांहीं मिथ्या नव्हे. तर आतां सांग बरें कीं, मनोऱ्याची कल्पना धरण्यास मनाची किती मोठी जागा लागते, व तीच कल्पना जर धान्याच्या कणाची मनांत धरिलीस तर किती जागा कमी लागते ? कांहीं नाहीं, जितकी मनोऱ्यास तितकीच धान्याच्या कणाला. तसेंच सांग बरें कीं, मनोऱ्याच्या कल्पनेचे परमाणु होऊं शकतील किंवा धान्याच्या कणाच्या कल्पनेचे परमाणु होऊं शकतील ? कोणाचेही होणार नाहींत. जे कार्याचे धर्म तेच कारणांचे; जे विचाराचे तेच विचारशक्तीचेही होत."

राजकन्या म्हणाली, "पण ज्या ईश्वरानें आत्मा उत्पन्न केला त्यास त्याचा नाशही करवेल. "

इम्लाक कवि म्हणाला, " करवेल खरा; कारण जरी तो नश्वर आहे तरी अनंत काल राहण्याची शक्ति ईश्वरानें दिल्याशिवाय त्यास नाहीं. शास्त्रावरून एवढें कळतें कीं, नाशाचीं कारणें आंगीं नसल्यामुळें तो अनश्वर आहे. शास्त्राची गति इतकीच. ज्यानें आत्म्यास उत्पन्न केलें त्याच्यानें त्याचा नाश करवेल कीं नाहीं हें मनुष्यानें सांगवणार नाहीं. "

इतकें संभाषण होऊन सर्वजण क्षणभर तटस्थ झालीं. मग राजपुत्र म्हणाला, " पुरें ! पाहिली प्रेतभूमि; चला आतां परत जाऊं, ज्या कोणास हें ज्ञान नाहीं कीं, आपण अमर आहों, आणि जो आत्मा चित्स्वरूप आहे तो अनंत कालापर्यंत तसाच राहील, त्यास हें स्थान किती भयाण वाटत असेल ! पुरातन कालचे ज्ञाते महान् राजे वगैरे जे हे येथें पडले आहेत, ते आपणांस सावध

करताहेत कीं, जीवित क्षणिक आहे, हें सर्वकाळ ध्यानांत वागवा ! हेही कदाचित् आपणाप्रमाणेंच संसारांतील उत्तम स्थितीची निवड करण्यांत गुंतले असतांना मृत्यूचे झडपेंत सांपडले असतील, कोणी नाहीं म्हणावें ! ''

राजकन्या म्हणाली, '' उत्तम स्थितीची निवड करण्यांत आतां मला मोठें हांशील वाटत नाहीं. पुढें मी मरणानंतर होणाऱ्या अनंत सुखदुःखाविषयीं मात्र विचार करीन. ''

मग सगळीं गुहांतून बाहेर पडलीं, व स्वार बरोबर घेतल्यामुळें बिनधोक केरो शहरांत परत आलीं.

---

# भाग एकुणपन्नासावा.

## समाप्ति कीं जींत कांहींच शेवटास पोहोंचलें नाहीं.

असें चालत असतां नील नदीस पूर येण्याचा समय येऊन ठेपला. तीं कबरी पाहून परत आल्यापासून कांहीं दिवसांनीं आणखी पूर चढत चालला. सर्व देश जलमय झाल्यामुळें त्यांस दुसऱ्या ठिकाणीं जाण्याचें नव्हतें; पण त्यांस बोलण्यास पुष्कळ होतें म्हणून, त्यांनीं ज्या तऱ्हेतऱ्हेच्या संसारांतल्या स्थिति पाहिल्या होत्या, त्यांच्या तुलना करून, व प्रत्येकानें सुखी होण्याचे निरनिराळे बेत काढले होते, त्यांच्याविषयीं विचार करून, आपलें मनोरंजन करून घेतलें.

पेक्युआ दासीस सर्वांमध्यें सेंट अँथनीचा मठ आवडला, व तिनें मनांत आणलें कीं, यांत सदाचरणी तरुण स्त्रियांस आश्रय देऊन आपण त्या मठामध्यें मुख्य असावें. तिला सुखाची व्यर्थ आशा करून कंटाळा आला होता, म्हणून कांहीं तरी सतत राहणारी स्थिति मिळाली तर बरें, असें तिला वाटलें.

राजकन्येस सर्वांत ज्ञान अमूल्य वाटलें. तिनें असा बेत केला कीं, पहिल्यानें स्वतः सर्व शास्त्रें शिकून नंतर विद्वान् स्त्रियांची एक पाठशाळा घालावयाची. मग त्या शाळेचें अध्यक्षत्व आपणावर घेऊन वृद्ध स्त्रियांशीं संभाषण करण्यानें व तरुण

स्त्रियांस शिक्षण देण्यानें ज्ञानसंपादन व विद्यादान हीं दोन्हीं करावयाचीं; कीं, असें केल्यानें पुढील होणाऱ्या स्त्रियांस हि स्त्रियांचा शहाणपणा व सदाचरण यांविषयींचा कित्ता व्हावा.

राजपुत्रास वाटलें कीं, आपणांस एक लहानसें राज्य असावें; व त्यांत आपण स्वतः न्यायाधीश होऊन सर्व राज्यावर देखरेख ठेवावी. परंतु राज्याच्या सीमा कोठवर कराव्या ह्याचाच त्यास निश्चय होईना, व आपल्या राज्यांत लोक किती असावे, ह्याचेंही त्यास मान बसवेना.

इम्लाक कवीस व ज्योतिष्यास चालेल तसेंच चालूं द्यावें, कांहीं अमुकच म्हणून करण्याची हाव व्यर्थ करूं नये, असें वाटलें.

असे एकापेक्षां एकेकाचे बेत झाले, पण ते सिद्धीस जाणार नाहींत, हें त्यास पक्कें समजलें होतें. आतां काय करावें म्हणून कांहीं वेळ त्यांनीं विचार करून शेवटीं बेत केला कीं पूर कमी झाला, म्हणजे हबशी देशासच परत जावें.

राष्ट्रीय ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम ३००५
विभाग का.वा
क्रमांक २२१५
नों. दि. २००५
वाचनालय

समाप्त.

---

ग्रं. सं. पुणे, वाचनालय शाखा,
ग्रं. क्र. ९५६४ नों. दि. ........
वि. का. का क्र. ........
IRBK-0101564

# शुद्धलेखनाचा राजमार्ग.

## या पुस्तकांत विशेष काय आहे ?

१ या नवीन पुस्तकांत व्याकरणाचे शुद्धलेखनावरील क्लिष्ट नियम व शुद्ध शब्दांचीं अनेक उदाहरणें दिलीं नाहींत. पण नेहमीं चुकणारे महत्त्वाचे शब्द वापरून गोष्टी तयार केल्या आहेत.

२ गोष्टीचे सहाय्यानें घरच्याघरीं आपलें शुद्धलेखन कसें सुधारावें याचे उत्तम उपाय या पुस्तकांत सांगितले आहेत.

३ ट्रेनिंगचे विद्यार्थी व विद्यार्थिनी, मॅट्रिक परीक्षेंत मराठी विषय घेऊन बसणारे विद्यार्थी, मराठी सहावी इयत्तेच्या परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थिनी, या सर्वांना हें पुस्तक म्हणजे शुद्धलेखनाचा एक विनखर्ची घरगुती शिक्षक आहे.

४ वर्गांत व शाळेंत मनोरंजक रीतीनें शुद्धलेखनासारखा विषय कसा शिकवावा, हें ह्या पुस्तकांत फार मार्मिक रीतीनें दाखविलें आहे.

५ विद्यार्थी, शिक्षक व शाळांचे चालक या सर्वांना वरील पुस्तक अत्यंत महत्त्वाचें आढळून येईल.

६ लेखक, रिपोर्टर, कंपॉझिटर्स, मराठी भाषा शिकणारे यूरोपियन मिशनरी विद्यार्थी, यांना हें पुस्तक अत्यंत उपयुक्त आहे.

या पुस्तकांतील प्रयोग करून सर्वांनीं आपलें लेखन शुद्ध करावें. किं. ८४. ट. ख. ८१.

पत्ता—म्यानेजर चित्रशाळा, पुणें सिटी.

खारे